# कल्हणकृत राजतरंगिणींतील सौंदर्यस्थळें

लेखकः—गणेश रामकृष्ण हवलदार, बी. ए. एल्.एल्. बी.

* स्मरूं फणारत्नचारु हरकल्प महातरू ॥
‡ तरंगिणी कल्हणाची अनायासें चला तरूं ॥१॥

महाकवि होमर, श्रीमान व्यास आणि मोरोपंत, श्रीहर्ष, महामुनि वाल्मीकि व महाकवि शेक्स्पियर यांचा परिचय करून देण्याकरतां इलियडचें कवितात्रद्ध भाषान्तर, भारतामृत, नैषधसार, रामायणामृत, व शेक्स्पियरच्या नाटकांतील सौन्दर्यस्थळें हे ग्रन्थ अनुक्रमें १९१६, १९३७, १९३८, १९४० व १९४४ या वर्षी प्रसिद्ध करण्यांत आले. आतां कल्हणाचा परिचय करून देण्याकरतां राजतरंगिणींतील सौंदर्य-स्थळें या नांवाचा ग्रन्थ प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

गणेश रामकृष्ण हवलदार.
ग्रंथकर्ता

हाहि लघुग्रन्थ, वेळेला संक्षेप देण्याच्या या काळांत ज्यांना, वाचावयास वेळ नसेल त्यांनीं प्रस्तावनेनंतर एक अनुक्रमणिका दिली आहे तींत जेवढ्या सारभूत प्रकरणांची यादी तरंगवार दिली आहे तेवढी वाचल्यास कल्हणाचा परिचय वाचकांस होईल. व तसा झाल्यास प्रस्तुत ग्रन्थकर्ता आपणास कृतार्थ मानील.

नदीकांठचे दृढमूल वृक्ष जसें तटाचें रक्षण करतात तसें कांहीं रूढ शब्दांचें रक्षण तरंगिणीनें केलेलें आहे. त्या शब्दांचा कोश, कांहीं राजांच्या व इतर पुरुषांच्या वंशावळी, कल्हणाची कालगणनेची माहिती, व इतर त्यावेळची राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिति इत्यादी गोष्टींच ं हिती संक्षिप्तप्रकारें शेवटीं दिली आहे तीहि वाचल्यास तिचा उ ोग होईल.

## कल्हणाचें अल्पचरित्र.

कल्हण हा एका काश्मीरच्या राजाचा चंपक नांवाच्या महान् अमात्याचा मुलगा असें प्रत्येक तरंगाच्या समाप्तिलेखांत म्हटलेलें आहे. हा चम्पक सातव्या तरंगांतील र्ष नृपति, याचा द्वारपति चम्पक, हे एकच होत. याला एक कनक नांवाचा भाऊ होता. त्याला हर्षानें एकलक्ष दिनार दिले होते. या हर्षाचा शोकमय अन्त झाल्यावर कनकानें काशीस जाऊन जीविताचा त्याग केला. व हर्षाविषयींची निष्ठा प्रकट केली. कल्हण हा निष्ठावान् शिवभक्त होता. असें प्रत्येक तरंगाच्या आरंभीं केलेल्या शिवस्तुतीवरून दिसतें. या शिवाय कल्हणाच्या कुलाविषयीं आणखी माहिती उपलब्ध नाहीं.

राजतरंगिणीच्या सात सहस्र श्लोक लांबीच्या अंतःस्वच्छ जलौघांत काश्मीरी लोकांच्या संस्कृतीचें व जीवनाचें प्रतिबिंब पडलेलें आहे. कारण कौरव पाण्डवांच्या एका समकालीन राजाच्या ( गोनंदाच्या ) राज्यारोहणापासून आरंभ करून पुढील सव्वातीन साडेतीन हजार वर्षांत होऊन गेलेल्या राजांचा इतिहास या ग्रंथांत आहे. त्यामुळें या ग्रंथाला विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे.

राजतरंगिणी ही राजांची तरंगिणी म्हणजे नदी आहे. तींत राजे, राण्या, व मंत्री यांनीं रिपूंवर मिळवलेल्या विजयाचें जसें वर्णन आहे तसें वरील मंडळीवर षड्रिपूंनीं मिळविलेल्या विजयाचेंहि वर्णन आहे. तरी देखील जेव्हां जेव्हां वरील मण्डळींत चांगल्या व्यक्ती निघाल्या तेव्हां तेव्हां त्यांची स्तुति कवीनें मुक्त कण्ठानें केली आहे. पण विटांनें वर्णन करतांना कवीला अश्लील असें कांहीं वाटत नाहीं.

या नदीचा प्रवाह कधीं कधीं तिच्यावरून उडून मंजुळध्वनि करीत जाणाऱ्या पक्ष्यांच्या कूजिताप्रमाणें मंजुळ आहे तर तो कधीं कधीं तो फूं फूं करीत दुथडी वाहत जात आहे असा भास होतो.

कल्हणाची भाषा कालिदासाच्या भाषेसारखी रेशमाप्रमाणें मऊमऊ लागते व कधीं कधीं मुद्राराक्षसाचा कर्ता जो विशाख-दत्त त्याच्या भाषेसारखी कठोर लागते.

या ग्रंथाला थोडासा आधार नीलमुनीच्या पुराणाचा आहे म्हणून या ग्रंथावर पुराणांची छाया पडली आहे. तिला उद्देशून तरंग तीन मधील मेघवाहन राजाची कथा सांगतांना कवि म्हणतो, "अशा राजाचें असंभाव्य वाटणारें चरित्र वर्णन करतांना आम्हांला लाज वाटते; पण आर्षमार्गानें ( ऋषिप्रणीत मार्गानें ) एकवार जाण्याचें ठरविल्यावर वाचकांची अभिरुचि आमच्या आड येत नाहीं."

कल्हणाची कवि या नात्यानें योग्यता मोठी आहे. निरीक्षण-शक्ति व उल्लेखशक्ति या दोन गुणांची जोडी कल्हणाच्या ठिकाणीं जशी आढळते तशी अन्य कवींत विरळा. त्याची स्वभावोक्तवर्णनें तर फार सरस आहेत. अर्थालंकारांत नेहमींची उपमानें असतातच पण अनपेक्षित व चमत्कृतिजनक हें त्याच्या गुणांचें अगदीं संक्षिप्त वर्णन होय.

---

* कल्हणाच्या नांदींतील एक श्लोक घेऊन त्यांत थोडा फरक करून हा श्लोक बनवलेला आहे.

‡ रामायण व महाभारत या ग्रन्थानंतर इतिहास म्हणून संस्कृत भाषेंत लिहिलेला हा एक भव्य ग्रन्थ आहे. पुरातन-काळीं—ग्रन्थ मग ते काव्यात्मक असोत अथवा शास्त्रीय असोत—ते छन्दोबद्ध असत—तसा हा आहे. राजतरंगिणी या शब्दाचा अर्थ राजांची नदी असा आहे. म्हणून या ग्रन्थाच्या प्रत्येक विभागाला तरंग हें नांव दिलेलें आहे तें यथार्थ आहे.

## अनुक्रमणिका


१ कल्हणाची प्रस्तावना. हींत इतिहासकाराची भूमिका कशी असावी तें कल्हणानें स्पष्ट करून सांगितलें आहे.

२ काश्मीर मण्डळ.

### तरंग १ ला

३ कविप्रशंसा.

४ श्रीमान दामोदर राजा व त्याची राणी यशोमति (स्त्रियांच्या गादीवर वारस म्हणून बसण्याविषयींच्या हक्काविषयीं श्रीकृष्णानें दिलेला न्याय.)

५ एक बौद्धधर्मीय कथा.

६ दामोदर दुसरा (रामायणाचा जुनेपणा.)

७ सुश्रवस नागाची गोष्ट.

८ क्रूर राजा मिहिरकुल याची गोष्ट.

९ युधिष्ठिर राजा. त्याच्या राण्यांचा देशपरित्याग.

### तरंग २ रा

१० राजा तुंजीन व दुष्काळनिवारण.

११ संधिमति आर्यराज याची गोष्ट.

१२ संधिमतीचा राजसंन्यास. वनास जातांना त्याच्या झोंपेची वेळ व जागें होण्याची वेळ; आणि वैराग्यधारण केलेला राजा.

### तरंग ३ रा

१३ राजा मेघवाहन व अहिंसा.

१४ असंभाव्य गोष्टींचें वर्णन करतांना कवीची भूमिका.

१५ मातृगुप्ताची गोष्ट.

१६ मानव रणादित्य राजाची अमानुष देवी राणी.

१७ राजकन्या अनंगलेखा.

### तरंग ४ था

१८ राजा प्रतापादित्य व नोनवणिजाची स्त्री नरेन्द्रप्रभा यांची गोष्ट.

१९ सार्वजनिक कार्याकरतां खासगी जमीन मोबदला देऊन घेण्याविषयींची (लॅन्ड ॲक्विझिशन ॲक्टाखालच्या पद्धतीची) गोष्ट.

२० कलियुगांतील चालू नसलेलें एक दिव्य.

२१ स्वामिनिष्ठ अमात्याची गोष्ट.

२२ ललितादित्याची राजकीय गीता.

२३ जयापीड व कमला नर्तकी यांची गोष्ट.

२४ स्पर्शसंचारी रोग व स्थानपरित्याग.

२५ शास्त्र प्रशंसा.

२६ राजा जयापीड व चतुर मंत्री देवशर्मा यांची गोष्ट.

२७ सुवर्णप्राप्तीविषयीं लोककथा.

२८ जसे राजा तसे ब्राह्मण.

### तरंग ५ वा

२९ मंत्री शूरशर्मा व त्याचा कृतमान्दार नांवाचा भाट.

२७ मोठा स्थापत्य शास्त्री (इंजिनिअर) सूय्य व त्याचें तंत्र

२८ राजा शंकरवर्मा स्वतां व्यापारी होतो.

२९ वेठ बिगार (रूढभारोढी)

३० राजांचा स्वभाव.

३१ राजवाड्यांत झालेला, डोम्ब व त्याच्या मुलींचा गायनाचा जलसा.

३२ राजाची निवड करणारी विप्रपरिषद.

### तरंग ६ वा

३३ अपहार करणाऱ्या कायस्थांविरुद्ध राजा यशस्कर याची मोहीम.

३४ राजाची बुवाबाजीविरुद्ध मोहीम.

३५ साक्षरता प्रसार.

३६ यशस्कर राजाच्या चातुर्याची गोष्ट १ ली.

३७ किंत्ता, गोष्ट २ री

३८ क्षेमगुप्त व त्याचे दुराचारी विट.

३९ सिंहासनावर बसविण्यास योग्य अशा राजाची निवड करण्यांत दिद्दाराणीचें चातुर्य.

### तरंग ७ वा

४० प्रजेच्या जवळचा वित्तसंचय ओळखण्याचें साधन.

४१ अनंतदेवाचा राज्यपरित्याग व युवराजपदाचें विडंबन.

४२ सासुरवासाचा मासला.

४३ अशुचिमनाचा लोहरच्या राज्याचा राजपुत्र.

४४ निंडालभट्ट वणिज व त्याची बुवाबाजी.

४५ चमक विट.

४६ मुठींत धरलेलें सांगणारा ग्राम-जोशी.

४७ विषयी कलशाचें रात्रीचें धाडस.

४८ मानवन्ताची स्वामिनिष्ठा.

४९ गुप्तस्फोट राजानें (अनंतदेवानें) केल्यावर राणीचा त्याला जाबसाल.

५० अनंत देवाच्या राणीचें अनुगमन.

५१ मनोभंग. (ही काय चीज आहे?)

५२ हर्षाचा बन्ध व मोक्ष आणि दोन आंगठ्या.

५३ हर्षाच्या चर्चा कथेचें वर्णन.

५४ स्त्री पुरुषांची राजमान्य वेशभूषा.

५५ राजाच्या मनांत प्रवेश करणारा कुशल विट

५६ राजे आपला पैसा कसा खर्च करतात.

५७ चंदलेची कथा.

५८ डामरांच्या नाशाची राजाची करपद्धति.

५९ माफीची घोषणा.

६० एक दैविक चमत्कार.

ज्युपुत्रसि ९७५



# तरंग ३.

## (१) मेघवाहन.

युद्धिष्ठिराचा प्रपौत्र जो गोपादित्य त्याच्या पुत्राला, मेघवाहनाला, गान्धाराहून आणून लोकांनीं राजा केलें. त्यापूर्वी प्राग्ज्योतिष नांवाच्या देशांतील राजाच्या कन्येचें स्वयंवर तेथील राजानें मांडलें. तेथें हा गेला असतां याला राजकन्येनें माळ घातली. नरकासुरानें आणलेलें छत्र या राजाच्या डोक्यावर धरलें, तें उगीच नव्हतें. चक्रवर्ती असल्याशिवाय कोणावर तें धरावयाचें नसतें.

या राजानें प्राणिवधाचें निवारण केलें. यज्ञांत पिष्टपशूंचे व घृतपशूंचे बली देऊं लागले. आपल्या कोशांतील धन खर्चून यानें खाटिकांना दुसरी निष्पाप वृत्ति दिली.

मूक देवीनें एक विहार बांधला. त्याच्या अर्ध्या भागांत भिक्षाचरांच्या धर्मतत्त्वाप्रमाणें वागणारे भिक्षू व दुसऱ्या अर्ध्या भागांत, गृहस्थांप्रमाणें वागणारे म्हणून निंद्य असे गार्हस्थ्य भिक्षू, त्यांच्या स्त्रिया व पशू ठेवले.

तो राजा एकदां बाहेर विहार करीत असतां अभय मागणाऱ्या दोन तीन स्त्रिया दिसल्या. आपल्या मस्तकावर अंजलि रचून त्या म्हणाला, "आमचे पती जे नाग ते मेघरूपानें नभाचें तल झांकून स्वस्थ बसले असतां, शालिवनाची राखण करणारे कांहीं नागऱ्ये हिमवृष्टि होईल या खोट्या शंकेनें चोर चोर असें ओरडले. आपण बांधा म्हणालांत. आपल्या आज्ञेनें पाशबद्ध होऊन ते खालीं पतन पावले. आमच्यावर करुणा करावी व प्रसाद व्हावा." बन्धनांतून सोडा असें राजा म्हणाला. बन्धनांतून मुक्त झालेले नाग राजाला प्रणाम करून पत्न्यांसह निघून गेले.

राजा वेलावनांत फिरत असतां एक शबर, चण्डिकेसमूर अधोमुख मनुष्याचा बलि देत होता. त्याचा राजानें धिक्कार केला. शबर म्हणाला, "या उपहाराचा निषेध करशील, तर माझा रोगग्रस्त मुलगा तत्काळ मरेल. या अनाथाचें रक्षण करतोस, पण पुष्कळांचें रक्षण करणाऱ्या या माझ्या बाळाची उपेक्षा करतोस?" बळीच्या दीनवाण्या दृष्टिपातांनीं विवश होऊन राजा म्हणाला, "मी या अनाथाचें रक्षण करण्यास स्वदेह अर्पण करतों." शबर म्हणाला, "त्रैलोक्यांतील जीव अर्पण करून तुम्ही रक्षण केलें पाहिजे. स्वप्राणाकरतां राजेलोक कोणाकडे पहात नाहींत. तू जग व माझ्या मुलाला जगूं दे." राजा म्हणाला, "तुम्हीं वनचर सदाचारसुधेचा आस्वाद घेणारे कसे व्हाल? मरुदेशांतील लोकांस जान्हवीजळांतील मज्जनाचें सुख कळत नाहीं. तुझ्या मुलाला बहुत (आप्त) बन्धू आहेत. या अनाथाला नाहींत. या बलीचें रक्षण मी चण्डिकेला स्वदेह अर्पण करून करणार."

राजानें स्वशरीरावर प्रहार करण्याला तरवार उपसली तोंच आकाशांतून पुष्पवृष्टि झाली. राजाचा हात एका दिव्य पुरुषानें धरला. ती चण्डिका, तो बली, इ. सर्व नाहींशीं झालीं. तो दिव्य पुरुष म्हणाला "मी वरुण आहें. रसातलाचा तिलक असें हें छत्र तुझ्यापुढें उभें आहे, तें पुराणपुरुषानें नरकासुरानें तुझ्या श्वशुरानें माझ्या पुरांतून हरण केलें होतें. तें नाहीं म्हणजे प्रजेला प्राणहर उपद्रव होतात. तें नाहींसें व्हावें म्हणून, तुझ्या औदार्याची परीक्षा पहाण्याकरतां मी ही माया रचली. राजानें वरुणाला छत्र दिलें; व समुद्रांतील बेटें जिंकण्याची राजानें इच्छा प्रदर्शित केली. वरुण म्हणाला "तुझ्याकरतां मी समुद्राचें स्तंभन करीन." छत्रासह वरुण अदृश्य झाला.

समुद्राला भांग पाडीत नंतर राजा लंकेला गेला. तेथील नृपानें राक्षसाच्या शिरांनीं भूषित अशा ध्वजा अर्पण केल्या व कायमची ताबेदारी प्रदर्शित केली या ध्वजांना परिध्वज म्हणतात. काश्मीरांत यात्राप्रसंगीं या राजांच्या अग्रभागीं दिसतात. राक्षसांना मांस वर्ज्य करावयास या राजानें लावलें. मांसाशन हें राक्षसांचें अन्वर्थ नांव आतां रूढिवाचक शब्दांत मोडूं लागलें.

एक ब्राह्मण राजद्वारीं आपल्या रुग्ण पुत्राला ठेऊन म्हणाला, "दुर्गेनें मागितलेला हा पशूंना बळि तूं देऊं न देशील तर हा माझा मुलगा मरेल. ब्राह्मण आणि पशु यांतील अंतर तूं वर्णगुरूनेंच ठरवावें. ब्राह्मणपुत्राच्या मृत्यूचें पाप टाळण्याकरतां व आपल्या अहिंसेचें व्रत पाळण्याकरतां राजानें स्वतांचा बलि देण्याचा निश्चय केला. संगमावर उद्भवलेल्या भोंवऱ्यांत पडलेल्या सुमनाप्रमाणें स्थिति असलेलें त्याचें मन स्थिर झालें. दुर्गेनें ब्राह्मणपुत्राची प्रकृति होती तशी केली.

### असंभाव्य गोष्टींचें वर्णन करतांना कवीची भूमिका.

पृथक्जनांना असंभाव्य वाटणारें या दिवसांतील मेघवाहनाचें वर्णन करतांना आम्हांला लाज वाटते. तथापि रचना निर्विशेष एका प्रकारच्या आर्ष मार्गानें (परंपरागत सांप्रदायिक मार्गानें) जाणाऱ्या आम्हांस श्रोतृचित्ताचें अनुवर्तन करावें लागत नाहीं. श्रोत्यांना रुचेल असें लिहिण्याला आम्हीं बांधलेले नाहीं.

## (२) प्रवरसेन; (३) हिरण्य व तोरमाण सहजोडी.

६१ जसा तो तुझा तसा तो माझा.
६२ उच्चलाला राज्याभिषेक झाल्यावर हर्षानें काय करावें, याविषयीं मंत्र्यांचा उपदेश.
६३ पराभूत हर्षाचें पलायन व त्याचा करुणास्पद अन्त.

तरंग ८

६४ उच्चल प्रथम सामादी उपायांनीं अथवा अपायांनीं डामरांची वाट लावतो.
६५ अनुयुक्त भीमादेवानें उच्चलाला दिलेल्या दोन शिक्षा.
६६ उच्चल जनतेची प्रीति संपादन करतो.
६७ प्रजापीडक कायस्थांस उच्चल शासन करतो.
६८ उच्चलानें केलेली न्यायदानाची गोष्ट. (सावकारी पाशाची गोष्ट.)
६९ उच्चल व सुस्सल यांचें स्वभाव वर्णन.
७० राज्यावर संकट आलें असतां पसरणाऱ्या वार्ता व त्यांवर भरंवसा ठेवणारी भोळी मंडळी.
७१ पुरोहित प्रायोपवेशन.
७२ चक्रधराच्या देवळाला लावलेली आग.
७३ सुस्सलाच्या राणीचें मरण.
७४ सुस्सलाचा वध.
७५ ती वार्ता ऐकून त्याच्या पुत्राची, सिंहदेवाची प्रतिज्ञा.
७६ सार्वत्रिक क्षमेची घोषणा.
७७ जयसिंहाच्या राज्याची आरंभिची स्थिति.
७८ जयसिंहाच्या गुणांचें वर्णन.
७९ विट पराक्रमवर्णन.
८० सुज्जीचा वध.
८१ चित्ररथावर प्राणान्तिक हल्ला.
८२ स्वामिभक्त मार्जारी.
८३ कांहीं धर्मभोळेपणा.
८४ सिल्हणाचा पराक्रम.
८५ राजाच्या विटांस कवीचा शेवटला रामराम.
८६ युद्धकार्याचा गोड शेवट.
८७ संधिनंतर राजाशीं भोजानें वर्तन.
८८ ग्रन्थ समाप्ति.

श्री गजानन

## ( कल्हणाची प्रस्तावना )

भवत्कालांत गतार्थ प्रत्यक्षवत् घडत आहे असें दाखवणारे कवी हे ब्रह्मदेवच आहेत अशा कांहीं प्राचीन कवींच्या ग्रंथांधारें सुव्रतानें काश्मीरच्या इतिहासावर एक प्रबन्ध लिहिला. त्याची भारती पाण्डित्यदूषित व तीव्र असल्यामुळे, तो मागें पडला. क्षेमेंद्राच्या इ. स. १०२९ ते १०६४ या अवधींत अवन्तिवर्मा राजा असतां हा कवि होऊन गेला. नृपावळींत कांहीं कविकर्म असुनहि, त्यानें अवधान न ठेवल्यामुळें, तींत निर्दोष असा एकहि अंश मिळत नाहीं. तरी हे ग्रन्थ, नील मुनीचें पुराण व जुन्या राजांचीं प्रशस्तिपत्रें वाचून मी भ्रम निरसन करून घेतलें. इतिहास कथन करतांना वाचा स्थिर ठेवली व राग आणि द्वेष बहिष्कृत केले; त्यामुळें राजांचा उल्हास अथवा ऱ्हास व देश आणि काल यांचें मी केलेलें वर्णन पूर्वीच्या कथांत असलेल्या दोषव्याधींवर एक औषधच होईल आणि ज्यांत अनन्त प्राक्तन व्यवहार संक्रांत झाले आहेत, अशा माझ्या ह्या संदर्भ ग्रथांत कथेच्या दीर्घत्वाच्या मानानें प्रपंच दिसला नाहीं, तरी सचेतस वाचकांस यांतील कांहीं भाग प्रीतिजनक होईल.

हें जग क्षणभंगुर करण्यांतच कायती विधिची कला दिसून येते म्हणून या ग्रंथांत शान्त रसाला मूर्धाभिषेक केला आहे.

आनंदस्यंदानें सरस अशा ह्या सुंदर अपापिणी राजतरंगिणीचें सेवन वाचकांनीं आपल्या श्रोत्रशुक्ति पुटानें करावें.

**टीप** :—इतिहासकारांची भूमिका कशी असावी तें वर कल्हणानें स्पष्ट करून सांगितलें आहे. तें इतिहास लिहिणाऱ्यांनीं ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

## काश्मीर मण्डळ

कल्पारंभापासून सहा मन्वन्तरें हिमालयाच्या कुशींत सतीसर नांवाचें एक जलाढ्य सरोवर होतें. त्यांत रहाणाऱ्या जलोद्भव नांवाच्या एका असुराचा नाश करून वैवस्वत मन्वन्तरांत कश्यप प्रजापतीनें त्या सरोवराच्या भूमींत काश्मीर मण्डळ निर्माण केलें. त्याचें परिपालन नील नांवाचा नाग करीत असतो. या मण्डळांतील पापसूदन तीर्थांत काष्ठरूप उमापतीची मूर्ति स्पर्शमात्रें करून मुक्ति व भुक्ति देते. तेथें निर्जल गिरीवर संध्यादेवी जल रूपानें दृश्य होऊन, अन्वयव्यतिरेकानें पुण्यपापाचा निर्णय देते; म्हणजे ज्याला तें जलरूप दिसेल तो पुण्यवान व न दिसेल तो पापी असें निश्चित करतें, तेथें भूगर्भांतून स्वयंभू अग्नि वर येऊन ज्वालारूपी भुजांनीं आहुति ग्रहण करतो; तेथें भेडगिरीच्या शिखरावर एका सरोवरांत सरस्वती हंसरूपानें दृश्य होते; तेथें नन्दी क्षेत्रांतील देवालयांत, देवांनीं अर्पण केलेल्या पूजाचन्दनाचे बिन्दू अद्यापि स्पष्ट दिसतात; तेथें शारदादेवीचें दर्शन करतांच, कविजन सेवितवाणी आणि मधुमति व सरस्वती या दोन नद्यांचें दर्शन घडतें; तेथें पृथ्वीतील तीर्थांनीं बहिष्कृत अशी जागा तिलांशानेंहि मिळत नाहीं. हें मण्डळ पुण्य बळानें जिंकतां येतें, शस्त्रास्त्रांनीं नाहीं; आपल्या पित्यानें, कश्यपानें, हें मण्डळ निर्माण केलें म्हणून तेथें चण्ड शु रवि ग्रीष्म ऋतूंत सुद्धां पित्याच्या गौरवानें सौम्य होतो; तेथें उंच विद्यामंदिरें सहिमजल व त्रैलोक्यदुर्मिळ द्राक्षें हीं सामान्यप्रकारें आढळतात.

त्रैलोक्यीं रत्नसू श्लाघ्य कौबेरी तेथ दिग्दल ।
तेथ गौरीपती श्लाघ्य तेथ काश्मीर मण्डल ॥ ४३ ॥

टीपः—हें काश्मीर मण्डळाचें वर्णन कालिदासानें केलेल्या कुमारसंभवांतील हिमालयाच्या वर्णनाच्या धर्तीवर आहे. शेवटल्या वाक्यांतील हिमालयाचा उत्कर्ष पायरीनें दाखविणारा सार अलंकार सुन्दर आहे.

## तरंग १ ला.

## कविप्रशंसा.

कलियुगांत कौरव पांडवांच्या एका समकालीन राजापासून (पहिल्या गोनन्दापासून) तिसऱ्या गोनंदापर्यंत बावन्न राजे होऊन गेले. त्यांच्या विषयींचे वृत्तग्रंथ नष्ट झाल्यामुळें त्यांची स्मृति नाहीं, कारण त्याकाळीं त्यांच्या दुर्दैवानें कीर्तिरूप काय निर्माण करणारे कविरूप ब्रह्मदेव नव्हते. ज्या महाप्रतापी राजांच्या आश्रयाखालीं जलधिरशना पृथ्वी सर्वत्र अभय असे, त्या राजांची स्मृतिमुद्धां ज्याच्या अनुग्रहावांचून राहूं शकत नाहीं, त्या प्रकृतीनेंच मोठ्या अशा कविकर्माला नमस्कार असो! राजांच्या गण्डस्थळांवर पाय देऊन श्री ग्रासकरून घेणारे असे लोकतिलकराजे, जर स्वप्नांतमुद्धां होऊन गेले नाहीत असे मानले जाण्याइतके, विस्मृतिमग्न होतात, तर हे कवि-भ्रातर्! तूं नाहींस म्हणजे जग आंधळे म्हणावयाचें! एवढें सांगितल्यावर तुझी अधिक स्तुति करावयाला शेंकड्यावारी स्तोत्रें कशाला रचावीं!

टीपः—वरील नष्टवृत्त झालेल्या बावन्न राजांविषयीं कल्हण म्हणतो, "यांपैकीं पहिले गोनन्दादि चार मी नील पुराणांतून संगृहीत केले आहेत. नंतर सर्व आम्नाय (ऐतिहासिक लेख) नष्ट झाल्यामुळें पसतीस राजे नष्टकृत्य व नष्टनाम होत्साते विस्मृति सागरांत मग्न झाले. पुढले आठ हेला राजाच्या पार्थिवावलीवरून ग्रन्थप्रोक्त केले आहेत. नन्तरचे पांच छविल्लाकारानें निर्दिष्ट केले आहेत. यात अशोकापासून अभिमन्यूपर्यंतचे राजे येतात.

### १ गोनन्द १ ला

कलियुगाची सहाशें त्रेपन वर्षे उलटल्यावर हा राजा गादीवर बसला. हा प्रतापी होता. कृष्णाशीं याच्या बन्धूचें (जरासंधाचें) युद्ध चालूं असतां जरासंधानें याचें साहाय्य मागितलें. यानें सैन्यानिशीं मथुरेला वेढा दिला. बलरामाशीं याचें युद्ध झालें. दोघे तुल्यबल होते. विजयसंदेहामुळें, पुष्पांची माळा जयश्रीच्या हातीं बराच वेळ राहून कोमेजून गेली. शेवटीं दोघांनीं क्षतांगांनीं—गोनन्दानें रणांगनेला व बलरामानें जयश्रीला आलिंगन दिलें.

टीप :—शेवटल्या वाक्यांत तुल्ययोगिता अलंकार चांगला साधला आहे.

### २ श्रीमान दामोदर

(गादीवर बसण्याच्या स्त्रियांच्या हक्काविषयीं श्रीकृष्णानें देलेला न्याय.)

गोनन्दाचा मुलगा श्रीमान दामोदर नंतर राजा झाला. ऊर्जित राज्य प्राप्त होऊनहि पितृवधाच्या चिन्तनानें हा सुख पावला नाहीं. सिन्धुनदीच्या कांठीं गान्धार नृपतीनें कन्येचें स्वयंवर मांडलें आहे. हें कळतांच याचे बाहू दृप्त झाले. याची यात्रा घाईघाईनें निघाली. याची चक्रधराशीं गांठ पडतांच चक्रधरानें सुदर्शन चक्रानें याला स्वर्ग दाखविला.

### ३ यशोमति

श्रीमान दामोदराची पत्नी यशोमति गर्भवती होती. तिला श्रीकृष्णानें राज्याभिषेक करविला. स्त्री म्हणजे पुरुषांची विलोसाची अशी भोग्यवस्तु आहे असें मानणारे मंत्री मत्सर करूं लागले. काश्मीरांत राजा शिवांश असतो व राणी पार्वती असते असा नील पुराणाचा आधार श्रीकृष्णानें दाखवून दिल्यावर लोक तिला प्रजेची माता व देवता मानूं लागले.

(४) गोनंद तिसरा; पुढले ३५ राजे स्मृति मग्न झाले; ४०, लव; ४१, कुश, ४२, खगेन्द्र; ४३, सुरेंद्र; ४४, गोधर अन्य वंशांतील, ४५ सुवर्ण; ४६, जनक; ४७, शचीनर.

### ४८ अशोक

हा शचीनराच्या चुलत आजाचा पुत्र—शकुनीचा नातू. यानें श्रीनगर वसविलें. जैन व बौद्ध धर्मांचा स्वीकार केला. स्तूप रचिले व चैत्य बांधले. चैत्यांच्या उंचीची अवधि डोळ्यांनी बघून समजत नसे.

### ४९ जलोक

यानें कोटीवेधी पारद सिद्ध करून (परिसमणि मिळवून) हीन धातूचें कोट्यवधि सुवर्ण केलें. याच्या पत्नीनें, ईशान देवीनें, उग्र (जागृत) मातृचक्रें निर्माण केलीं.

व्यास शिष्यांजवळ नंदीश पुराण ऐकून राजा, नंदीशतीर्थाशीं स्पर्धा करणाऱ्या सोदर जलाचें सेवन करूं लागला. श्रीनगरांत ज्येष्ठेशाचें देऊळ बांधण्यांत व्यग्र झाल्यामुळें सोदरतीर्थाच्या स्नानाचा विसर पडून हा राजा मनांत उद्विग्न झाला. तों तेथें निर्जल स्थानांत जल प्रादुर्भूत झालें. रंगानें व रुचीनें तें सोदरतीर्थाशीं संवादी होतें. परीक्षा पहाण्याकरीतां यानें आपला सुवर्ण कलश त्याचें तोंड बंद करून मूळ सोदरतीर्थांत टाकला. तो अडीच दिवसांनीं श्रीनगरांत उद्भूत झालेल्या जलांत निघाला. राजाचा संशयच्छेद झाला. हा राजा म्हणजे नंदीशच भोग भोगण्यास अवतरला होता. नाहींतर अशी दृष्टादृष्ट क्रियासिद्धि याला कशी प्राप्त झाली असती!

## एक बौद्ध धर्मीय कथा

एकदां एका स्त्रीची, इच्छाभोजन करण्याची, याचना या राजानें मान्य केली. तिनें विकृतस्वरूप धारण करून नरमांस मागितलें. हिंसेविरुद्ध असलेल्या राजानें स्वशरीरांतून मांस

खाण्याची अनुज्ञा दिली. तेव्हां ती म्हणाली, सत्य पाळणारा तूं बोधिसत्त्व आहेस. या शैवराजानें विचारलें "हे कल्याणि! बोधिसत्त्व म्हणालीस तो कोण?" ती म्हणाली "भगवान लोकनाथाच्या काळापासून या विश्वधारणोद्यत बोधिसत्त्वांनीं आपणांला पंचक्लेशांपासून (अविद्या, अस्मिता, राग, द्वेष आणि अभिनिवेश यांपासून) मुक्त करून घेतलें आहे. ते अपराध्यांस रागवत नाहींत. क्षमा करून त्यांवर उपकारच करतात. आम्हीं तामसी–कृत्या असून प्रकाश व अंधार यांना विभागणाऱ्या लोकालोक पर्वतावर रहातों. तेथील काळोख्या रात्रीं फार घोर असतात. त्यांचा क्षय व्हावा (आम्हांला सद्गति मिळावी) अशी आम्हीं बोधिसत्त्वांना प्रार्थना करतों. एका विहारांतील वाद्यघोषांनीं तुझी झोंप मोडली. तूं त्या विहाराचा नाश केलास. कद्धबुद्धांनीं माझें ध्यान केलें. मी तुझा वध करण्यास निघालें. पण बोधिसत्त्व हांक मारून म्हणाले. 'तो महाशाक्य (बुद्धमु ) आहे. त्याच्या दर्शनानें तुझ्याच तमाचा क्षय होईल. त्याला हेमसंभार खर्च करून विहारछेदनाचें प्रायश्चित्त म्हणून विहार बांधावयास सांग.' तुझ्या सत्त्वातिरेकाची परीक्षा पाहिली. माझ्या पापाचा क्षय झाला. तुझें कल्याण असो. राजानें विहारबांधण्याचें वचन दिलें, कृत्याश्रम बांधला व त्यांत कृत्येची स्थापना केली.

व्यवहार जाणणारे लोक काश्मीरांत नव्हते. १ धनाध्यक्ष, २ धर्माध्यक्ष, ३ कोशाध्यक्ष, ४ सेनाध्यक्ष, ५ दूत (वकील) ६ पुरोधा व ७ दैवज्ञ एवढेच होते. हीं कर्मस्थानें अठरा करून राजानें यौधिष्ठिरी स्थिति प्राप्त करून दिली.

राज्य भोगून हा राजा पत्नीसह गिरिजापतीशीं सायुज्यता पावला.

## ५० दामोदर २ रा

## (रामायणाचा जुनेपणा व सुटसुटीतपणा)

श्राद्धसमयीं हा राजा स्नानाला उठला. कांहीं भुकेलेल्या ब्राह्मणांनीं आधीं भोजन मागितलें. राजा म्हणाला "स्नान करून येतों व देतों. विप्राःसर्पत साम्प्रतम्" "विप्रहो! सध्या दूर सराः" विप्रांनीं शाप दिला "तूं सर्प होशील!" उग्र तेजाच्या ब्राह्मणांना भिऊन असलें पाहिजे. त्यांच्या अवज्ञेनें नष्ट झालेल्या संपत्तिच्या पुनः प्राप्तीचा संभव नसतो. विप्रांचा प्रसाद संपादन केल्यावर विप्र म्हणाले, "एका दिवसांत अशेष रामायण वाचशील तर शापमुक्त होशील.

**टीप** :—यावरून रामायण या राजाच्या पूर्वीचें असून त्याचा आकार सुटसुटीत असावा असें धरून चालणें सयुक्तिक वाटतें.

## ५१ हुष्क, जुष्क व कनिष्क

नंतर वरील तीन राजे एकाच काळीं राज्य करते झाले. शाक्यसिंहाची (बुद्धाची) निर्वृत्ति होऊन शंभर वर्षे उलटलीं होतीं. याचवेळीं या देशांत बोधिसत्त्व नागार्जुन प्रसिद्धीस आला.

## ५२ अभिमन्यु

या राजाच्या अनुज्ञेनें चंद्राचार्यांनीं व्याकरण व भाष्य लिहिलें.

## गोनन्दीय वंशांतील २१ राजे

(१) गोनंद ३ रा; (२) बिभीषण १ ला; (३) इंद्रजित्; (४) रावण; (५) बिभीषण २ रा; (६) नर अथवा किन्नर.

## सुश्रवस नागाची गोष्ट.

याच्यावेळीं एका कलोद्यानांत सुश्रवस नांवाचा नाग वसत होता. एकदां विशाख नांवाचा एक तरुण ब्राह्मण भर दुपारीं अध्वश्रान्त होऊन सरोवरोपकण्ठीं, एका वृक्षाखालीं बसला. पवनानें त्याचें श्रमापहरण केलें. जलस्पर्श करून तो सातू भक्षण करणार, तों नूपुरशिंजित त्याच्या कानीं पडलें. तें तत्पूर्वी तीरविहारी हंसानीं ऐकलें. मंजरीयुक्त कुंजातून दोन चंद्रमुखी कन्या बाहेर आल्या. त्यांच्या चारु नेत्रांचे धवल अपांग काजळाच्या रेखेनें सुशोभित होते. त्यांना पाहूनच ब्राह्मणानें व्रीडाजड होऊन सक्तुभक्षण थांबविलें. त्या नागकन्या कच्छगुच्छ (गवताच्या शेंड्या) खाऊं लागल्या. डोळे चाळवून तो प्रकार त्यानें पुन्हां पुन्हां पहिला. कोठें यांची ही सुंदर आकृति व कोठें यांचें हें दरिद्री खाणें! या विचारानें त्यांचा यानें सन्मान करून त्यांच्याकडून सातू खावविलें. कुंभायमान एका उदकक्षेपण भाण्डांत, एकाचतसांत (द्रोणांत) त्यांना पाणी आणून दिलें. आणि कमलाच्या पानानें त्यांना वारा घालीत तो म्हणाला "माझ्या कांहीं पूर्वसुकृतीनें मला भवतींचें दर्शन झालें. विप्रसुलभ चापल्यानें हा जन कांहीं प्रश्न विचारूं इच्छितो. तुम्हीं कल्याणीनीं कोणती पुण्यवन्तांची जाति परिष्कृत केली? हें नीरस अन्न कां खावें लागत आहे?"

तेव्हां एकजण म्हणाली, "आम्हीं सुश्रवस नागाच्या कन्या. ही मी पहिली कन्या इरावती. मला कुबेराला द्यावी असें तातानें ठरविलें आहे. दुसरी कन्या ही चंद्रावती लहान आहे. स्वादुअन्न न मिळेल तर असलें अन्न आम्हीं कां खाऊं नये?"

विप्रानें विचारलें "तुम्हांला ही निष्कांचनता कां प्राप्त झाली?" त्या म्हणाल्या, "त्याचें कारण ताताला विचार. कृष्ण द्वादशीला तो तक्षकाच्या यात्रेला येईल. तोय झाडणाऱ्या चुडेवरून त्याला ओळख. आम्हीं तेथें असूं." असें म्हणून त्या फणिकन्या क्षणांत गुप्त झाल्या.

नटचारण प्रेक्षकांनीं समाकुल असा तक्षकोत्सव सुरू झाला. तेथें जाऊन द्विजानें त्या नागाला चिन्हांवरून ओळखलें. नागानें द्विजाचें स्वागत केलें. गोष्टीवरून गोष्टी निघाल्या.

राजांचा मोठा दोष असून अकीर्तीला पात्र आहे.

## युधिष्ठिर राजाचा देश परित्याग

राजा आपली स्थिति सुधारूं शकला नाहीं. यंत्रांतून सुटलेली शिळा, शिल्पी आंवरूं शकत नाहीं. राज्य विसंस्थुल झालें. ढिलें पडलें. अन्य देशीय राजांनीं मंदिराला वेढा दिला; पण राजा व राजललना यांस जाण्याची संधि दिली.

राजललनांनीं प्रस्थान केलेलें पाहून पौरांनी अश्रू गाळले. आपलें मण्डळ दूरदूर सरत आहे असें पाहून त्या नृपदारांनीं त्याची अनुज्ञा घेण्यास त्याला अश्रुपुष्पांजलि वाहिली. तेव्हां पक्षांनीं गिरीकंदरांतील घरट्यांतून तेथें सवेग येऊन, पंख ताणून, तुण्ड खालीं घालून, आक्रंदन केलें. डोक्यावरून सरलेला व स्तनांवर पडलेला पदर तसाच सोडून वळलेल्या तिरप्या दृष्टीनें दुरूनच स्वदेशाकडे पाहून, कपाळाला हात लावून सारखें रडण्यांतच त्या राजस्त्रियांचें बळ होतें.

राजा व राजस्त्रियांस आश्रय देणाऱ्या राजांनीं नाना उपचारांनीं व उचित वचनांनीं राज्यभ्रंशापासून त्यांचें दुःख मन्द केलें.

**टीपः**—या वर्णनांत करुण रसाचा पोष चांगला झाला आहे.

या तरंगांत विस्मृतिमग्न झालेल्या पसतीस राजांशिवाय अडतीस राजांनीं सर्वांनीं मिळून एकसहस्र चतुर्दश वर्षे नउमास नउदिवस राज्य केलें.

**तरंग २ रा.**

(१) प्रतापादित्य; (२) जलौक

## (३) राजा तुंजीन.

या राजाचे वेळीं, चंद्रक नावाचा महाकवि, व्यासांचा जणु शिष्य, असा होऊन गेला. त्यानें सर्वजनप्रेक्ष्य असें नाटक लिहिलें.

राजा व त्याची वाक्पुष्टा दिव्यप्रभा राणी, यांचा प्रभाव पहाण्याकरतां, देशांत दैवी आपदा उत्पन्न झाली. हिमपातानें पाकोन्मुख शेतें नष्ट झालीं. अशनाच्या अंहक्रियेनें, लक्ष्मीकटाक्षांकित जनांनी लज्जा स्वाभिमान व कुलाभिमान हीं सोडून दिलीं. कुक्षी भरण्याला आतुर, अशा क्षुधेनें तप्त झालेले जन, त्यांचे प्राण कण्ठगत होऊन, पत्नीप्रीति, सुतस्नेह, व पितृवात्सल्य विसरले. एकएकजण रूक्ष भाषण करीत, जगांतील जीवनाचा नाश होऊन आपलें पोषण करण्याची इच्छा करूं लागला. अस्थिशेष माणसें पिशाचाप्रमाणें झगडूं लागलीं. प्रेतराशींनीं देश आकुल झाला.

अशा वेळेस राजा सर्वत्र पत्नीसह फिरून मणिरत्नौषधीप्रमाणें शोभणारें आपलें दर्शन देत, कोणाची उपेक्षा न करतां, अन्नदान करून प्राण्यांचें संजीवन करीत होता. त्याचें सर्व धन निःशेष झालें. मेदिनीवरचा अन्नाचा सांठा संपला. राजा दुःखित होत्साता, राणीला म्हणाला 'हे देवि! आमच्या कोठल्यातरी अपचारानें, निरपराध प्रजेवर ही दुस्तर आपदा, ओढवली असतां मी प्रजेचें रक्षण करूं शकत नाहीं, तर माझ्या जीविताचा उपयोग काय? कालदौरात्म्यानें पृथ्वी नष्टगौरव झाली आहे. हा लोक निरालोक झाला आहे. घरट्याचें दार बंद झाल्यावर, जशी खगांची तशी नरांची अवस्था झाली आहे. सौजन्यामृताची वृष्टि करणाऱ्या सेवायोग्य अशा नराचा टिला या मण्डळाला लागला नाहीं. अथवा काळानें मोहित होऊं आंगचे गुण झांकलें जाऊन ते येथें वसत आहेत असें म्हणावयाचें? पुत्रवत् पालन केल्यानें पौर सुखी झालेले पाहून खानें झोंप घेणारे राजे धन्य होत! निरुपायानें मी आपल्या तनूची आतां अग्नींत आहूति देतों."

असें बोलून तो राजा करुणा विष्ट होत्साता, वस्त्रानें तोंड झांकून निःशद्बपणें रडूं लागला. सर्वत्र निवांत असल्यामुळें स्तिमित असलेले दीप वर मान करून जिच्याकडे कौतुकानें पहात होते, ती त्याची राणी देवताचें स्मरण करून राजाला म्हणाली, "अधीर मनाला शोभणारी सामान्य जनांची ही कोठली स्वैर बुद्धि मनांत आणतोस? असाध्य दुःखाचा च्छेद करण्याचा प्रभाव अंगीं नसेल तर मोठ्यांच्या मोठेपणाची गणना कोण करील? सत्यव्रत राजांची आज्ञा भंग करणारा इंद्र कोण? ब्रह्मदेव कसला? यमतरी किती दरिद्री! पतिभक्ति जसें स्त्रियांचें व्रत, अद्रोह जसें मंत्र्याचें व्रत, तसें प्रजापालनाशिवाय दुसरें कांहीं न करणें हें जें राजाचें व्रत, तें पाळणाऱ्या व्रतींच्या अग्रस्थानीं असणाऱ्या राजा! ऊठ! माझें वच कधीं विपर्यस्त होतें कां? हे प्रजापालका! तुझ्या प्रजेला क्षुधाकृत भय नाहीं!"

हें तिचें भाषण संपलें नाहीं तोंच प्रत्येक घरात गतप्राण झालेल्या कपोतांचा समूह, रोज पडूं लागला व त्यावर जनता जगूं लागली. साध्वीनें निर्मिलेले हे कपोत खरोखरीचे नव्हते; राजाचा शोक व प्रजेचें दुर्भिक्ष हीं मात्र खरोखर नाहींशीं झालीं.

**टीपः**—वर मान करून दीपांना राणीकडे कौतुकानें पहावयाला लावून या प्रसंगाला कवीनें विशेष शोभा आणली आहे. प्राण्यांच्या करुणेनें शोभणारे जन, आपल्या धर्मचर्येला हिंसेचा कलंक लावून घेतील हें शक्य नाहीं म्हणून हे कपोत कवीनें मायानिर्मित करवले आहेत.

या चारुचरित्र स्त्रीनें एक अन्नछत्र स्थापिलें. या दोघांनीं जें काय केलें त्याहून अधिक करण्याची शक्ति दुसऱ्याची नाहीं हें जाणून अरोचिकी (सुपरीक्षक) विधात्यानें यांच्या पोटीं अपत्य निर्माण केलें नाहीं. उंसाला फळ आणून देण्याच्या कामीं श्रम घेतले नाहींत. सुधारसाची योग्यता आपल्या रसाच्या मधुरपणामुळें विसरावयाला लावणाऱ्या उंसाला आणखी फळ तें काय द्यावयाचें असतें?

**टीप :**—मधुरचरिताचें दांपत्य अनपत्य ठेवणें या विधात्याच्या करणीला मधुररसाच्या उंसाला फळ आणून न देणें या त्याच्याच करणीचा दिलेला दाखला सर्वोत्कृष्ट आहे.

(४) विजय; (५) जयेन्द्र

## संधिमति आर्यराज नामक मंत्र्याची गोष्ट

जयेन्द्र राजाचा, बुद्धिमंतांत श्रेष्ठ असा संधिमति नांवाचा एक मंत्री होता. हत्तीची व राजांची चपलकर्णता नष्ट करण्याचा उपाय नाहीं. गंभीर वृत्तीचे नसलेले राजे विटांनीं बोललेल्याचा अनुवाद करीत असतात. जसा ध्वनीचा प्रतिध्वनि! हा शंकय आहे असें विटांनीं म्हणतांच राजानें त्यास वाड्यांत प्रवेश बंद करून त्याचें सर्वस्व हरण केलें. मंत्री शिवभक्तींत व दारिद्र्यांत मग्न राहिला. त्याला राज्यप्राप्ति होणार अशी अश्रुतवाणी घरोघर पसरली. वाणी आपोआप पसरत नाहीं असें आप्तांनीं सांगितल्यावर राजानें संधिमतीला बन्धनांत टाकलें. राजा झुरणीस लागला. दहा वर्षें झालीं. मंत्र्यांचा वध केल्याशिवाय भवितव्याची प्रतिक्रिया करतां येणार नाहीं असें राजाच्या मनानें घेतलें. भस्मराशींत अल्प तेजानें उन्मेष पावणाऱ्या अग्निकणाला अतुल शक्ति देण्याचें जेव्हां विधि ठरवतो तेव्हां, तो कण विझवून टाकण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषाच्या मनांत त्याच्या समीप असलेल्या तप्त म्हणून पातळ अशा घृतानें भरलेल्या घटाचें ठायीं पाण्यानें भरलेल्या कुंभाचा भ्रम उत्पन्न करतो. संधिमतीला राजाच्या आज्ञेनें शूळावर चढवून मारण्यांत आलें. राजाचा शोक-शंकु आधीं व मग त्याचे प्राण नष्ट झाले. राजा निपुत्रिक होता म्हणून पुढें कांहीं दिवस त्याची भूमि पालकाशिवाय राहिली.

संधिमतीच्या मरणाचें वृत्त ऐकून त्याचा ईशान नामक गुरु त्याची क्रिया करण्याकरतां स्मशानांत गेला. जन्मभर दारिद्र्य, 'दहा वर्षें बन्धन, शूळावर मरण व नंतर राज्यप्राप्ति असें भविष्य कपाळावर लिहिलेलें वाचून, शेवटल्या अर्थाची सिद्धि कशी होते तें पाहाण्याकरतां तेथेंच वसति करून तो गुरु अस्थि राखीत बसला.

हा विधि खरोखरच आश्चर्याचा निधि आहे. अर्धरात्र झाली. दिव्यगंधाचा वास सुटला. डमरूचा घर्घर निर्घोष ऐकूं आला. तेजोवलयाच्यामध्यें स्थित अशा योगिनी त्याला दिसल्या. त्यांकडे बघत एका वृक्षाआड ईशान उभा राहिला. योगिनींनीं संधिमतीचा सांपळा जुळविला. योग बळानें त्यांना पूर्णांग केलें. व त्याचा उपभोग घेतला. क्षपा क्षीण झाली. योगिनी अन्तर्धान पावल्या. त्याच्या आधीं त्यांनीं ईशानाच्या कानांत पुढील वाणी प्रविष्ट केली, " ईशाना! भिऊं नको. हा पृथ्वीवर प्रख्यात होईल. याला सांधवून आम्हीं दिव्य केलें आहे."

संधिमतीनें गुरुला वंदन केलें. स्वप्नांतसुद्धां जो मिळावयाची आशा नव्हती त्याला गुरुनें आलिंगन दिलें, तेव्हां तो कोणत्या भूमीचें अवलंबन करून होता, त्याला किती आनंद झाला होता. तें कोण सांगेल?

हें वृत्त कळतांच पौरांनीं संधिमतीलाच राजा होण्याची विनंति केली. गुरुची अनुज्ञा मिळताच ती त्यानें मान्य केली. वाद्यघोषांत पुरप्रवेश करतां त्यावर लोकांनीं वाड्यांतून लाह्या उधळल्या.

सर्व प्रक्रिया यानें निस्तुष केल्या. यानें सत्तावीस वर्षें राज्य केलें. तो शम व्यसनी होता. याला वाटलें एखाद्या नटाप्रमाणें, या राज्यरूपी रंगभूमीवर, मी बरीच वल्गना केली. ती नीरस होऊन अद्याप प्रेक्षक उठून जावयास लागले नाहींत, हें माझें मोठें मी भाग्य समजतों.

दुसऱ्या दिवशीं सभा भरवून संधिमतीनें आपलें राज्य ठेवीप्रमाणें जसेंच्यातसें परत दिलें. स्वेच्छेनें टाकलेली कांत अशी नागाकडून परत घेववतां येत नाहीं तसें तें सोडलेलें राज्य, त्याच्याकडून परत घेववतां आलें नाहीं.

### झोंपेच्या समयाचें वर्णन.

राजाचा वेश टाकून, पूजालिंग हातांत घेऊन, उत्तराभिमुख होऊन संधिमानानें गुहागृहें असलेल्या वनाची वाट धरली. दिवसावसान झालें. पुष्करणीवर जलपान करून त्यानें तरुतळीं पर्णांची शय्या रचली. तो तीवर आरूढ झाला. रवीचे मितोष्ण किरण पर्वतशृंगावर चढले. वनभू छायेनें शबलित झाली. प्रफुल्ल मल्लिकावेलींच्या तळीं गोपस्त्रिया सुप्त झाल्या. निर्झराच्या अम्बुपाताचा ध्वनि, वनपालानें वाजविलेल्या वेणूच्या रणितांत, मिश्र झाला. व त्या श्रान्त झालेल्या राजाला निद्रा लागली.

टं भेरीच्या ध्वनीशीं स्पर्धा करणाऱ्या वनगजांच्या रसितांनीं व ांच आणि सारस्वत पक्षांच्या शद्बांनीं त्रियामा सरत आली असं तो अनुमान करून पुढें निघाला.

### वैराग्य धारण केलेला राजा.

वैराग्य धारण करून तो नन्दीक्षेत्रांत जाऊन राहिला. अंगाला भस्म फांसलेलें आहे, शिरीं जटाजूट बांधलेलें आहे, हस्तांत अक्षमाला आहे, रुद्राक्षांकित त्याच्या शरीराकडे जरठमुनी पहात आहेत. अशी त्याला संमत असलेली स्थिति प्राप्त झाली. शंकराचे व्रताकरतां तो भिक्षेला जाई तेव्हां तापस स्त्रिया त्याचें पात्र पवित्र फुलें व फळें यांनीं भरून काढीत. कोणाजवळ जाऊन त्याची प्रार्थना करण्याचें लाघव त्याला प्राप्त झालें नाहीं.

**टीपः**—आरंभींची विटानुकारी राजांना प्रतिध्वनीची उपमा मार्मिक आहे. पुढें अग्निकणाला विझवण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषाच्या मनांत अग्निकणाचा उन्मेष करूं पाहणारा विधि तप्त घृतानें भरलेल्या घटाचा भ्रम उत्पन्न करतो या गोष्टीचा, संधिमतीला नाहींसा करण्याच्या इच्छेनें राजानें योजलेल्या संधिमतीचाच उलट उत्कर्ष करणाऱ्या उपायाला दिलेला दृष्टान्त फार उठावदार आहे. वनवासिजनांच्या झोंपेच्या काळाचें व जागें होण्याच्या काळाचें अशीं दोन्हीं वर्णनें आल्हादकारक आहेत. वैराग्ययुक्त संधिमानाचें चित्र मनांत पावित्र्य उत्पन्न करणारें आहे.

या तरंगांत सहा राजांनीं मिळून एक्क्यांणव वर्षें राज्य केलें.

# तरंग ३.

## (१) मेघवाहन.

युद्धिष्ठिराचा प्रपौत्र जो गोपादित्य त्याच्या पुत्राला, मेघवाहनाला, गान्धाराहून आणून लोकांनीं राजा केलें. त्यापूर्वी प्राग्ज्योतिष नांवाच्या देशांतील राजाच्या कन्येचें स्वयंवर तेथील राजानें मांडलें. तेथें हा गेला असतां याला राजकन्येनें माळ घातली. नरकासुरानें आणलेलें छत्र या राजाच्या डोक्यावर धरलें, तें उगीच नव्हतें. चक्रवर्ती असल्याशिवाय कोणावर तें धरावयाचें नसतें.

या राजानें प्राणिवधाचें निवारण केलें. यज्ञांत पिष्टपशूंचे व घृतपशूंचे बली देऊं लागले. आपल्या कोशांतील धन खर्चून यानें खाटिकांना दुसरी निष्पाप वृत्ति दिली.

मूक देवीनें एक विहार बांधला. त्याच्या अर्ध्या भागांत भिक्षाचरांच्या धर्मतत्त्वाप्रमाणें वागणारे भिक्षू व दुसऱ्या अर्ध्या भागांत, गृहस्थांप्रमाणें वागणारे म्हणून निंद्य असे गार्हस्थ्य भिक्षू, त्यांच्या स्त्रिया व पशू ठेवले.

तो राजा एकदां बाहेर विहार करीत असतां अभय मागणाऱ्या दोन तीन स्त्रिया दिसल्या. आपल्या मस्तकावर अंजलि रचून त्या म्हणाल्या, "आमचे पती जे नाग ते मेघरूपानें नभाचें तल झांकून स्वस्थ बसले असतां, शालिवनाची राखण करणारे कांहीं नागन्ये हिमवृष्टि होईल या खोट्या शंकेनें चोर चोर असें ओरडले. आपण त्यांना म्हणालांत. आपल्या आज्ञेनें पाशबद्ध होऊन ते खाली पतन पावले. आमच्यावर करुणा करावी व प्रसाद व्हावा." बन्धनांतून सोडा असें राजा म्हणाला. बन्धनांतून मुक्त झालेले नाग राजाला प्रणाम करून पत्न्यांसह निघून गेले.

राजा वेलावनांत फिरत असतां एक शबर, चण्डिकेसमूर अधोमुख मनुष्याचा बलि देत होता. त्याचा राजानें धिक्कार केला. शबर म्हणाला, "या उपहाराचा निषेध करशील, तर माझा रोगग्रस्त मुलगा तत्काळ मरेल. या अनाथाचें रक्षण करतोस, पण पुष्कळांचें रक्षण करणाऱ्या या माझ्या बाळाची उपेक्षा करतोस?" बलीच्या दीनवाण्या दृष्टिपातांनीं विवश होऊन राजा म्हणाला, "मी या अनाथाचें रक्षण करण्यास स्वदेह अर्पण करतों." शबर म्हणाला, "त्रैलोक्यांतील जीव अर्पण करून तुझें रक्षण केलें पाहिजे. स्वप्राणाकरतां राजेलोक कोणाकडे पहात नाहींत. तू जग व माझ्या मुलाला जगूं दे." राजा म्हणाला, "तुम्हीं वनचर सदाचारसुखेचा आस्वाद घेणारे कसे व्हाल? मरुदेशांतील लोकांस जान्हवीजळांतील मज्जनाचें सुख कळत नाहीं. तुझ्या मुलाला बहुत (आप्त) बन्धू आहेत. या अनाथाला नाहींत. या बलीचें रक्षण मी चण्डिकेला स्वदेह अर्पण करून करणार."

राजानें स्वशरीरावर प्रहार करण्याला तरवार उपसली तोंच आकाशांतून पुष्पवृष्टि झाली. राजाचा हात एका दिव्य पुरुषानें धरला. ती चण्डिका, तो बली, इ. सर्व नाहींशीं झालीं. तो दिव्य पुरुष म्हणाला "मी वरुण आहें. रसातलाचा तिलक असें हें छत्र तुझ्यापुढें उभें आहे, तें पुराणपुरुषानें नरकासुरानें तुझ्या श्वशूरानें माझ्या पुरांतून हरण केलें होतें. तें नाहीं म्हणजे प्रजेला प्राणहर उपद्रव होतात. तें नाहींसे व्हावें म्हणून, तुझ्या औदार्याची परीक्षा पहाण्याकरतां मी ही माया रचली. राजानें वरुणाला छत्र दिलें; व समुद्रांतील बेटें जिंकण्याची राजानें इच्छा प्रदर्शित केली. वरुण म्हणाला "तुझ्याकरतां मी समुद्राचें स्तंभन करीन." छत्रासह वरुण अदृश्य झाला.

समुद्राला भांग पाडीत नंतर राजा लंकेला गेला. तेथील नृपानें राक्षसांच्या शिरांनीं भूषित अशा ध्वजा अर्पण केल्या व कायमची ताबेदारी प्रदर्शित केली या ध्वजांना पारिध्वज म्हणतात. काश्मीरांत यात्राप्रसंगीं या राजांच्या अग्रभागीं दिसतात. राक्षसांना मांस वर्ज्य करावयास या राजानें लावलें. मांसाशन हें राक्षसांचें अन्वर्थ नांव आतां रूढिवाचक शब्दांत मोडूं लागलें.

एक ब्राह्मण राजद्वारीं आपल्या रुग्ण पुत्राला ठेऊन म्हणाला, "दुर्गेनें मागितलेला हा पशूचा बळि तूं देऊं न देशील तर हा माझा मुलगा मरेल. ब्राह्मण आणि पशु यांतील अंतर तूं वर्णगुरूनेंच ठरवावें. ब्राह्मणपुत्राच्या मृत्यूचें पाप टाळण्याकरतां व आपल्या अहिंसेचें व्रत पाळण्याकरतां राजानें स्वतांचा बलि देण्याचा निश्चय केला. संगमावर उद्भवलेल्या भोंवऱ्यांत पडलेल्या सुमनाप्रमाणें स्थिति असलेलें त्याचें मन स्थिर झालें. दुर्गेनें ब्राह्मणपुत्राची प्रकृति होती तशी केली.

### असंभाव्य गोष्टींचें वर्णन करतांना कवीची भूमिका.

पृथक्जनांना असंभाव्य वाटणारें या दिवसांतील मेघवाहनाचें वर्णन करतांना आम्हांला लाज वाटते. तथापि रचना निर्विशेष एका प्रकारच्या आर्ष मार्गानें (परंपरागत सांप्रदायिक मार्गानें) जाणाऱ्या आम्हांस श्रोतृचित्ताचें अनुवर्तन करावें लागत नाहीं. श्रोत्यांना रुचेल असें लिहिण्याला आम्हीं बांधलेले नाहीं.

## (२) प्रवरसेन; (३) हिरण्य व तोरमाण सहजोडी.

## मातृगुप्ताची गोष्ट

काश्मीरांत राजा हिरण्य निःसंततिपणानें मृत्यु पावला. त्याचा वारस पुतण्या तोरमाण, तीर्थयात्रेला गेला होता. म्हणून काश्मीरांत राजा असा कोणी नव्हता. तेव्हां श्रीमान् हर्ष असें नाम धारण करणारा एक चक्रवर्ती राजा, विक्रमादित्य उज्जयनींत राज्य करीत होता. हा गुणवन्तांना सुलभ असे. मातृगुप्त (एक कवि) विविध आस्थानें (राजसभा) फिरून येथें आला. त्याला हा राजा अद्भुत वाटला. मातृगुप्तानें विचार केला. "या राजाकडे गुणांचें चीज व्हावयाला अंजलिदान करावें लागत नाहीं–आपल्या अभिप्रायाचें प्रकाशन वक्रोक्तीनें करावें लागत नाहीं–कुलवधूप्रमाणें बुद्धीला चातुर्याचें बन्धन घालावें लागत नाहीं. खलांच्या आलापांना खीळ बसते. याच्या सेवेंत गुण अनर्थकारी होत नाहींत. विद्वान् व अज्ञ यांचा समावेश एकाच शीर्षकांत (मथळ्यांत) होत नसल्यामुळें गुणीजनांना मेल्यासारखें वाटत नाहीं. हा युक्तायुक्त जाणणारा अंतरज्ञ आहे. मर्जी संपादन करण्याकरतां सेवकाला जे श्रम पडतात, ते हिमालयांत हिमविक्रय करण्यासारखे निष्फळ होत नाहींत. अन्यांचा प्रवेश सहन न होणारे सेवक याच्या जवळ नाहींत. सर्वज्ञ मन्यतेनें अंध झालेल्या लोकांचा हा मुखप्रेक्षी होत नाहीं. याच्यासह चाललेल्या संलापांला, विपुल भर आला असतां मध्येंच दुर्जात दुर्जनांना च्छेद करणाला सांपडत नाहीं. अर्थसिद्धि दूर नाहीं. आणखी भ्रमण करीत अन्य राजांची सेवा करणापेक्षां याच राजाची सेवा क्लेशांचें भय सोडून करावी असें त्याला वाटलें. या राजाच्या सभेचें रंजन जशा नव्या सभेचें करावें लागतें तसें करण्याचें यानें सोडून दिलें. गुणिजनांचा मध्यम झाला नाहीं.

आपली विशिष्ट योग्यता कळावी म्हणून हा मातृगुप्त, आराधनोन्मुख आहे, तरी आपलें गुण मार्दवानें प्रकट करणारा आहे. सत्कार योग्य आहे हें राजानें जाणलें; पण त्याची परीक्षा पहाण्याकरतां, राजानें त्याचा तसा सत्कार केला नाहीं. तरी तो मातृगुप्त राजाविषयीं प्रेम मनांत बाळगून त्याची सेवा करीत राहिला.

मातृगुप्ताचा सेवाभ्यास क्रमानें वाढला; पण तो राजापुढें अगदीं दीर्घ वेळ अथवा अगदीं स्वल्प वेळ उभा राहिला नाहीं. त्यानें राजदासीवर डोळा ठेवला नाहीं; राजशत्रूशीं सहासन केलें नाहीं. प्रसंगीं निराग्रहानें अन्यांच्या उत्कर्षाविषयीं बोलून तो सभाजनांच्या आवडीचा झाला.

असें मातृगुप्तानें सहा ऋतू घालविले एक दिवस बाहेर जातांना, राजाला पुढें मातृगुप्त सर्वांगांनीं कृश, मलिन व जीर्ण वस्त्र नेसलेला दिसला. राजा मनांत म्हणाला "मी या वैदेशिकाकडून त्याची परीक्षा पाहाण्याकरतां कष्ट सोसवले. शीत, वात व आतप, यांनीं सुकलेला हा पुरुषपादप मी वसन्ताप्रमाणें शोभायमान केला नाहीं. ऐवढी सेवा केली त्याबद्दल मी काय याला चिंतामणि देऊं कीं अमृत देऊं? मातृगुप्ताला सेवाऋणातून मुक्त करण्याचा उपाय राजाला विचार करूनहि सुचला नाहीं.

हिमागम आला. शीतार्थ अम्बरमणि जो सूर्य तो वडवानलाच्या उष्म्याचा अभिलाष धरून जलधीकडे वळला. दिवस लहान झाले. अशा कालांत, रसरशीत निखाऱ्यांनीं भरलेल्या शेगड्या, ज्यांत प्रदीप्त आहेत अशा शयनमंदिरांत उज्ज्वल दीपाच्या प्रकाशांत राजा झोंपी गेला. तो मध्यरात्रीच्या सुमारास जागा झाला. मंद झालेले दिवे पुन्हा उजळ करण्यास पहाऱ्यावर कोण आहे असें राजानें विचारलें. सर्व सुखसुप्त असतां "महाराज! मीं मातृगुप्त" असे शब्द त्यानें ऐकले. आंत ये अशी अनुज्ञा मिळतांच मातृगुप्त आंत शिरला. दिवे उजळ असें राजानें सांगितलें. तसें करून चतुरपणें पदें टाकीत मातृगुप्त जात आहे तोंच राजा म्हणाला. "उभा रहा." राजा काय बोलणार याचा विचार करीत, दूर नाहीं जवळ नाहीं इतक्या अंतरावर मातृगुप्त राहिला. त्याचा शीतकम्प दुणावला. राजानें विचारलें रात्र किती आहे. तो म्हणाला "रात्रीचा अर्धभाग शेष आहे." राजानें विचारलें तूं हें निश्चितपणें कसें जाणलेंस? तुला निद्रा लागली होती कीं नाहीं. त्यानें क्षणार्धांत, श्लोकबद्धवाणींत उत्तर दिलें.

"शीतेनोद्धूषितस्य माषकिणवच्चिन्तार्णवेमज्जतः।
शान्ताग्निं स्फुरिताधरस्यधमतः क्षुत्क्षामकण्ठस्य मे॥
निद्रा क्वाप्यवमानितेव दयिता संत्यज्य दूरंगता।
सत्पात्रप्रतिपादितेव वसुधा न क्षीयते शर्वरी॥ १८१॥

शीतानें पीडलेल्याची, माषकणाप्रमाणें चिंतार्णवांत बुडालेल्याची, क्षुधेनें क्षामकण्ठ झालेल्याची, फुटलेल्या ओंठांनीं शेगडींतील अग्नि प्रदीप्त करणाऱ्याची, माझी निद्रा, अपमान केलेल्या दयितेप्रमाणें मला सोडून दूर निघून गेली. पण सत्पात्रीं दान केलेल्या वसुधेप्रमाणें माझी निद्रा क्षय पावत नाहीं."

राजानें कवीन्द्राचें त्याच्या परिश्रमाबद्दल, अभिनंदन केलें. व त्याला पूर्वस्थानीं लावून दिलें. राजा मनांत म्हणाला, "या खिन्नमनस्क गुणी माणसाचें दुःखसंतप्त वचन ऐकून, जागच्याजागीं असा स्वस्थ बसणाऱ्याचा माझा धिक्कार असो. माझें खरें हृदय न समजून हा आपला बाहेर खेद करीत बसला आहे. याचा विचार करूनहि याला काय द्यावें तें मला सुचत नाहीं–पण तसें नाहीं–'सत्पात्रीं दान केलेल्या वसुधेप्रमाणें,' या याच्या शब्दांनीं मला आठवण करून दिली आहे. ती अशी कीं हवें हवें असें वाटणारें काश्मीर मण्डळ राजरहित आहे. त्याची मागणी राजे करीत आहेत. त्यांची अवधारणा करून तें मण्डळ या पुरुषाला देऊन टाकावें."

रात्रीं हेर पाठवून राजानें काश्मीर मण्डळाच्या सचिवास

कळविलें कीं, मातृगुप्त नांवाचा जो कोणी माझें शासन घेऊन येईल, त्याला निःशंकपणें राज्य द्या.

राजा कृतकृत्य होऊन शेषरात्र निद्रेंत घालविता झाला. मातृगुप्ताला वाटलें आशेचा भार हलका झाला. संशय फिटला. आतां मी सुखानें फिरेन. जनप्रवादामुळें हा राजा चांगला सेव्य आहे.' असें मी समजत होतों. सरीसृपगण (सरपटणाऱ्या प्राण्यांचा गण) वायु भक्षण करून भोगी म्हणून प्रसिद्धि पावले आहेत. गुंजारव करणाऱ्या मृगांचें निवारण करणारे गण विस्तीर्ण कर्ण म्हणून ज्ञात आहेत. अभ्यंतरांत उष्म विकृति अग्नि बाळगणारा वृक्ष शमी ठरला जातो. असें हें सर्व जग निरर्गल प्रलाप करणाऱ्यांनीं विपर्यस्त करून टाकलें आहे. उघड उघड फलप्राप्ति होण्याला, राजाचे उपजीवीच पत्करतात. प्रत्यक्ष राजापासून फलप्राप्ति होण्यास फार परिक्लेश होतात. जे पशुपतीच्या पादतलीं उभे असतात त्यांना त्वरित भस्माशिवाय, दुसरें कांहीं प्राप्त होत नाहीं. पण जे त्याच्या वृषाच्या पादतलीं उभे असतात त्यांना सुवर्णाची प्राप्ति होऊन कोठले दिन सुदिन नसतात ? मातृगुप्त राजाविषयीं निरादर झाला. खेद पावलेल्या तत्त्वज्ञान्याची बुद्धि विपर्यस्त होते.

प्रभातसमयीं राजानें क्षत्त्याला (द्वारपालाला) आज्ञा केली कीं मातृगुप्ताला घेऊन ये. अनेक धांवत गेलेल्या सेवकांनीं मातृगुप्ताला राजाजवळ नेलें. मुहूर्तभरानें भ्रूसंज्ञेनें आपला लेख लेखनाधिकाऱ्याकडून मातृगुप्ताला देववून राजा मातृगुप्ताला म्हणाला "अंग ! तुला काश्मीर माहीत आहे काय ? तेथें जा व तेथील अधिकाऱ्यांस हें शासनपत्र दे. वाटेंत कोणी हा माझा लेख वाचील त्याला माझ्या देहाची शपथ. ही सूचना विसरतां कामा नये."

आशय न कळल्यानें त्याला राजाज्ञा अग्निशिखाच वाटली. अशा मातृगुप्त जातांना पाहून इतरांनीं राजाची निंदा आरंभली. जो नानाद्युतिमान पदार्थांचा रसिक आहे व जो इंद्रधनुष्य पाहून मुदित होतो व पुढें पिसारा करून जो मोर आशेनें नाचतो त्याला वारिकणाहून अधिक जो देत नाहीं अशा मेघाहून अधिक शून्याशय कोण म्हणावयाचा ?

मातृगुप्ताला वाटेंत अहंपूर्विकेनें शुभशकून झाले. सर्पाच्या फणाकोटीवर बसलेला खंजरीट सरडा दिसला. नौकेंत बसून सागर तरून गेलों असें स्वप्न त्यानें वाटेंत निद्रा घेत असतां पाहिलें. पुष्कळ वाट चालून त्याला मंगल दधिपात्रासारखा हिमालय लागला.

काश्मीरांत गेल्यावर तो तेथें पहातो तों मोठेमोठे अमात्य जमले होते. मातृगुप्तानें अमात्यांना शासनपत्र अर्पण केलें. त्यांनीं विचारलें मातृगुप्त असें श्लाघ्य नांव आपलेंच काय ? तो स्मित करून होय म्हणाला.

सर्वत्र गडबड उडाली त्यांनीं मातृगुप्ताला स्नातानुलिप्त करून राज्याभिषेक केला. व ते म्हणाले आमचें रक्षण करावयाला राजा पाठवून द्या अशी विनंति केल्यावरून विक्रमादित्यानें स्वसमान असा राजा तूं आहेस असें पाहून तुला पाठवून दिलें. सुखानें राज्य कर. मातापिता जन्माला निमित्त होतात. पण प्राण्याला कर्माप्रमाणें जीवित प्राप्त होतें. तसें हें राज्य तुला मिळालें आहे. दुसऱ्या कुणी मिळवून दिलें असें मानूं नकोस. 'मी तुझा आहें' असें कुणाला वाखाणून हे राजा ! आपणाला व आम्हांला लघुता आणूं नये."

धन्याची सत्क्रिया व त्याचे असामान्य गुण, आठवून मातृगुप्तानें एक श्लोक रचून, स्वात्म्य (आपलेपणाच्या) नजराण्यासह धन्याकडे पाठवून दिला.

> नाकारमुद्वहसि नैव विकत्थसे त्वम् ।
> दित्सां न सूचयसि मुंचसि सत्फलानि ॥
> निःशब्दवर्षणमिवाम्बुधरस्य राजन् ।
> संलक्ष्यते फलत एव तव प्रसादः ॥

**भावार्थः**—तूं चर्येवरून कांहीं भाव प्रदर्शित करीत नाहींस. तोंडानें विकत्थन करीत नाहींस. देण्याची इच्छा सुचवीत नाहींस. फलप्राप्ति तेवढी हे राजा ! करून देतोस. निःशब्द वर्षाव करणाऱ्या मेघाप्रमाणेंच तुझा प्रसाद फलप्राप्तीनें लक्षांत येतो.

**टीपः**—युक्तायुक्त जाणणाऱ्या विक्रमादित्य राजाचें वर्णन कवीनें फार सरस केलें आहे. त्याहून सरस त्याच्या सेवकाचें मातृगुप्ताचें वर्णन आहे. राजदासीवर डोळा न ठेवणारा दुसरा राजभृत्य कोण सांपडेल ? त्याच्या वर्णनांत एवढें सूक्ष्म निरीक्षण तरी कोणता कवि कल्हणाशिवाय दाखवील ? डाक्तर भाऊदाजींच्या मतें हाच मातृगुप्त कवि, कालिदास असावा. तें पुष्कळांस मान्य नाहीं. नसो, पण अशी अशी तुझी सेवा करीत असतां अपमानित दायितेप्रमाणें माझी निद्रा उडाली असें सांगून सत्पात्रींदान केलेल्या वसुधेप्रमाणें माझी क्षपाक्षय पावत नाहीं, असें कथन करून आपल्या सेवेचा मोबदला कसा हें सूचित करणारा श्लोक रचावयास कालिदासाच्याच प्रतिभेचा कवि लागेल, यांत संशय नाहीं. मातृगुप्त काश्मीरच्या वाटेनें जात असतां शुभशकुन झाले. हिमालयाला मंगल दधिपात्राची कल्हणानें दिलेली उपमा सहजरम्य व हिमालयाचें पावित्र्य दर्शित करणारी आहे.

मातृगुप्त राजा असतां मेंठकवीचें हयग्रीव नांवाचें काव्य प्रसिद्धीस आलें. त्याचा सत्कार मातृगुप्तानें केला. व करंभक नांवाचीं नाणीं पाडून त्यांचा प्रसार केला. आपला कल्याण करणारा राजा विक्रमादित्य हा मृत झाला असें ऐकून मातृगुप्त काशीस जाऊन यति होऊन राहिला.

## ५ प्रवरसेन.

हिरण्याचा पुतण्या काशीयात्रा करून परत आला व राजा झाला. हा राजा दिग्विजयी होता. यानें वितस्तेवर पूल बांधला. तेव्हां नौकांचा पूल बांधण्याची कल्पना निघाली. वितस्तेच्या तीरावर प्रवरपूर वसविलें, त्यांत पृथक् बाजार, क्रीडागृहें, क्रीडापर्वत पाण्याचे पाट इत्यादि सोई होत्या.

( ६ ) युधिष्ठिर—

## ७ लखखण नरेन्द्रादित्य.

लिखित दस्तैवज चांगल्या स्थितींत रहावे म्हणून यानें जागा बांधल्या.

## ( ८ ) रणादित्य.

### भानवरणादित्याची देवी राणी.

हा राजा पूर्वजन्मीं द्यूतकार होता. द्यूतांत सर्वस्वी हरण झाल्यावर शेवटपर्यंत न सोडणाऱ्या कितवांना मिळून यानें देवीचें अवंध्य दर्शन घेण्याचें ठरविलें. वज्रशंकु पुच्छाच्या भ्रमरांनीं तिचा मार्ग दुर्लंघ्य होता. यानें लोखंडी चिलखत घालून महिषचर्म पांघरिलें. शेणमातीचे लेप अंगाला लाविले. लोष्ठाप्रमाणें संचार करीत हा देवीच्या तमोवृत गुहेत शिरला. भ्रमरांचीं मण्डळें उठून मृत्यूच्या तुताऱ्यांच्या शब्दाप्रमाणें पंखांचा ध्वनि करीत त्याला प्रहार करूं लागलीं. त्याचें चिलखत गळालें पण धैर्य गळालें नाहीं. मातीच्या कणांनीं जीं अंध होत होतीं तीं परत जात. पण नव्यांनीं त्याचें मांस खाऊन त्याला अस्थिशेष केलें. असा देह त्यानें देवीच्या पायावर टाकला.

देवीच्या स्पर्शानें तो पूर्ववत् झाला. देवीचें निर्दोष रूप पाहून तो तिला अप्सरा समजला, त्यानें संगमाची याचना केली. ती तो बदलीना. पूर्वी अधिवास जो प्राण्यांमध्यें विलीन असतो, तो अंगावरील तिलाप्रमाणें शेवटपर्यंत विशीर्ण होत नाहीं. देवी म्हणाली पुढल्या जन्मीं तुझी इच्छा सफल होईल.

द्यूतकारानें प्रयागांत जाऊन देहविसर्जन केलें. या जन्मीं तो रणादित्य झाला. चौलराजाला लांटावरून आलेली एक कन्या मिळाली. तीच ही भ्रमरवासिनी. तिचा विवाह रणादित्याशीं झाला. ती मर्त्याला स्पर्श कशी करणार? आपल्या सारखी दिसणारी, मायामय स्त्री राजाच्या पलंगावर ठेऊन भ्रमररूपानें ती रात्रौ बाहेर पडे.

राजानें दोन देवळें बांधलीं, त्यांत स्थापन करण्याकरतां पार्वतीविवाहप्रसंगीं पुजलेल्या हरिहराच्या मूर्ती राणीनें आणवल्या. देवीनें एक स्वच्छ आरोग्यशाळा रोग्यांना औषधें देण्याकरतां बांधिवली व सेनामुखी ( देवीच्या ) शान्तिकरतां गृह बांधवलें.

या राजानें तीनशें वर्षें राज्य केलें व अन्तीं चंद्रभागातीरी नमूचीच्या बिळांत प्रविष्ट झाला. पौरजन पुढें पाठविलेले होते.

टीप—रणादित्य व भ्रमरवासिनी देवी यांची गोष्ट कल्पनारम्य आहे. पूर्वीच्या न बदलणाऱ्या अधिवासाला कधीं न क्षीण होणाऱ्या अंगावरील तिलाची उपमा पूर्णपणें पटणारी आहे. राजाचा राज्यकाळ तीनशें वर्षें जो कवीनें लांबविला आहे तो बहुधा त्यानें एकंदर दिलेल्या इतिहासकालाचा सप्तर्षिकालाशीं मेळ बसविण्याकरतां असेल.

## ( ९ ) विक्रमादित्य

## (१०) बलादित्य

हा रणादित्याचा धाकटा मुलगा, राजा झाला. यानें प्रतापानें बंगाल जिंकला.

## राजकन्या अनंगलेखा हिची गोष्ट

या राजाची अनंगलेखा या नांवाची एक कन्या होती. ती शृंगारसागराची कौमुदी होती. एका दैवज्ञानें राजाला सांगितलें, तुझ्या अन्तापर्यंत गोनंदाचें राज्य टिकेल. मग तुझा जामात साम्राज्य भोगील. तशी राजाची इच्छा नव्हती. पुरुषप्रयत्नानें तो दैवाला जिंकण्याचा उद्योग करूं लागला. कन्या साम्राज्यहारिणी न व्हावी म्हणून त्यानें तिला कोणाहि राजाला न देतां दुर्लभवर्धन नांवाच्या एका अश्वघास ( अश्वांना घांस पुरवणाऱ्या ) कायस्थाला देण्याचें त्याची स्वरूपता पाहून ठरविलें. त्याच्या आईचा ती सुस्नात असतां कर्कोटक नागाशीं संबंध झाला होता. तें त्या राजाला माहित नव्हतें. शंमन्य लोक ज्याला आग्रहानें अयोग्य ठरवतात त्याच्यावर ताण करण्याकरतां दैव त्यालाच शुभ ठरवितें.

भाग्यानुगामिबुद्धीनें दुर्लभवर्धन यथोचित वर्तन करून सर्वांना चक्षुष्य झाला. प्रज्ञेनें प्रकाश पावणाऱ्या जांवयास, श्वशूरानें प्रज्ञादित्य असें नांव ठेवलें. पित्याच्या लाडांनीं व तारुण्याच्या मानें उद्धृत्त झालेली राजपुत्री, त्याची योग्यता जाणत नव्हती. सुखोपभोग, तरुण पुरुष, पतीचें मृदुत्व, पुढें उभें माहेर, स्वैरिणींचा संगम, इत्यादि शीलाला विघ्न करणारें काय काय तिथें नव्हतें? रोज दर्शनानें खंक मंत्र्यानें तिच्या मनांत प्रवेश केला. बहुशः जी स्त्री सखीमध्यें असतां गुप्तपणें हंसते, भर्तृदर्शनानें विवर्ण होते, पति रागावला असतां भिवया उडवते, नेत्र फिरवते, पतीचें अप्रिय भाषण ऐकून डोळे मिचकावते व हंसते, त्याच्या गुणांची स्तुति झाल्यास खिन्न होते, शत्रूच्या स्तुतींत रत होते, पतीची रममाण होण्याची इच्छा कळतांच सख्यांशीं गोष्टी करण्यांत चूर होते, चुम्बनाचे वेळीं मुख चोरते, पतीच्या तल्पावर झोपेचें सोंग घेते, अशा स्त्रीचा शीलनाश झालेला असतो.

एका रात्रीं खंक व अनंगलेखा एकत्र सुप्त झालेलीं दुर्लभवर्धनानें पाहिलीं. संभोग नुकताच समाप्त झाला असें कुचाचे कांपणारे अंकुर व श्वासाचे वेग हीं सुचवीत होतीं. हें तिच्या-

इतालासुद्धां क्रोध यावयाला कारण पुरेसें होतें. तो क्रोधानें जळूं लागला. त्या दोघांना कापावें अशी इच्छा त्याला झाली. पण विवेकानें तिचें निवारण केलें. आपण त्यांना कापून पुन्हां केव्हांच परत आलों असें त्याला वाटलें. दुर्लभवर्धना शिवाय ज्या कुणाची गणना वशीजनाच्या माथ्यावर करतां येईल त्याला नमस्कार असो ! तो म्हणाला प्रेमाच्या यां अनुगांच्या या चेष्टांचा धिक्कार असो. या चेष्टा विचारवंध्या असतात. वंध्या जशा मुलें प्रसवत नाहींत तशा या चेष्टा विचारांना प्रसवत नाहींत. शेवटीं "खंकाच्या शेल्यावर तूं वध्य असून तुझा वध केला नाहीं. हें स्मरण्याचें काम तुझें आहे." असें वर्णन लिहून राजा निघून गेला.

खंकानें तें वर्णन वाचलें. आपले प्राण दुर्लभवर्धनाच्या दाक्षिण्यानें वांचले असें जाणून अनंगलेखेला खंक अगदीं विसरून गेला अशी प्रतिक्रिया झाली.

**टीपः**—हीच गोष्ट थोड्या फरकानें कोंकण प्रान्तांत नुसती राजाराणींची सांगितलेली प्रस्तुत ग्रंथकारानें ऐकली. ती अशी. "मंत्री व राणी यांस महालांत उपरोक्त अधर्म्य स्थितींत पाहून त्या दोघांवर आपल्या शेल्याचें पांघरूण घालून राजा तेथून निघून गेला.

राणी व मंत्री यांच्या या पापाची कुणकुण कांहींना लागली. राजा लवकरच कांहीं कारणानें मृत्यु पावला. तेव्हां राणी मोठमोठ्यानें रडूं लागली. तेव्हां तिला त्या लोकांनीं विचारलें "आपण रडतां कां ! आपल्याला हवें होतें तेंच झालें." तिनें उत्तर दिलें "होय. हें सारें खरें. मी पति मृत झाला म्हणून रडत नाहीं. माझेवर आतां पांघरुण कोण घालील ? कोणी नाहीं ! म्हणून मी रडत आहे !" हा फरक इष्ट वाटतो. अपराधावर पांघरूण घालणें या शब्दप्रयोगांत असलेला विशेष अर्थ या गोष्टीवरून निघाला असेल काय !

राजा बलादित्यमृत झाला. त्यानंतर गोनंद संतति नष्ट झाली. खंकमंत्र्यानें कर्कोटक नागानें जन्म दिलेल्याला, दुर्लभवर्धन प्रतापादित्याला राज्याभिषेक केला. गोनंदवंशाहून अधिक शुचि अशा कर्कोटक वंशांत भू प्रस्थापित झाली.

## तरंग ४.

### ( कर्कोटक वंश ).

### ( १ ) दुर्लभवर्धन प्रतापादित्य.

### २ दुर्लभक प्रतापादित्य २ रा.

### दुर्लभक प्रतापादित्य राजा झाला.

### राजा प्रतापादित्य व नोण वणिजाची नरेंद्रप्रभा स्त्री यांची गोष्ट.

विविध विक्रेत्यांनीं संकुलित झालेल्या प्रतापादित्य राजाच्या राज्यांत रोहितक नामक प्रदेशांत नोण नांवाचा वणिज राहत होता. त्यानें आपल्या देशांतील ब्राह्मणांकरितां एक महागुण ( पुष्कळ सोयींचा ) मठ बांधला.

त्याला एकदां राजानें मोठ्या प्रेमानें आमंत्रण दिलें; एक दिवस ठेऊन घेऊन, नृपोचित उपचारांनीं त्याची अर्चा केली. सकाळीं राजानें त्याला एकदिवस सुखःशिका ( सुखानें आहेस का ? ) असा प्रश्न विचारला. दीपांच्या कजलानें शीर्षव्यथा त्यानें झाल्याचें सांगितलें. पुढें क्रमानें नोणाच्या विनंतीवरून राजा त्याच्या घरीं रहावयास गेला. तेथें त्यानें मणिदीप पाहिले. असल्या लक्ष्मीविलासानें राजा विस्मित झाला. राजाचें आदरातिथ्य होत होत तो दोन तीन दिवस राहिला.

एकदां राजानें नोणाची नरेन्द्रप्रभा नांवाची ललिताकृति चंद्रमुखी स्त्री पाहिली. तिच्या अभिलाषानें राजा स्पृष्ट झाला. त्याच्यावर तिनें आपलें मन दृष्टीनेंच बसविलें. तिच्या स्पर्शाचा लाभ झाला नव्हता तरी, ती सौभाग्यसुधासुंदरी आपल्या आलिंगनानें संस्पृष्ट आली आहे, असें त्याला वाटलें. इर्थे स्तंभाआड, क्षणभर लपून वांकड्या नजरेनें माझ्याकडे पहात पहात जातांना ही माझें हृदय घेऊन जात आहे, असें राजाला तेवढ्यानेंच वाटलें.

राजा विव्हळ होऊन घरास गेला. त्याची अंतःपुरावरील प्रीति व तनु हीं कृश झालीं. त्यानें आपल्या मानसोद्यानांत रुजलेल्या प्रेमवृक्षाचा धिक्कार केला. तो म्हणाला "राजाच जर प्रजेच्या हक्कांचें अपहरण करूं लागला, तर नीतीचा अपक्रम झाला असतां त्याचें शासन दुसरा कोण करील ?" पण साधुसेव्य पद्धतीला व त्या सुलोचनेला, राजाच्यानें सोडववेना. तो आसन्नमरण स्थितींत पडला.

सुज्ञ वणिजाला हा वृत्तान्त कळला, तेव्हां अस्वस्थ होऊन, वणिजानें कांहीं तत्त्वज्ञान लढविलें. तो राजाला भेटून म्हणाला, प्राणसंशय प्राप्त झाला असतां प्राण्याला कांहीं अकृत्य नसतेंच. तुझ्याकरतां माझ्या प्राणांची गणना मी करणार नाहीं. मग इंद्रियांच्या विषयाची या स्त्रीची कथा काय ? इतकें सांगूनहि तूं तिला नको म्हणशील तर, तिला मी नर्तकी म्हणून प्रथम देवदासी करतो. आणि मग तूं तिचा स्वीकार कर. राजानें प्रथम लज्जेचा त्याग केला व मग सुलोचनेचा स्वीकार केला.

### ३ चंद्रापीड वज्रादित्य ( प्रतापादित्याचा मुलगा )

या राजाच्या कित्येक गुणांचा उच्चार करून, त्याची स्तुति कांहीं काळ चालवून, कवि म्हणतो. "ही स्तुति नियंत्रित करावी लागत आहे ती गुणांची इयत्ता संपली म्हणून नव्हे. तर अतिप्रसंग भंग होईल, ( कथेचें अनुसंधान सुटेल ) म्हणून.

### सार्वजनिक कार्याकरतां मोबदला देऊन खासगी जमीन घेण्याविषयीं गोष्ट

चंद्रापीडानें त्रिभुवनस्वामीचें देऊळ बांधावयाचें ठरविलें. तेव्हां क्षेत्रोपयोगी अशी आपली कुटी एक चर्मकार देईना. नव्यानव्या अधिकाऱ्यांना, तो देतों असें म्हणे; पण ते सूत्रपात करूं लागले म्हणजे साहजिक आग्रहानें ग्रस्त होऊन त्यांना अडवी.

ही गोष्ट राजाला अधिकाऱ्यांनीं सांगितली. तेव्हां राजा म्हणाला, "धिक्कार असो तुमच्या या अप्रेक्षापूर्वक काम करण्याच्या पद्धतीला ! चर्मकाराचा दोष नाहीं. त्याला विचारल्या

शिवाय तुम्हीं या कामांत प्रविष्ट झालांत! हें काम यांचवा नाहींतर, अन्य ठिकाणीं चालवा. सदसत् जाणणारे जर आम्हीं धर्मविगुण क्रिया करूं लागलों तर, न्यायमार्गानें कोणी चालावें?"

मंत्र्यांनीं चर्मकाराकडे एक दूत पाठविला. तो परत येऊन म्हणाला, "चर्मकार म्हणतो कीं मला राजाला भेटावयाचें आहे. आस्थान मण्डपांत प्रवेश नसेल तर बाह्यालींत भेटेन."

राजा त्याला बाह्यालींत भेटला तेव्हां चर्मकार त्याला म्हणाला, "हे राजा! जसा माझा आशय आहे तसा मीं सांगतों. त्यावरून आपण अनुलिप्त होऊन राहूं नये. तूं पहातोसच आहेस मी श्वानापेक्षां कमी नाहीं. तूं काकुत्स्थापेक्षां श्रेष्ठ नाहींस. महाराजांची जशी सौधहासिनी राजधानी (राजवाडा) आहे तशी फुटक्या घटमुखांनीं काळोख नष्ट करणाऱ्या तमोरींनीं (खिडक्यांनीं) शोभणारी माझी कुटी आहे. ती जन्मापासून मातेप्रमाणें माझ्या सुखदुःखाची साक्षिणी आहे. ती मठिका माझ्यानें आज तुवाडलेली पहावत नाहीं. ज्याच्या घराचें हरण करण्यांत येतें त्याच्या मनस्थितीचें वर्णन करण्यास, जर कोणी समर्थ होईल तर तो विमानांतून च्युत झालेला अथवा राज्यभ्रष्ट असा पार्थिवच होईल! इतकें असून महाराजांनीं माझें जवळ येऊन माझ्या घराबद्दल मागणी केली, तर सदाचारानुरोधानें तें देणें मला उचितच आहे."

मोबदला देऊन राजानें त्या चर्मकाराचें घर घेतलें. चर्मकार राजाचें कल्याण इच्छून निघून गेला. राजानें त्या ठिकाणीं त्रिभुवनस्वामीची स्थापना केली.

**टीपः**—चर्मकारानें आपलें काम राजापुढें स्वतः चालविलें. त्याचें भाषण थोडकेंच असून एक सरस वक्तृत्वाचा मासला आहे. चर्मकारानें सहानुभूति मिळवून घेतली. आजच्या सुधारलेल्या कालाला शोभेल असा न्याय राजानें दिला म्हणून त्याचें कौतुक वाचक करतीलच.

## कलियुगांत चालू नसलेलें एक दिव्य.

राजाला एकदां एका ब्राह्मणीनें येऊन सांगितलें. "माझा पति सुखनिद्रित असतां, त्याचा कोणी वध करावा हें तुझ्या सदाचाराला लज्जा आणणारें कृत्य आहे. माझ्या पतीचा कोणी विरोधी नाहीं. त्याला सर्व दिशा शीतल होत्या. त्याच्या वधाचा एक ब्राह्मण अध्ययनधम (अधमविद्येचें अध्ययन करणारा) जादुगार आहे. गुणदरिद्री क्षुद्रलोकांना निर्निद्र राहून कौशलशाली जनांची प्रसिद्धि पाहून असूयेची बाधा होते. पुश्चलेय दुःशील नसेल तर दुसरा कोण असेल! वाचाल मृषा भाषण करीत नसेल तर दुसरा कोण करीत असेल? कायस्थ (कारकून) कृत नसेल तर दुसरा कोण असेल? दत्तगृहांत जाणारा लोभी नसेल तर दुसरा कोण असेल? स्त्रीजित सर्वहास्य (ज्यानें त्यानें ज्याला हंसावें असा) नसेल तर दुसरा कोण असेल? असा भूतार्थ संग्रह आहे. (असें वस्तुस्थितीचें सार आहे.)

शंकास्थान (आरोपी) विप्राला आणून राजा त्याला म्हणाला "परिशुध्यस्व. दिव्य करून तूं शुद्ध आहेस असें सिद्ध कर." ब्राह्मणी लागलेंच म्हणाली. "हा खाखोंद विद्या (जादू) जाणतो. हा दिव्य प्रस्थापित करून, निःसंभ्रम होईल. चार रात्री क्षीण झाल्या. मी अजून अन्न सेवन केलें नाहीं. व अनुगमन केलें नाहीं. याला दण्ड होईतों मी उपास करून प्राण देईन."

मग राजा त्रिभुवनस्वामीपुढें (केशवापुढें) उपास करीत बसला. स्वप्नोत्तम स्वप्नांत येऊन म्हणाला. "राजा! कलियुगामध्यें असलें सत्यान्वेषण युक्त नाहीं. तरी तुला एकवेळ प्रत्यय येईल. या देवालयाच्या अंगण्यांत शालीचूर्ण उधळून त्यावरून शंकित विप्राकडून तीन प्रदक्षिणा घालव. व त्याच्या पावलामागून ब्रह्महत्येचीं पावलें उमटलीं तर तो वधक समज."

तसें करवतां ब्राह्मणाचा दोष दिसून आला. राजानें त्याला वधाची शिक्षा वर्जून शिक्षा केली. ब्राह्मणी राजाला आशीर्वाद देऊन निघून गेली.

या राजाला त्याच्या भावानें वरील ब्राह्मणाकडून अभिचार कर्म करवून मारवलें. राजा आसन्नमरण असतां त्याच्यापुढें या ब्राह्मणाला पकडून एकानें उभें केलें. हा अन्यप्रयुक्त आहे म्हणून राजानें त्याचा वध केला नाहीं. कृतयुगांतील राजांच्या पंक्तीला याला बसवावयाला ब्रह्मदेव विसरला म्हणून काकपद घालून कलियुगांतील नृपावलींत याला ब्रह्मदेवानें बसविलें. अभिचार कर्म करविणारा त्याचा भाऊ **४ तारापीड उदयादित्य राजा झाला.**

हा ब्रह्मद्वेषी होता. ब्राह्मणांस शिक्षा करी. त्यांनीं याला जादू करविली. व हा मृत झाला. चंद्रापीडाचा भाऊ.

## ५ ललितादित्य (मुक्तापीड) राजा झाला.

हा दिग्विजयी होता. याच्या दुंदुभींचा ध्वनि ऐकून शत्रू वसति उठवून जात, तेव्हां हा नगराचा गर्भपातच वाटे.

कान्यकुब्ज देशांतील यशोवर्म्यानें याला पाठ दाखवून संधि केला. संधीविषयींच्या लिखितांत, "हा संधि यशोवर्मा व ललितादित्य यांत झाला." अशा उल्लेखानें यशोवर्म्याचें नांव आधीं आलें; तें आमच्या प्रभूला कमीपणा आणणारें आहे. व अक्षम्य आहे असें संधिविग्रह करण्याला अभिमानी मंत्र्याला (मित्रशर्म्याला) वाटलें. म्हणून त्यानें पुन्हां चढाई केली. तींत यशोवर्म्याचें उच्चाटण झालें. त्याचीं पंचमहाशब्दभाजनें कर्मस्थानें होतीं. (१) महाप्रतीहार पीडा, (२) महासंधिविग्रह, (३) महाश्वशाला. (४) महाभाण्डागार व (५) महासाधन भाग. तीं राजानें संतुष्ट होऊन मित्रशर्म्याला दिलीं.

**टीपः**—हीं भाजनें पूर्वी शाही राजांकडे चालत असत. हे शाही राजे मूळचे तुर्क होते. ते काबूलच्या खोऱ्यांत व गान्धार देशांत नवव्या शतकापर्यंत होते.

यानें मुम्मुनीला तिवार जिंकिलें; कारण एकवार मिळविलेल्या जयाला, अरीचे वीर घुणाक्षर म्हणतात.

कवि वाचस्पति राजश्री भवभूत्यादी कवींनीं सेवित असा यशोवर्मा ललितादित्याचा बन्दी ( गुण गाणारा ) झाला. आणखी काय सांगावें ?

प्रस्थापित केलेल्या पुरांना त्यानें उचित नांवें दिलीं. उ० दिग्विजय करण्याचा ज्या ठिकाणीं त्यानें निश्चय केला, त्या ठिकाणीं वसविलेल्या पुराला त्यानें निश्चितपूर असें नांव दिलें. असें एक गांव नाहीं, नदी नाहीं, सागर नाहीं, द्वीप नाहीं, कीं जेथें यानें आपली प्रतिष्ठा स्थापन केली नाहीं.

## अंधांतरीं टांगलेला नरहरि.

स्त्रीराज्यांत यानें नरहरीची स्थापना केली. तो निराळंब टांगलेला होता. लोहचुम्बकाच्या साहाय्यानें त्याचा मूर्धा खालींवर करतां येत असे.

दिग्विजयाला निघतांच यानें कोटी दिन्नार घेतले होते. परत आल्यावर त्यानें भूतेश्वराला एकादश कोटि दिले.

चक्रधर येथें पुष्कळ पाणी पोंचविण्याची व्यवस्था वितस्तेवर रहाटांच्या ओळी बांधून केली.

यानें मार्तण्डाचें देऊळ बांधलें. परिहासपूर वसविलें. या प्रतिकुबेरानें मुक्ताकेशवाची मूर्ति बनविण्यास चौर्‍यैंशीं हजार तोळें सोनें लावलें—तितकेंच हजार पळ रुपें परिहासकेशवाची मूर्ति बनविण्यास लाविलें. तितक्याच संख्येच्या वजनाचें रीतसर प्रस्थ सोनें घेऊन श्रीमान बुद्धाची व्योमव्यापी मूर्ति करविली. त्याच्या पत्नीनें ईशानदेवीनें पाण्याचें कुण्ड बांधलें. त्यांतील जल सुधारसाप्रमाणें रुग्णजनांस आरोग्यदायी होतें.

## ललितादित्याच्या तोंडून लीलेनें निघालेल्या आज्ञा देव कशा पाळीत त्याची गोष्ट.

एकदां या राजानें कपित्थाचीं फळें आणावयाची आज्ञा केली. तोंच नंदनवनाचा पालक तीं फळें घेऊन आला व इंद्राचा निष्ठुरपण पथ्यावह निरोप सांगतांना म्हणाला, "तूं पूर्वजन्मीं पृथु संपदेच्या एका गृहस्थाचा नांगर हाकणारा होतास; बैल हांकीत जात असतां श्रान्त झालास. दिवसहि क्षीणप्राय झाला. स्वामीकडून कोणी पाण्याचा कुंभ व अपूप घेऊन आला. तूं खाऊं लागणार तों कण्ठांत प्राण आलेला एक विप्र येऊन म्हणाला, 'अतिथीचे प्राण वांचव.' तूं अपूप व जल दिलेंस. त्या सत्पात्रीं दानानें, स्वर्गांत असें ठरलें कीं तुझ्या शंभर आज्ञा अखंडित रहाव्या. त्या अल्पशेष आहेत, हव्या तशा खर्च करूं नकोस. पावसाळ्यांत मिळणारीं फळें शिशिरऋतूंत कशीं मिळतील." असें म्हणून पालक अंतर्धान पावला.

राजानें त्या प्रकारच्या पुण्याईच्या लालसेनें एक वार्षिक पर्वणी ( उत्सव ) स्थापिली. तिचें नांव सहस्रभक्त. तींत एक लक्षांवर एक इतकीं अन्नानें भरलेलीं पात्रें तो सदक्षिण वांटी. त्यानें शिवाय उत्तर प्रदेशांत पाणपोयी स्थापल्या.

राजानें भुःकार देशांतून चंकुण नांवाच्या एका रससिद्ध पुरुषाला आणून त्याकडून रसाच्या योगानें सुवर्णाची भर कोशांत टाकिली.

पंचनद देशांत ( पंजाबांत ) सिंधुसंगम दुस्तर झाला. राजा सेनेसह तटावर स्तंभित होऊन राहिला. अमात्य चंकुणानें पाण्यांत एक मणि टाकला. नदीचें पाणी द्विधा झालें. राजा-नदी उतरून ससैन्य गेला. अमात्यानें दुसरा मणि टाकला. पहिला आकर्षण करून घेतला. पाणी पूर्ववत् झालें.

राजा म्हणाला "माझेजवळ जी चांगली वस्तु असेल ती मागून घे व हे मणि मला दे. चंकुण म्हणाला समुद्र तरून जाण्याचीं हीं रत्नें तुझीं झालीं समज. मात्र संसार तरून जाण्याची सुगत देवाची मूर्ति तूं मगध देशांतून आणली आहेस ती मला दे. राजानें मणि घेऊन मूर्ति दिली.

## स्वामिनिष्ठ अमात्याची गोष्ट

राजा पुन्हा दिग्विजयाला निघाला. एक प्राणार्थी छिन्न-हस्त पुरुष पुढें येऊन पडला. तो राजाला म्हणाला, मी सिकता-सिन्धूजवळच्या राजाचा हितकारी सचिव असून, त्याला मी तुझी ( ललितादित्याची ) प्रणति ( ताबेदारी ) हिताची आहे असें म्हटलें. तेवढ्यावरून त्यानें 'माझा असा विग्रह केला'. असली काया रक्षण करून, सूड घेऊन वैराची शुद्धी करण्याची इच्छा आहे.

> अपकृत्याधिकं शत्रोरपकारं जयेत् मितम् ।
> गंभीरप्रतिनादेन घोषमुच्चैर्यथा गिरिः ॥ २५ ॥

शत्रूनें केलेला मित असा अपकार अधिक अपराधानें फेडावा. गिरीवर ओरडून नाद केला असतां तो गिरि त्याहून अधिक गंभीर असा उलट प्रतिध्वनि करतो.

तेथें जावयाला तीन महिने लागतील. आपण जाऊं तो वैरि तेथें कसा असेल ! मी तुला अर्ध्या महिन्यांत जाण्याचा मार्ग दाखवितो."

तुझ्या स्वामीचा निग्रह करीन अशी प्रतिज्ञा करून राजानें त्यासह सिकतासिन्धूंत प्रवेश केला. पंधरा दिवसांनीं जवळचें पाणी संपलें. आणखी दोन तीन दिवस निघतील कीं नाहीं असें वाटून राजानें त्याला शेषपन्थ किती आहे असें विचारलें. तो हंसून म्हणाला "शेषपन्थ विचारतोस तो अरीचा कीं यमाचा? तुला मी स्वजीविताची उपेक्षा करून, स्वामिहिताकरतां, ससैन्य मृत्युमुखांत युक्तीनें घातलें. ही सिकतासिन्धु निर्जल आहे. तुला येथें त्राता कोण आहे ?"

हें ऐकून राजा म्हणाला "अमात्य ! स्वामिहित करणाऱ्या तुझ्या या कृत्यानें, आम्ही खूष आहोंत. पण मण्याच्या भ्रमानें अग्निकण उचलून आपली अंगुलि मात्र भाजून घेणारा तूं खरोखर रडत बसशील. माझ्या निदेशानें मेदिनींतून पाणी निघेल."

असें म्हणून ललितादित्यानें भाला मारून पाताळांतून पाणी वर आणलें. मंत्री विफलश्रम होऊन प्रथम भल्याच्या नगरींत

व मग यमाच्या नगरींत प्रवेश करता झाला. मंत्र्याचीच अवस्था ललितादित्यानें त्याच्या स्वामीला आणून दिली.

ललितादित्यानें जागजागीं यथोपयोग नद्या काढल्या. अद्यापि त्या कुन्तवाहिन्या या नांवानें वाहत आहेत.

या राजाचे त्रिभुवनांत अद्भुत असे. वृतान्त आहेत. पण अति प्रसंगभंग होईल. कथानकाचें अनुसंधान तुटेल म्हणून येथें दिले नाहींत.

टीपः—शत्रूनें केलेल्या लहान अपकाराची फेड महान अपकारानें करावी या सिद्धान्ताला प्रतिध्वनि करणाऱ्या गिरीचा दाखला उत्कृष्ट आहे."

हा राजा कधींकधीं मलिनवृत्ति दाखवी. अंतःपुरांत मदिराक्षीव होऊन त्यानें अशी आज्ञा केली कीं, प्रवरसेनानें बांधलेलें प्रवरपूर माझ्या पुरासारखें वाटत असेल तर तें जाळून टाका. सेवकांनीं गवताच्या राशीला आग लावली. प्रासादावरून आग पहात असतां राजाचें तोंड उज्ज्वल झालें.

पुढें क्षैब्य क्षीण झालें. राजाला पश्चात्ताप झाला. मंत्री म्हणाले "ही पुराची आग मिथ्या होती. स्वप्नांत अंतर्हित झालेला पुत्र जागें झाल्यावर पुढें उभा पहातांच पुरुष जसा निःशोक होतो तसा, पुर नष्ट झालें नाहीं असें ऐकून राजा निःशोक झाला. व म्हणाला, "जें प्रिय असेल तें अनुचित असेल तरी तें करून जे सेवक राजांना रमवतात, त्यांचा धिक्कार असो! पण आपल्या प्राणाची उपेक्षा करून जे पंथ सोडून जाणाऱ्या राजाचें सहसा रक्षण करतात त्या महात्म्यांनीं पृथ्वी पुनीत झाली आहे."

टीपः—वरच्या उन्मत्त स्थितींतील राजाला स्वप्नांत असलेल्या पुरुषांची समग्र उपमा सुन्दर आहे. मॅसिडोनियाचा राजा मद्य पीऊन उन्मत्त असतां एका स्त्रीची विनंति झिडकारिता झाला त्यावर ती म्हणाली, "हरकत नाहीं मी वरिष्ठ कोडतांत अपील करीन" राजानें विचारलें "तें कोठलें?" ती म्हणाली "तू शुद्धीवर आल्यावर तुझ्याच कोडतांत! (from Philip drunk to Philip sober.)" या दोन्हीं गोष्टींत साम्य आहे.

## गौडांची स्वामिनिष्ठा.

सामान्य राजांना उचित असा दोष या राजाच्या अंगीं होता. परिहास केशवाला साक्षी ठेवूनहि या राजानें त्रिग्रामामध्यें, गौडांच्या राजाला तीक्ष्ण पुरुषाकरवी मारविलें. शारदादेवीच्या दर्शनाच्या मिषानें त्या राजाचे सेवक काश्मीरांत शिरले. परिहास केशवाच्या भ्रान्तीनें रामस्वामीच्या देवळास संहतीनें त्यांनीं वेढा दिला, व आंतील मूर्तीचें त्यांनीं चूर्ण केलें. राजाच्या सैन्यानें त्यांस पदोपदीं ठार केलें; पण गौडांनीं जें कर्म करून दाखविलें तें विधात्यालाहि शक्य नाहीं. याकाळीं लोकोत्तर स्वामीनिष्ठेचा प्रभाव दाखविणारी भृत्यरत्नें मिळत.

## ललितादित्याची राजकीय गीता

अनाक्रान्त अशी पृथ्वी पहाण्याच्या कौतुकानें राजानें उत्तरापथात प्रवेश केला. फार दिवस झाले. वृत्तान्त कळत नाहीं. मंत्र्यांनीं दूत पाठविला. तो परत आल्यावर म्हणाला, "स्वामी तुम्हांला असें सांगतो. सरळ विजिगीषूला अवधि नसतो. मी दूर असतां तुम्हीं माझ्या राज्यविषयांत आचार कसा करावा त्याचें सार सांगतो. त्याला अनुसरून हे पुण्यशील मंत्रीहो! माझें राज्य निर्विघ्नपणें चालवा. (१) प्रभाव गाजविण्याची इच्छा करणाऱ्या माझ्या लोकांनीं, आपसांतील भेदाला जपलें पाहिजे. निरीश्वर चार्वाकांना जसें परलोकांपासून भय नसतें तसें आम्हांला परलोकांपासून (शत्रूपासून) भय नसतें. (२) गिरीगव्हरांत रहाणाऱ्या लोकांना अपराधाशिवाय नित्य दण्ड करीतच रहावें. त्यांजवळ वित्ताचा संचय असतो. दुर्गांचा आश्रय करीत असल्यामुळें ते दुर्भेद्य असतात. वर्षाला पुरेल इतकीच त्यांजवळ अन्नसामग्री असू द्यावी. शेतें नांगरावयाला पुरतील इतकेच बैल त्यांजवळ असू द्यावे. अधिक वित्त उरणार नाहीं असें कार्य करावें. अधिक वित्त झालें तर तें डामर बनतात. उन्मत्त बनतात. नृपाची आज्ञा मोडावयाला ते एकाच वर्षांत तयार होतात. वस्त्र, कुंथा, स्त्रिया, पक्वान्नें, अलंकार, अश्व, घरें अशा ग्रामोचित वस्तू जर ग्रामीयांना मिळाल्या, राजांनी दुर्ग वगैरे संरक्षणाच्या ठिकाणीं जर उपेक्षा केली, राजभृत्यांनीं जर त्यांचे अंतरस्थ विचार जाणण्याचें सोडून दिलें, शस्त्री लोकांची (सैन्यांतील लोकांची) वृत्ति जर एकाच प्रदेशांतील लोकांवर येऊन पडली, विवाह संबंधानें कायस्थ जर परस्पर संहत झाले, आणि राजांनीं कायस्थवृत्ति पतकरली म्हणजे प्रजेचा भाग्यविपर्यय झाला असें समजावें."

टीप:—ही राजकीय आचारांची सारभूत असलेली गीता चाणक्याची नीति, महाभारतांतील कणिक नीति, यांशीं सदृश आहे. मॅकिॲव्हेल व बेकन हे हिचें कौतुकच करतील.

कोणी म्हणतात हा राजा अर्णव नांवाच्या देशांत हिमवृष्टीनें मरण पावला. कोणी म्हणतात संकटांत सांपडून प्रतिष्ठा राहण्याकरतां तो आपण होऊन अग्निप्रवेश करता झाला. मोठ्या लोकांच्या निरुपम प्रस्थानासंबंधें अद्भुतवार्ता त्यांच्या शेवटल्या दिवसांतसुद्धां उठतात.

(६) कुवलयापीड; (७) ललितादित्य, बप्पयिक वज्रादित्य.

(८) पृथिव्यापीड; (९) संग्रामपीड; (१०) जयापीड; ("जज हा जयापीडाचा शालक, जयापीड दिग्विजयावर असतां त्याचें राज्य बळकावतो. राजा परत आल्यावर युद्धांत त्याला मारतो.)

## जयापीडाचा दिग्विजय.

हा दिग्विजयाला निघाला तेव्हां याचें सैन्य ऐशीं हजार होतें. याचा आजा दिग्विजयाला निघाला तेव्हां त्याच्या सैन्यांत नुसते कर्णीरथ (डोळ्या) सवालक्ष होते. घरच्या प्रेमानें कांहीं सैन्य परतलें. प्रयागास पोंचल्यावर त्यानें मनोजव असे अश्व लक्षांत एक कमी, ब्राह्मणांला सदक्षिण दान दिले व असें सांगून ठेवलें कीं ही माझी–मुद्रा पहा. तीवर, "जयापीडाची" अशीं अक्षरें आहेत. बाहेरदेशांत गंगाजळाच्या कावंड्या जातील त्यांवर ती मुद्रा करावी. पण जेव्हां एक लक्ष वारू जो कोणी दान करील तेव्हां ती त्यानें मोडून आपल्या नांवाची नवी करावी. पण गंगाजळ पिऊन व जयापीडाची मुद्रा वाचून अभिमानी राजांचा ताप अद्याप वाढत असतो.

## जयापीड राजा व कमला नर्तकी यांचीं गोष्ट

येथून हा राजा गौडराज जयन्त या राजाच्या पौंड्रवर्धन नगरांत शिरला. कार्तिकेयाच्या मंदिरांत भरतशास्त्राप्रमाणें नृत्यगीत चाललें होतें. हा भरतशास्त्रज्ञ राजा देवद्वाराशीं शिळेवर बसला. त्याच्या तेजानें चकित झालेले लोक दूर सरले. कमला नर्तकीनें याचें रूप पाहिलें. मधून मधून तांबूलविटिकेकरतां स्कन्धावरून जाणारा याचा हात पाहिला. तिनें जाणलें कीं हा कोणी तरी गुप्त रीतीनें फिरणारा राजा असावा. म्हणून पृष्ठस्थ पर्णविटिका (विडा) घेण्याचा याला अभ्यास असून प्रतिक्षणीं याचा हात अंशदेश स्पृष्ट करीत आहे. मदोत्क मधुपांचा हल्ला सरला तरी द्वीप आपले कान हलवतो. गजाचें कुल नाहींसें झालें तरी सिंह मागें वळून पाहातो. मेघाकडे उन्मुख राहण्याची इच्छा नष्ट झाली तरी अशान्त वदनानें मोर स्वरोद्गार काढीत असतो; त्याप्रमाणें श्रेष्ठ लोकांची संवय ती असण्याचा हेतु नष्ट झाला तरी अभ्यासामुळें लांबतच असते.

**टीप:**—वर कवीची केवढी मोठी अलंकारसंपत्ति आहे ती पहा. "हेतु नष्ट झाला तरी पहिली श्रेष्ठ लोकांची संवय लांबते" एवढ्याशा गोष्टीला हत्ती, सिंह, मोर यांच्या संवयीचे एकामागून एक असे भराभर सुंदर तीन दृष्टान्त कवीनें दिले आहेत.

आपल्या अभिन्नहृदय दासीला मनांतलें सांगून नर्तकीनें त्याच्या जवळ पाठवलें पहिल्याप्रमाणें पाठीकडे हात गेल्यावर दासीनें पूगखण्ड त्याच्या हातावर ठेवलें. जयापीडानें ते तोंडांत टाकले. व मान वळवून तिच्याकडे पाहिलें. भ्रूसंज्ञेनें तूं कोणाची कोण असें तिला विचारलें. तेव्हां विटिका देणारीचा वृतान्त तिनें त्याला सांगितला.

नृत्य संपलें. दासीनें त्याला मालकिणीच्या घरीं नेलें. तेव्हां त्या परार्घश्री विलासिनीनें सभ्य व चतुर भाषणानें त्याचें आतिथ्य केलें. चंद्रोदय होतांच राजाचा हात धरून तिनें त्याला शयनमंदिरांत नेलें. तिचें मनोगत जाणून राजा म्हणाला. "हे पद्मपलाक्षी; तूं माझी हृदयहारिणी नाहींस असें नाहीं. पण कालानुरोधानें तुझ्या मनोभंगाचें पातक मला करावें लागत आहे." असें सांगून राजानें मांडीवर हातानें ताल धरून एक निश्वास सोडून एक श्लोक म्हटला.

> असमाप्तजिगीषस्य स्त्रीचिन्ता का मनस्विनः।
> अनाक्रम्य जगत् कृत्स्नं नो संध्यां भजते रविः ॥४४१॥

(अर्थ) जयेच्छा परिपूर्ण झाल्याशिवाय प्रभावी पुरुषाला स्त्री कशी आठवेल? सकल जगाचें आक्रमण झाल्याशिवाय रवि संध्येचा उपभोग कोठें घेतो?

हा मोठा पुरुष आहे असें नर्तकीनें जाणलें. तो जावयास इच्छा करूं लागला. रात्रीं प्रस्थान करूं नये असें तिनें आर्जवानें सांगितलें. कारण येथें जीवांचा संहार करणाऱ्या सिंहाचा संचार असतो. राजा तेव्हांच बाहेर पडला व सिंहाची मार्ग प्रतीक्षा करीत बसला. फुललेल्या बकुल वृक्षासारखा, यमाच्या संचारी अट्टहासाप्रमाणें शोभणारा सिंह मन्थरगतीनें येतांना त्याला दिसला. त्याला या राजसिंहानें आव्हान दिलें. सिंहानें कान स्तब्ध केले, जबडा विस्फारला, आयाळ कंपित केली, प्रदीप्त नेत्र वटारले, देहाचा पूर्व भाग पुढें करून गर्जना केली. व राजाकडे क्रोधानें धांव घेतली. राजानें सिंहाच्या मुखांत कफोणी (कोंपर) घातली; व सुरीच्या एका प्रहारानें दुसऱ्या हातानें त्याचा भेद केला. सिंहाचा प्राण गेला. राजा नर्तकीच्या घरीं जाऊन झोंपीं गेला.

**टीप**—विजिगीषु राजाला जय मिळविल्याशिवाय स्त्री चिन्ता कर्तव्य नाहीं या सिद्धान्ताला रवि व संध्या यांचा दिलेला दाखला सुन्दर आहे. तसेंच सिंहाचे वर्णनांत स्वभावोक्ति अलंकार उत्तम साधला आहे.

दुसऱ्या दिवशीं जयापीडाच्या नांवानें अंकित असा केयूर सिंहाच्या जबड्यांत अडकलेला पाहून राजानें ओळखलें कीं कांहीं हेतूनें कल्हटराजपुत्र असें नांव घेऊन भुतळावर हिंडणारा जयापीड येथें आला आहे. त्याचा शोध करून जयन्त राजानें आपली कन्या कल्याणदेवी त्याला मोठ्या आदरानें अर्पण केली. पुढें कांहीं राजे जिंकून जयापीड आपल्या गांवाला जावयास निघाला. तेव्हां पुढें जयश्री, मागें कल्याणदेवी अशा निघाल्या.

जयापीडानें स्वभूमींत प्रवेश केला. त्याचें सिंहासन बळकावून बसलेला जज्ज युद्धास उभा राहिला. जयापीडाचे अनुरक्त लोक धांवत आले. त्यांत एक श्रीदेव नांवाचा ग्रामचाण्डाळ होता. मातेजवळून एक भाकरी मागून घेऊन तो निघाला. जज्जाला मारणार अशी प्रतिज्ञा त्यानें केली होती. अश्वारूढ असलेल्या व तृषार्त होऊन सोन्याच्या झारींतून पाणी पीत असलेल्या जज्जाला रोखून त्यानें गोफणीनें त्याच्या तोंडावर दगड मारून त्याला ठार केलें. जज्जाचे अनुयायी पळाले. द्रोहानें मिळवलेलें राज्य तीन वर्षांनीं गेलें. ठेवी दाबून मिळवलेली वणिजांची, कामीजनांची वंचना करून मिळवलेली वेश्यांची व द्रोह करून मिळवलेली राजांची अशा या सर्व संपदा नष्ट होतात.

राजानें मग क्षीर नांवाच्या विद्योपाध्यायाजवळ ज्ञान संभृत केलें. परदेशांतून वैय्याकरणी आणून स्वदेशांत विच्छिन्न झालेली महाभाष्याची प्रवृत्ति केली. राजा या शब्दानें त्याची जेवढी प्रथा होती त्याहून अधिक प्रथा पंडित या शब्दानें झाली. कुट्टिनीमत या नांवाचा ग्रन्थ करणारा कवि दामोदरगुप्त, मनोरथ, वामन इ. कवी त्याचे मंत्री होते. त्याला एकदां पश्चिम दिशेला रवीचा उदय झालेला दिसला. त्यामुळें त्याला वाटलें कीं, आपल्या देशांत कोणी साधु धर्माचार्य प्रविष्ट झाला आहे. विद्वानाचा शोध करून त्यांचा संग्रह करून अन्य नृपमण्डळांत त्यानें विद्वानांचें दुर्भिक्ष केलें. कोणी स्पष्ट असें म्हणेल, अमूक एक मूर्ख आहे, तर त्या मूर्खाला सर्वज्ञानाच्या अभियोगानें ज्ञान देण्याचें यानें काम केलें

पुन्हां सामग्री जमवून, विनयादित्य हें नांव घेऊन हा पुन्हा दिग्विजयाला निघाला. पूर्वेकडील भीमसेनाच्या राज्यात शिरून हा निःशब्दपणें रंध्रान्वेषण करूं लागला. जज्जाच्या भ्रात्यानें भीमसेनाला कळवल्यावरून भीमसेनानें या धुरीण शूरवीराला अकस्मात बन्धन केलें तेव्हां पौरुषाचा द्वेष करणाऱ्या दैवानें शिर उचलून ताठ केलें असेल. राजा सुटण्याचे उपाय योजूं लागला.

## स्पर्शसंचारी रोग व स्थानत्याग

या राज्यांत लूता नांवाचा स्पर्शसंचारी रोग पसरला होता.. लूताव्यासाला स्थानत्याग करावा लागे. पित्तोद्रेजक द्रव्यें आणवून त्याच्या सेवनानें राजानें आपणास पित्तज्वर जडवून घेतला. वज्र नांवाच्या झाडाचा चीक अंगाला लावला. अंगावर फोड उठले. मग राजा लूताव्यास आहे असें रक्षकाकडून भीमसेनाला कळविलें. राजा जयापीड हटकून मरेल म्हणून भीमसेनानें त्याला राज्याबाहेर घालविलें. नंतर राजानें भीमसेनेला जिंकलें.

## शास्त्रप्रशंसा

वरील गोष्टींचे तात्पर्यार्थावरून कवीनें पुढील श्लोकांत शास्त्राची प्रशंसा केली आहे.

> यःसर्वकालमबुधैः परिहास्यमानः।
> मूलांकुराद्यपिन जातु पुरस्करोति
> आपत्सु शास्त्रविटपी सकलंप्रसूय।
> पुंसः किलैकपद एवलुनात्यलक्ष्मीम्॥ ५३० ॥

**अर्थ**— शास्त्ररूपी वृक्षाला मूढ लोक हंसतात. हा मूळ, अंकुर इत्यादी भागांचा पुरस्कार करीत नाहीं. हा अमूल आहे. अनंकुर आहे. पण संकटसमयीं हा वृक्ष, मूळ व अंकुर यांचा उदय झाल्याशिवायच फळें प्रसवतो व पुरुषाची एकदम अलक्ष्मी (दारिद्र्य) घालवितो. राजानें आपली मोकळीक शास्त्रज्ञानानें करून घेतली.

## राजा जयापीड व चतुर मंत्री देवशर्मा यांची गोष्ट

पुढें जयापीडें नेपाळांत शिरला. तेथील राजा अरमुंडि पळत सुटला. कधीं दृश्य होई कधीं अदृश्य होई. त्याच्या मार्गे लागून जयापीडानें श्येनकपोत न्याय धरला. जयापीड आड आलेल्या नदींत शिरला. अकस्मात आलेल्या पुरांत कांहीं सैन्य वाहत गेलें. राजा पकडला गेला. कालगण्डिका तीरावर शिलामय दुर्गांत राजाला असें रक्षून ठेवण्यांत आलें कीं, कलावन्तांत श्रेष्ठ असा चंद्र व तेजस्वींत श्रेष्ठ असा सूर्य त्यास रात्रीं अथवा दिवसास पाहूं शकले नाहींत.

मंत्री देवशर्मा यानें अरमुंडीला कळविलें कीं मी तुला जयापीडाच्या लक्ष्मीसह काश्मीरचें राज्य देतों. धनाचे विश्वस्त सैन्यांत आहेत. अरमुंडीच्या अनुज्ञेनें शेष सैन्य देवशर्मा नेपाळला घेऊन गेला. अरमुंडीनें त्याच्या सत्कार केला. कोशपान व शपथा झाल्या. अरमुंडीच्या अनुज्ञेनें दुर्गांत येऊन मंत्र्यानें जयापीडाला विचारलें "आपलें तेज कायम ठेवलें आहेस ना? तेजोरूप भितीचा आधार असेल तरच साहसरूपी आलेखाच्या कल्पना सिद्ध होतात. तूं दोन नलिका बाहेर जा. परत आल्यावर मी तयार करून ठेवलेला नदी तरून जाण्याचा उपाय करून पहा."

राजा जाऊन वेळेवर परत आला व पहातो तों अमात्य गळफास लावून गतप्राण असा भूमीवरून दिसला. "माझी तनु गतप्राण झाली आहे ती श्वासानें पूरीत आहे. ती एक दृति [ मसक, चामडयाची श्वासानें फुगवलेली अभेद्य पिशवी ] आहे. तीवर आरूढ होऊन नदी तरून जा. तुझें सैन्य तेथें आहे." असा मजकूर गळ्याभोंवतीं असलेल्या पट्टीवर त्याच्या रक्तानें लिहिलेला होता. साधी मसक घेऊन राजा उंचावरून उडी मारता तर ती फुटली असती, म्हणून असा मसक मंत्र्यानें तयार केला.

राजा तत्काळ हतीवर आरूढ होऊन, नदी तरून स्वसैन्यांत प्रविष्ट झाला. व त्यानें नेपाळचें राज्य कथाशेष केलें. जेत्याला वाटलें, जयश्री मिळाली; पण गळ्यांतील रक्षामणीप्रमाणें सचिवाला हारवलों.

टीपः—गड हातीं आला पण सिंह गेला अशी शिवाजी महाराजांची तान्हाजीविषयींची उक्ति सदृश आहे.

नंतर राजानें स्त्रीराज्य जिंकलें हा त्याचा इंद्रियग्रामावर विजय झाला.

टीप—भीमसेन व अरमुडि हे ऐतिहासिक पुरुष होते अशाबद्दल डाक्तर स्टीन यांनीं शंका प्रदर्शित केली आहे.

## सुवर्णप्राप्तीविषयीं लोककथा

राजाला स्वप्नांत एक कृतांजलि पुरुष दिसला. तो म्हणाला "मी तुझ्या राज्यांत, सुखानें राहणारा महापद्म नाग आहे. कुणी द्रविड मांत्रिक मला धरून विकणार आहे. मला वांचवशील तर मी तुला सुवर्णोत्पादक गिरी दाखवीन." जागे झाल्यावर राजानें हेरांकडून द्रविड मांत्रिकाचा शोध करून त्याला बोलावून आणिलें व अभय दिलें. त्याच्याबरोबर राजा नागाच्या सरोवराशीं गेला. मंत्रशक्तीनें द्रविडानें दिग्बन्ध केला. जल आटवलें. चिखलांत वीतभर लांबीचा मनुष्यमुखी नाग दिसला. राजानें द्रविडाला द्रव्य देऊन नागाला वांचविलें. नागानें तांब्याचा द्रव करणाऱ्या गिरीच्या खाणाखुणा सांगितल्या. त्यांतील तांब्यानें राजानें नव्याण्णव कोटी दिन्नार नाणीं पाडलीं व असा करार करून ठेवला कीं जो कोणी पूर्ण शत कोटी दिन्नार नाणी पाडील त्यानें मला जिंकलें असें समजावें. पूर्णसंख्या नाणीं पाडणाऱ्या राजांचा दर्प कुण्ठित व्हावा म्हणून त्यानें त्यांच्यापुढें समस्याच टाकली.

पुढें दिग्विजयापेक्षां स्वदेशांत द्रव्यार्जन करणें बरें असें राजाला कायस्थानीं शिकवलें. लोकाभ्यासानें राजानें इतकें क्रौर्य केलें कीं या राजाचें विपर्यस्त चरित्र वर्णन करतांना बुधानींसुद्धां काव्यांत स्तुतिविपर्यय करून ठेवला आहे. त्यांतील एक उदाहरण असें आहे.

**नितान्तकृतकृत्यस्य गुणवृद्धिविधायकः ।**
**श्रीजयापीडदेवस्य पाणिनेः किमन्तरम् ॥**

या श्लोकाचा अर्थ (१) जयापीडपर (२) पाणिनिपर असून (३) जयापीडाची स्तुति अथवा निन्दा करणारा आहे. तो असा "जयापीड व पाणिनी यांत काय अंतर आहे हो! जयापीड हा कृतकृत्य आहे. करावीं तितकीं सर्व कृत्यें करून बसला आहे. यानें गुणवृद्धि (सद्गुणाची वाढ) केली आहे. अथवा असेंहि म्हणा त्यानें सर्व कृत्यांचा (सत्कृत्यांचा) नाश केला आहे. तसें सर्व गुणांचें उच्चाटण केलें आहे. या ठिकाणीं कृत हा शब्द कृत् (हिंसायां) कापणें व वृद्धि हा शब्द वृध् (कापणें) या शब्दांपासून क्रमानें निघाले आहेत असें धरलें पाहिजे. पाणिनि कृतकृत्य आहे म्हणजे त्यानें कृतप्रत्ययाचा सावशेष विचार केला आहे. धातूची गुणवृद्धि केव्हां होते त्याविषयीं त्यानें नियम केले आहेत.

टीपः—या श्लोकांत दिसावयाला वरवर स्तुति पण आंतून निंदा आहे म्हणून येथें उत्तम व्याजस्तुति अलंकार साधला आहे. तो मात्र श्लेषमूलक आहे.

## जसे राजे तसे ब्राह्मण

अहो! अशा या राजाला परिपन्थी झालेल्या ब्राम्हणांचेच धैर्य अकुंठित झालें. कांहीं ब्राम्हणांच्या जमिनी जयापीडानें हरण केल्या. त्या परत देण्याविषयीं विनंति करण्याला गेलेल्या ब्राम्हणांना राजाच्या प्रतिहाऱ्यांनीं मार दिला. विप्र ओरडून म्हणाले, "मनु, मांधाता, राम इ. मोठमोठे राजे होऊन गेले. त्यांच्यापुढें ब्राम्हणांना विमानता सोसावी लागली नाहीं. इंद्रासह स्वर्ग, पर्वतांसह मेदिनी, शेषासह पाताळ ते एका क्षणांत भस्म करावयास समर्थ असत. जयापीड एक भ्रुकुटी उल्हसित करून म्हणाला. "भिक्षाकण भक्षण करणाऱ्या तुमच्या शठांचा हा कोण दुर्ज्वर आहे, कीं ज्याच्या योगें तुम्ही ऋषींप्रमाणें उक्ति करतां!"

ब्रह्मतेजानें युक्त असा इट्टिल नांवाचा ब्राम्हण म्हणाला.

**राजन्युगानुरूपेण भावाऽभानु वर्तिनः ।**
**शासितुस्तेऽनुसारेण न कस्माद् ऋषयोवयम् ?॥६४६॥**

हे राजा! युगमानानें बदलत जाणाऱ्या स्थितीला धरून जसा तूं राजा आहेस तसे आम्हीं ब्राम्हण ऋषी कसे नव्हेत?

राजा पुन्हां दर्पानें म्हणाला, तूं विश्वामित्र का वसिष्ठ का अगस्ती आहेस? कोपानें ब्राह्मण स्फुरण पावूं लागला. फडा उभारलेल्या नागाप्रमाणें दिसूं लागला. व म्हणाला तुझ्यावर ब्रह्मदण्ड पडेल! राजा हंसून पडूं दे म्हणाला तोंच छतांतून राजावर कनकदण्ड पडून राजाला व्रण झाला. कांहीं भागावर करवत चालवावी लागली. अन्तीं राजा यमाकडे गेला. यानें एकतीस वर्षे राज्य केलें.

## ११ ललितापीड

जयापीड व राणी दुर्गा यांचा पुत्र ललितादित्य राजा झाला. वेश्यांच्या गोष्टी सांगण्यांत प्रवीण, व नर्मभाषणांत चतुर असलेले लोक याला प्रिय झाले, तसे शूर अथवा पंडित झाले नाहींत. बन्धकीच्या पदमुद्रांनीं अंकित अशीं वस्त्रें हा गौरवार्ह सचिवांना पांघरावयास लावी. कुकर्मयोगवाहित्व व द्रोहवृत्ति अंगांत असलेल्या राजांना त्यांच्या परिहाराशिवाय दुसरें औषध नाहीं. यानें १२ वर्षें राज्य केलें.

१२ राजा जयापीड व राणी कल्याणदेवी यांचा पुत्र संग्रामपीड उर्फ पृथिव्यापीड. यानें ७ वर्षें राज्य केलें.

## १३ चिप्पड जयापीड उर्फ बृहस्पति

हा राजा ललितादित्य व राणी जयादेवी यांचा शिशुदेश्य पुत्र होता. जयादेवी एका उप्पनावाच्या कलालाची कन्या होती ती प्रथम वेश्या म्हणून अवरोधगृहांत ठेवून घेतली होती. हिचे भाऊ पद्म, उत्पलक, मम्म व धर्म म्हणून होते. ते भाच्याचें पालन करीत. पंचमहाशब्द, मोठी अधिकारांची स्थानें, आपल्याकडे ठेवून भगिनीभगसौभाग्यसंभव वैभवानें प्राप्त अशा भंगुर भोगांचें ते सर्वजण भोक्ते झाले. आपला भाचा वयांत येईल व आपला नाश करील अशी त्या अकुलीन माणसानें शंका घेऊन अभिचारक्रियेनें जादू करून त्याचा नाश केला. लौकिक वर्ष ३८८९ (इ. स. ८१३-४) या वर्षी चिप्पडजयापीड शान्त झाला.

**टीपः**—कल्हणाची ख्याती अर्थालंकाराबद्दल आहे. पण येथें आठवे लाभ वर्णाचीं रूपे घालून चांगला भव प्राय नांवाचा शब्दालंकार साधला आहे. तो एकटाच आहे.

## १४ अजितापीड

ललितापीड व राणी मेघावली यांचा पुत्र त्रिभुवनापीड म्हणून होता. तो व दुसरीच एक जयादेवी, यांना अजितापीड म्हणून पुत्र झाला. त्याला उत्पलानें बलानें राजा केलें. त्याला तो मुख्य चार खात्यांतून शिल्लक असलेल्या रकमांचा भरणा हेडादी पंचमखात्यांत (जमाखर्च खात्यांत) होत असे त्यांतून याला अन्नवस्त्र तो देत असे व बाकी उत्पन्नावर उत्पलादी सर्व ताव मारीत असत. कांहीं दानधर्म करीत. मम्मस्वामीच्या कुंभप्रतिष्ठेच्या दिवशीं मम्मानें पंचायशी सहस्त्र गाई दान केल्या. गाईमागें पंचोपकरणार्थ हजार हजार दिनार दिले.

मम्म व उत्पल या भावांत राजे गादीवर आणण्याकरतां तुमुळ युद्ध झालें. त्याला उद्देशून भुवनाभ्युदय नांवाचें शंकुक कवीनें काव्य लिहीलें. राजे भराभर एकामागून एक बसविले जात. ते पूर्वीच्या * अश्वयुजी रजांप्रमाणें अस्थिर असत.

शेवटीं शूर मंत्र्यानें विप्लव शांत करण्याकरतां उत्पलाचा पुत्र जो सुखवर्मा त्याच्या पुत्राला अवन्तिवर्म्याला राजा केलें. येथें कर्कोटक वंश समाप्त झाला व उत्पलकवंशाला वैपुल्य पात्र झालें. या उत्पलकवंशापासून कल्हणानें गत वृतान्ताचें विस्तरशः वर्णन करून वर्ष मास व दिन हीं नमूद केलीं आहेत.

---

* अश्वीन शुद्ध पौर्णिमेपासून चैत्र शुद्ध पौर्णिमेपर्यन्त काश्मीर देश काळोखानें (पिशाच्यानीं) व्याप्त असे. त्यामुळें लोकांना त्या काळांत (सहा महिने) देश सोडून जावें लागे त्यांबरोबर तेथील राजे जात. अश्वीन शुद्ध पौर्णिमेला लोक धुळवाड खेळत. व पिशाच्यांना (काळोखाला) गाळी देत.

# तरंग ५

### उत्पलकवंश

(वक्रोक्तीनें शंकर पार्वती यांची स्तुति)

## अवन्तिवर्मा

अवन्तिवर्मा विवेकी राजा व त्याचा भक्त मंत्री शूर अशी अभंगुर जोडी सुकृतानें दिसून येते. अशी कोणी पाहिली नाहीं व ऐकली नाहीं. राजाला वाटलें समुद्रजलाच्या सान्निध्यानें कलुषित झालेली ही लक्ष्मी, दारिद्यानें तप्त झालेल्यांना विमुक्त केली असतां मृगीप्रमाणें विमल होते. राजानें या विचारानें स्वर्णादिकांचें चूर्ण करून त्यांची खिचडी ओंजळीनें ब्राम्हणांस दिली. सर्व संपत्ति अर्थिसात् करून विभूतिचिन्ह म्हणून छत्रचामर शिल्लक ठेवलें. आपल्या बुद्धिवान व शूर सापत्न भावाला शूरवर्म्याला युवराजपद दिलें.

**टीपः**—अग्निशौच हे मृग अग्नींत उडी मारतात, तेव्हां स्वच्छ होतात.

काश्मीर देशांत विच्छिन्न झालेला विद्येचा प्रसार पुन्हां चालू करण्यास शूर मंत्र्यानें विद्वानांना सभेंत स्थान दिलें. विद्वान राजांना योग्य अशा युग्यांतून, (मनुष्यांनीं वाहिलेल्या यानांतून, विद्वान लोक सभेंत प्रवेश करीत मुक्ताकंठ शिवस्वामी व आनंदवर्धन (कवि ध्वन्यालोकाचा व देवीशतकाचा कर्ता) आणि रत्नाकर यांची चांगली प्रथा पडली.

मंत्री शूर याचा **कृतमन्दार नांवाचा भाट** मंत्र्यानें आपल्या संकल्पाची स्मृति कायम ठेवावी म्हणून उत्तेजनपर कविता म्हणे.

> **अयमवसर उपकृतये, प्रकृतिचलायावदस्ति**
> **संपदियम्।**
> **विपदिसदोभ्युदयिन्यां पुनरुपकर्तुं**
> **कुतोवसरः** ॥ ३६ ॥

**अर्थ**—जोंवर संपत्ति हातांत आहे तोंवरच उपकार करण्याचा समय असतो. तो फार टिकत नाहीं. कारण संपत्ति ही प्रकृतिनेंच फार चंचल आहे. शिवाय विपत्ति ही सदैवच अभ्युदय पावणारी आहे. तसें झाल्यावर उपकार करण्याचा दुसरा समय कसा प्राप्त होणार?

शूर मंत्र्याच्या द्वारपालानें मंदिर बांधून त्यांत प्रख्यात व्याकरणकाराला रामजाला उपाध्याय नेमलें. प्रभाकर अमात्यानें मंदिर बांधलें. त्यांत देवप्रतिष्ठेच्या वेळीं गृहशुकांबरोबर आलेल्या व अन्यलोकांनीं दिलेल्या मोत्यांची शुकावली केली.

शूरमंत्र्यानें शूरपूर बसविलें. त्याकरतां क्रमवर्त प्रदेशांतील दौक (सीमेवरील नाके) उठवून तेथें आणलें.

राजा वैष्णव होता. पण अमात्य शैव होता. म्हणून त्याला प्रिय असें शैव मत राजा प्रदर्शित करी.

## भूतेशालावन्य शाकेचें अर्पण, राजाचा राग, व मंत्र्यानें अपराध्याचें केलेलें शासन.

राजा भूतेश्वराला गेला. पूजकांनीं उत्पल नांवाची वन्य तिक्तशाक, देवाला अर्पण केली. कारण विचारतां पूजक म्हणाले, " लोहर प्रान्तांतील धन्व नांवाच्या बली डामरानें देवाचें गांव हरण केलें. म्हणून असा नैवेद्य देवाला मिळतो. ऐकलें न ऐकिलें असें करून एकाएकीं शूळव्यथा झाली असें दाखवून राजा चालता झाला.

राजाचें हें सहेतुक जाणें शूराला कळतांच त्यानें धन्वाला बोलावून आणून त्याचें डोकें उडविलें. राजाचा राग शान्त झाला व त्यानें पूजा पुरी केली.

अवन्तिवर्म्याच्या काळांत पुष्कळ सिद्धांनीं अनुग्रहार्थ अवतार घेतले. त्यापैकीं पुष्कळांचीं चरित्रें वर्णन करण्यासारखीं असतां एकाच' व पावनवृत्तान्त प्रासंगिक म्हणून वर्णन करूं.

## मोठा स्थापत्यशास्त्री सूय्य व त्याचें तंत्र

राज्यांत जलप्रलय होऊं लागला. दुर्भिक्ष झालें. खारीभर धान्याला दहाशें पन्नास दिन्नार पडूं लागले. तेव्हां जनांचे जीव वांचविण्यास सूय्य हाच कोणी अन्नपति अवतरला. सूय्या नांवाच्या चाण्डळणीला एक मडकें सांपडलें. त्यांत एक कमलनयन बालक अंगुलि चोखीत होतें. तें फार सुंदर असून त्याचा त्याग कोणातरी मन्दभाग्य मातेनें केला, या विचारानें तिचे स्तन स्नेहानें द्रवूं लागले. तिनें त्याला एका शूद्र स्त्रीच्या घरीं पोंचविलें.

तेथें तें वाढलें व त्याचें नांव सूय्य पडलें. तो बुद्धिमान बहु अक्षरओळख झाल्यावर एका गृहपतीकडे ( गृहस्थाकडे ) मुलांचा शिक्षक झाला. गोष्टी सांगण्यांत प्रज्ञ म्हणून लोक त्याच्या वाटोळे जमत, वे आपल्या गोष्टींत जलप्रालयाविषयीं बोलत व राजभृत्यांची निन्दा करीत व त्यांस दोष देत.

तो म्हणे मला बुद्धि आहे, पण ती निरर्थ आहे. मी काय करूं.

हें त्याचें नियमानें बडबडणें राजाच्या कानावर गेलें. राजानें त्याला बोलावून त्याची परीक्षा पहाण्याकरतां, त्याला दिन्नारांनीं भरलेलीं भांडीं दिलीं. प्रलयांत बुडालेल्या गांवीं जाऊन त्यानें तीं भांडीं नदींत पाणी अडलेल्या ठिकाणीं टाकून दिलीं. लोक म्हणाले हा बातुल आहे. त्याची निष्ठा पहात राजा स्वस्थ बसला. दुर्भिक्षानें पीडित लोक दिन्नार शोधूं लागले. पर्वतांतून ढांसळलेल्या शिळा नदींत पडून प्रवाहाला अडथळा करीत होत्या. त्या लोकांनीं बाहेर काढल्या. सागरमीलनोत्सुक वितस्ता वेगानें वाहूं लागली. पन्नगीला यांत्रिक खेळवतो त्याप्रमाणें ओघाचा वेध घेऊन पाट काढून सुय्यानें पाणी खेळवलें, बांध घातले. सेतू बांधले. गांवोगावीं पृथक् पृथक् पाणी बांटून दिलें. गांवोगांवांतील माती आणून ती भिजवून, तिला सुकावयाला वेळ किती लागतो, तितक्या कालानें तिला सेकाहें ( पाणी देण्याचें ) ठरवून त्याचे परीणाम व विभाग हीं कायम केलीं. तत्काल फल देणाऱ्या क्षेत्रांच्या संपत्तीनें दिशांचा विभ्रम दिसूं लागला. दुर्भिक्ष असतां जेथें खारीभर धान्याची प्राप्ति होण्यास दोनशें दिन्नार हेतु होत. तेथें खारीभर धान्याची विक्री छत्तीस दिन्नारांनी उदित झाली.

टीप—विस्तरलेला पन्नगीप्रमाणें सुय्यानें खेळवली यांतील उपमा सहजरम्य आहे.

अवन्तिदेवानें अनेक वर्षे राज्य करून लौ. ३९५९ इ. स. ८३३ या वर्षी भगवद्गीतेचें श्रवण करून क्षेत्रांत जीवित सोडलें. तेव्हां गुपित असलेलें वैष्णवमत प्रकट केलें.

## १२ शंकर वर्मा

अवन्तिवर्म्याचा पुत्र शंकरवर्मा राजा झाला. शूरम्याचा पुत्र सुखवर्मा राजा झाला. दोघांचें वैर सुरू झालें. राजाचे अनुयायी पिण्डस्पृहा शिकलेले नव्हते. पिण्डाकरतां हवें त्यांशीं लढणारे नव्हते. सुखवर्म्याला युद्धांत जिंकून, शंकरवर्म्यानें विजयाचा ओंकारच रचला. ( हा बहुधा हिंदु राजशाहीचा स्थापक असावा असें डा. स्टीन म्हणतो. )

मग राजा दिग्विजयाला निघाला. आपल्या पुत्राला नीवि ( ओलीस ) देऊन त्रिगर्तांच्या राजानें, पृथ्वीचंद्रानें प्रणति केली. अंगुलि देऊन शरीर राखतात त्याप्रमाणें गुर्जराधिपतीनें, अलखणानें, टक्कभूमि देऊन आपले मण्डळ राखलें. उदभाण्डचा लल्लीय शाही राजा दरद व तुरुष्क यांमध्यें सांपडून त्याची स्थिति हिमवान व विंध्य, यामध्यें असलेल्या आर्यावर्ताप्रमाणें, वनवराह व सिंह यांमध्यें पडल्यासारखी झाली होती. तो याच्या आश्रयाला येत होता पण त्याचें राज्य त्याला द्यावयाचें होतें; म्हणून त्यानें त्याची सेवा घेतली नाहीं. चंद्राची जशी पौर्णिमा तशी याची सुगन्धा राणी होती, यानें सुगन्धेश व शंकर व शंकर गौरीश यांचीं देवळें बांधलीं. पण काय?

**परकाव्येन कवयः परद्रव्येणचेश्वराः।**
**निर्लोडितेनस्वकृतिं पुष्णन्त्यद्यतनेक्षणे॥ ४६०॥**

अर्थ—आजच्या क्षणाला कवि हे परकृत काव्याची व राजे परद्रव्याची लूट करून स्वकृतीचें पोषण करतात.

टीप—येथें राजे परद्रव्याचें अपहरण करतात असें म्हणण्याच्या निमित्तानें कवि हे परकल्पनांचें अपहरण करतात असें म्हणून कवींचा कल्हणानें भरपूर समाचार घेतला आहे.

आपल्या पुराची स्थापना करण्याकरतां, परिहास पुरांतील सारभूत वस्तूंचा यानें अपहार केला. पट्टखानाचें ( शालींचें ) कारखाने, पशूंचा क्रयविक्रय, प्रसिद्धि हेतु परिहासपुरांत होते ते यानें आपल्या पुरांत आणले. लोकाभ्यासानें राजा प्रजापीडनपंडित झाला. अट्टपति व गृहकृत्य भाग या नावाचे नवे

कर व ते वसूल करण्याचीं कर्मस्थानें (कचेऱ्या) स्थापन केल्या.

## राजा स्वतां व्यापारी होतो

राजानें देवालयांतील धूप चंदन वगैरे पदार्थांची विक्री करून येणारें क्रयमूल्य कलाच्छलानें नफ्याचा आपला भाग म्हणून घेऊन देवळांचे इनामगांव जप्त केले. त्याबद्दल त्यांना कांहीं नक्त नेमणुका करून दिल्या, व त्या देशांत शेतकऱ्याप्रमाणें लागवड केली. देणगीचा तिसरा भाग करून तो कम्बल वगैरे भोग्य वस्तू वाढवलेल्या किंमतीनें देवूं लागला.

## वेठ बिगार

वेठीला धरण्याची पद्धति यानें काश्मीरांत पहिल्यानें पाडली. ही तेरा प्रकारची गूढ भारोढी गांवाची दारिद्र्यदूतीच होती. स्कन्धकग्राम (पटवारी, कुळकर्णी इ. ग्रामकायस्थ) पाटील व वजनदार यांच्या मासिकवृत्तीनें ग्राम निर्धन झालें. तोलाचा अपहार व उपचय करून (वजनांत कमी अधिक करून) मिळालेला पैसा राजानें गृहकृत्याकडे वळवला. या खात्यांत भिन्नकामांवर पांच दिवीर (करून) नेमले. त्याशिवाय शकच किंवा लवट यांचा सहावा भारवाह (मजूर) नावाचा खजिनदार नेमला. गुणिजनांच्या धनाची व यशाची हानि करणारे हे रांडलेक कायस्थ राजानें चढवल्यामुळें ही भूमि कायस्थ भोज्य कुरणच झाली.

## राजपुत्राची पित्याला विनंति

अशा स्थितींत गोपालवर्मा पित्याला म्हणाला, "हें राज्य तुमच्याकडे न्यास म्हणून आहे. पण त्रासदायक करांनी प्रजेला श्वासशेष तेवढी प्राणवृत्ति उरली आहे. जनपिंडेपासून ताताल ऐहिक किंवा पारमार्थिक प्राप्ति इवली सुद्धां होणार नाही. अदृष्टाची वार्ता गहन आहे; पण जें आज दृष्ट आहे त्यापासून अनिष्टाशिवाय दुसरें कांहीं दिसून येत नाहीं. दान व सुनृत यांनीं विश्वसंवहन होतें. लोभ दोहोंचा नाश करण्याचा मोठा उद्योग करतो. हा राजसंवाहन नावांचा नवा कर जनांचा शत्रू आहे. त्याचें निवारण हे प्रजानाथा! तूं कर."

राजा म्हणाला, "तूच एक मला वचन दे तें असें कीं तुला राज्यप्राप्ती झाल्यावर मीं दिली तीहून तूं अधिक पीडा प्रजेला देणार नाहींस." हें ऐकून राजपुत्र लज्जित झाला. विटांनीं एकमेकांकडे बघून हास्य केलें.

या राजाचे कारकीर्दीत भल्लटादी कवी कायस्थनिर्वेतन झाले. प्रजेच्या अभिशापानें याचे वीस तीस मुलगे मृत झाले. यानें वसविलेले शूरपूर नष्ट झाले. याचें नांव पट्टण पडलें. उरशादेशांत फिरत असतां लौ. ३९७७ इ. स. ९०२ या वर्षी एकाश्वपाकानें याला वेगवाही बाणानें ठार केलें. राजाच्या मरणाची बातमी मंत्र्यांनीं दूर ठेवली व राजाला घरीं आणलें वाटेंत दर्शनाला आलेल्या सामन्तांना राजाच्या कपाळाला बांधलेली सूत्रें खालीवर करून प्रति प्रणाम करवीत असें सांगतात.

## ३ गोपालवर्मा

शंकरवर्म्याचा पुत्र गोपालवर्मा राजा झाला. जननी सुगन्धा भोगप्राप्तीमुळें वैधव्यांत प्रभाकर नांवाच्या कोशाध्यक्षावर आसक्त झाली. त्यानें कोशसंपदा लुटली. कोशगणना राजानें केल्यावरून त्याला ती कळून आली. त्याच्या भीतीनें प्रभाकरानें खाखोंद विद्या जादू जाणणाऱ्या रामदेवाच्या बंधूकडून राजाला अभिचार कर्म करून मारविलें. राजानें दोन वर्षें राज्य केलें.

## ४ संकटवर्मा पालक (सुगन्धा राजमाता)

हा राजाचा भाऊ दहा दिवसांत मृत्यु पावला.

## (५) सुगन्धा

जननी सुगन्धा राज्यावर बसली. तिच्या मनांतून निर्जित वर्म्याला (शूरवर्म्याच्या नातवाला) राजा करावयाचें होतें; कारण संबंधी म्हणून, तो स्नेहानें अनुव्रत वागेल. तंत्रीं व एकांग म्हणाले, "हा विषयव्यसनी रात्रौ जागरण करतो. दिवसा निजतो. याला पंगु नांव प्राप्त झालें आहे. हा उत्थान योग्य नाहीं. तंत्र्यांनीं निर्जितवर्म्याच्या पुत्राला पार्थाला राजा केलें. या कारणानें तंत्र्यांशीं लढतांना ती त्यांच्या हातीं सांपडली. त्यांनी तिला बन्धनांत घालून ठार केलें.

**टीपः**—एक राजा मृत झाला म्हणजे त्याच्या मागून त्याचा वारस गादीवर बसावयाचा हें तंत्र यापुढें उत्पलक वंशांत चाललें नाहीं. आपल्या मुलाकरतां मंत्र्यांशीं सख्य ठेवणाऱ्या मत्सरी राण्या, सत्ताभिलाषी मंत्री, प्रबल शस्त्रधारी तंत्री मध्यें लुडबुड करीत म्हणून कोणत्याही राजाचें पद फार वेळ स्थिर नव्हतें. वाचकांना असा प्रकार समजण्यास सोपा जावा या करतां पार्थापासून उत्पलक वंशाची वंशावळ दिली आहे. तीवरून राजांची राज्यावर स्थापना, उच्चाटण व मृत्यु या गोष्टींची सकवार माहिती कळून येईल.

## ६ पार्थ (पालक निर्जितवर्मा)

पार्थ लहान म्हणून त्याचा बाप निर्जितवर्मा पालक झाला. याचे मंत्री सुगन्धादित्य व मेरूवर्धन म्हणून होते. मेरूवर्धनाचे पुत्र, चक्रवर्मा, शूरवर्मा, शंभुवर्धन, व शंकर वर्धन म्हणून गहनचाक्रिक (राजद्रोहाचीं गहनचक्रें फिरवणारे) होते. काश्मीरचे राजे आतां तंत्र्यांना उत्कोच (लांच) देऊन एकमेकांचें उच्चाटन करवीत. तंत्र्यांना हुंडिका दान (हुड्यांचें दान) करणें हीच त्यांची जीविका होऊन बसली. तंत्र्याना जे मंत्री हुंडिका भरीत त्यांनांच राजे आपले मंत्री करीत. व तसले मंत्री राजांची संपदा लुटीत.

निर्जितवर्म्याच्या राण्या बप्पटदेवी व मृगयावती (मेरूवर्धनाची पुत्री) या आपल्या मुलांना सानुक्रम चक्रवर्म्याला व शूरवर्म्याला राज्यलाभ व्हावा म्हणून बीजाश्वोपम (वळूघोड्या-

सारख्या ) सुगन्धादित्याला विधुवन श्रद्धा देऊन वरती दक्षिणा देत. दरिद्री माणसाच्या दोन बायका एकाच पात्रांत भोजन करतात.

लौ. ३९९७ इ. स. ९२१ या वर्षी तंत्र्यांनीं पार्थाचें उच्चाटन करून त्याच्या पित्याला निर्जितवर्म्याला राजा केलें. तो दोन वर्षांनीं बप्पट देवीच्या पोटीं झालेल्या आपल्या पुत्राला राज्य देऊन लौ० ३९९९ इ. स. ९२३ या वर्षी मृत झाला. पुढें निर्जितवर्मा ऊर्फ पंगु याच्या मृगावती नांवाच्या राणीच्या पोटीं झालेला पुत्र शूरवर्मा, पार्थ, चक्रवर्मा व शंभुवर्धन हे राजे तंत्र्यांनीं केले. तात्पर्य—

> तीर्थस्थितान्स्वकुलजास्तिमिरत्ति, भुंक्ते ।
> मौनी बकस्तिमिमुपेत्यवनांतवासी ॥
> व्याधो निहन्तिच बकं प्रभवन्ति ते ते ।
> तत्राप्युपर्य्युपरि वंचनचंचुतायाः ॥ ३०५ ॥

**अर्थ**—तीर्थवासी तिमिमत्स्य स्वकुलजांना खातो, वनान्तवासी मौन धारण करणारा बक झडप घालून तिमिमस्याला खातो. त्या बकाला व्याध मारतो. एवंच वर पायरी पायरीनें चढ करून फसवण्यांत अधिकाधिक चातुर्य दाखवून एक दुसऱ्यावर पोट भरतो.

भ्रष्टश्री चक्रवर्मा ढक्कश्री येथें असतां त्यानें संग्राम डामराचें साहाय्य मागितलें. डामर म्हणाला "तुझें कार्य झालें म्हणजे तूंच आम्हांला मारशील."

## राजांचा स्वभाव

राजे लोक कृतकार्य झाले कीं उपकार विसरतात.वृक्षावर चढतांना अधोगमनाचें वेळेस मनुष्य तोडीत उतरतो. जे आमच्या बुद्धिधैर्यादिगुणांनीं राजे उपकृत होतात, त्याच गुणां-मुळें आतां उपकर्त्यांविषयीं शंका घेतात, व आम्हांला वर्ज्य करतात. उपकार तर विसरतातच; पण उपकार करतांना आमचे झालेले प्रमाद तेवढे हृदयांत बाळगून ठेवतात. स्वतां पाहिलेल्या गोष्टींवर यांचा भरंवसा बसत नाहीं. हे कानीं लागणाऱ्यांवर भरंवसा ठेवतात. रात्रीं उपाध्याय ( गुरु ) अशी पत्नी जें एकान्तांत शिकवते, त्याविषयीं सारखा प्रजागर ठेवणें सर्वज्ञांनाहि शक्य नाहीं. कुशलमंत्र्यांनीं कसेंबसें दिवसास दिलेलें शिक्षण, ते रात्रौ नीलगाईप्रमाणें विसरतात. स्निग्ध ओलसर लांबलांब जिव्हांनीं विलोभित होऊन मुंग्या आस्व-लांकडून खाल्ल्या जातात. तसें लोकांकडून लांबलांब बातांनीं विलोभित होऊन कोठले राजे ग्रस्त होत नाहींत? सिंहनमन करीत, सर्प कंवटाळीत, वेताळ हंसत व राजा, हे स्तुति करीतच मारतात.

तत्रापि तूंच जर सदैव आमच्याकडे अद्रोह बुद्धीनें पाहशील तर मी ससैन्य निघालोंच समज."

राजा म्हणाला "तुझें आस्थ्याप्रमाणें रक्षण करीन." नंतर नृप व डामर यांनीं हातांत खड्ग घेऊन रक्तानें माखलेल्या मेषाचे चामड्यावर चरण ठेवून कोश पान पूर्वक शपथा घेऊन दिव्य केलें.

चक्रवर्मा डामर व त्याची सेना आणि शंभुवर्धन व त्याची तंत्री सेना यांमध्यें पद्मपुराजवळ मोठा संग्राम झाला.

अहितुण्डिक कृष्णसर्पाला पकडतो व करंडींत कोंडून ठेवतो. पोटासाठीं भिक्षा मागतांना त्याला हिंडवतो व त्याला क्रूरपणें वागवतो, त्याप्रमाणें ज्या महावंशीय नृपतीला ज्या तंत्र्यांनीं वागवलें त्यांचा मोड त्याच महावंशीय नृपतीनें चक्रवर्म्यानें केला. शंभुवर्धनाला मारून चक्रवर्मा सिंहासनावर बसला.

**टीप**—डामराच्या भाषणांत शेवटीं आलेला दीपक अलंकार व वरची गारूड्याची तंत्र्यांना दिलेली उपमा हे दोन्ही अलंकार सुंदर आहेत.

## ७ चक्रवर्मा

अंड्यांत असतांना जशी सर्पाच्या पिलांची तशी बाळपणीं चक्रवर्म्याची दुःशीलता दिसून आली नाहीं. स्वपराक्रमाचा रोमन्थ त्याला प्रिय झाला. तो विषम कृत्यें करूं लागला. अशा वेळेस डोम्ब, अगदीं हलक्या जातीचा एक वैदेशिक रंग नांवाचा गायक, दोन गायक मुली घेऊन आला. त्यांचा जलसा राजवाड्यांत झाला.

## राजवाड्यांत झालेला डोम्ब व त्याच्या मुलींचा बहारीचा जलसा

मण्डपांत सचिव, सामन्त, अंतःपुरांतील स्त्रिया हीं यथाक्रम व यथोचित स्थळीं बसलीं.

डोम्ब, मंडळीसह प्रविष्ट झाला. तींत त्याच्या ललितलोचन अशा दोन मुली, हंसी व नागलता म्हणून होत्या. त्यांच्याकडे मान उचलून कौतुकानें बघणारी सभा, चित्रार्पित झाली. ललीत व चलीत अशा सविलास अपांग विभ्रमांनीं त्या दोघी सभेमध्यें फुलेंच उधळीत होत्या. "जय! जीव!" (वाहवा! जितरहो!) अशा शब्दांचा कोलाहल उठला. एक विषेश राग गातांना त्या, आधी खालील स्वरांत गाऊन उत्तरोत्तर उंच अशा पंचम स्वरांत ताना घेऊं लागल्या. वंशवाद्यें त्या स्वरांचे नेमकें स्थान ओळखून साथ देऊं लागली. त्यांच्या गीतध्वनीनें माना हालवण्यानें, भ्रुकुटी उडवण्यानें व नेत्र चालनानें राजाची दृष्टी कुरंगा प्रमाणें अस्पंद झाली. उद्रेचित नांवाचें विषेश स्निग्धगायन सुरू झालें. राजाचा व त्या दोघींचा स्वसंवेद्य अशा दृग्व्यापारानें, संलाप चालू झाला.

राजाचें चित्त हरवलें आहे असें जाणून एका विटानें प्रणय वृद्धिकारक भाषण केलें तो म्हणाला नेत्रांनीं यांचें रुप व कर्णांनीं यांचा गीतध्वनि संस्पृष्ट करण्यात कांहीं दुष्कृत्य नसेल तर तशाच नेत्र श्रोत्र सदृश अन्य मनोरम अंगांना संस्पृष्ट केलें असतां दोष कां असावा?

राजाचा अभिलाषांकुर या विटभाषितांनीं शत शाखात्व पावला. राजा हार केयुरादी वस्तू डोम्बाला देऊन अंतःपुरांत गेला. क्षणांत अनुपपत्तियुक्त लबाडीची गोष्ट युक्त गोष्ट उपपत्तियुक्त (चांगली) आहे असे तर्ककपटानें जाणणारे विट नसते तर नरक पुरी ओस पडली असती व तेथें मृग संचार करते!

**टीप**—संगीताच्या स्त्रीगायिकांच्या जलशावरील लोकांचें प्रेम फार जुनें आहे असें म्हणावयाचें तर मग ! दलशाचें वर्णन कल्हणानें इतकें हुबेहूब केलें आहे कीं तो जलसा आपणापुढें प्रत्यक्ष घडत आहे असा भास उत्पन्न होतो. राजाच्या मनःस्थि. तीचे समर्थन करणाऱ्या विटाला कल्हणानें दिलेलें टीकात्मक उत्तर पुरेसें आहे.

प्रेमानें अंध होऊन त्या विजातीय शोभा असलेल्या हंसीला राजानें पट्टराणी केलें. तिच्यावर व्यजन व चामरें हलूं लागली, तिचें ज्यांनीं उच्छिष्ट खाल्लें ते सभासद झाले. डोम्बाची सेवा बढतीचा हेतु झाला. कांहीं श्वपाक मूर्ख असल्यामुळें स्वतः सचिव झाले नाहींत. जे नीतिज्ञ होते त्यांनीं मंत्र्यांप्रमाणें राजकारणें केली. तो ऋतुस्नात झालेली राणी आपल्या आर्तवानें अंकित अशा रेशमी वस्त्रें इनाम देई. तीं पांघरून इच्छातृप्त झालेले मंत्री सभेंत येत. राजाचें वैर पत्करून त्या श्वपाकचें उच्छिष्ट ज्यांनीं खाल्लें नाहीं ते सोमपान करणारे ऋषीच म्हणावयाचे ! यावेळीं काश्मीर मण्डळात उग्र स्वभावाचे देव बसत नसावे. नाहींतर राजाच्या मंदिरांत ही श्वपाकी कसें शिरूं शकती ? तीलद्वादशीच्या दिवशीं ही हंसाराणी रणस्वामीच्या दर्शनाला गेली. बरोबर सामन्तांपेक्षां अधिक अभिमानी असे डामर गेले नाहींत.

राजकुटुंम्बांतील म्हणून दृप्त झालेल्या डोम्बाच्या आज्ञा राजाज्ञा समजून कोणी मोडीत नसत. राजानें रंगाला हेलुग्राम अग्रहार दिला. त्याचें दानपत्र पटोपाध्याय ( लेखक कायस्थ ) लिहींना. तेव्हां रंग रागानें अक्षपटलाला गेला व म्हणाला,

**रंगस्य हेलु दिण्णेति दासी सुत ! न लिख्यते !**

( हे रांडलेका ! रंगाला हेलु दिला असें का लिहीत नाहींस ? ) रंगाला भिऊन त्यानें तसें लिहिलें.

राजानें अन्त्यजेशीं गमन केल्याची निष्कृति काय, म्हणून विचारलें. विटांनीं हास्यकारक प्रायश्चित्तें करवली.

**हिमेनैव हिमशाम्येत् दुष्कृतेनैव दुष्कृतम्**

हिमानें हिम शमवावें, एका दुष्कृतानें दुसरें दुष्कृत नाहींसें होते म्हणून अस्पृश्याला स्पर्श करून झालेल्या पापाचें क्षालन पवित्राला स्पर्श करून मासभर उपास करणाऱ्या ब्राम्हणीला स्पर्श करून राजानें तिला दूषित केलें.

पुढें कांहीं विश्वस्त डामरांना राजानें कारण नसतां मारवलें. म्हणून कांहीं डामर दस्यूंनीं राजाला श्वमार्कीच्य शयन. मंदिराजवळील अवस्करमदिरांत ( शोचकूपांत ) लौ. ४०१३ इ. स. ९३७ वर्षी कुत्र्याप्रमाणें मारून ठार केलें.

शर्वाटादी मूर्ख मंत्र्यानीं पार्थाच्या दुसऱ्या पुत्राला उन्मत्त अवन्तीवर्म्याला राजा केलें. हा अधिक पापी निघाला. याच्या कथेच्या स्पर्शानें सरस्वती स्थगित झाली आहे; पण मी तिला एकाद्या बिचकलेल्या घोडीप्रमाणें चुचकारून चालवीत आहें. नाकानें व खांद्याने डोक्याच्या कवचीवर आघात करून वाद्याप्रमाणें सूर काढणारे नीच लोक त्याचे मंत्री झाले. त्या सर्वांत त्याला पर्वतगुप्त प्रिय झाला. कटिपट सोडून तो सभेंत नर्तन करी. त्याचे मनांतून गूढपणें राज्य मिळवावयाचें होतें. राजाकडून त्याच्या भत्याला बन्धनांत टाकून क्षुधेनें मरूं दिलें. व राजाच्या बापाला, पार्थाला, तंत्र्यांकडून गोठयांतून ओढून जसें गुरांना मारतात तसें मारवलें.

राजा शास्त्राभ्यास करूं लागला. स्त्रियांचा कोठा व गर्भ पहाण्याकरतां कोटवी ( नग्न ) स्त्रियांचीं व गर्भवती स्त्रियांचीं पोटें फाडी. मजुरांचीं अंगें त्यांच्या कातडीच्या काठिण्याची परीक्षा पहाण्याकरतां, तशींच फाडी. अशा राजांकडून ब्राह्मण-लोभानें अगर वधाच्या भीतीनें दान घेत.

पापामुळें राजा क्षयी झाला. त्याच्या चौदा राण्यांनासुद्धां संतोष वाटला. हा माझ्यापासून झाला असे ख्यात करून एका शिशुला गादीवर बसवून तंत्री व एकांगव कम्पनाधिपति कमलवर्धन याच्या स्वाधीन त्याला करून राजा लौ. ४०१५ इ. स. ९३९ वर्षी मृत झाला.

कमलवर्धनानें सैन्य आणून एकांगादीनां पळविलें. राण्यांनी बाळराजाला पळविलें; तेव्हां कमलवर्धन स्वतां राज्यावर बसला नाहीं. तो सर्व द्विजांस जमवून त्यांस म्हणाला "कोणी तरी स्वदेशज, प्रौढ व सशक्त असा पाहून त्याला राजा करा. "या मूर्खांना वाटलें " हे माझें सामर्थ्य पाहून मला राजा करतील. दुर्लभ अशी युवती एकान्तांत प्राप्त झाली असतां, तिचा उपभोग न घेता, दुसऱ्यादिवशीं दूती पाठवून जो तिची आर्जवा करतो व प्राप्त झालेली विभूति टाकून जो त्याच क्षणीं ती राजनीतीच्या मार्गानें प्राप्त करून घेण्यास इच्छा करतो, तो व हा कमलवर्धन या दोघांतून अधिक शोच्य कोण ?

## राजाची निवड करणारी विप्रपरिषद्

हे विप्र स्थूळ कांवळीं वाहणारे शृंगहीन बैलाप्रमाणें असलेले, विप्र गोकुल मंदिरांत जमले. त्यांचें कूर्च धूमानें निर्दग्ध झाले होते. कोणाला राजा करावा याची चिकित्सा करीत असत। त्यांनीं मांडलेला उपन्यास वैमल्यानें वाढला. अभिषेक कोणावर झाला नाहीं. पण उच्च भाषण करतांना मुखांतून उडालेल्या थुंकीनें त्यांच्या लांब दाढीवर चांगला अभिषेक झाला.

आपली स्मृति देण्याच्या क्लृप्तीनें कमलवर्धन तेथें गेला. पण इष्टिकाघातानें विप्रांनीं त्यास परतवलें. द्विजांची जाति पांच सहा दिवस बसून होती. काहला, ढोलकें, कास्यतालादि वाद्यांचा कोलाहल चालू होता. आपली पत्नी बन्धकी झालेली जशी पहावी, तशी राजलक्ष्मी झालेली पाहून, कमलवर्धन सचिंत बसला.

पूर्वी सुगन्धादेवीचा कामुक प्रभाकरदेव म्हणून होता. त्याला एक भास्कर नांवाचा पुत्र होता. तो फार विद्वान होता व लक्ष्मीसरस्वतीच्या विद्वेषामुळें देशांतरांत फिरत होता. तो शुभ स्वप्नांच्या दर्शनामुळें व पीठ देवीच्या आशीर्वादामुळें हर्षुल होऊन यावेळेस परत आला. तो वाक्कुशल म्हणून द्विजांजवळ गेला व द्विजांनीं त्याला राजा केलें. त्र्यायशीं वर्षे चार महिने इतक्या कालांत कल्यपालाचे आठ वंशज, राणी सुगन्धा देवी, व शंभुवर्धन यांनीं राज्य केलें.

## तरंग ६ वा

### शिवस्तुति

( शिवाचें जें अर्धशरीर पार्वतीला पात्र झालें आहे, तें प्रेमानेंच प्राप्त झालें आहे. अशी देववधूनीं केलेली स्तुति ऐकणारी पार्वती आमचें रक्षण करो. )

### १ यशस्कर

( लौ. ४०१५ इ. ९३९ सालीं राजा झाला )

राजवाड्याच्या कक्षेंतून मला कोणी उल्लंघुन जाऊं नये म्हणून, तसें करणाऱ्या ब्राह्मणांस अंजलि जोडून तो म्हणाला, "तुम्हीं मला राज्य दिलें म्हणून तुम्हीं मला पूज्य आहांत तरी कांहीं कार्याचा काल असल्याशिवाय तुम्हीं माझे जवळ येऊं नये." हा सहज मिळण्यासारखा नाहीं म्हणून सहवासलाभव लोक विसरले.

### यशस्कर राजाची अपहरण करणाऱ्या कामगारांविरुद्ध मोहिम

राजा स्वतां कामें पाहूं लागला. अपहरण करणाऱ्या कामगारांना, खेड्यांतील लोकांना कृषिकर्म करण्यापलिकडे दुसरें कांहीं काम राहिलें नाहीं.

### बुवाबाजी विरुद्ध मोहिम

धर्मगुरूंकडून दीक्षा घेतलेल्या गृहिणी मस्तक हलवून भर्त्याच्या शीलशोभेचा निषेध करतांना दिसत नाहींशा झाल्या.

### साक्षरता प्रसार

ज्योतिषी, वैद्य, गुरू, सभ्य ( सभासद ), मंत्री, पुरोहित, दूत ( वकील ) स्थेय ( न्यायाधीश ) व कारकून यांत कोणीहि अपंडित राहिला नाहीं.

### राजाच्या चातुर्याची गोष्ट १ ली

एकदां प्रायोपवेशनाविषयीं चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यानें राजाला येऊन सांगितलें कीं एकजण राजवाड्याजवळ प्रायोपवेशन करीत आहे. त्याला राजानें बोलावून त्याचें कारण विचारलें. तो म्हणाला, राजा मी पूर्वी वैभवानें आढ्य होतों दैवयोगानें निष्कांचन झालों. ऋण झालें तें वाढत गेलें. सावकार पीडूं लागले. प्रथम माझें मंदिर मी एका वणिजाला बऱ्याच किंमतीला विकलें. भार्येच्या पोटापाण्याच्या सोयीकरतां एक सोपान कूप होता. तो वर्ज केला. त्या अतिशीतळ जागेंत बसून फुलें व पानें विकणाऱ्या मंडळीं कडून जें भाटक ( भाडें ) येईल त्यावर तिची उपजीविका व्हावी असा हेतु होता.

नंतर दिगन्तरांत हिंडून वीस वर्षांनीं अल्प वित्त मिळवून जन्मभूमीला परत आलों. तेव्हां मी माझी साध्वी स्त्री विवर्ण देहाची दुसऱ्याच्या घरीं मजुरी करून कशी तरी जीवन्त राहिलेली आढळली. तुला उपजीविकेचें साधन दिलें असतां तूं असल्या वृत्तीचा आश्रय कां केला आहेस असें विचारलें असतां तिनें वृत्तान्त कळविला तो असा कीं– "सोपान कूप तूं मला देऊन निघून गेल्यावर, वणिजानें मला लांकडानें मारून घालवून दिलें. मला दुसरी वृत्ति कोठली" असें म्हणून ती स्वस्थ बसली.

मी शोक व कोप यांमध्यें मग्न झालो. प्रायोपवेश केला. जागजागीं अधिकाऱ्यांनीं प्रतिवादी तर्फे न्याय दिला. मला जडाला न्याय कळत नाहीं. सोपान कूप विकला नाहीं असें प्राण पणाला लावून पुन्हां पुन्हां सांगितलें. मी क्षीणार्थ झालों आहे. पापाचें भय असेल तर तूं या वस्तूचा स्वतां न्याय कर."

राजा स्वतां धर्मासनावर बसला. सर्व स्थेय अधिकारी त्यानें एकत्र केले. कूप सहित मंदिर विकलें अशीं अक्षरें, विक्रयपत्रांत राजानें वाचलीं. त्यावरून ते सभ्य म्हणाले, बहुशः विचार करूनच याचा पराभव केलेला आहे. न्यायाकडे पहातां हा कपटानें लेखाला दूषण देत आहे. याचाच दण्ड केला पाहिजे.

राजाचा अंतरात्मा वादीचा जय व्हावा असें सांगत होता. त्यानें मुहूर्तभर विचार केला. व दुसऱ्यांबरोबर विचित्र कथा सांगत सभ्य मण्डळाला मोह पाडीत राजा बराच वेळ बसला.

मध्यंतरी सर्वांकडून पहावयाला म्हणून राजानें रत्नें घेतली व हंसत प्रतिवादीवणिजा जवळ जाऊन त्याची आंगठी घेतली. सर्वांनीं येथेंच रहावें. मी एका क्षणांत येतो असें कपटानें सांगून राजा तेथून निघून गेला. व ती आंगुठी एका भृत्या-जवळ देऊन त्याला म्हणाला "वणिजाकडे जा व ही आंगठी खूण म्हणून वणिजाच्या गणनाध्यक्षाला दाखवून, ज्या वर्षी विक्रीपत्र झालें, त्या वर्षाची गणनापत्रिका ( कीर्द ) घेऊन ये. ती एका निर्णयाच्या कामीं भाण्डपतीला ( वणिजाला ) पाहिजे आहे."

राजाच्या आदेशा प्रमाणें गणनाध्यक्षानें आंगठी घेऊन कीर्द दिली. तींत अधिकरण लेखकाला ( विक्रीपत्र लिहिणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याला ) एक सहस्र दिनार दिले. असें खर्चाच्या बाजूनें लिहिलेलें राजानें वाचलें. त्याची मितधनाची योग्यता त्याला बहु धनाचे अर्पण झालेलें पाहून, राजानें असें निश्चित केलें कीं 'र' काराचा वणिजानें 'स' कार केला. व सोपानकूपरहित या शब्दा बद्दल सोपानकूपसहित असे शब्द घातले.

अधिकरण लेखकाला राजानें अभय देऊन त्याच्याकडून सभ्यांना प्रत्यय आणून दिला. सभ्यांनीं विनंति केल्यावरून वणिजाचें घर वादीला देऊन वणिजाला राजानें देशाबाहेर घालविलें.

### यशस्कर राजाच्या चातुर्याची गोष्ट २ री

एकदां राजा आन्हिक करून भोजन करणार तों क्षत्त्यानें (द्वारपालानें) अवेळ होती म्हणून भीत भीत आंत येऊन

कळावलें बाहेर विप्र उभा आहे. आज काम संपलें. विज्ञप्ति करण्याचा तुम्हा समय उद्यां येईल. असें मी सांगितलें तरी "आज दर्शन झालें नाहीं तर प्राणत्याग करीन" असें तो म्हणत आहे.

भोजन थांबवून राजानें विप्राला दर्शन दिलें. विप्र म्हणाला मी देशांतरांत फिरून सुवर्णरूपक शंभर मिळविलें. तूं राजा झालास. सौराज्य झालें. असें ऐकून ते रूपक घेऊन परतलों. निश्चोर मार्गांत प्रवेश करतां मला सुख झालें. दिन सरतांच वाटेंत लवणोत्सव ग्रामी स्थिती (वसति) केली. अस्तसमयानें मी एका वनांत तरूतलीं निद्रा मी रात्र घालविली. झुडपामुळें लक्षांत न येणाऱ्या जवळच्या विहिरींत, वस्त्राला गांठ मारून ठेवलेलें माझें वेतन पडलें. तें मला जागे झाल्यावर समजलें. विहिरींत उतरणें अशक्य होतें नष्टसर्वस्व असा मी शोकाविष्ट होऊन जीव द्यावयाला निघालों.

एक समर्थ पुरुष मला म्हणाला कीं मी तुझें वित्त काढतों. मला काय देशील? मी म्हटलें मी विवश आहे. तुला आवडेल तें मला दे (तुभ्यं यद्रोचते मह्यं तत्त्वतो दीयतां त्वया) त्या पुरुषानें विहिरींत उतरून रुपये काढले. मला दोन दिले व स्पष्टपणें अठ्ठ्याण्णव आपण ठेवले. मी या व्यवहाराची निंदा करूं लागलों. 'वाक् कुतोऽसि' अरे तुला फसविलें असें लोक म्हणाले. यशस्कर राजा असता सर्व व्यवहार वचननिष्ठ होतात." मी सरळ बोललों त्याचा त्यानें फायदा घेऊन माझें घेऊन त्यानें हरण केलें तुझ्या दुर्व्यवहाराच्या द्वारांत आलों व देतों.

त्याचा 'प्रकृति नामनी' नाव व पत्ता विचारून राजा म्हणाला, "मी उद्यां तुझ्या इप्सित वस्तूची प्राप्ति करून देईन."

दुसऱ्या दिवशीं त्या दूतांनीं बोलावून आणलेल्या त्या लवणोत्सववासि जनांतून त्या ब्राह्मणानें त्या साहस करणाऱ्या पुरुषाला दाखवून दिलें. राजानें विचारतां तो पुरुष म्हणाला. "ब्राह्मणानें सांगितलें तसें वृत्त आहे. वाचेप्रमाणें व्यवहार घडून आला, "सत्यवाक्पारतंत्र्यस्य वस्तुवृत्तस्य चान्तरम्" स वाक् परतन्त्र असतें. एखाद्या बोलण्याचे दोन अर्थ होतात म्हणून पहिला अर्थ व दुसरा अर्थ यांत अंतर पडतें. हें लक्षांत न घेऊन लोक दोलाचलावर आरूढ होऊन खालीं जमिनी कडे दृष्टि लावून बसले.

धर्मसंरक्षक राजा म्हणाला 'तुला आवडेल ते दे' असें विप्राचें मत आहे. या लोभ्याला अठ्याण्णव आवडले ते त्यानें दिलें नाहीत. व दोन रुपये दिले. आतां अठ्याण्णव विप्राला द्या व साहसिकाला दोन द्या."

या वर्णाश्रमपालक राजानें चक्रभानु नांवाच्या एका द्विजतपस्व्यानें अत्याचार केला म्हणून त्याच्या कपाळावर डाग दिला. धर्म अधर्म सूक्ष्म परीक्षेने ओळखून राजानें राज्यांत कृतयुगाचा उदय केला.

पथ्योपदेश करणारा वैद्य अपथ्य करतो. हा राजा स्वतां न्याय देत असतां अन्याय करूं लागला. उत्तरोत्तर एकमेकांचें पक्षपाती (पाठीमागे टाकणाऱ्या) अधिकाऱ्याच्या मध्यें थीनें हा सत्यंकार राजा अर्थसंग्रह करूं लागला. याचा वडिल भाऊ मेला तेव्हां याला आनंद झाला. व राण्यांचा अभिलाष धरणाऱ्या वेळा वित्ताकडे यानें गज निमीलिकेनें पाहिलें. (डोळेझांक केली) ललला वेश्येला अंतःपुरांतील स्त्रियांच्या डोक्यावर ठेवलें. लल्ला चाण्डाळ पहारेकऱ्याशीं दुर्वर्तन करूं लागली. त्याच्या अंगीं वशीकरण सामर्थ्य होतें.

प्रायश्चित म्हणून राजानें आर्यदेशीय विद्यार्थ्यांकरितां मठ बांधला. मठाधिपतीला छत्रचामरादि राजचिन्हें दिली. फक्त टंक (नाणें पाडण्याचा अधिकार) व अंतःपुरांतील अधिकार हे वर्ज्य केलें.

राजाला उदर झालें, मरणाकरतां तो मठांत गेला. रुग्णस्थितींत राजा जिवन्त असतां उद्वेगानें भृत्यांनीं स्मश्रू न करण्याची, शिरोवस्त्र वर्ज करण्याची व काषाय वस्त्र धारण करण्याची असा ज्या कांहीं कृतज्ञता व्यंजक प्रतिज्ञा केल्या त्या सर्व राजा मरतो असें समजतांच विसरले.

या राजानें नऊ वर्षें राज्य केलें. तो लौकिक ४०२४ भाद्रपद कृष्ण तृतीयेला इ. स. ९४८ रोजीं मरण पावला. त्याआधी चुलत आजा जो रामदेव त्याचा पुत्र वर्णट नांवाचा होता, त्याला राजानें राज्य दिलें. पण तो नगरांत असूनहि राजाला भेटला नाहीं. म्हणून हा आपल्यापासून झाला नाहीं असें जाणूनहि संग्रामदेवाला राजा केलें. वर्णट हा एकाह राजा होता. एका दिवसापुरता राजा होता.

## (२) संग्रामदेव

संग्रामदेवाची आजी पालक झाली. पर्वतगुप्त म्हणून कोणी एक याचा मंत्री झाला—"चैत्राच्या प्रथम दिवशीं हें राज्य तुझ्या वंशजांना मिळेल पण अन्यथा वर्तन केलेंस तर तुझ्या वंशजांच्या आयुष्याचा नाश होईल. ऐशी भूतभारती (आकाशवाणी) याला ऐकूं आली.

म्हणून सैन्यासह वाड्यांत शिरून बालराजाला मारून त्याच्या गळ्यांत धोंड बांधून त्याला वितस्ता नदींत पर्वतगुप्तानें फेंकून दिलें व लौ. ४०२४ इ. स. ९४९ या वर्षी फाल्गुन कृष्ण दशमीला सिंहासनावर बसला.

## (३) पर्वतगुप्त

सामन्त, तंत्री वगैरे याचा द्रोह करीत. तरी त्याला यांनीं प्रणति केली. तथापि हा त्यांचा द्रोह करी. एकदां मदनादित्य याचा नगारा प्रमादानें फुटला. राजानें त्याचे अंशुक फेडून अपमान केला.

गौरीप्रमाणें शुद्ध अशा रूपसुन्दरी नांवाच्या यशस्कराच्या एका राणीचा यानें अभिलाष धरला. ती म्हणाली "यशस्कर स्वामी मंदिराची निर्मिति पुरी झाली नाहीं तोंच यशस्कर मृत झाला. ती निर्मिति आधीं पुरी कर." त्यानें घाईनें मंदिर पुरें केलें. पूर्वीच्या यागांत राणीनें आपल्या तनूची आहुति दिली. तिच्यावर पुष्पवृष्टि झाली. लौ. ४०२६ इ. स ९५० या वर्षी विता रोगानें राजा मृत झाला.

परलोकांत कोणती वृत्ति प्राप्त होते हें जाणणें अतींद्रिय आहे. तरी पण या लोकीं अशुभकर्माचा परिणाम दुःखद आहे असें अनुभवास न येतें तर आपली भरमसाट दुष्कृत्यांनी करण्यास कोण झटणार नाहीं ?

## ४ क्षेमगुप्त (व त्याचे दुराचारी विट)

पर्वतगुप्ताचा मुलगा क्षेमगुप्त राजा झाला. हा दुर्जनाश्रयानें दुर्वृत्त निघाला. कृष्ण पक्षांतल्या घनान्धकारित घोर रात्रीप्रमाणें भयप्रद निघाला. सारखे अलंकार घातलेले, सारखे वेश केलेले, याचे शंभर दुराचारी असे फल्गुन प्रभृति मित्र होते. त्यांनीं याला व्यसनें लावून लुटलें. तरी हा लक्ष्मीबहिष्कृत झाला नाहीं. हा परावलंबाश्रय झाला. दुसऱ्याची इच्छा ती याची इच्छा झाली विटांनीं याच्यांत अशुचिरुचि उत्पन्न केली. हा परोपहास कुशल राजा वृद्धांच्या स्मश्रूवर थुंके, कर्णशालीत गाली ओती. जवळच्या माणसाच्या डोक्यांवर टकरा मारी. विट-जिष्णु पुत्र याला कंकणवर्षी म्हणून आपल्यावर कंकणांचा वर्षाव करून घेई. विटजन या कामुक राजाला घरीं नेऊन [ कुच कुक्षी दिसतील अशा प्रकारें त्याच्यापुढें उभ्या करून ] आपल्या स्त्रियांचें सौभाग्य भग्न करण्यांत आपल्यांत स्पर्धा लावीत. कोणतीत काय विशेष व हृद्य कोणती असें विचारून द्रव्यप्राप्ति करून घेत. याच्या लालितांत हरी व धूर्जटी हे विट ढौकण विषयांत मूढ ठरले कारण यांनीं आपल्या भार्यांचें चरित्र शुद्धच राखलें व ते भिकारीच राहिले. द्वारपति फल्गुन यानें आपली मुलगी चंद्रलेखा क्षेमगुप्ताला दिली होती. तरी लोहरादी दुर्गांचा राजा, जो जयसिंह त्यानें आपुली मुलगी दिद्दा ( भीमशाही राजाच्या मुलीची मुलगी ) याला दिली होती. दिद्देवर राजा आसक्त होता, त्यामुळें याला दिद्दाक्षेम ही पदवी प्राप्त झाली होती.

संग्रामोपयोगी भाल्याची फेंक याला येत होती. तिचा उपयोग हा कोल्ह्याच्या शिकारींत करीत असे. जाळीं घेतलेले डोम्ब, रानांत फिरणारे लोक व कुतरे यांनीं तो वेढलेला सदा दिसत असे. शिकारीस गेला असतां एका कोल्हिणीच्या मुखातून अग्निज्वाला निघाल्या. या दृश्यानें त्रस्त होऊन याला लुता नांवाचा रोग जडला. व हा लौकिक ४०३४ इ. स. ९५८ या वर्षी मृत झाला. फल्गुनाचा मुलगा याच्या अस्थी घेऊन काशीस गेला. सपत्नीनें अनुगमन केलें. म्हणून दम्भानें दिद्दा मागाहून निघाली. अनुबंधानें तिला अनुताप झाला. सदय नरवाहन मंत्र्यानें अनुगमनाचा निषेध केला.

## ( ५ ) अभिमन्यु

क्षेमगुप्ताचा मुलगा अभिमन्यु राजा झाला— निर्दय दिद्दा पालक झाली. संधिविग्रह मंत्री, अंतःपुरांतील मुख्य व दुसरे अधिकारी यानीं या राजवधूचें शयन अनन्य केलें.

शर्योल्लास इ. गुणांनीं उज्वल मंत्री फल्गुन इत्यांच्या डोळ्यांत खुपे. पिशुन मंत्री रक्क यानें दिद्देच्या मनांत भरविलें कीं फल्गुन तुझें राज्य घेणार आहे. राणीनें त्याला मारावयाला यष्टिधर पाठविले. वाराह क्षेत्रीं जाऊन फल्गुनानें वराह देवाच्या चरणीं शस्त्र अर्पण केलें व राणीचें भय घालविलें. शस्त्र किंवा शास्त्र हे न्यून गुणांचें उपकरण आहे. म्हणून कोप आला असतां शस्त्र किंवा शास्त्र याचा उपयोग करणें एका विवेकी मनुष्यालाच साधतें. अध्यापक गेल्यावर जसा बाळांना तसा मंत्र्यांना आनंद झाला,

बंडाबारखें महाभय उत्पन्न झाल्यावर नरवाहन मंत्री बंड खोरांचें बंड तत्काल मोडी. म्हणून राजानें नरवाहनाला राजानक ही पदवी दिली. राणी नरवाहनाला अनुकूल झाली ती इतकी कीं तो हृष्ट म्हणजे ती हृष्ट. तो निर्विण्ण म्हणजे ती निर्विण्ण होई. त्याच्या आरोग्याविषयीं चौकशी केल्याशिवाय तिला बरें वाटत नसे. कोणत्याहि कामांत शिक्षा घेतल्याशिवाय व नित्यभेट म्हणून वस्तु दिल्या शिवाय तिला बरें वाटत नसे. सिंधु म्हणून एक युग्य ( मेणा ) वाहणाऱ्या भोयाचा मुलगा पर्वतगुप्ताचे घरीं आवडता नोकर होता. क्रमानें राणीनें त्याला गंजाधिकारी केलें. नव्या उत्पन्नाचा मार्ग म्हणून सिंधुगंज नांवाचें त्यानें एक कर्मस्थान काढलें. तो दुराशय त्या नैयथी राणीला म्हणाला "हा नर वांहा तुझें राज्य हरण करून बसला आहे." तसें खरें असें राणीनें उत्तर दिलें. नरवाहनानें तिला भोजनाचें आमंत्रण दिलें. भयाकुल राणीनें निरोप पाठविला कीं, मी स्त्रीधर्मिणी आहे. अमात्याची निष्ठा नाश पावली. याचाकिक उपद्व्यापी लोकांनीं तीळ व पेंड यांच्यांत असलेलें रुक्षत्व या दोघांत आणून दिलें. जे दिमण्यांत बालिशांपेक्षां संमूढ असतात, पण सुगुरूपेक्षां प्राज्ञ असतात, त्यांना निर्माण करणारे परमाणू कसे असतील ह्याची आम्हास माहिती नाहीं लोकांचें अवेक्षण करण्यांत ज्या राजाची बुद्धी तीक्ष्ण असते त्या राजाला खलाची वाणी सत्य वाटते. राणीनें केलेले असले अपमान, असह्य होऊन नरवाहनानें एक दिवस आत्महत्या केली. जिचा प्रतिकार करतां येत नाहीं अशा गोष्टीचा राग आला तर, स्वतेजानें संतप्त झालेल्या यशोधनांना मरणाशिवाय कोणती गति उरते ?

नरवहन विरहित राजलक्ष्मी सत्यविहीन भारतीप्रमाणें शोभत नाहींशी झाली.

मातेच्या पापामुळें विधुर झालेल्या राजपुत्राला (अभिमन्यूला) शिरीष पुष्पाला जसा सूर्याचा ताप तसा दुष्कृत्य जनांचा संगम शोषाध्यायी झाला. व हा राजपुत्र कोमजून गेला. हा अर्धमान प्रजाचंद्र कार्तिक शुद्ध लौ. ४०४८ इ. स. ९७२ या वर्षी नियति राहुनें ग्रस्त झाला.

## (६) नन्दीगुप्त

मृत राजाच्या बालपुत्राला राणीनें राज्यावर बसविलें. आपल्या मृत पुत्रापासून तों या पंगु राणीला खेळतांना पळतांना देत नसे म्हणून उचलून नेणाऱ्या दासीपर्यंत सर्वांच्या पुण्योत्कर्षाकरतां अभिमन्युस्वामी दिद्दास्वामी इत्यादींची मंदिरें बांधणें वगैरे वैकुण्ठ निर्मिल्यांनीं या राणीनें वितस्ता सिंधु संगम पावन केला.

सत्संगाचरण करीत असतांहि पाप्याच्या हातून दोष परित्याग होईल असा प्रत्यवाय देतां येत नाहीं. ध्यानस्थ बगळा विश्वासानें संचार करीत असणाऱ्या मत्स्यांना खातो. वर्षमात्रानें भोगोत्सुक होऊन या चर्षणी राणीनें या व दुसऱ्या एका नातवाला त्रिभुवनगुप्ताला थोड्या अंतरानें अभिचार करून आपल्या शेवटल्या नातवाला भीमगुप्ताला राज्यावर बसविलें .

## (७) भीमगुप्त

पर्णोत्सवांतील खेड्यांत एका तुंगाचा (खशाचा) नाण नांवाचा मुलगा महिषीचालक (गुराखी) होता. तो आपल्या सुगंधि, सिंह, प्रकट नाग व अट्टयिक या पांच भावासह काश्मिरांत आला व लेखहराचें (जासूदाचें) काम करूं लागला. तो एकदां राणीला दृग्गोचर झाला. तिचें हृदय आकृष्ट झालें. व तो तिला प्रिय झाला. आपल्या स्पष्ट व दुष्ट चेष्टांनीं तिनें वक्रपट भ्रष्ट केला व ती भयप्रद दिसूं लागली. धिःकार असो या मोठया कुलांत जन्मलेल्या स्त्रियांच्या महा नद्यां प्रमाणें निम्नानुसारी वृत्तीला !

भीमगुप्त महाकुलांतील होता. त्याला अभिमन्यूच्या राणीनें गुप्तपणें प्रविष्ट करून घेतलें होतें. तो आतां प्रौढमति झाला. जी काय राज व्यवस्था होती, ती व पितामहीची वृत्ती हीं नीट केली पाहिजेत, असें त्याच्या मनानें घेतलें. या शंकित राणीनें भीमगुप्ताचा विविध योजनांनीं निःपात करविला. लौ. ४०५६ इ. स. ९८० आपण स्वतां ही राणी सिंहासनावर बसली.

## ८ दिद्दा

तुंग सर्वाधिकारी झाला. त्यानें पूर्वमंत्र्यांच्या जागा भावांना दिल्या. तुंगानें राजपुरीच्या अधिपतीचा (पृथ्वीपालाचा) मोड केला. व त्यापासून कारभार घेतला. राणीनें त्याला कम्पणाधीश केला.

### सिंहासनावर बसण्यास योग्य अशा राजपुत्राची निवड करण्यांत दिद्दा राणीचें चातुर्य

राणी लोहरदेशीय आपल्या सर्व भ्रात्यांचे शिशुप्राय पुत्र जमविले. व त्यांच्यापुढें पालवेल (शेव) फळांची माळ टाकून दिली व या फळांतून एकजण किती फळें जमवूं शकतो तें पहूं असें ती म्हणाली. व तिनें त्या राजपुत्रांत कलह लावून दिला. ज्यांनीं अल्प फळें घेतलीं ते पुष्कळ मार खाल्लेले दिसलें. उदय राजाच्या संग्रामनामक पुत्रानें बरीच फळें घेतलेलीं दिसली पण तो अक्षतच राहिला. त्याचें कारण काय असें तिनें त्याला विस्मयानें विचारलें. तो म्हणाला अन्योन्य कलह करण्यांत दुसऱ्यांना गुंग ठेऊन मी निराळा राहिलों. व एवढी फळें मिळविलीं. व क्षतहीन राहिलों. दुसऱ्यांना व्यसनांत टाकून आपण स्वच्छ राहणाऱ्यांचा हवा तो अर्थ क्लेश केल्याशिवाय सिद्ध होतो.

अप्रमत्तत्वाची दूतीच अशी याची वाणी ऐकून राणी स्वभावतःच भीरू अशी नारी असल्यामुळें याची राजा होण्याची योग्यता आहे असें वाटलें व तिनें त्याला युवराज केलें. शूराला आपलें कार्य शौर्यानें व्हावें असें वाटतें, व भित्र्याला सावधपणें व्हावें असें वाटतें. अग्नीनें वर्जित लांकूड (वानरेन्धन) वानरांना शीत निवारक होतें. अग्निशौच मृगाच्या लोमांची शुद्धि जल आणि वायु यांनीं होते. प्राण्याच्या कार्याची सिद्धि त्याच्या स्वभावावर अवलंबून असते. पुढें लौ. ४०७९ इ. स. १००३ या वर्षी राणीनें भाद्रपद शुद्ध अष्टमी या वर्षी स्वर्गाला प्रयाण केलें.

या काश्मीर मण्डळांतील भूपाल वंशांत स्त्रीच्या माहेरच्या संबंधानें हा तिसरा परिवर्त झाला. चौसष्ट वर्षे आठ महिने सहा दिवस इतक्या अवधींत सहा राजे भूभोगी झाले.

---

# तरंग ७ वा

## शिवस्तुति

परस्परांचा द्रोह केल्याशिवाय नीट रहावें म्हणून संग्रामराज व तुंगप्रमुख लोकांकडून दिद्दा राणीनें मरतांना, कोशपानपूर्वक शपथा घेववल्या.

### १ संग्रामराज (सातवाहन कुलांतील)

तुंगावर सारें प्रजाकार्य टाकून संग्रामराजा आळशी झाला. त्यानें असम कुलांशीं संबंध केले. दिद्दा मठाच्या अधिपतीला त्यानें आपली लोठिका नामक कन्या दिली. कोटें लोकांचा भार सहन करणाऱ्या उद्धत राजाला देण्यास योग्य अशी राजकन्या

व कोटें दान देतांना सोडलेल्या पाण्यानें ओले झालेल्या हाताचा क्षुद्र मनाचा ब्राह्मण ?

तुंगाच्या विरुद्ध असलेल्या मंत्र्यांनीं पद्मि स पुरांतील ब्राह्मण परिषदेच्या सभासदांकडून प्रायोपवेशन करवलें. त्यांवर तुंगानें हल्ला केला. एक ब्राह्मण मेला. तुंगाला अधिकारावरून दूर करणें ही निष्कृति क्षान्ति चरू (प्रायश्चित्त) म्हणून मान्य झाली. मृत ब्राह्मणाला तुंगाच्या घरीं जाळूं असें दुसरेंच कांहीं ब्राह्मण म्हणाले. त्यांनीं कोठून तरी एक शव आणलें व तें तुंगाच्या घरीं जाळलें. केश होमामुळें एका कृत्येचें उत्थान झालें. व ब्राह्मणांचा नाश करण्याकरतां शस्त्रें बाहेर पडलीं. ब्राह्मण पळाले. तुंग विजयी झाला.

भद्रेश्वर नांवाचा एक हीन कुळांतील कायस्थ होता. त्याला तुंगानें आपला साहाय्यक घेतला. भद्रेश्वराचें वंशक्रमोचित कृत्य आरामिकाचें (बागवानाचें) काष्टविक्रय करणाऱ्याचें कसायाचें, द्विवणिजाचें (गोमय विकणाऱ्याचें) होतें. तो कांबळ्यानें पोट झांकून, हातांत दप्तरें दौती घेऊन पोटासाठीं कामगाऱ्यांची मागून जाई. तुंगानें याला धर्माधिकारी नेमलें. देव ब्राह्मण आणि अतिथि, इत्यादि राजोपजीवींच्या वृत्तींचा च्छेद करून हा त्यांचा अकाल मृत्युच झाला.

शाही राजा त्रिलोचन पाल * यानें तुरुष्कांविरुद्ध राजाचें साहाय्य मागितलें. राजानें तुंगाला सैन्य पाठविलें. पहारा ठेवणें, जागोजाग चर खणणें, सशस्त्र अभ्यास करणें. इत्यादि कांहीं न करतां तुंग तेथें उन्मत्तपणें राहिला. हम्मीरानें जिज्ञासापूर्वक टेहळणीकरतां पुढें थोडें सैन्य पाठविलें त्याचा नाश करून तुंग दंग होऊन बसला. हम्मीरानें पुढें रुधिराभिसारी युद्ध करून तुंगाचा पराभव केला.

तुंग मार खाललेल्या कोल्ह्याप्रमाणें परत आला. तुंगावर अवलंबून असावें लागण्यानें राजाला खेद होई. परायत्त स्थितीनें पशुहि खिन्न होतो. तुंगाच्या भावाच्या (नागाच्या) प्रेरणेनें तुंगाला सपुत्र मारण्याचें राजानें ठरवून त्यांना आमंत्रण दिलें. दुष्ट स्वप्न पडलें असूनहि, तुंग पुत्रासह राजवाड्यांत गेला व पुत्रासह मारला गेला. तेव्हां त्याचा एक भृत्य मध्यें पडून श्लाघ्य ठरला. एकाच प्रहारानें तुंग निरुच्छ्वास व राजा सोच्छ्वास झाला. तुंगाचे कांहीं अनुयायी तोंडांत अंगुलि घालून मूक बसले. तुंगाच्या भावाला (नागाला) राजानें कंपनाधिपति केलें.

प्रजापीडनपण्डित अधिकारी राजाच्या कोशाशीं वृद्धि करीत. त्यांत एका दिविराच्या अपूप विकणाऱ्या वेश्येचा चन्द्रमुख नांवाचा पुत्र होता. त्याच्या मुलांना सैन्य विभागांत राजानें अधिकारी नेमलें. व हेमाच्या ठिकाणीं मुलें यवाचीं कांडें बांधून हंसूं करून घेतात तसें राजानें हंसे करून घेतलें. आपल्या हरिराज नांवाच्या पुत्राचा राजा करून लौ. ४१०४ इ. स. १०२८ या वर्षीं राजा मरण पावला.

## (२) हरिराज

यानें मही निःश्चौर केली. रात्रीं बाजारांत दारें लावणें बंद पडलें. याची कारकीर्द अचिरस्थायिनी होती. हा बावीस दिवसांनीं मृत्यु पावला.

## (३) अनंत

हरिराजाचा हा पुत्र होता. याला शाही पुत्र प्रिय असत. रुद्रपालाला प्रत्यही निर्वाहाकरतां अर्धलक्ष दिन्नार * देई. दिद्दापालाला प्रतिवर्षीं ऐंशीं हजार देई.

कम्पनाधिपति त्रिभुवन डामर गोळा करून राजाचें राज्य घेण्यास आला. राजा श्लाघ्य विक्रम होता. असें एकूं येत असें कीं तो रणांतून परत येई तेव्हां त्याच्या हातांत स्थिरग्रह करून राहिलेली तरवार दुधाच्या अभिषेकानें सोडवावी लागे.

या युद्धांत राजाला एकांगांचें साहाय्य होतें. त्यांचें वृत्त (वेतन) त्यांना नामग्रहपूर्वक सेवकांकडून मिळे. पण त्यांना अक्षपटलांत (हिशेबनीसाच्या कचेरींत) त्यांना जावें लागे. राजानें त्यांस स्थावर विलब्धि (कायमच्या नेमणुका) करून दिल्या.

म्लेच्छ, अमर, व दरदांचा राजा अचलमंगल यांस घेऊन त्रिभुवन परत आला. त्याच्याशीं लढण्यास रुद्रपाल निघाला. दुसऱ्या दिवशीं युद्ध ठरलें. अचलमंगल, पिण्डारक नांवाच्या नागभवनाला गेला. त्यानें भवनांत पोवत असलेल्या नागावर अविनयानें भाला फेंकला. कुंडांतून कोल्ह्याच्या आकाराचा नाग बाहेर पडला. मृगयेच्या औत्सुक्यानें अचलमंगल त्याचें मागें लागला. युद्धाचा समय मोडला असें समजून राजाचें सैन्य चाल करून गेलें. त्या समरोत्सवांत अचलमंगलाचा शिरच्छेद झाला. रुद्रपाल विजयी झाला.

मत्सरी उदयानें (रुद्रपालाच्या भावानें) ब्राह्मणांकडून प्रायोपवेशन करवलें. त्यांच्याशीं रुद्रपालाची अवदालिका झाली. लूता नांवाचा रोग जडून तो मरण पावला.

राजाचा एक पुत्र मृत झाला. राजा व राणी सूर्यमती राजवाडा सोडून सदाशिवाजवळ रहावयास गेलीं. पुढें हीच प्रथा पडली.

पापसूदन तीर्थाच्या जलानें नित्य तोंड धुण्याची मालवेंद्र राजा जो भोज त्याची प्रतिज्ञा होती. ती राजानें असंख्यात

---

* पंजाबचा हा शेवटला शाही राजा. याच्यावर हम्मीरानें (गझनीच्या महुमुदानें) स्वारी केली होती. ती नववी होती. व ती १०१३ सालीं झाली.

* हीं नाणीं सोन्याचीं, रुप्याचीं अथवा तांब्याचीं असत.

काचेच्या कळशांचीं कुंभें तीर्थजलानें भरभरून पाठवून पुरी केली.

राजा तांबुलव्यसनी होता. पद्मराज नांवाच्या एका विदेशी नागखंड द्वीपर्णाची विक्री करणाऱ्यानें निःशेष देशोत्पत्ती ( उत्पन्न ) आपलेकडे लावून घेतलें. राजाला अश्व प्रिय होते. म्हणून मोतद्दार लूट करीत. राजाला अधिकाधिक झालेलें कर्ज पद्मराजानें दिलें. व पंचचन्द्रादिनीं शोभणारा मुकुट व सिंहासन तारण गहाण म्हणून घेतलीं. ही राजचिन्हें दर महिन्याला समारंभाच्या दिवशीं राजवाड्यांत आणलीं जात. ही अवस्था राणी सूर्यमतीनें आपल्या खर्चानें दूर केली. पतीचें नारी विधेयत्व ( पत्नीच्या तंत्राप्रमाणें चालणें ) व तिचा भर्तृजय ( भर्त्यावर आज्ञा चालवणें ) हीं दोन्हीं तिच्या निष्कलंक शीलामुळें लोकनिंदेला पात्र झालीं नाहींत.

पण राजाचें मन स्वयंवरांतील पतिवरेप्रमाणें नव्या भृत्यांवर बसूं लागलें.

हलधर म्हणून एक बुद्धियुक्त सर्वाधिकारी होता त्यानें शेजारचें प्रांत राजाच्या अमलाखालीं आणले. राजाराणी त्यांचीं मुखप्रेक्षीं झालीं.

## प्रजेचा वित्तसंचय ओळखण्याचें साधन

उग्रभीक्षिमानें एक पादाग्र नांवाचें कर्मस्थान होतें तेथें सोन्याचा वर्ण ( कस ) व मूल्य लिखावयाचा मुद्रित करावयाचा हक्क त्यानें प्रजेजवळ धनाचा संचय किती आहे तें कळून येत असे. तो या ज्ञानी मनुष्यानें बंद केला. कारण त्यापासून राजे लोक वित्तसंचय करणाऱ्याला त्रास देतील.

हलधराचा राणीशीं असलेला निकट संबंध आतां दुष्प्रवादाचें स्थान झाला, तनयाच्या शाश्वत व मूढ प्रेमामुळें पत्नीच्या प्रेरणेनें हा मंत्रशून्य राजा राज्यपरित्याग करून पुत्राला ( कलशाला ) राजा करण्यास तयार झाला. हलधर व परिक्षत्ता ( खासगीकडील मंत्री ) रणादित्य इत्यादिनीं या कृत्याचे दोष दाखवून दिले.

## अनंत देवाचा राज्यपरित्याग. व युवराजपदाचें विडम्बन

लौ. ४१३९ इ. स. १०६३ च्या बहुलांत ( कार्तिकांत ) शुक्लषष्ठीला राजानें कलशाला राज्याभिषेक करविला. आस्थान मण्डपांत नव्या राजाला सिंहासनावर बसवून त्याच्यापुढें राजपुत्रांना व सामन्तांना मुजरा करण्यास नांवें घेऊन आणतांना, मानापमान संभाळण्यांत निष्ठुर अशा रणादित्यानें राजमहात्म्य मनांत आणून अनंतदेवाच्या मानेवर हात ठेवून, नव्या राजाला ( कलशाला ) म्हटलें, "महाराज, हे राजपुत्र अनंत देव आहेत. यांकडे नजर द्यावी." रागे येऊन अनन्त देवान मागें वळून पाहिलें. तेव्हां रणादित्य हंसून स्पष्टपणें म्हणाला "आपण राजपरित्याग केल्यावर आपल्याला याहून विशेषपद काय मिळणार? या हृदयंगम भाषणानें राजा प्रतिवाक्य करावयास अक्षम झाला.

हलधर राजाला म्हणाला, "आपल्या मुखाकडे पाहून मुलावर राज्याचा भार टाकून त्याला निःसुख करून म्हातारपणीं आपल्याला लाज नाहीं कां वाटत? आपल्या मुलाला यौवनाचे भोग भोगावयास मोकळें ठेऊं नये का?

अनंत देवानें पुन्हां अधिकार धारण केलें.

## सासुरवासाचा मासला

उचित वेष व अलंकार यांविषयीं सुनांचा उत्कर्ष या रूक्षोचित राणीला सहन झाला नाहीं. पुत्राच्या महिषींकडून दासींना योग्य अशीं गृहलेपनादी ( सारवण वगैरे ) कृत्यें करून घेतली तरी त्यांनीं वैमुख्य दाखविलें नाहीं.

## अशुचिमनाचा लोहरचा राजपुत्र

पुढें लोहरचा राजा क्षितिराज यानें येऊन अनन्त देवाला भेटून सांगितलें "माझा पुत्र भुवनराज राज्यलोभानें माझ्या अंगावर धांवून आला. या अशुचि मनाच्या माणसानें कुत्र्यांना जानवीं घालून मला पूज्य अशा भागवतांचीं नांवें दिलीं," असें म्हणून कलश राजपुत्र व लेखाराणी यांच्या दुसऱ्या मुलाला ( उत्कर्षाला ) क्षितिराजानें आपलें राज्य दिलें व चक्रधर तीर्थाला जाऊन सायुज्यता प्राप्त करून घेतली.

जिन्दुराज कम्पनाधिपतीनें राजपुरी इत्यादींच्या राजाकडून करभार घेतला. क्षोभ नांवाच्या उद्वेगकारक डामराला ठार केलें.

हलधर म्हणाला हा जिन्दुराज पराकोटीला पावला आहे. त्याविषयीं शंका घेत रहा. हा तुमच्यांत व तुमच्या पुत्रांत भेद पाडील व जयानन्द होईल ( जय झाला म्हणून आनन्द मानील. ) जिन्दुराजाला राजानें बद्ध केलें.

कलश असाधु वृत्तीचा झाला. प्रमदकण्ठ म्हणून गम्यागम्य विचारांचा परिहर्ता राजाचा उपदेशक झाला.

## बिडालभट्ट वणिज

तांत्रिक समयांत चतुर, प्रत्यक्ष भैरवाची गणना न करणारा असा हा एक वणिज होता. काळें माजर पाळल्यावरून याला बिडालभट्ट हें नांव मिळालें. याच्यापुढें विनत झाले. त्यांच्या डोक्यावर हस्त ठेऊन हा स्वस्थ करी. हा व्यंजमूर्ख होता. आपण मूर्ख आहों असा बहाणा करी. शिल्पी, रजक वगैरेंचा गुरू होऊन हा श्रेष्ठी बिडालांची मिष्ठा व हिंग याच्या वासानें उत्कट झालेले आपले कर पण्डितांच्या शिरावर ठेऊन तो आपणांस अनुल्लंघ्य करी. यानें कलशाला आन्ध्य

## चमक विट

कुण्टणगिरी करणारा हा अमंगलावह विट राजाला प्रिय झाला. हलधराच्या पुत्रानें याचें नाक कापलें. हा वेणुवाद्य कुशल होता. रात्रीं जागणाऱ्या व पुष्कळ भोजन करणाऱ्या, व ज्यांच्या घशाला नित्य अजीर्णाच्या ढेंकरांनीं, दुर्गंधि सुटलेली असे, अशा गाणें बजावणें करणाऱ्या मण्डळीचा हा सेवक असे. या मण्डळींचीं तोंडें म्हणजे मोऱ्या होत्या. त्यांतून प्यायलेलें मद्य शौचाला घेतलेल्या पाण्याप्रमाणें एकदम घसरून पोटांत जात असे. या नृकुक्कुराला ठक्कुर ही पदवी मिळाली. म्हणून त्यांनीं आपल्या वंशाशीं संबंध तोडला. वंशभंगापूर्वी नासिका भंग पावली याचा याला अभिमान वाटला. चमक निर्लज्ज होऊन जें जें करी तें तें अवाच्य असलें तरी मध्य पाताप्रमाणें (प्रासंगिक वाक्याप्रमाणें) त्याचें दिग्दर्शन केलें पाहिजे. यानें राजाची बहीण कल्ला व तिची मुलगी नागा, यांना भ्रष्ट केलें. हें कळतां राजा व राणी यांनीं मनोव्यथा व राग झांकून ठेवली.

## मुठींत धरलेलें सांगणारा ग्रामजोशी

लोष्ठक नांवाचा हा धान्य मुष्ठीचा भिक्षुक होता. ग्रामक्षेत्रपालाच्या प्रसादानें मुष्टिबद्ध वस्तूंचें ज्ञान झाल्यामुळें याला मुष्टिलोष्ठक हें नांव पडलें. गुरूपणा, कुण्टणगिरी, दैवज्ञता इत्यादि गुणांनीं राजाचें प्रेम यावर बसलें.

## व्योमशिव जटी

भट्टारक नांवाच्या मठाचा अधिपति, एक जटी साधु होता. खुर्खुट ही पदवी मिळावी म्हणून यानें एक व्रत धरलें होतें. पूजापाठासाठीं यानें एक परिभ्रष्ट (ज्याचा कोणी नाहीं असा) गवई ठेवला होता. तो राजाला प्रिय झाला.

असल्या व दुसऱ्या विटांच्या चाटुकारांनीं कलशाचें मन कलुषित झालें. तो दोषांना गुण मानूं लागला. शाही राजवंशांतील बिज्जू, पित्थराज, पाज व आणखी एक व गजपति नाग याचा पुत्र जयानंद हे त्याचे स्नेही झाले.

## विषयी कलशाचें रात्रीचें साहस

कलशाला परवधू प्रिय वाटूं लागली. जिन्दुराजाच्या सुनेच्या संकेताप्रमाणें पांच सहा नीच मनुष्यांसह तो रात्रौ गेला. कुत्रे भोकूं लागले. चोरांच्या शंकेनें शस्त्र घेऊन चांडाल पहारेकरी धांवले. कलश घाबरून पडला. वर पडून त्याचें रक्षण अनुयायी जनांनीं हा राजपुत्र आहे असें कळवून केलें. नासिकारहित चमकाचा पुरस्कार करून आलों. तो मला अमंगल शकुन झाला. असें समजून कलश स्वस्थ राहिला.

## मानवन्तांची स्वामीनिष्ठा

पितरांना ही वार्ता कळली. विद्येच्या निधीला, वडील नातवाला, हर्षाला त्यांनीं राजा करण्याचें मनात आणलें व त्याला जवळ आणविलें. पितरांनीं कलशाला बोलावलें. तो भीत भीत जयानंदाचा हात धरून, बिज्ज पाठीमागून येत असतां पितरांना भेटला. पित्यानें तोंडांत मारली. बिज्ज शस्त्राला हात घालीत रागानें म्हणाला. महाराज, आपण मानवंतांचे धुरीण असतां, मी राजपुत्राकडून वेतन घेणारा हातांत शस्त्र धरून असतां, माझ्या जीवांत जीव आहे तो मी त्याला कसा सोडूं? आपण पिते! हा पुत्र! तेव्हां क्षणभरनें मी जवळ नसेन त्या वेळीं जें योग्य तें करावें." अशा स्निग्ध व कर्कश वचानें राजाला मोह पाडून कलशाला बिज्ज घेऊन गेला. त्याच्या अतिमानुष धैर्याची पूजा धीर जनांनीं केली.

राजा रागानें विजयक्षेत्रास सपत्नीक गेला. विद्याविद्यादी द्विज म्हणाले तूं कोश मागें ठेवूं नकोस कोशहीन नष्टधार तरवार व कोशहीन आणि नष्टाधिकार राजा याला विचारतो कोण प्रासादवर्जून सर्वसंपदा घेऊन राजा निघाला. अयःशंकु (खिळे) सुद्धां शेष ठेवले नाहींत.

विजयेक्षत्रांत परिवारासह स्वर्गसुखाचा अनुभव घेऊं लागला. पण कलशानें अम्बराधिकारी (कापडनवीस) कम्पना धिपती वगैरे अधिकारी नेमून, पित्याशीं युद्ध करावयाचें ठरविलें. मी आहे तो सरळ मनाच्या राजापासून भीति नाहीं असें सांगून पुत्रवत्सल राणीनें थांबविलें. तरी पितापुत्राचीं मतें कलुषित होत.

वैरस्यरूपंएतद्धि भेदं यातिमुहुर्मुहुः ॥
संधीयमानमपियत् छिन्नमम्बरमिवाशयम् ॥३॥

वैराचें रूपच असें आहे कीं संधि केला तरी मन पुन्हां पुन्हां फाटतें. लड्डा नांवाची एक कोळीण बन्धकी होती. थक्क म्हणून एक टकल्या डामर तिचा वल्लभ होता. तो तिच्या बुद्धीनें चालत असे. कलशाचे लोक त्यांचीं नावें पितरांना देत व दुरात्मा कलश हंसे. राजानें तुल्य पुरुष दान केलें.

मत्सरानें विजयेश्वराच्या देवळाला आग लावून कलशानें तें भस्मसात केलें. सौधावरून हें पाहून कलश नाचूं लागला. Nero fiddleed while Rome was burning. इकडे रोम जळत असतां तिकडे नीरो वाद्य वाजवत होता ही गोष्ट इटलीच्या इतिहासांत प्रसिद्ध आहे. राणीला दुसरे दिवशीं अदग्ध रत्नलिंग सांपडलें. तें तिनें तद्देशीय व्यापाऱ्याला विकलें. भोजनसामग्री व वस्त्रें विक्रीच्या पैशानें प्रजेला दिलीं व जळलेलीं घरें बांधवली. बोरूच्या छत्राकार पटलांनीं आच्छादलेल्या नगरांत राजा राहूं लागला.

पिता पराभूत न झाल्यामुळें पुत्र त्याला वारंवार दुःसंदेश पाठवी. राणी प्रेरक आहे असें समजून राजा तिला म्हणाला, राणी सांगेल तेंच करण्यानें, अभिमान, राज्य, मति, इत्यादी पैकीं मी कोणतें बरें हरवून बसलों नाहीं! नारी हें पुरुषाचें

खेळणें आहे असें म्हणतात, पण परिणामीं पुत्रच नारीचें खेळणें होतात. जीर्ण पति काय कामाचे ! शेवटीं पुत्रच वेतन देतील. म्हणून स्त्रिया पुत्रांना पोषतात व भर्त्यांना शोषतात. पित्याशीं अस्निग्ध असलेला पुत्र अन्याचा समजावा. दुसऱ्याच्या कुलांत उत्पन्न झालेल्याला या मुलाला राणीनें घरांत प्रविष्ट केला हा मागें ऐकलेला प्रवाद खरा ठरतो.

## गुप्तगोपनाचा स्फोट राजानें केल्यावर राणीचा जाबसाल

पुत्रोत्पत्तीचें गूढ प्रकाशित झालें. कलश हा प्रशस्त नांवाच्या मंत्र्याचा मुलगा होता. त्याला राजाचें पहिलें अपत्य मृत झालें तेव्हां राणीनें घेतला अशी जनश्रुति होती. भर्त्यांना जिंकणाऱ्या स्त्रिया भर्त्यांचें उत्सिक्त भाषण म्हणजे शिरावर लत्ता प्रहारच समजतात. राणीनें रागानें प्राकृत प्रमदेप्रमाणें प्रौढिसंस्कार पुरुष (संवयीनें आलेल्या धीट पणामुळें) कठोर भाषण केलें. राणी म्हणाली "या गतश्री वृथावृद्ध झालेल्या मंद मूढाला काय बोलावें तें समजत नाहीं. जीं जीं काहीं दूषणें तूं मला दिलींस तीं तीं तुझ्या कुळांतील स्त्रियांस लावावयाला उचित आहेत. पुत्रानें देशांतून घालविलेला, व आतां पत्नीनें टाकलेला असा परिवाद तुझ्या विषयीं लोक करतील अशी भीति वाटते."

या उपालंभानें राजा कुपित झाला. त्यानें गुदद्वारांत असिप्रविष्ट करून घेतली. रक्तातिसार झाला. अशी वार्ता राजाज्ञेनें राजभृत्यांनीं प्रसृत केली. लौ. ४१५७ इ. स. १०८१ या वर्षी कार्तिक शुद्ध पौर्णिमेला राजा त्याच्या एकसष्ठावे वर्षी विजयेश्वराच्या पुढें जीविताला मुकला. सुखोचित राजा पत्नीच्या व पुत्राच्या जाचांतून सुटला. हा कुणावर रागावला नाहीं, यावर कोणी रागावला नाहीं. चुकोपासौ न कस्मैचित् चुकोप्यस्मैन कश्चन ॥ ४५४ ॥

## अनन्तदेवाच्या राणीचें अनुगमन

राणीनें भृत्याकडून नातवांच्या हर्षाच्या क्षेमाकरतां कोशपानपूर्वक शपथा घेववल्या. नातवानें रडत तिच्या पायांवर शिर ठेवलें. तिनें तें हुंगलें. व सांगितलें पित्यावर विश्वास ठेऊं नको. भर्त्याचें शेवटलें मण्डन झालें. पतीला शिबिकारूढ तिनें करवलें. राजांनीं शिबिकेला खांदे दिले. विजयेश्वराला प्रणाम करून युग्यारूढ राणी बाहेर पडली तूर्यवाद्यांच्या कल्लोलांत लोकांचें आक्रन्दन मिश्र होऊन दिशा मग्न झाल्या. दिन अस्तास जाणाऱ्या सुमारास राणी पितृ काननांत पोंचली अहो कलश आला कां ? असें तिनें पुत्राच्या दर्शनाला उत्सुक होऊन नगराकडून आलेल्या लोकांस पहिल्यानें विचारलें. द्वेष करणाऱ्यांनीं ती ती बिभीषिका घालून त्याला निषिद्ध केलें. तिची निराशा झाली. वितस्तेच्या जलाची प्रार्थना करून तिनें एक श्लोक म्हटला.

वैतस्तेन तुनोयेन जठरस्थेन ये मृताः ।
मोक्षं गच्छन्त्य संदेहं ते यथा ब्रह्मवादिनः ॥ ४७३ ॥

वितस्तेचें जल जठरस्थ करून जे मृत होतात, तें ब्रह्मवाद्यांप्रमाणें निःसंशय मोक्षाप्रत जातात. तिनें वितस्तेचें जल प्राशन केलें. स्नेहाचा संशय करणाऱ्या लोकांना तिनें असा शाप दिला कीं, ज्यानें आमचें दोघांचें पुत्राशीं वैर उत्पन्न केलें त्यांचा सान्वय परिमित दिवसांनीं क्षय होवो ! तिचा हलधराशीं संबंध होता असा जो प्रवाद होता त्याचें शमन करण्यांत परलोकाचा पण लावून त्या सतीनें शपथ घेतली. अशा प्रकारें आपल्या विशुद्ध शीलाचें प्रकाशन करून पावित्र्य दर्शक हास्य करून प्रज्वलित अग्नीमध्यें उडी घेतली. अग्नीच्या ज्वालेनें नभ शोभित झालें. असें वाटलें कीं देवांनीं तिच्या आगमनाप्रीत्यर्थ नभाला शेंदरी रंग फासला. लोकांच्या आक्रन्दानें चितेचा चटाचट शब्द ऐकूं आला नाहीं. सर्व लोक शोकानें तप्त झाल्यामुळें, चिताग्नि उष्ण वाटला नाहीं. तो अग्निपटावर आलिखित असा दिसला. काहीं दास व दासींनीं अनुगमन केलें. प्राणिमात्र निसर्गानें भगुर असल्यामुळें, टिकत नाहींत. पण माणसाच्या मनांत व कांचेच्या घटांत, जो एक दीर्घकाल टिकणारा गुण असतो तो हा कीं त्याच्यांत सांठवलेली चमत्कृतिजनक कथा, व गीर्वाण गंगोदक हीं गळून जात नाहींत.

चवथ्या दिवशीं राजा व राणी यांच्या अस्थी घेऊन तत्वंगाचे मुलगे गंगेला गेले.

## (४) कलश

वेतन द्यावयाचें मान्य करून कलशानें हर्षाशीं (पित्याशीं) संधि केला.

## निधि-निक्षेप

सैल्यपुरांत एका कुटुम्बाच्या जय्य नांवाच्या बुद्धिमान मुलानें व्यापारांत द्रव्य संभृत केलें. याची स्थूलोत्पत्ति (स्थावर उत्पन्न) पुष्कळ होती. तो डामराच्या पदवीला पोंचला. त्यानें आपली दीड कोश जमीन खणून काढली व ती दिनाराच्या न्यासानें भरून वर साळीचें बीं पेरलें. व बभ्रा होईल म्हणून भृत्यांस मारून टाकलें. तो पुढें हा निधि ताब्यांत घ्यावयास जात असतां शेतांत एका अज्ञात सैनिकाकडून मारला गेला. ही सर्व संपदा कलशाला मिळाली.

---

टीपः—हें सतीचें वर्णन फार बहारीचें आहे. चितेच्या ज्वालांनीं नभशोभित झालें व असें वाटलें कीं तिच्या आगमनार्थ देवांनीं नभाला शेंदरी रंग फासला ही उत्प्रेक्षा उत्तम आहे. ती फार पावित्र्यदर्शक आहे.

वणिज्‌प्रमार्गे गमन करणाऱ्या या राजानें उत्पन्न उपस्थित खर्च, व भविखर्च यांची गणना करतांना भुर्जपत्र व खडू हीं दूर केलीं नव्हतीं. हेराच्या मार्फत याला सर्व प्रजेचें वृत्त कळतसे. काय कळत नसे तो प्रजेचं फक्त स्वप्न वृत्तान्तच होतां. मंत्र्यांना भरून द्यावयाला पडेल अशा प्रकारें याचा अर्थ नष्ट होत नसे. कंटकांचा शोध करून त्यांना न्यायानें शासन करी.

तरी दुष्ट उपदेशकांकडून त्यांना वाईट नाद लागलेला होताच. बुलीर नांवाचा एक टक्क नाना देशांमधून अशा तुरुष्कांपासून विकत अथवा हरण केलेल्या स्त्रिया याला आणून देत असे. शिवाय रूपलोभानें आणलेल्या परदारांनीं याच्या अन्तःपुरांतील स्त्रियांची संख्या बहात्तर झाली. मत्स्ययूषादी वृष्य पदार्थ हा पुष्टि येण्याकरतां सेवन करी.

अशी शवरू कृत्यें करताना त्यानें विजयेश्वराचें दग्ध झालेलें मंदिर बांधलें. तसेंच कलशेश्वराचें बांधलें. त्यांत सुवर्णकृत असंख्य घंटांचें पटल बांधलें. विजयेश्वरावर सुवर्णाचें छत्र बांधावयाचें त्यानें मनांत आणलें. तेव्हां तुर्क देशांतील एक शिल्पी आला. त्याला तांब्यावर सुवर्णलेप करण्याची विद्या विदित होती. नोनक मंत्र्यानें त्याला प्रश्न विचारून ती कला अवगत केली.

सती सूर्यमतीच्या शापाची अव्यभिचारिता सिद्ध करण्याकरतां जयानन्द व जिन्दुराज लवकर मृत्यु पावले. बिज्ज सांधींत मेला पाजकाला वाघानें खाल्लें. लौ. ४१६३ इ. स. १०८७–८ वर्षी एकाच वेळीं या राजाच्या नगरींत (१) नध्वपूरचा कीर्ति-(२) चम्पाचा आसट (३) वल्लापुरच्या तुक्काचा पुत्र कलश, (४) राजपुरीचा संग्रामपाल, (५) लोहरचा उत्कर्ष, (६) उर्शा येथील राजा मुंगज (७) कान्हचा राजा गंभीरसिंह. (८) काष्ठवाटचा राजा उत्तमसिंह असे आठ राजे उपस्थित होते. व्यवहारज्ञ राजानें नोनक मंत्र्याची व्यवस्था उत्तम ठेवली.

राजाचा मंत्री मल्ल यानें एका चोराला ताडण केल्यामुळें तो चोर मरण पावला. म्हणून तो कृपाकुल व विषण्ण होवून जान्हवीला गेला.

नंतर निरंतर ( मध्यें अंतर नसलेल्या ) महागृहांचें असें नगर वसविण्यास राजा प्रवृत्त झाला.

## गायकाचा श्रोत्यानें केलेला मनोभंग

इकडे हर्ष आपल्या गुणांनीं प्रकाशित झाला. याला सर्व देशांतील भाषा येत होत्या. हा कवी होता. विद्यानिधि होता. हा गुणिजनांना वेतन देई. पित्यानें दिलेलें वेतन पुरें पडत नसे. याला एक दिवसआड भोजन करावें लागलें. गीतें म्हणून हर्ष पित्याचें रंजन करी. व त्यानें दिलेल्या पारितोषिकांनी भर्तव्यांचें भरण करी. पित्याकडे हा एक दिवस गात होता. सर्व सभा मुदित झाले. पण कालश उठून शौचास गेला. या प्रसंगभंगानें या बुद्धिमानाचा तेजोभंग झाला. हा कोपानें व वैलक्ष्यानें भूमीकडे पाहूं लागला.

> प्रभुर्गीतक्षान्तिः सुहृदतिशठः स्त्री परुषवाक् ।
> सुतोगर्वोन्नद्धः परिजन उदात्त प्रतिवचः ॥
> इयान् सोढुं शक्यो ननु हृदयदाही परिकरः ।
> ननु श्रोतावज्ञालुलितनयनानां परिभवः ॥ ६४६ ॥

शान्तिरहित प्रभु, अतिशठ मित्र, कठोर वाचा बोलणारी स्त्री, गर्विष्ठ पुत्र, उलटें प्रत्युत्तर देणारे भृत्य, इतका सारा हृदयाचा दाह करणारा परिकर सुद्धां सोसता येईल. पण अवज्ञेनें चंचल नयन फिरवणारा प्रत्यक्ष परिभव तिरस्कारच असा श्रोता, सहन होणें शक्य नाहीं.

तेव्हां पित्याचाच भृत्य विशाविट्ट हर्षाला हंसत म्हणाला, “ पित्याला ( कलशाला ) मार, व राज्य कर, हर्षानें अभिषेक केला. जवळच तत्त्वंगपुत्र धम्मट होता. तो म्हणाला. “ हा कांहीं असाप्रत बोलला नाहीं.”

हर्षानें पित्याला मारण्याच्या कामीं तीक्ष्ण पुरुषाची योजना केली. राजा मारेकऱ्यांना गोचर होई, पण स्नेहलवानें त्यांना हर्षाला मारूं देईना. तेव्हां या गोष्टीचा प्रतिभेद होईल, या भीतीनें विशाविट्टानें ही गोष्ट राजाला निवेदन केली. त्याला थक्कादी तत्त्वंगाचे कांहीं पुत्र भेटले. त्यांना राजानें सांगितलें कीं धम्मटाला धरून आणा तेव्हां तत्त्वंगाचे पुत्र म्हणाले “ या कृत्याची आम्हांला माहिती नाहीं. तुझ्या प्रसादबलानें आम्हीं परित्राणदीक्षित होऊन विपन्नाचें रक्षण करण्याकरतां आमचें दार नेहमीं उघडें ठेवतो. प्राणनाश होण्याच्या वेळीं आमचा बंधु निर्दोष असो वा सदोष असो, त्याला कसा सोडून देऊं? त्याचें रक्षण केल्यास आम्हांला स्वामिद्रोहाचें पातक लागेल. देशत्याग वर्जून आम्हांला दुसरा उपाय नाहीं ” त्यांनीं धम्मटाला मध्यें घेऊन देशत्याग केला.

मग हर्षाला आणवून पिता कलश त्याचें सान्त्वन करीत म्हणाला “ सर्वत्र प्रख्यात अशा पित्यावरून पुत्राची ओळख होते. आपली स्थिति उलट आहे. दिशांचा दीप म्हणून जो तूं माझा मुलगा प्रसिद्ध आहेस त्यावरून मला तुझा पिता म्हणून ओळखतात. तूं गुणवन्तांचा अग्रणी असून असाधु लोकांनीं सेव्य अशा मार्गाचें अवलंबन करीत आहेस. खलांनीं तुझ्याविषयीं सांगितलें तें संभवत नाहीं तेव्हां यथार्थ कथन करून तूं अपराधाचें निराकरण करावें.” हर्षानें राजाला कळविलें कीं मला दुसऱ्याच्या सांगण्यावरून प्रेरणा झाली. याला पकडावा अशी राजानें आज्ञा केली. याला नाहींसा करा असें नोनक मंत्र्यानें सुचविलें.

तों मोरेकन्यांनीं हालचाल केली. त्यांची वाट राजभृत्यांनीं लावली. व हर्षाला बन्धनांत टाकलें. हर्षाचा सेवक प्रयाग,चक्रिकेच्या कामाला असमर्थ असे जाणून त्याला हर्षाबरोबर राहूं दिलें. हर्षाला नाहींसा करावा असें नोनक मंत्र्यानें सुचविलें. सामन्याची मर्जी संभाळण्याकरतां हर्षाच्या एका स्त्रीनें विष कालवलेलें अन्न एकदां एका आचाऱ्याकडून हर्षाला पोचतें केलें. हें वृत्त दुसऱ्या आचाऱ्याकडून कळलें. तें त्यानें कुत्र्याकडून खाववलें. कुत्र्याचा जीव गेला पुढें प्रयागानें दिलेल्या अन्नाशिवाय हर्ष कांहीं खात नाहींसा झाला.

राजामध्यें सदाचार विपर्यय झाला. त्यानें ताम्रस्वामीची (रवीची) प्रतिमा फोडली.

राजाला क्षय झाला. कुंभ प्रतिष्ठा करीत असतां कुम्भांत त्याच्या नाकिंतून रक्त गळलें. अपशकुन झाला. राजा शय्याप्रणयिता झाला. ताम्रस्वामींचा कोप झाला म्हणून हा शैवसांप्रदायी अपवर्ग देणाऱ्या विजयेश्वराला सोडून ताम्रस्वामीला शरण गेला. सर्व जग तृणासारखें मानणारा, नियोगी ( अधिकारी ) आर्तिप्रसंग आला म्हणजे गद्दासीला नमन करतो. त्याच्या मनांत हर्षाला भेटावयाचें होतें. सेवकांनीं आज्ञा ऐकली नाहीं.

प्राणप्रसंगसमये परिसंकुचंती ।
स्वप्नप्रसंग इव धावनशक्तिराज्ञा ॥

प्राणावसानसमयीं केलेली आज्ञा स्वप्नप्रसंगीं जशी धांवण्याची शक्ति तशी संकोच पावते. हर्षाविषयीं व प्रजेविषयीं कांहीं शिक्षा ( व्यवस्था ) सांगत असतां त्याची जीभ जड पडली. त्याचा मानस जाणण्याकरतां नोनकानें त्याच्या पुढें आरसा धरला. राजानें दांतओठ चावले व आरसा ढकलला. लौ. ४१६५ इ. स. १०८९ या वर्षी मार्गशीर्ष शुद्ध दशमीला तो निद्रेला पोचला. सात राण्या व एक अवरुद्धिका यांनीं अनुगमन केलें. कय्या नांवाच्या एका प्रमादवित्त राणीनें ती उच्च कुळांतील असून एका नियोग्यांचें अवरुद्धात्व पत्करिलें. भूपालभोग्य वपु ग्रामभोग्य केलें. वामनानें राजाची अन्त्येष्टी नेली. कलशाच्या मनांतून वडील मुलाला ( हर्षाला ) राजा करावयाचें होतें. पण मंत्र्यांनीं तसें करूं दिलें नाहीं. कलशानें लोठराकडून दुसरा मुलगा जो उत्कर्ष त्याला आणवून त्याला राज्य दिलें.

## उत्कर्ष

हर्ष स्नान करीत असतां [illegible] अभिषेकाचा तूर्यध्वनि ऐकूं आला. तो त्या शकुनशास्त्रज्ञाला शुभशकुन वाटला आपल्याला राज्यप्राप्ति होणार [illegible] वाटलें. विश्वास येण्याकरतां ताटंक ( दागिना ) दे[illegible] हर्षानें प्रयागाबरोबर विजयमल्लाला ( राजा कलश व राणी [illegible]श्री यांच्या मुलाला— आपल्या सावत्र भावाला ) असा निरोप पाठविला कीं तूं आमचा बंधु असतां आम्हीं बंधनांत आहा. विजयमल्ल विचार करतों म्हणाला. परंतु वैमत्य घालविण्याकरतां विजयमल्लाला नेमणूक देण्याचें कबूल केलें.

कंदर्पावर राज्य टाकून राजा त्याला राज्य कसें करतां विचारीत नसे. त्याचें नित्यकृत्य म्हणजे कोशाची तपासणी असे. निर्व्यय काम आलें कीं तें करी. सव्यय आलें कीं विचार करीत बसे. सापत्न मातांना मुद्गाल देई. श्रोत्रियाप्रमाणें कंजुष असा राजा अप्रिय झाला.

## हर्षाचा बंध, मोक्ष व दोन आंगठ्या

नेमलेलें वेतन मिळेना म्हणून विजयमल्लानें बंड केलें. हर्षाला मारला म्हणजे बंड मोडेल, असें नोनक मंत्र्यानें सुचविलें. उत्कर्षानें मोरेकरी सज्ज केले. व त्यांना दोन आंगठ्या दाखवून म्हणाला, तुम्हीं तूर्त हर्षाची राखण करीत बसा. मी ही आंगठी धाडीन तेव्हां त्याला मारा. व ही धाडीन तेव्हां सोडा. हर्षाला जिवंत ठेवला तर त्याचा उपयोग करून घेतां येईल असें त्याला वाटत होतें.

मोरेकरी हर्षाकडे गेले. त्यानें प्रत्येकाला जवळ बसवून घेतलें, त्यांचीं शस्त्रें हातांतून व मारण्याची इच्छा मनांतून गळाली. वाणी कामधेनूप्रमाणें कोणत्या अनर्थाचें अपहरण करीत नाहीं !

प्रसेश्रियं सृजति कीर्तिं मघं लुनीते ।
मित्रत्वमानयति हन्त विरोधिनोऽपि ॥
यात्यध्वभिः प्रतिपदं सुमनोऽनुकूलैः ।
गौः कामधुक भिववाऽपहरत्यनर्थम् ॥ ७८९ ॥
कामान् दुग्धे विप्रकर्षत्यलक्ष्मीम् ।
कीर्तिं सूते दुष्कृत या हिनस्ति ॥
तांचाप्येतां मातरं मंगलानां ।
धेनुंधीराः सूनृतवाच माहुः ॥ १ ॥

( या श्लोकाचा अनुवाद हा ७८९ श्लोक आहे. )

हर्ष त्यांना म्हणाला, “ असें लाजून कां उभे रहातां ! स्वामीच्या आज्ञेप्रमाणें वागणोर सेवक, सर्वथा निर्दोष असतात. क्षणोक्षणीं अवस्थांचें स्थित्यंतर होत गेलेलें असें अद्भुत बघावयाला मिळेल. जरा विलंब करा. आकाशांत लहान लहान अभ्रें भग्न पावतात. द्वीप (बेट); द्वीपी, वाघ; उरग, (उंट); तुरग, ( अश्व ) इत्यादींचा भ्रम उत्पन्न करतात. सौम्य व क्रूर अशा क्रमानें ज्या माणसांना विकृती होतात, त्यांच्या हृदयांत क्षणोक्षणीं विकारांच्या ऊर्मी उठतात. क्षण जसा येईल तशी वृत्ति ठेऊन मी जसा येथें बसलों आहे तसे कार्यान्तरावर दृष्टि देऊन

देखें आपणहि रक्षावें. ज्यांना राज्यप्राप्ति जवळ आली आहे त्यावर असले प्राणसंशय उत्पन्न करणारे प्रसंग येतात. वा रसान्तर उत्पन्न करतात. वृष्टिकाल जवळ आला कीं ग्रीष्माचा उष्मा घन होतो. प्रभात जवळ आली कीं रात्रीचें तिमिर, गाढ होतें. त्या प्रमाणें पुष्कळ संपत्तीच्या लोटांबरोबर मनुष्याला विभव प्राप्त व्हावयाचें असेल. तेव्हां पुष्कळ उपद्रवाच्या उद्रेकासह, नष्ट होणारी विपद् बाहेर पडते. श्वासोच्छ्वास होत आहे. आपण जीवन्त आहोंत हा शुभ शकून समजून हर्षानें शुभोदर्क (ज्याचा शेवट चांगला आहे अस) सज्जनांच्या गोष्टी आपल्या परिस्थितीला लागू अशा त्यांना सांगितल्या, व कालक्षेप करण्याकरितां रसोत्पत्ति होईल अशा रीतीनें मुख्य मुख्य मुद्यांचें स्पष्टीकरण करून, हरिश्चंद्राची उपकथा सांगितली.

टीपः—हीच हुबेहुब कल्पना त्याच शब्दांत शेक्सपिअरने अँटनी व क्लिओपट्रा या नाटकांत घातली आहे. पहा अंक ४ प्रवेश १४ वा

ॲन्टनी म्हणतो "अरे! इरास! कधीं आपण राक्षसाच्या आकृतीशीं, कधी कांहीसा झुलणारा ढग; कधीं वाघासारखा लोट, अस्वलासारखा अथवा सिंहासारखा; कधीं अभिमुख असा किल्ला; लम्बायमान खडक; दोन शृंगांचा डोंगर; वर वृक्ष असलेलें, जगांत झुलक्या देत रहाणारें, दिमाखानें आम्हांला वेडवणारें, असें भूशीर हि आपण आकाशांत पहातो! अशा खुणा तूं आकाशांत पाहिल्या आहेत ते काळोख्या रात्रीं दाखविले जाणारे चित्रपट आहेत.

असें हर्ष इकडे त्यांचें रंजन करीत असतां, तिकडे हर्षाला सोडावें अथवा मारावें असे अनेक वेळा उत्कर्षानें मनांत आणलें. शेवटीं दूतांजवळ वधादेश देऊन त्याच्या खुणेची आंगठी द्यावयास तो विसरला. रक्षिजनांनीं तोंडी उक्ति मानली नाहीं. तें वृत्त वधादेश देणाऱ्या दूतानें परत येऊन उत्कर्षाला कळविलें. उत्कर्षानें दुसरा दूत पाठविला; पण दैवानें मोह पाडून आंगठ्यांची अदलाबदल झाली. पहारेकरी पहातात तों दूताचे हातांत बंधमुक्त करण्याची आंगठी होती. त्यांनीं मागत जाऊन हर्षाच्या पायांवर डोकीं ठेवलीं व हर्षाला बाहेर पडण्याची विनंति केली. हर्षाला खरें वाटेना. तो चुप बसला. तेथेंच उभा राहिला.

हर्ष मारला जाणार म्हणून विजय रागानें निघाला. सैन्य नगरांत फिरून राजवाडा जाळावयास निघाला. तोंच त्याला हर्ष येऊन भेटला. दोघांच्या नाना कथा झाल्या हर्ष सिंहासनावर बसला.

आतां पुढें काय करावें असा प्रश्न उत्कर्षानें मंत्र्यांस विचारला असतां, नोनक मंत्री दुसरे बोलत असतां त्यांना थांबवून रूक्षपणें म्हणाला "महाराज, सकाळीं मंत्र सांगितला तो एकला नाहीं. मरणाशिवाय दुसरा इलाज नाहीं" सहजा राणीच्या मंदिरांत जाऊन पटच्छेद करणारी कात्री मानेवर टाकून प्राणहर नाड्या कापल्या. रक्तस्त्रावानें त्याचा प्राण गेला.

प्रियाच्या रक्ताची गैरिकानें सहजेनें दाट अंगराग केला व अग्निरूपी ... प्रेमाला सोन्याला उजळा दिला. सहजेनें औचित्य राखलें, त्यांनीं भर्तृप्रसादाला पात्र झालेल्या स्त्रियांचें शिर उंच राहिलें.

टीपः—प्रेमाच्या सोन्याला उजळा दिला. या शब्दांत संपणाऱ्या वाक्यांतील परंपरित रूपकानें उजळा दिलेल्या सोन्याप्रमाणेंच उजळ आहे. सतीच्या पातिव्रत्यानें शोभणारें आहे.

## (६) हर्ष

हर्षानें उत्कर्षाचे मंत्री, नोनक, भट्टारक प्रशस्तकलश इत्यादिकांना बन्धनांत टाकलें.

## हर्षाच्या चर्चाकथेचें वर्णन

पुष्कळ राजे असल्या कथाप्रसंगांत येऊन गेले. आतां प्रतीतीला विषम (बुद्धीला अगम्य.) असा कष्टप्रद मार्ग लागला आहे. हर्षाची चर्चाकथा सर्व साहसांचें उदकांचें क्षेत्र, सर्व उल्हास नष्ट झाला असें सांगणारी दूती; सर्व व्यवस्थांची जननी; सर्व नीतीचा नाश करणारी, उद्रिक्त शासनाची स्फूर्ति, उद्रिक्त अशक्षयाची क्षिति. उद्रिक्त त्यागसंपत्ति (उद्रिक्त औदार्यसंपत्ति) व उद्रिक्त हरणाकांक्षा होय. एका काळीं ती कारुण्योत्सेकांनीं सुभग, दुसरे काळीं हिंसोत्सेकानें भयंकर, एकदां सत्कर्मानें कळित व एकदां पापकर्मानें कलंकित अशी होय. ती स्पृहणीय व क्रूर; सर्वतः वंद्य व निंद्य अशी होय. ती जवळ बाळगण्याजोगी व दूर घालवून लावण्यास लायक अशी उपहास्य; शहाण्यांनीं काम्य व शोच्य असें नामधारण करणारी, अशी ही अपकीर्तीमुळें रमणीय व मानसांतून अगदीं त्याज्य अशी होय.

टीपः— वर हर्षाच्या गुणांतील उद्रेक व विरोध हीं स्पष्ट करून कवीनें दाखविले आहेत. कल्हण हा वागीश खरा.

हर्ष हा तेजःपुंज ... केलेला होता. एरव्हीं हा मोठ्यांना सुद्धां दुष्प्रेक्ष्य कसा ... असता?

* सिंहद्वारीं हर्षानें घंटा टांगविल्या. म्हणजे विज्ञप्ति करणारे कोण आहेत तें वाद्याच्या नादानें समजावें! पूर्वापार संस्थांचा व्यतिक्रम न होऊं देण्याकरतां वडिलांच्या मंत्र्यांना

हर्षानें अधिकार दिले. * कंदर्पाला द्वारगाधीश व मदनाला कम्पनाधीश नेमलें. प्रशस्त कलशादिकांना बंधमुक्त केलें. अपराध ज्यानें केला त्याचा उपयोग करून घेतां येतो, ज्यानें घर जळून जातें, त्या अग्नीवरच घरचा स्वयंपाक करून घेतां येतो, पण नोनकाला त्याच्या अपराधाचें स्मरण करून, शूळावर चढविण्यांत आलें. विशाविट्टाचें नाक कापून त्याला त्याच्या स्त्रियांच्या समूर शूळावर चढविण्यांत आलें.

* सतराव्या शतकाच्या आरंभीं होऊन गेलेल्या जहानगीर बादशहानें अशी न्यायशृंखळा टांगली होती. ती याचें अनुकरण असूं शकेल. कारण कल्हणानें आपला ग्रंथ ११४९ त संपविला आहे.

## स्त्रीपुरुषांचें राजमान्य वेषभूषा

जशी वनांत वसंतानें चालविलेली पद्धति असते तशी हर्षानें रानोचित पद्धति आपल्या मंडळांत विशेष न ठेवतां चालू केली. सुवर्ण शृंखलांनीं (कडींतोड्यांनी अलंकृत) असे मंत्री व प्रतीहारी राजवाड्यांत क्रमण करतांना आढळत. कांहीं अमत्य सुंदर पोषाखानें शोभायमान होऊन आले. राजानें दासींकरवीं त्यांची आरती करविली पूर्वीं राजाशिवाय सर्व देही केश मोकळे ठेवीत. शिराला उष्णीष घालीत नसत. किंवा कलापूर्ण आभरणें घालीत नसत. आतां या निर्मत्सर राजाच्या काळीं झुलणाऱ्या ताडपत्री पंखांनीं, स्थूलचंदन तिलकांनीं, व श्मश्रु अशा दीर्घ केसांनीं लोक शोभत. स्त्रिया सुवर्ण कैतकीच्या पातीनें व फुलांच्या वेण्यांनीं केश अलंकृत करीत. त्यांनीं शुभ्र कपालावरील तिलकांना स्थिर होत. अपांग व कर्णप्रान्त यांना संधि, त्या अंजन रेखेनें शोभवीत, केश जरतारी आंचलाने बांधीत, त्यांच्या चोळ्या अर्धदण्ड व पयोधर प्रच्छादित करीत. दाक्षिण्यांची पद्धति आवडली. म्हणून त्यानें सोन्याचें टंक (नाणें) चालू केलें.

दंड नायक सुत्रनुर्शीपद्य (कृपण) होता. चंपक मंत्री खर्चिक होता. राजा उभयमुखी (सवत्स) गाई व हरिण जिंन दान करी. हा विद्वच्चूडामणि राजा पण्डितांना पालख्या छत्र्या वापरण्याची प्रक्रिया देत असे. बिल्हण कवि कर्नाटकभूपति जो परमार्दि त्याकडे गेला. त्यानें त्याला विद्यापति करून गर्वांत उंच केलें. तरी हर्षाची कीर्ति ऐकून परमार्दीचा मान, बिल्हणाला वचनाच वाटली. दिवसाचे दोन यम राजा झोप घेई. रात्रीं दरबारांत जाऊन काम करी या राजाच्या मण्डळांत सोन्याच्या व रुप्याच्या दिनारांत व्यवहार चाले.

राजाच्या मनांत मोह उत्पन्न झाला त्यानें पित्याचें पूर्ववैर स्मरून त्याला पाद्रसेन असें नांव दिलें. व राजाचा मट लुटला अवरोधगृहांत ती ही स्त्रिया ठेवल्या.

राजपुरीचा राजा संग्रामपाल, विकृत झाला. कम्पनेश कंदर्पानें त्याच्याशीं युद्ध सुरू केलें व मृत्यूचा महानद उघडला. औषधी तेलानें लिप्त बाण सोडले. कंदर्प अग्निअस्त्र जाणतो असें समजून शत्रू पळाले. कंदर्प राजाला प्रिय झाला.

पुढें परिहासपुराची व्यवस्था ठेवणाऱ्या मंत्र्यांत फार बिघाड होत गेला. वामन मंत्र्यादिकांना ब्रह्मपरिषदेनें वातगण्ड असें नांव दिलें त्यांना राजानें काढलें.

कंदर्पाला लोहरदेश घ्यावयाचा आहे असें कांहीं दुष्ट मंत्र्यांनीं उठविलें. मुठींतून जशी वाळू तशी राजाच्या मनांतून कंदर्पावरील प्रीति जरी मुष्टिबद्ध होती तरी गळाली. त्यांचेवर राजानें एक असिधर पाठविला. तो मारण्याच्या उद्योगांत असतां कंदर्पानें त्याचा हात रगडला व त्याची चामडी काढली. कंदर्प वाराणशीस गेला. व एका गयावळाला मारून त्या जागीं दुसरा बसविला. अशा रीतीनें गयेस काश्मीरिकांचें श्राद्धशुल्काचें निवारण केलें.

कंदर्प गेल्यावर दुष्ट मंत्र्यांचा हेतु साध्य झाला. खैराहारानें मद चढलेले मेंढे आपल्या शृंगांच्या कण्डू शमविण्याकरितां एकमेकांना टकरा मारीत सुटून मधल्या खांबाचा चूर करतात. तसे उन्मत्तमंत्री दुर्वार द्वेषानें एकमेकांशीं भांडून मध्यस्थ राजाचा नाश करतात.

राज्य मिळविण्याची इच्छा करणारा तन्वंगपुत्र घम्मट हा लोहर वंशीय राजपुत्र होता. त्यानें कलशाच्या एका वेश्येच्या (कटवेच्या) पुत्राला (जयराजाला) हर्षाला मारण्याकरितां प्रेरित केलें. हें वृत्त प्रयागाला कळलें. त्यानें कांहीं प्रश्न जयराजाला विचारले. तेव्हां कट करणारा मींच असे यातना सोशीत जयराजानें सांगितलें. जयराजाला विष घालण्यांत आलें. त्याला विषघ्न मंत्र येत होते; म्हणून तें व्यर्थ गेलें. त्याचा शिरच्छेद करून मांसास भोजन देण्यांत आलें. घम्मटाला मारण्याचें काम लोहरच्या टक्कुगाला सांगून राजा म्हणाला, हें काम प्रयाग सांगल तेव्हां कर. वामनमंत्री म्हणाला, हें काम त्वरित करून टाका नाहींतर भद्राणि दरिद्रति. (सुदैवाला दरिद्र प्राप्त होतें) घम्मटाला त्वरित मारण्यांत आलें.

## राजाच्या मनांत प्रवेश करणारा कुशल विट

नष्टचेष्ट अशा शवांत प्रवेश करण्यांत वेताळ कुशल असतो. तसा राजाच्या मनांत प्रवेश करण्यांत विट कुशल असतो. हलधराचा नातू लोष्टधर हर्षाला कलशाचा द्वेष्टा समजून म्हणाला "तूं कलशेश्वराचे गांव जप्त कर. सुवर्ण लूट मी त्याने वितस्तेवर पूल बांधीन. आणखी राजानें रंजन करतांना म्हणाला. "मी गगनावर चित्र सुरेख काढतो.

जिस तंन्तूनीं वस्त्र उत्तम विणतो, स्वप्न दृष्ट सुवर्ण काढून देतो. हिमाचे कोट बघतो, जरी समुपस्थायिका ( रुग्ण परिचर्या करणारी स्त्री ) अपथ्य वस्तूवरिल रोग्याच्या इच्छेला निषेध करत तसा प्रभूच्या इच्छेन प्रयागानें निषेध केला.

एकदां लेष्टधराच्या सांगण्यावरून भीमशाही राजानें भीमकेशवाचें मंदिर लुटलें व दुसरीं अन्य देवळें लुटून झाल्यावर देवांच्या मूर्तींचें उत्पाटण करण्याच्या कामीं एक अधिकारी राजानें नेमला त्यानें शीर्ण झालेल्या नकांच्या व चोटांच्या व नग्नावस्थेंत हिंडणाऱ्या कृश लोकांकडून प्रतिमांवर मल मूत्र विसर्जन राजानें करवलें. लांकडाच्या ओंड्याप्रमाणें सुवर्णाच्या मूर्ती ओढल्या. या तुरुष्कानें असा गांव ठेवला नाहीं. कीं जो यानें निष्प्रतिम केला नाहीं. दोन प्रभावी असे देव अधृष्य राहिले एक श्री नगरांतील रणस्वामी व इतरत्र मार्तंड. एक बुद्धाची प्रतिमा कनक नावाच्या गायकाच्या विनंतीवरून व एक कुशलश्री नांवाच्या श्रमणीच्या विनंतीवरून. पुरीवावर कर बसवून तो वसूल करण्याच्या कामीं राजानें एक अधिकाऱ्याची जागा निर्माण केली. गर्भश्री नांवाच्या पर्यायानें ज्ञात असे जें मतीनें जाड्य त्याच्या प्रभावानें कुमार्गानें मिळविलेल्या द्रव्याचा व्यय राजा तदनुरोधानें करी

## राजे आपला पैसा कसा खर्च करतात

दुर्लभ मृगाक्षी स्त्रिया, व सुंदर श्वास असलेले अश्व मिळविण्यांत आणि वैतालिकांची अतिशयोक्त स्तुति विकत घेण्यांत, राजे आपली संपत्ति खर्च करतात. प्रियतमांचा कोप व त्यांचा प्रसाद यांच्या गोष्टी, शिकारीच्या कथा, यांत राजांचा पोरांप्रमाणें काळ जातो. वेटांच्या स्तवांवरून आपण खरोखर अमानुष आहोत, पुरुषाधिक आहोत, आपल्याला तृतीय नेत्र आहे, अधिक भुजा आहेत. असें राजे मानतात. राजे व बालकें समान भाव असतात. बालकें गोड असेल तें रुचीनें खातात, व कडू असेल तें थुकून टाकतात. राजे मिष्टभाषण चांगलें मानतात कडू झिडकारतात. कनक म्हणून चम्पकाचा धाकटा भाऊ गायक होता त्याला राजानें एक लक्ष दिनार दिले.

## चंदलेची कथा

कर्नाटकचा राजा परमाडि याची चदला नांवाची स्त्री सुंदर होती तिला मिळविण्याची राजानें प्रतिज्ञा केली तेव्हां कांहीं चारण स्तुति मिषानें हसून परस्थलाला उद्देशून म्हणाले, "या राजानें प्रतिज्ञा पुरी होईतों अपक्रिय ( भट्टी लावल्याशिवाय काढलेला) * कापूर न खाण्याची प्रतिज्ञा केली आहे. ही चंदलेची माता स्वर्गांतून आणविली आहे असें सांगून राजाला एक जाड स्त्री दाखवून राजाकडून एका वितानें द्रव्य मिळविलें. चंदलेच्या दासी देवता आहेत असें राजाला विट सांगत व राजा त्यांस नमन करी. राजाला पुष्कळ आयुष्य हवें होतें. या दासींनीं त्याला शंभर वर्षे आयुष्य दिलें विटांनीं विनंति केल्यावरून राजा त्यांस विद्यमान आयुष्य तुल्य आयुष्य देई. चन्दलेच्या दासीं कडून एका डोम्बानें रसायन मिळविलें. कारण राजाला पिण्ड सिद्ध व्हावयाला पाहिजे होता. बल व रूप यांच्या प्राप्तीकरतां यानें केलेले उपाय, इतके लज्जाकारक आहेत कीं ते कोणताहि भला मनुष्य सांगू शकणार नाहीं. हा मूर्ख राजा रात्रौ नर्तकीला शिकवी. व स्वतां अभिनय करी याच्या या गोष्टी इतक्या अद्भुत आहेत कीं, त्या कालें करून खोट्या वाटतील. दुरून कोणी शत्रूनें बाण टाकले तर ते याला लागत नसत हें त्याचें आयुष्य शेष असल्याचें अथवा त्याच्या प्रजेच्या सुकृताचेंच फल होय. यानें अगम्य गमन केलें. निषिद्ध असें सूकर मांस भक्षण केलें.

टीप :— भट्टी लावल्याशिवाय कापराच्या झाडांतील कापूर काढतां येत नाहीं.

राजपुरीचा संग्रामपाल सेवेंत चुकला. राजानें त्याच्या पृथ्वीगिरि नांवाच्या किल्ल्याला वेढा दिला. संग्रामपालानें लोभी दण्डनायकाला ( सुजाला ) द्रव्यानें वश केलें. त्यानें सैनिकांकडून प्रायोपवेशन (भत्ता) मागविलें. सैनिकांनीं प्रायोपवेशन आरंभिलें. राजाला परतावें लागलें. दण्डनायकाचा द्रोह कळतांच राजानें त्याला प्रतिपक्षाच्या अनुरोधानें ( कामचालविण्याच्या कायद्याप्रमाणें ) शिक्षा केली. रागानें नव्हे

लोहरचे लवन्य दुर्गापात नांवाच्या किल्ल्याच्या आधारें राजाच्या खेड्यांवर आक्रमण करीत. म्हणून त्या किल्ल्याला वेढा देवून राजा एक प्रयाण मागें राहिला. लवण्य वरून गण्डीशिला लोटीत राजाचे लोक मोर्चा वरून अति दुःसह संग्राम करीत. पण हिम वृष्टि झाली. राजाला परतावें लागलें. परत येतांना राजा या सैन्याचें रक्षण उच्चल व सुस्सल या दोन वीरांनीं केलें. हे लोहर वंशी या मल्लाचे पुत्र होते. एकाला राज्यप्राप्ति होईल असें एका दैवविदानें वर्तविलें होतें. म्हणून हे या स्वारींत होते. त्यांची ख्याति झाली.

मदन कम्पनाधीश म्हणाला "राजाचा पराभव झाला. बरें झालें. राणीच्या आज्ञापत्राचें उल्लंघन करण्याचा त्यावर आरोप ठेवून राजानें त्याला सपुत्र मारविलें.

उच्चल व सुस्सल राजाला टाळून दूर रहात. म्हणून राजा जवळ असलेल्या प्रजेचाच छळ करूं लागला नीच मनुष्य अल्प अपराध करणाऱ्या जवळच्या माणसाला मारतो. पण दूरच्या मोठ्या अपराध करणाऱ्या शत्रूला कांहीं करीत नाहीं.

कुत्रा जवळ येऊन पडलेल्या दगडाला रोषानें चावतो. दगड मारणाऱ्या पण दूर असलेल्या माणसाला कांहीं करीत नाहीं.

टीप :— कुत्र्याचा दृष्टान्त फार समर्पक व सर्वांना समजण्यासारखा व अनुभवानें पटण्यासारखा आहे.

राजदण्डाचा त्रास प्रजेला क्षतांवर क्षारांप्रमाणें होऊं लागला. राज्यांत अनर्थ परंपरा उठली. तस्कर दिवसा नृपगृहांतून कांचनस्थाली नेत. मरकी उद्‌भवली. पूर येऊन दुर्भिक्ष झालें. खारी धान्याला पांचशें दिनार पडूं लागले. एक दिनाराला मृद्विक (द्राक्षामय दोन पळें येई– मीठ, मिरी, हिंग इत्यादिकांचें नांव दुर्लभ झालें' कोंथरीच्या एका पल्ल्याची विक्री, सहाहजारांनीं होऊं लागली. राजानें द्रुमच्छेद चालविला. फुलें व फळें यांनीं भरलेले वृक्ष राजानें गुहस्थांप्रमाणें पाडले.

## डामरांच्या नाशाची क्रूर पद्धति.

डामरांना मारण्याकरतां राजानें मण्डलेश्वराला आनंदाला दिली. डामर म्लेच्छ भूमींत गेले. गोमांस खाऊं लागले. कांहीं घट्ट व अरघट्ट यांवर काम करूं लागले. मंण्डलेश्वरानें लव. न्यांच्या अखंण्ड मुण्डमाळा पाठविल्या. या ठरविल्या लवण्याच्या करोट्यांनी तोरणें बांधलीं. राजद्वारीं कंकणवल्लादी बांधलेलीं असत. तीं जो कोणी लवन्यांचीं मुंडकी आणून देईल तो नेत असे. या प्रमाणें मडव राज्यांतील डामर नष्ट करून राजा क्रम राज्याकडे वळला.

मल्ल राजाचा धाकटा सुरूप मुलगा प्रतिवेदमकाच्या (शेजाऱ्याच्या मर्कटासारख्या कुरूप) लक्ष्मीधराच्या गेहिनीला आल्हादकारक झाला. लक्ष्मीधरानें विचारलें "महाराज ऐवढी, अगण्य हत्या करून या दण्डाई लक्षणांच्या सुस्सल व उच्चल यांना कां मारीत नाहीं ?" त्यांना मारण्याचा निश्चय हर्षानें केला. उच्चल राजपुरीला गेला. व सुस्सल कलंजरचा राजा जो कल्ह त्याकडे गेला. राजपुरीच्या सग्रामपालानें उच्चलाच्या डोक्यांवर अविनाथ कीर्ति कापुराचें चूर्ण अयमदानाकरतां ठेवलें. या घटनेची भीति वाटून हर्षानें एक प्रमुख ठक्कूर ज्याला हर्षानें द्रव्य दिलें होतें त्या संग्रामपालाला विनविलें तो संग्रामपालाला एकान्तात गाठून म्हणाला "हर्षाचा प्रसाद मिळवावयाचा सोडून बोकडाच्या गळ्यांत मिठ्या मारतोस हें काय ? हर्षापुढें त्या भिकारड्याचें काय चालेल ? राजगिरीच्या दुर्गांत त्याला धरून ठेव. म्हणजे हर्षाला त्याचें भय राहील व तो तुझ्याप्रमाणें वागेल. संग्रामपाल म्हणाला "तुझ्याकडे मी उच्चलाला पाठवितो पुढचें काम तूच कर.

उच्चलाला कराचें वृत्त प्रथम अपशकुनानें व नंतर आप्तांनी कळविलें. तो कट उच्चलावर हल्ला करण्याचा होता. उच्चलानेंहि आपले लोक जमविलें व उलट हल्ला करण्याचें बेतानें निघाला. झगड्याला भिऊन संग्रामपालानें उच्चलाला दरबारांत बोलाविलें. उच्चलाचे भृत्य नको म्हणत असतां तो निघाला. दोघांची भेट झाली. उच्चल फार क्रुद्ध झाला होता. त्याची समजूत घालीत असतां वादविवादांत वहुराज व संग्रामपाल यांनी विचारलें "तुम्हीं काश्मीर राजवंशी आहांत काय ? आणि म्हणाले काश्मीरचें राज्य हर्षाकडे क्रमानें आलें. त्याना क्रोधानें व निष्ठुरपणें उच्चलानें उत्तर दिलें. "पूर्वी दार्वाभिसार प्रदेशांत भारद्वाज गोत्री नर हा राजा झाला. त्याचा पुत्र फुल्ल, त्याचा पुत्र सातवाहन, त्याचा पुत्र चंद्र, त्याचा पुत्र चंदुराज, असे राजे झाले. त्याचे पुत्र गोपाल व सिंहराज असे होते. सिंहराजाला एक कन्या दिद्दा व अनेक पुत्र होते. दिद्दा क्षेमगुप्ताला तिच्या पित्यानें दिली. ती साविरा झाली. (निपुत्रिकपणें मृत झाली.) तिनें आपल्या भावाच्या (उदय राजाच्या पुत्राला संग्रामाला) राज्य दिलें. त्याच्या वंशांतला जसा हर्ष तसे आम्हीं दिद्दाराणीचा दुसरा भाऊ जो कांतिलाल त्याच्या वंशातले आहोत. हें झालें तुमच्या पहिल्या प्रश्नाचें उत्तर ! तुम्ही असा सिद्धान्त करतां कीं हें काश्मीरचें–पृथ्वीचें–राज्य क्रमभोज्य आहे. त्यावर मी म्हणतों कीं ही पृथ्वी वीरभोज्य आहे. स्वतांच्या बाहुद्वयाशिवाय वीराला दुसरा सहाय कोण होतो ? अनुकम्प्य अशा तुम्हांसारख्या लोकांपुढें हस्त डोकयाला लावून मी काश्मीर मंडळींतील भूपांत कुलपांसुल झालों न हीं हें नशीब ! माझी शक्ति काय आहे ती पहा !"

टीपः— हें भाषण बाहुबली राजाला शोभेल असें आहे.

उच्चल सैन्य घेऊन निघाला. मारलेला ससा हातांत घेऊन कोणी एकजण पुढें आला. तो उच्चलाला शुभशकून वाटला. तो काश्मीराकडे वळला. आपल्याला राज्यश्री मिळाली असें त्याला वाटले, कपिलाच्या सैन्याला पलायनांत शिष्य केलें. हा जसा कांहीं आकाशांतून खालीं पडला, अथवा भूविवरांतून वर आला. असें हर्षाला वाटलें. राजाकडील एक सुलक्षणी घोडी उच्चलाकडे आली. राजलक्ष्मी समजून त्यानें तिला पकडली.

हिम सरल्यावर जसे षट्‌पद भूविवरांतून निघतात, तसे असंतुष्ट डामरांचे ओघ सहस्रांनीं निघाले. त्यांची उठावणी उच्चलाच्या (मामानें) आनंदानें केली. हर्षानें धाडलेल्या मंडलेश्वराला सकवच व शस्त्र उच्चलानें पकडलें. हें कसें काय झालें तें आम्हांला कळलें नाहीं ! पण त्या स्वामिभक्तानें हर्षाचें हितच पाहिलें. मानी माणसाची स्वामिभक्ति शेवटपर्यंत विपर्यस्त होत नाहीं. त्यानें उच्चलाला अशी प्रेरणा केली कीं आता पुरप्रवेश करावा, विश्वास्य क्षण असा दुसरा नाहीं; असे

चित्त जसा देह जर साहसक्षम असेल तर आत्मनिरपेक्ष माणसाचें कोणतें मनीषित साधणार नाहीं ?

उच्चल साहसपुराला पोचला. पुढें मंडळेश्वरानें हर्षाला इकडे निरोप पाठविला कीं, तुझ्यापुढें मी कोल्ह्याची शिकार ओढवून आणली आहे. त्वरित येऊन उच्चलाला मारावें. तेव्हां समस्त सामंत व सैन्य जमवून आज मृत्यू येवो किंवा जय होवो असा निश्चय करून नृप बाहेर पडला.

## माफीची घोषणा

या प्राणसंशयाच्या प्रसंगीं राजानें ढोलकें वाजवून प्रशमाची ( सर्वांना सरसकट माफी देण्याची ) घोषणा केली. सर्व पौर त्याच्या मागून गेले. मंडळाश्वरानें फिरून उच्चलाच्या उन्मद सैन्याचा नाश करून उच्चलाला तारमूलकडे पळविलें.

## एक दैविक चमत्कार

वाटेंत राजानें परिहास केशवाची मूर्ति फोडली. दरिद्री उच्चलानें फोडली नाहीं. तेव्हांपासून पुढें हर्षाचा शिरच्छेद होईतों कपोताच्या पंखाप्रमाणें धूसर अशा धूळीनें सर्व आकाश व्याप्त होतें. पूर्वी या देशांत सर्व अंधार होता. पण परिहास केशवाचीं मूर्ती स्थापन झाल्या दिवसापासून, तिच्या रुपेरी तेजानें दिवस प्रकाशित असें म्हणत.

शूरपूरच्या वाटेनें येऊन क्षिप्रकारी सुस्सलानें सरहद्दीवर येऊन माणिक्य सेनापतीला जिंकलें. उच्चलाच्या सैन्यांत पायदळ होतें. राजाच्या सैन्यांत घोडदळ होतें. त्रासातुर होऊन कोणीहि कम्पनाधीश होईना. तेव्हां राजा म्हणाला, " विश्वास वगळून माझा असा कोण आहे ?" तेव्हां राजाच्या हातून अधिकाराची माळा चंद्रराजानें घेतली. त्यानें आनंदाला, उच्चलाच्या मामाला ठार केला. व त्याचें शरीर राजाकडे पाठविलें. तें पाहून राजाला वाटलें विधि अनुकूल आहे. सिंह जातां जातां आपल्या मागें वळून पहाण्यानें प्रत्यागमाचा ( हा फिरून मागें वळेल असा ) भ्रम उत्पन्न करतो. तसा विधी उलट जात असतांहि, मध्येंच सन्मुख दृष्टीनें अनुकूलता दाखवितो.

## जसा तुझा तसा तो माझा

राजाचा एक मण्डलेश्वर मारला गेला. सिद्धिदैवायत्त असें जाणून या मण्डलेश्वरासारख्याची, स्तुति करणें हीच वस्तुशता ( गुणग्राहकता ) होय. स्वामिकार्यांत स्तुत्य झालेल्याला जन्म दिला असा गौरव स्त्रियांत होण्याकरतां त्याच्या मातेनें अग्निप्रवेश केला. जेथें तेथें साहसाचे कामीं आपल्या पुत्राला पाठविलेलें पाहून या स्त्रीनें स्नेहानें मोहित होऊन, एकदां राजाला म्हटलें होतें, महाराज, ज्या स्त्रीला दुसरी संतति नाहीं. अशा माझ्या एकुलत्या एक मुलाची ज्या कामांत प्राणसंदेह त्या कामांत करीत जाऊं नका.' राजा म्हणाला "मातोश्री, 'जसा तुला तो एकच आधार आहे. तसा तो माझाहि आहे—" आपल्या पुत्राच्या स्वामिभक्तीची स्तुति झालेली पाहून, त्या मानवती स्त्रीला वाटलें. आपल्या मुलाला फार प्रतिष्ठा प्राप्त झाली.

उच्चल तसाच हिरण्यपुराला गेला तेथें ब्राह्मणांनीं त्याला राज्याभिषेक केला.

## उच्चलाला राज्यभिषेक केल्यावर हर्षानें पुढें काय करावें याविषयीं मंत्र्यांचा उपदेश.

राजा विवश झाला. मंत्र्यांनीं सांगितलें मूळगांवला लोहर पर्वताकडे जावें. त्यानें पुन्हां विचारलें, "तुम्हांला दुसरा कांहीं उपदेश करावयाचा आहे काय ?" ते म्हणाले " रणांत राजाला मरण म्हणजे आशीर्वाद आहे. राजे व्यसनांत सांपडले म्हणजे त्यांचे खरे शत्रु गोत्रज नसतात पण त्याचा अनुद्योग लज्जा व भय, आणि मंत्र्यांचा भेद हेच खरे शत्रु असतात. समस्त कृत्यांचा भार मंत्र्यांवर सोपवणाऱ्या आळशी राजाचा घात परोपरीनें होतो. अमात्यांच्या वैमत्यानें राजकारण कितीहि तनु असलें तरी, त्याचा शेवट चांगला होत नाहीं. दोहों पुरुषांकडून ओढल्या जाणाऱ्या दोरीचा रस्ता, जसा तसा समग्रशक्ती राजा आपल्या समग्र शक्ती एका माणसावर अवलंबून ठेवील तर त्याचें राज्य, त्याचा सर्वांगहीन वैरी हरून नेतो, जेथें मेदिनी आक्रान्त करणारा शत्रु दिसेल, जेथें नरांप्रमाणें धड नाचतात, जेथें धनुष्याच्या दोऱ्या भोंपळा असलेल्या वीण्याच्या तारांप्रमाणें किण किण शब्द करतात, जेथें कोल्हिणीच्या मुखांतून ज्वालांचे दीपाकुर तेवत असतात, तेथें वीरांच्या शय्येवर पडून ज्यांची वांछा सफल झाली आहे असे कोणी कोणीच धन्य होतात. हें अन्त्यकृत्य उदात्त समजून द्यूतकाराप्रमाणें राज्य पणाला लावून, क्षत्रिय त्रासहीन होतात. "राजा म्हणाला दुसरा उपदेश असला तर करा." एक निश्वास टाकून मंत्री म्हणाले " उत्कर्षराजाप्रमाणें प्राण द्यावयाला स्वतां तयार असाल तर ठीक नाहीं तर दुसरेंच कांहीं करून बसाल !" राजा म्हणाला, " स्वतां मारून घ्यावयाला मी समर्थ नाहीं. आपणच मला मारून टाका." ही वैक्लव्यग्रस्ताची वाणी ऐकून मंत्री म्हणाले. " या प्रकारचें दैन्य ज्या स्वामीला प्राप्त झालें आहे, त्याचें दुःख ज्या भृत्यांना खणून टाकतां येत नाहीं त्या भृत्यांना स्वामीनें खरोखर पशू म्हणून, पाळलें म्हणावयाचे "

भृत्यांच्या भय, शोक, दैन्य इ. विक्रिया जे भृत्य-नटांप्रमाणें स्वस्थचित्त पहातात, त्यांच्या योगानें, ही भू सतीर्थ असून, अपावनी झाली आहे. क्षुधाक्रान्त मुलगा, परगृहास पाठवावी लागलेली वधू, दुःखमग्न मित्र, अधनां-

मांत्रे विवश होऊन हंबारवाचा उद्गार काढणारी दुभाळ गाय, निष्पथ्य ( पथ्याभावीं ) आखन्नमरण पितरें, व शत्रू-निर्जित स्वामी, अशा गोष्टी ज्यांनीं पाहिल्या, त्या मृत्यांना नरकांत अप्रिय असें कांहीं भोक्तव्य राहिलें नाहीं.

शुल्कामरतनयो, वधूः परगृहे प्रेष्या ऽ वसन्नः सुहृत् ।
दुग्धा गौरशनाद्यमवविवशा, हम्भारवोद्गार्द्र हिणी ॥
निष्पथ्यौ पितरावदूरमरणौ; स्वामी द्विषन्निर्जितो ।
दृष्टो येन परं न तस्य निरये भोक्तव्यमस्त्यप्रियम् ॥१४१४॥*

भूतबाधेनें जसा कांहीं विमोहित होऊन राजा म्हणाला "यम व कुबेर राजाच्या ओष्ठांग्रीं असतात, अशी जी ख्याति ( म्हण ) या कलियुगांत आहे, ती मला एकट्यालाच शरण येऊन बसली आहे. अल्प सत्व, स्वल्पोदय लोक मला हंसतील. ज्याचा मेंदू (चेतस्) बोटांच्या अग्रांवर सांटवून ठेवतां येईल, तो उच्चल आतां मला काळे दांत दाखवून माझ्या सत्कृत्याची विडंबना करील. शास्त्र व संदर्भ जाणत असूनहि, मी जनांच्या उपजीवनार्थ जें श्रीगर्भत्व दाखवीत असें. तेंच माझें जाडय सिद्ध करावयाला कारण झालें. मुन्निस्वामी नांवाचा अमात्य म्हणाला, "प्रतिष्ठेचें रक्षण केलें पाहिजे. किर्तिरूप शरीर कायम राहणें तेंच परमेष्णूचें पूर्णत्व असतें. म्हणून महाराज दण्डकालाक ( अतिसार ) नांवाचा आशुकारी रोग जडला आहे. असा बाहणा करा, पुढली आपत्ति टळण्याचा मार्ग उद्यां सांगेन."

तसा बाहणा करून राजा बडबडूं लागला. स्वेदन, संवादन व वमन इत्यादि उपचारांनीं राजांची व्याधि शिथिल झाली नाहीं. लोक म्हणाले तो मरणार. अमात्यानें कृतज्ञता निवेदक, अग्निप्रवेश केला. † शेष कर्तव्य काय राहिलें तें प्रत्यक्ष न सांगतां युक्तीनें उक्त अशा निष्ठुर आचारानें सुचवल्यापासून राजा अमात्यावर संतुष्ट राहिला

राजवंशाच्या रक्षणार्थ राजपुत्र जो भोज, त्याला लोहर कोटाला पाठवावा असा सल्ला तज्ज्ञांनीं राजाला दिला. प्रस्थान मंगलविधि करून निघालेल्या पुत्राला दंडनायकाच्या सांगण्यावरून, राजानें परतवलें. जो नृप भाग्यकालीं धी व धैर्य-यांनीं शत्रूचें आक्रमण करतो, तो नृप अभाग्य येतां जडमूढ होतो. तेव्हां त्यानें पृथ्वीवर पदक्रम कसा केला हा विचार लोकांच्या मनांत येतो.

* टीप :—या शेवटल्या वाक्यखंडांत उपमादीप अलंकार साधला आहे. वरील हरयांत दुःखकारक ', हा सामान्य धर्म सर्वांवर मध्यवर्ती दीपाप्रमाणें उजेड पाडीत आहे. हा कवीचा आवडता अलंकार आहे.

† हा आत्मयज्ञ जपानीं लोकांत आहे. त्याला हरिकारी म्हणतात.

तरी सैन्य नगरांत असून प्रवासवतन मागूं लागलें. सैनिक जो शिक्षाध्यायी (म्होरक्या पुढें करीत तो सर्व सैन्याधिकारी लोभी व अभिमानशून्य आहेत, अशी घोषणा करी योधांची समरश्रद्धा नष्ट करी रसद वाटण्याच्या वेळीं प्रक्रियेची विशेष प्रकारची ) मागणी करी व कलह मावती.

सुस्सल व उच्चल लढत होते; त्यांचा पिता मल्ल मात्र व्रती होता. तो दांभिक आहे या समजुतीनें हर्षानें त्याला मारविलें. त्याच्या पत्नीनें, (उच्चल, सुस्सल यांच्या मातेनें) आपणांस जळून घेतलें. अग्नींत उडी घेतांना ती म्हणाली. "हे माझ्या पुत्रांनो! तुम्ही जामदग्नी प्रमाणें पितृघातकांच्या वंशाचा थोड्याच दिवसांनीं नाश कराल!"

सुस्सल राजवाड्यापर्यंत लढत आला. त्याला भोज अपराजित पुत्र, या राजपुत्रानें पळविलें. तो उच्चल उत्तर दिशेकडून आला मूळ तोंडा तसा क्षेमेंनें निघाला. नगराधिकारी नागानें उच्चलाला वंदन केलें. राण्या शतद्वार नांवाच्या राजवाड्याच्या चतुष्किकेवर ( चार खांबांच्या गच्चीवर ) हातांत वन्हि घेऊन मरणाच्या इच्छेनें उभ्या राहिल्या. हर्षाचा शरविद्ध हत्ती फूत्कार करीत राजाच्या चमूचें पायांखालीं मर्दन करीत विरुद्ध झालेल्या विधीप्रमाणें उलट फिरला. राजा विमुख होऊन स्वारांसह शतद्वारांच्या अंगणांत शिरला—मुख वर करून तो वन्हिदान करणाऱ्या राण्यांचें हस्तानें निवारण करीत होता. भोजानें पलायन केलें; मग वास्तव्य (रहिवासी) जन व डामर यांनीं लुटालूट करून, दारिद्य घालवलें. कांहीं पामरांनीं सोनेरी चित्रें दलही रेशमी वस्त्रें जाळून त्यांची राख आदरानें गोळा केली; तांदूळ समजून अविद्ध मोत्यांच्या ढिगाचें चूर्ण केलें. अशी विडंबना होऊन या देशांतील लक्ष्मी जी या देशाला सोडून गेली ती पुन्हा प्राप्त झाली नाहीं.

## पराभूत हर्षाचें पलायन व करुणास्पद अन्त

उच्चलानें राजवाडा जाळला राजाच्या मनांतून लढून परानगाचें होणें दंडनायक निषेध करी. लोहराकडे जा असें लेठ्ठक म्हणे. उत्तरपक्ष प्रयागाला आवडला. पुत्राची वार्ता काढण्यास राजा चम्पकाला म्हणाला "भोजदेवाच्या मार्गानें जा. पुत्राशिवाय मला सर्व दिशा, असूनहि दिसत नाहीं. चम्पक राजपुत्रानुसारी झाला. राजाला पुष्कळांनीं मंत्र सांगितले

भाग्यक्षयस्यैतदेवहि लक्षणम् यत् प्राकृतोऽपि सन्
अपृष्टः कथयेत् धाष्टर्यात्मंत्रं स्वहृदयोचितम् ॥१६३॥

( भावार्थ )—एखादा प्राकृत मनुष्य सुद्धां विचारलें नसतांहि धाष्ट्यानें आपल्या मनाला वाटेल तसा सल्ला देऊं लागतात, हेंच भाग्यक्षयाचें लक्षण समजावें. राजा भांबावून गेला, एकादि मंत्रावर आरूढ न होता, सर्वांना पाधिरधी झाला.

सर्वो यथा निखिल रन्ध्रमुखेन वंशः ।
संपूरितो न खलु शद्बमपिप्रसूते ॥
तैस्तैस्तथा बहुपथप्रत्ययेन मंत्रः ।
संकल्पितः किल न निश्चयमभ्युपैति ॥ १६१ ॥

अर्थः—कळकीचें वाद्य जर त्याच्या सर्व मुखांनीं भरलें तर तें एक शद्बहि प्रसवत नाहीं. त्याप्रमाणें नाना मतांच्या गलबल्यानें संकल्पित असा मंत्र निश्चयकारक होत नाहीं. राजानें रत्नग्रैवेय (रत्नांची गळ्यांतील माळ) मुलाला पाथेयाकरतां दिली होती. म्हणून तो गतश्री दिसूं लागला. तो अश्वपटांतून मंत्र्यांच्या घरोघर फिरला. राजाची व्यर्थ संभावनाभूमि होऊन बसलेले, प्रायोपवेशन कुशल ब्रह्मणबन्धू (नांवाचे ब्राह्मण) उपयोगी पडले नाहींत. जो कोणी मोठा म्हणून होता, त्याच्याकडे मोठ्या आस्थेनें फिरत असतां राजा कपिलनामक मंत्र्याकडे गेला. मंत्री घरीं नव्हता. त्याचे मुळगे सावकाश पुढें जसे ऋणको तसे या राजापुढें लपून राहिले. राजाची झालेली निंदा स्वतांच ऐकावी लागली. आपण छत्तीस कुळांतील आहों। अशी ज्यांनीं संभूति (प्रौढी) मिळविली, ते अनंतपालादी राजकुमार आपले घोडे पदोपदीं स्थगित करून वाढत्या अंधःकारांत राजाला सोडून गेले येथें श्वशुराचें स्थान आहे, येथें रात्रभर वसति करतां येईल का, असें विचारतां तें स्थळ पाहून येतो व सांगतों असें निमित्त करून दण्डनायक व अनुग निघून गेले. दण्डनायक जावयास निघाला तेव्हां प्रयागानें त्याचें अंगद (बाहुभूषण) पाथेयार्थ मागितलें. त्यानें सांतू दिलें. तेव्हां त्या राजाची संपत्ति म्हणजे एक अंशुक उरलें. व दुसरें अवशेष म्हणजे त्याचा जीव उरला. व अनुचर म्हणजे एक प्रयाग व दुसरा मुक्त नांवाचा एक सूद असे उरले.

टीप—अॅथेन्सचा नागरिक टायमन हा फार धनाढ्य होता. त्यानें आपली कांहीं संपत्ति कवीसारख्या गुणी जनांस उत्तेजनार्थ, वांटली, कांहीं मित्रकार्यांत खर्च केली. त्याच्यापाशीं कांहीं राहिलें नाहीं. त्यानें आपले दूत ज्यांच्यावर त्यानें उपकार केले होते त्यांकडे पैशांची मागणी करण्याकरतां पाठविले. त्यांना सर्व लोकांनीं रागानें परत पाठविलें. एकानें दूतास विचारलें "कायरे! भेट आणलीस काय?" दूत म्हणाला "भेट कसची! मी पैसे मागावयास आलों आहे." आणखी एक मित्र म्हणाला "मी घरीं नाहीं म्हणून सांग." दुसरा म्हणाला "अरेरे! कालच एकाला दिले. नाहींतर दिले असते. आतां नाहींत. वाईट वाटतें." तिसरा म्हणाला, "अरे तूं वरच्या मित्रांकडे जाऊन बघ" दूत म्हणाला "त्यांकडे गेलों होतों. ते नाहीं म्हणाले. मित्र म्हणाला "असें होय! तूं माझ्याकडे आधीं न येतां दुसऱ्याकडे गेलास होय! यांत माझा मोठा अपमान झाला. जा!! यजमानाला सांग माफ देत नाहीं" या गोष्टींत व वरील हर्षाच्या गोष्टींत फार साम्य आहे. अनुभवाला पटतें. म्हणून आनंददायी आहे.

तोंच द्रोहाच्या स्पर्शानें दूषित झालेल्या या भूमीचें क्षालन करण्याकरतां मेघांचा गण वारिमोचन करूं लागला, वृष्टिपात, भूमि निर्जन, कल्लोळीरात्र, दुष्ट सहायांशी गांठ, वैरिभीति इत्यादी कायकाय प्रकार, त्याला दुःखकारक झाले नाहींत?

दुष्कर्म करणाऱ्यांची नांवें स्मर्तव्य नसूनहि, आतां वृत्तनुरोधानें घ्यावी लागत आहेत. ही धिःकारास्पद गोष्ट आहे. सोमानंद नांवाचा एक सिद्ध पुरुष आपल्या देवतांची पूजा करून स्मशानांत राहत होता. त्याच्या कुंपण घातलेल्या अंगणांत उच्च तरूंनीं छिन्न अशा वाटिकेंत गुण नांवाच्या एका क्षुद्र तपस्वीची कुटी होती. भिक्षा नांवाची एक वारस्त्री होती, ती विरहभुजंगी या नांवानें प्रसिद्ध होती. तिच्यासह हा कुट्टनाला उचित अशा चेष्टा करीत असे. त्याच्या दुसऱ्या एका कुटींत राजानें एक रात्र काढावी असें मुक्तानें ठरवलें होतें. भिजलेलीं वस्त्रें राजाच्या अंगाला डकलीं होतीं. मुक्ताचें अवलंबन राजानें, व राजाचें प्रयागानें केलें होतें. हे तिघे विद्युत्प्रवाहानें भूमि पहात अडखळत अडखळत कुटीजवळ आले. प्राकारावर चढून मुक्तानें अर्गल काढला. कुटीच्या अंगणांत प्रवेश करतांच दगड लागून राजाला क्षत झालें. त्यांतून रक्त गळूं लागलें या अनिमित्तानें (अशुभ निमित्तानें) राजाला वाटलें मृत्यु जवळ आला. अंगणांत तापस नव्हता. कुटीच्या द्वाराला अर्गल लावलेला होता. म्हणून राजानें सारी रात्र अंगणांत काढली. दासाच्या कांबळ्यानें आपली तनु झांकून ती उरलेली पावसाळी रात्र राजानें अंगणांत काढली. त्याला झोंप लागेना. मी कोण? मला कोणी अभिभूत केले आहे? मी कोठें आहे? आतां काय करावें? असे विचार त्याच्या मनांत येऊन त्याला कांपरें भरलें. राज्य गेलें! प्रिया जळून मेली! पुत्र भ्रष्ट झाला! बांधव नाहींत! मी एकटा उरलों! पाथेय जवळ नाहीं! भिक्षेवर निर्वाह करणाऱ्याच्या अंगणांत लोळत पडलों आहे! या एक एक दुःखाचा विचार करीत असतां, दुस्थितीच्या इतक्या टोकाला पोंचलेला, राजाला दुसरा कोणी अभागी कल्पित कथांत सुद्धां आढळला नाहीं!

भोज राजपुत्र हस्तीकर्णाला पोंचला, तेथें एका शून्य मंदिरांत बसला असतां, एका द्रोह्यानें त्यावर प्रहार केला. क्षत्रधर्मापासून च्युत न झालेल्या राजपुत्रानें त्याचा संहार केला व रक्तानें लिप्तांग होऊन वीरशय्येला भूषवितां झाला.

उच्चल रणश्रांत होऊन सूर्यमतीच्या मटांत सुस्सलाला भेटला. भोज मृत झाला हें वृत्त त्याला कळलें. हर्षच उरला.

त्याला वाटलें कीं आपल्या मनातला शूळ उपटून निघाला. आतां फक्त टोंकच उरलें.

उजाडल्यावर मुक्तानें तापसाला शोधून आणलें. त्यानें भूकुटीचा अडसर काढला. कुटी दंशमशकांनीं आकीर्ण होती. आत त्यानें गवताची हांतरी पसरली होती. मुक्तानें अम्बुसेक केला. राजा आंत प्रविष्ट झाला. ज्याची गिरा ऐकून इतर राजांना बहुमान वाटे त्या राजाला भीक मागणाऱ्याशीं चाटु भाषण करावें लागलें. तापसाचें भाषण भिकाऱ्याला उचित असें ग्राम्य अनुदात्त, व लाज वाटावयाला लावणारें असें होतें.

आपलें अंतर्वस्त्र देऊन त्या भिक्षाकाला, प्रयागानें भोजन सामग्री आणावयास पाठविलें. मध्यान्ह झाल्यावर त्या क्षुद्र तापसानें बरोबरीच्या तपस्विनीकडून, स्कंधावर ठेवलेला भोजन सामग्रीचा करंडा आणविला. पूर्वी आपण भृत्य व भिक्षाक या दोघानांच माहित होतों. आतां या स्त्रीला माहित झालों हें जाणून राजा जीविताविषयीं निराश झाला. प्रयागाखातर राजानें नुसता अन्नाला स्पर्श केला. पण त्याचें सेवन केलें नाहीं प्रयागानें काय वार्ता आहे असें विचारलें तेव्हां त्या तापसीनें सांगितलें. "भोजाचा वध झाला एका पडक्या मंदिरांत लपून असतां, अन्न आणावयास पाठविलेल्या त्याच्या नागेश्वर नांवाच्या साथिदाराकडून मारला गेला. भोज क्षत्रियाप्रमाणें लढून मेला." हें मिथ्या आहे असें प्रयागानें म्हटलें. पण ती वार्ता खोटी नाहीं असें अपशकुनांनीं राजास वाटलें. आपत्तींत मग्न झालेल्या राजाला इतक्या दुःखानें गांठलें कीं, अप्रिय बोलणाऱ्या शत्रूच्या वाचेनेंहि, त्याचा उच्चार करतां आला नसता राजनीति म्हणून आपण जें त्या पुत्रावर नियंत्रण ठेवलें, तें त्या मुलाला दुःखदायी झालें. न तो समरांत पडला तरी, वात्सल्यानें, अंकावर पडलेल्या मुलाचा घात आपण ज्ञानपणीच केला असें राजाला वाटलें. यौवनानें रुंद झालेल्या त्याच्या वक्षस्थलावर, हार शोभत आहे. व आपण त्याला आशिर्वाद देत आहोत, असें संकल्पानें राजाला वाटलें, व तो विव्हल झाला. रक्तगोप बाळ मृत झाला. आणि मी वृद्ध असून जीविताचें रक्षण करीत आहें; या विचारानें राजा लज्जित झाला.

अशा रीतीनें पुत्रशोकाची अर्वाच्यव्यथा धारण करीत असतां, त्या तापसाच्या कुटींत दुसरी रात्र घालविण्याचें ठरविलें. लम्बायमान इन्दु रात्रीचें मुख होतें. दवांच्या राजानें सान्द्र बिन्दूनीं ती अश्रू गाळीत होती. चक्रवाकाच्या आक्रन्दानें ती शोक करीत होती


प्रातःकाळीं प्रभूला क्षुत्पिपासेनें पीडित पाहून प्रयागानें तापसाला भोजनव्य आणण्याविषयीं प्रार्थना केली. क्षणभरानें तापसानें त्याच्या पुढें, सडलेल्या अन्नानें भरलेले दोन द्रोण आणून ठेवले. कोणा एका गृहस्थाकडे यज्ञोत्सव होता त्याकडून मी हे आणले असें तापस म्हणाला. प्रयाग दीर्घ निश्वास टाकून म्हणाला, "महाराज, स्वामीचा वियोग झाला असतांहि लोकांची ही सुस्थता पहा." राजा हंसून म्हणाला "काय मूढासारखें बोलतोस! जो गेला, तो गेला. एक क्षत झाला म्हणून दुसरा क्षण होत नाहीं. सर्वजण आपल्या सुखाची अपेक्षा करतात. कोणी कोणाचा शोक करीत बसत नाहीं. सर्व लोकांचा एकच चक्षु जो सूर्य तो परलोकाला (अस्ताला) गेला म्हणजे लोक आपआपल्या घरीं निजावयास जातात. माझा विरह झाला, हें विश्व कसें चालेल, याचा विचार दुसऱ्या कोणाला कसा करतां येईल! माझ्या जीविताचें जीवित असा माझा पुत्र मेल्याचें ऐकून आज स्वस्थपणें राहून मला दुसऱ्याची निंदा कशी करतां येईल!" ही उक्ति एक तर गिरणींतील सौंदर्यस्थळ आहे.

प्रयागानें तापसाला तीं भांडीं टाकून दुसरें जेवण आणावयाची प्रेरणा केली. तेव्हां कालच्या पैशांतील पुरेसे शिल्लक नाहीं. तथापि प्रयत्न करतों असें म्हणून तो तापस बाहेर गेला. गोप्य असें रहस्य अल्प हृदय माणसाच्या स्वाधीन केलें तर अविनाश्य पाप प्रमाणें तें त्या मनुष्याला पचवायला जड जातें ही कथा मनोरथ नांवाच्या विप्राला तपस्व्यानें सांगितली. तेव्हां उच्चलाचा दाणद त्याला दाखवून दिला. तर आपणाला ऐश्वर्य प्राप्त होईल असें म्हणूनत्यानें तापसाला द्रोही बनविलें. हा तापस नित्य मनुष्याच्या पोटचा असावा. कारण सदसत्कर्माचें योग्य ज्ञान, बीजच असतें. त्यानें ही वार्ता इल्ला राजाला कळविली. त्यानें उच्चलाला कळवली. त्याला वाटलें ही कोणी खोटीच कण्डी पिकवली असेल. कारण हा काल बहुश्रोत्र मुकुल (पुष्कळ उठवलेल्या कड्यांनीं आकुल) झाला होता. या कामावर उच्चलानें इल्ला राजालाच नेमलें.

जसें अण्डज पिलूं घरट्यांतून बघतें, तसें तापस आतां अन्न आणील आतां आणील अशी वाट बघत राजानें खिडकींतून वारंवार पाहिलें. तेव्हां त्याला ती कुटी सैनिकांनीं भरलेली दिसली अंगणाच्या द्वाराचा अडसर काढल्याचा ध्वनि ऐकूं आला. द्रोह झाल्याचें राजाला कळून आलें. राजानें भय सोडून द्वार उघडलें. व क्षुरिका हातांत घेतली. एक साहसी राजावर धावला. राजा व्यायामकुशल होता त्यानें त्या पुरुषाला खालीं पाडलें. हा वराक आतां पडला याला मारून मला काय मोठेपणा असा विचार राजानें मनांत आणून त्याला मारलें नाहीं. दुसरा एक सैनिक कुटीच्या छरातून आंत उतरतांना पडला. त्याच्यावर

वीरासन निष्ठुर असा राजा बसला. मांड्यांत कोंडलेल्या उंदराभोंवतीं जशीं मांजरें जमतात तसे शस्त्रधारी डामर कुटींत कोंडलेल्या राजाभोंवतीं जमले. एकानें प्रयागाच्या खांद्यावर व राजाच्या डोक्यावर त्याचे प्रहार चुकवून वार केले. महेश्वर असे दोन वर्ण दोन वेळां म्हणून राजा गतजीव झाला. छिन्नमूल वृक्षाप्रमाणें तो भूमीवर पडला. पळून लपून जसा चोराला योग्य असा मृत्यु या चक्रवर्ती राजाला घरकुटल्यांत आला. या विभूतिमान राजाचा दोष म्हणजे न्येयबुद्धित्व होतें. मंत्र्याचे दोष क्लेशावह झाले. तो ४२ व्या वर्षी लौकिक ४१७७ इ. स. ११०० या वर्षी मारला गेला. त्याची कुण्डली स्वकुलान्तक दुर्योधनाच्या कुंडलीप्रमाणे होती.

(पण तिच्यावरून त्याच्या जन्ममरणाची तिथी जमत नाहींत असें डॉ. स्टीन यांचें म्हणणें आहे. तरी ती येथें दिली आहे.)




या राजाचा शिरच्छेद झाला तेव्हां भू सागरासह कंपित झाला. याचें शिर कापून एकानें उच्चलाकडे नेलें. त्यानें तिकडे पाहिलें नाहीं; पण त्याचें त्यानें मागाहून दहन करविलें. धिक्! धिक्! किती कष्टावह स्थिति ही! एकाद्या तस्कराच्या व नग्न अनाथाच्या शरीराच्या दहनाप्रमाणें या चक्रवर्ती राजाच्या शवाची दहनक्रिया एका गौरक नांवाच्या काष्ठागारावरील अधिकाऱ्यानें केली. याच्या अवरोध गृहांत एवढ्या स्त्रिया असून कोणी रडली नाहीं. कोणी अनुगमन केलें नाहीं. आधीं नियत असें कांहीं नाहीं तसें पुढें नाहीं. मध्यंतरीं मात्र सौस्थ्य व दौस्थ्य यांच्या अनुरोधानें कांहीं घटना प्राण्यांच्या हातून आकस्मिक रीतीनें घडून येते. एकाद्या नटाप्रमाणें नाट्य करून भवजवनिकेनें अंतर्भूत होऊन (पडद्याआड निघून) तो कोठें जातो तें आम्हांला माहित नाहीं.

टीप:- नटः संसारान्ते विशति यमधानी जवनिकां ॥ असेंच भर्तृहरि म्हणत आहे.

टीप:- हें हर्षाच्या पलायनाचें व अन्ताचें वर्णन प्रत्यक्षवत् आपल्यापुढें घडत आहे असें वाचकांस वाटूं लागतें. इतकें यथार्थ तें कवीनें केलें आहे. तें त्यांच्या पित्याच्या कडून अथवा पित्याच्या नोकराच्या प्रगायाच्या, तोंडून ऐकावयाला मिळालें असलें पाहिजे.

ज्या त्या माणसानें न विचारतां हवातसा उपदेश करीत सुटणें हें दुर्भाग्याचें लक्षण सांगून हर्षाच्या दुर्भाग्याच्या वर्णनाला कवीनें आरंभ केला आहे. मंत्री, राजाचे आश्रित ब्राह्मण राजकुमार व अनुग यांचें साहाय्य मिळेल या आशेनें राजाचें दारोदार फिरणें इत्यादी वर्णनानें सचेतन वाचकांचीच सहानुभूति हर्षाकडे कवीनें वळवली इतकेंच नाहीं तर रात्रीं चन्द्र हिमबिन्दू आकाशाला गाळावयाला लावून व चक्रवाकांना आक्रन्द करावयास लावून वाचकेतर जड सृष्टीचीहि सहानुभूति हर्षाकडे वळविली आहे. पुत्र भोज मृत झाला असें ऐकून त्याच्या यौवनानें रुंद झालेल्या वक्षावर हार रुळत आहे व आपण त्यास आशीर्वाद देत आहोंत असें राजाला स्वप्नानें वाटवून कवीनें येथें उत्कृष्ट भाविक नांवाचा अलंकार साधला आहे. सर्व लोकांचा एकच चक्षु जो रवि तो परलोकाला गेला तरी लोक घरोघर जाऊन निजतात. शोक करीत बसत नाहीत. हा राजाच्या दुःस्थितींतहि लोक मजा मारतात या गोष्टीला दिलेला दृष्टान्त वाचकाच्या मनांत फार कळवळा उत्पन्न करतात. कुटींत शत्रूंनें कोंडलेल्या राजाला मांड्यांत कोंडलेल्या उंदरावाटोळें जमलेल्या मांजरांची उपमा सहज सुंदर आहे. हर्षाच्या या अंताच्या वर्णनांत करुण रसाचा जवढा परिपाक झालेला आहे तेवढा अन्यत्र फारच थोड्या ठिकाणीं सांपडेल.

# तरंग ८ वा

## शिवप्रार्थना

ज्या पार्वतीच्या अर्धशरीरांत वास करतांना चारित्र्यचर्या जाणणाऱ्या शंकरानें तेथून प्रौढ कंचुकी वृद्धवर वृष, कुब्ज हिमकर या आप्तांचा सर्व परिकर बहिष्कृत केला ती पार्वती दुरिताचा नाश करो.

टीप:—या नांदींत चतुर उच्चलानें एकामागून एक अशा डामरादिक शत्रूंचा व बंडखोर आप्तांचा मोड केल्याचें सूचित केलें आहे.

चंपकाचा भाऊ व हर्षाचा गायक जो कनक, त्यानें काशीस जाऊन जीविताचा त्याग केला. ही (जपानी लोकांची हरिकारी आहे.) व हर्षाविषयीं कृतज्ञता दाखविली.

उच्चलाच्या मनांत सर्वदा दौस्थ्य उत्पन्न व्हायला दोन कारणें होतीं.

(१) एकीभूत डामरांचा संघ, व (२) राज्याचे दोन विभाग करण्याची इच्छा करणारा त्याचा सोदर सुस्सल.

सुस्सलाचा सन्मान करून त्याला लोहरकोटाशीं संबंध असलेल्या दुसऱ्या मण्डळावर राज्य करावयास लावून दिलें.

हर्षाचा मुलगा जो भोज त्याला, त्याचे पहिले मुलगे मृत झाल्यावर त्याला जो एक मुलगा झाला, तो वांचावा म्हणून गुरुनीं त्याचें भिक्षाचर असें अभव्य नांव ठेवलें.

हा शत्रूच्या वंशांतील तन्तु याला अप्रिय प्रकारें वागविणें उचित असें असतां दर्पानें वागणाऱ्या लोहरच्या डामराचें जनकचंद्राचें ऐकून उच्चलानें त्याला राणीच्या अंगावर रक्षणार्थ आणून ठेवलें. याला हातांत ठेऊन आपण राज्य करावें असा जनकचंद्राचा हेतु होता. तो यथेंत त्याचें इंगित जाणून उच्चलानें नीतिकौटिल्या धारण केलें.

## ( १ ) उच्चल

### उच्चल प्रथम सामादी उपायांनी अथवा अपायांनीं डामरांची वाट लावतो.

उच्चलानें जनकचंद्राला द्वारपति केलें. हेतु असा कीं त्याचा सत्कार झालेला पाहून आपला जो तुल्य त्याचा वरचढपणा सहन न होऊन अन्य डामर क्रुद्ध व्हावे. त्याप्रमाणें भीमादी डामरांचे मनांत किंचित उत्पन्न होऊन त्याचें मात्सर्य समासीला पोंचलें. भीमादेवाच्या गेहगणनाधिपतीनें (हिंशोबनिसानें) युद्धांत द्विमाद्रपदांत ( अधिक भाद्रपदांत ) कमी नाहीं अधिक नाहीं अशा तीन पक्षांनीं ( पंधरवड्यांनीं ) जनकचंद्रांचा मध्य द्विधा केला

मग उच्चलानें क्रम राज्यांतील डामरांकडून आपल्या घोड्यांचा व सैन्याचा त्याग करविला. मडव राज्यांतील विप्रियप्रिय डामरांस शूळावर चढविलें.

### अनुयुक्त भीमदेवानें उच्चलाला दिलेल्या दान शिक्षा

एकीप्रमाणें लोकवार्ता मिळविण्यास तो सकाळीं बाहेर पडून दिवसक्षय होई तो हिंडे व दुसरीप्रमाणें उत्थानशील राहून वैऱ्यांचें नांव ऐकतांच त्याचा मोड करी.

### उच्चल जनतेची प्रीति संपादन करतो

कोणी प्रायोपवेशन करून मरण कवटाळलें तर धर्माध्यक्षाकडून हा राजा त्याची नीट प्रत्यवेक्षा करी—दुर्बलांवर हा अनुग्रह करी म्हणून सर्व जनता प्रबळ झाली. व अधिकारी दुर्बल झाले. तस्करांना तो कोशाध्यक्ष करी. व चौर्याचरणापासून निवृत्त करी व त्याचें जीवित अनिंद्य करी. हा राजा सुलभदर्शन होता. त्याचे आलाप प्रिय असत. या राजाची सेवा एका क्षणांत इंद्रजालिकानीं उत्पन्न केलेल्या तरुप्रमाणें फलद्रुप होई. उच्चलाचा अवर्णनीय गुण म्हणजे, अर्थनैस्पृह्य. दण्डास योग्य पुरुषाला हा दण्ड करी व त्याच्या उपयोगानें त्याचीच शुद्धि होण्यास त्याच पुरुषाकडून सत्कर्म करवी. यानें दिलेलें दान अनुदार कालक्षेप करून सत्कार केल्याशिवाय केलेलें, किंवा दूतांनीं अर्धें काढून घेतलेलें नसे. हा वृत्तिहीनांना वेतन देत असे. आपलें संचित अन्न अल्प मूल्यानें विकून दुर्भिक्ष तत्काल दूर करी. श्राद्धे, ग्रहण, ग्रहशान्ति इ. प्रसंगीं ब्राह्मणांना दान देऊन भजे. याला जीर्णोद्धाराचें व्यसन होतें. हर्षानें नेलेली परिहास केशवाची मूर्ति, पुन्हां यानें पुरांत स्थापन केली. शुकावलि नवयानें बांधून त्रिभुवन स्वामीचें मंदिर सुशोभित केलें.

### प्रजापीडक कायस्थांस उच्चल शासन करतो

पितरं कर्कटो हन्ति मातरं हन्ति पुत्तिका ।

हन्ति सर्वं तु कायस्थः कृतघ्नः प्राप्तसंभवः ॥ ८९ ॥

अर्थः—खेकडा, पित्याचा; वाळवी, मातेचा; व कृतघ्न कायस्थ संभव प्राप्त झाला असतां सर्वांचा नाश करतो. असल्या श्लोकांतील ऐतिहासिनी नीतीवर श्रद्धा ठेऊन, अशा कायस्थांना कारागृहांत सणाची वस्त्रें वापरावयास यानें लावलें. सम्यग्वादानें वागलेल्या वेश्यांनीं व विटांनीं वेढलेल्या वृद्ध कायस्थाला आपल्या पुढें हावभाव करून नाचावयाला लावलें. तसेंच दुसऱ्या एकाला त्याचा अर्ध मूर्धा भादरून, शकटाला बांधवलें, कांहीं कायस्थ मडकीं वाजवीत भिक्षा मागूं लागले. कांहीं ज्योतिषांमागें आपलें जातक व स्वप्नें कळवीत, कांहीं भागवतस्तवराजाचा ( मुख्य मुख्य स्तोत्रांचा ) पाठ करूं लागले. कांहीं आयावहिणीकडून सामंतांची सेवा करवूं लागले. पांडित्य मिळवणें हें भूर्जपत्राप्रमाणें सोपे आहे असें समजून बाळांप्रमाणें आचार्यांच्या घरीं कांहीं शिक्षा घेऊं लागले. याचें शीघ्र दण्डत्व बहुमत झालें. क्षुद्राश्व ( अडेल तट्टू ) कायस्थ व वैरी, याना उद्विग्न केलेल्या दंडाची प्रशंसा नीतिविशारदजन करीत नाहींत. दण्ड केलेल्याच्या बांधवांना या विचारशील राजानें पिडा केली नाहीं. चुगलखोरांना शिक्षा करून या राजानें पैशुन्याचा मार्ग बंद केला. प्रज्ञा या राजाशी परिणित होती. एकावणिज्याच्या व त्याच्या कुलाच्या वादांत न्यायाधिशांना गोचर न झालेल्यांना संशयाचा च्छेद या राजानें केला.

### उच्चलाने केलेल्या न्यायदानाची गोष्ट ( सावकारी पाश )

एका सद्भावरूढ वाणशाजवळ एकलक्ष दिनार, औपयिक (आपल्याला आयत्या वेळेस उपयोगी पडावें म्हणून राखून

ठेवलेलें धन ) ठेव म्हणून ठेवलें. त्यांतून त्यानें खर्चाकरतां कांहीं भाग मधून मधून घेतले. तीस वीस वर्षांनीं उरलेलें धन परत मिळविण्याविषयीं त्यानें वाण्याजवळ प्रार्थना केली. कुकर्मी वाणी ठेव गिळण्याच्या उद्योगांत होता. कालापहरणार्थ त्यानें नाना निमित्तें सांगितली.

स्रोतोभिर्न्यस्तमम्भोधौ लभ्यं मेघमुखैर्जलम् ।
प्राप्तिर्भूयस्तु नास्त्येव वाणिग्यस्तस्य वस्तुनः ॥

अर्थः—नद्यांनीं समुद्रांत सोडलेलें जल मेघमुखानीं परत मिळेल, पण वाण्याजवळ ठेवलेली वस्तु मात्र परत मिळणार नाहीं. तैलाप्रमाणें स्निग्धमुखाचा, स्वल्प बोलणारा मृदु आकृतीचा, असा वाणी न्यास मिळावयाच्या वादांत उग्र होतो व वाघासहि मागें टाकतो. वादामध्यें पूर्वीचें सख्य दाखविणाऱ्या स्मितानें शेटजीचें शाठ्य गेलें असें जरी वाटलें तरी तो प्राणान्तींहि सोडीत नाहीं. वेश्या, कायस्थ, दिव्हिर व हे वाणी, निसर्गानेंच वंचक असतात. ललाट, हस्तपुटें, श्रोत्रद्वन्द्व व हृदय यांवर चन्दन लावलेला वाणी षड्बिंदुधारण करणाऱ्या वृश्चिकाप्रमाणें क्षणांत प्राणघात करतो. वर्णानें पाण्डु व श्याम, सूची (सुई) प्रमाणें तोंड असलेला, गहन पोटाचा तुम्बीफलाप्रमाणें दिसणारा वाणी रक्तमांस शोषून घेतो. आतां सर्ववाद संपले तेव्हां कुळाचा निर्बन्ध पाहून वाणी रागावला. भिवया चढवून, गणना पत्रिका (हिशोबाची वही) दाखवून, तो म्हणाला आधीचें अग्रस सर्व अग्रेग्रस झालें. (पूर्वीची जमा होती ती सर्व खर्चीं टाकली गेली.) ही पहा (आतरेषु) पुलावरून जाण्यास, सहाशें दिन्नार, नाकें पट्टी म्हणून घेतलीस, छिन्न उपानह (फाटके जोडे) व चाबूक शिवण्यास, चर्मकाराला शंभर दिन्नार दिलेस, पायांवर विपादिका (गळू) झालेल्या दासीनें घृताकरतां नेले ते पन्नास. मडक्यांचा भारा फुटला म्हणून आक्रोश करणाऱ्या कुंभारणीला, कृपा करून तूं दिलेस, ते पुष्कळ वेळा पहा. हे तीनशें भूर्जपत्रावर लिहिलेले आहेत. मांजराच्या पिलांना पोसण्याकरतां वात्सल्यानें उंदीर विकत घेतलेस व मत्स्यरस आणलास तेव्हांचे शंभर, तसेंच पायांना लावण्याला लोणी, श्राद्ध पक्षांतील, स्नान समयीं लावण्याचें तांदुळाचें पीठ, घृत व माक्षिक, हे जिन्नस तूं सातशें दिन्नार घेऊन विकत आणलेस. कास मुळें झालेला आयास दवडण्याकरतां, तुझ्या अर्भकानें मध व आलें नेलें, मुलाची भाषा अव्यक्त. त्याला कुठें बोलतां येत होतें म्हणून शंभर मांडलें. वृषण उपटून हट्टानें याचना करणाऱ्या भिक्षाचराचें निवारण करण्यास तो युद्धपटु असल्यामुळें त्याला दिलेस ते तीनशें. भट्टपादांना (गुरूंना) घरीं आणले वेळीं, धूप, पलांडु व शंदामूळ आणण्याकरतां जो खर्च झाला. त्याचे सरासरीनें शंभर, किंवा दोनशें धर.

याप्रमाणें अयुक्त, व अपरिहार्य असा झालेल्या सर्व खर्चाची गणना करून त्यानें हळुहळू आपलेंच येणें दाखविलें. वर्षे मास, ग्रह, तिथी यांची प्रत्यावृत्ति या संसार चक्रांत पुन्हां होतच असते. त्या प्रमाणें तो वाणी आपल्या बोटांवर पुन्हा पुन्हां त्याच त्याच रकमा दाखवी, नंतर मूळ घेतलेली रक्कम, मध्यंतरीच्या रकमा, यांची बेरीज करून ओष्ठप्रहार करीत, डोळे मिचकावीत तो वाणी, मृदु शब्दांत म्हणाला "हें शल्य काढून टाक, व तुझा निक्षेप घेऊन जा. पण या रकमा विश्रंभानें दिलेल्या आहेत. त्या निर्दंभ प्रकारानें सव्याज दे.

त्याचें वचन धर्म्य आहे असें वाटून, कुळानें क्षणभर निःश्वास टाकला. पण नंतर तें मधुलिप्त क्षुर (सुरी) आहे असें जाणून त्याला ताप झाला. युक्तीनें हरण केलेलें त्याचें सर्वस्व धन तो अर्थक (कुळ) त्या अनार्य व क्रूर सावकाराजवळून वादांत परत घेऊं शकेना! विचारी न्यायाधिकारीसुद्धां तसेच; हा न्याय त्यांनीं राजापुढें ठेवला. तो असा आहे असा निश्चय करून, राजा वाण्याला म्हणाला, अद्यापि न्यास ठेवलेले दिन्नार, मग ते किती कां थोडे असतनां! असले तर दाखव म्हणजे यथायोग्य असेल तें सांगेन.

तसें सावकारानें केल्यावर ते दिन्नार पाहून तो राजा मंत्र्यांना म्हणाला, "पुढें येणाऱ्या भावी राजाच्या नांवानें टंक पाडतात कीं काय? नाहीं. तर कलशभूपतीच्या काळीं न्यासीकृत (ठेव) ठेवलेल्या या दिन्नारांत माझ्या नांवानें अंकित असे दिन्नार कोठून आले? ठेव ठेवलेल्या दिन्नारांवर वाण्यानें व्यवहार केला. तसें ठेव ठेवणाऱ्यानें वाण्याजवळून मधून मधून द्रव्य नेलें. म्हणून ठेव ठेवणाऱ्यानें ज्या रकमा घेतल्या त्या त्यानें परत व्याजासकट द्याव्या. तसेंच वाण्यानें लक्ष दिन्नारांवरचें व्याज द्यावें व मौलिक मूळ ठेवीचें धन द्यावें हें सांगावयास नकोच. माझ्यासारखा सघृण मनुष्य इतकेंच म्हणेल पण श्रीयशस्कर राजाप्रमाणें याच्या बाबतींत रौक्ष्य धारण करणें युक्त आहे.

विवादे संदिहानस्य, युक्तंक्षन्त्यानुशासनम् ।
भाव्यं दण्डधराचारैः प्रयुक्तः कुसृतेः पुनः ॥

(भावार्थ) विवादामध्यें चुकून झालेल्या अपराधाचें शासन क्षान्तीनेंच झालें पाहिजे. पण मुद्दाम कुमार्गानें केलेल्या अपराधाचें शासन दण्डधरांच्या आचाराप्रमाणें जबर असलें पाहिजे.

टीपः—या गोष्टींत वणिजाचें वर्णन स्वभावोक्त आहे. चंदनबिन्दुधारण करणाऱ्या वाण्याला षड्बिन्दु धारण करणाऱ्या विंचवाची उपमा प्राणघातकपणाच्या समान धर्मावर दिलेली फार सुंदर आहे. कुळानें मधून मधून द्रव्य नेलें तें

कोणत्या कारणांकरतां तीं सांगतांना काश्मीरी लोकांच्या चाली-रीतींवर कवीनें फार कोरडे ओढले आहेत. त्यांत विनोद भरपूर आहे. तो काश्मीरी आहे.

मनूप्रमाणें वर्तन करणाऱ्या या राजाचें वर्तन निर्दोष नव्हतें. या राजानें संख्यातीत महायोद्धे आपल्या युद्धश्रद्धालुतेनें नष्ट केले. द्वन्द्व युद्ध खेळणाऱ्यांना तो द्रव्य देई. मद्रोत्सवासारखी एकहि पर्वणी नव्हती की जींत वंशाला ललामभूत असे घरांतून नाचत नाचत बाहेर पडलेले योद्धे राजाच्या रक्तसिक्त असा अंगणांतून लुतांग अथवा मृत झालेले बांधवांनी उचलून परत नेले नाहींत. मृत योद्धे पाहून राजाला मोह होई. व्यथा होत नसे. पती घरास परत आले म्हणजे दिवस पदरांत पडला असें वीरांगना म्हणत.

कामण चूर्ण (वशीकरण चूर्ण) लावलेल्या वेश्येप्रमाणें यशोधरांना सुद्धां लक्ष्मी कुमार्गी करते. उच्चलानें भृत्यांना आज्ञा केली कीं हर्षाच्या नातवाचा (भिक्षाराचा) वध करा. त्यांनीं त्याला राणी जयमतीच्या वाड्यांतून, मध्यरात्रीला उचलून वितस्तेच्या जलांत फेंकून दिलें. उराचें स्पंदन चालू असतांच तो एका ब्राह्मणाचे हातीं लागला. त्याला दक्षिणापथानें नेण्यांत आलें. मालवेन्द्र राजानें त्याचें पुत्रवत् पालन केलें व त्यास शस्त्रविद्या शिकवली. हा राजबीजी, भिक्षाचर, राजांच्या नाशा करतां वाढला गेला. उपद्रवांचा उदय पाहून दिर्घावलोकीविधि. प्रतिकाराची कल्पना रचून ठेवतो. विषवृक्षाच्या जवळ त्याच्या प्रतिकाराची वल्ली रुजते. पर्जन्यानें पाणी गढूळ होण्याच्या वेळींच अगस्त्योदय होत असतो. याचवेळीं जगदुद्धार समर्थ असा सुस्सल राजाला पुत्र झाला. त्याच्या जन्मकालाच्या आरंभापासून सुस्सलाला जय मिळत गेल्यामुळें या पुत्राचें नांव सुस्सलनें जयसिंह असें ठेवलें. त्याच्या अंगावर शुभलक्षणाच्या मुद्रा होत्या.

राजा स्वयंभू अग्नि पहावयास बर्हणचक्राख्य गांवीं गेला. डोंगरांत सशस्त्र चाण्डाळांनीं एक रात्र त्याचा मार्ग निरुद्ध केला. वात जसा गिरिगव्हरांत उठून अरण्यांत दिर्घत्व पावतो. तसा राजा नाहीं ही संक्षोभकारिणीवार्ता राजाच्या स्कन्धावारांत उठून राजधानींत दीर्घत्व पावली. य वेळेला यशस्कराचा आजा कामदेव याच्या वंशांतील रड्डु, व्यड्डु व च्छड्डु असे भाऊ नगरांत राजानें मंत्रिपदावर स्थापलेले होते. त्यतील च्छड्डु हा नगराधिप होता. यांसह सड्डु म्हणून एक भारवाकाचा पुत्र गंजाध्यक्ष होता. त्याच्या मनांत राज्यलालसा उत्पन्न झाली- परंतु राजा जिवन्त आहे अशी वार्ता कळतांच त्यांची राज्यलालसा उडाली, राजानें रड्डुदिकांचे अधिकार काढून त्यांस मध्यम वृत्तीचें केलें. रड्डुची माता शेजाऱ्याशीं प्रेमबद्ध झाली. मुलांनीं शासन केलें नाहीं म्हणून राजानें तिचें प्रथम नाक कापलें. व मग त्या नाक कापलेलीचे मुलगे कोठें आहेत असें रूक्षपणें राजा लोकांस विचारूं लागला सड्डु कोशांतील द्रव्य खातो असें राजाला कळल्यावरून त्याला राजानें त्याच्या प्रवेशभागिकेच्या कामावरून दूर केलें.

रड्डुछड्डुादिकांनीं राजाला मारण्याचा कट करून शपथा घेतल्या, ते उदर, पार्श्व व पृष्ठ भाग, लोखंडी चिलखतानें झांकून, राजाच्या मागून जात. भोगसेन राजाचा आदिसुहृद् होता. या वीरानें डामर जिंकले होते. सुस्सलालाहि तो जिंकणार होता. पणबंधुवात्सल्यानें राजा तसें त्याला करूं देईना. म्हणून त्यानें राजाची निंदा केली. त्याला राजानें द्वाररक्षकाच्या कामावरून दूर केलें. त्याला रड्डुदिकांनीं कटांत घेण्याचा प्रयत्न केला तरी हा सरळ मनाचा वीर राजाला भेटला. व म्हणाला मला तुला कांहीं एकान्तात सांगावयाचें आहे. राजा म्हणाला "तूं काय सांगणार आहेस? मी तुला पुन्हां द्वाररक्षकाच्या कामावर घेणार नाहीं." उन्हाळ्याच्या तडाक्यांत निद्रित झालेला पुरुष गतस्मृति होतो आणि जो त्याला जागें करतो, त्याचाच द्वेष करतो. भोगसेन द्रोही पक्षाला मिळाला.

एक दिवस रात्रौ भोजन झाल्यावर लहान दिव्याच्या उजेडांत राजा, राणी * उजलेच्या महालात जावयास निघाला. वाटेंत रड्डुछड्डुादिकांनीं त्याला वेढलें. कांहीं विनवणी करण्याच्या दंभानें एकानें राजापुढें गुडघे टेंकून त्याची वाट अडवली. दुसऱ्यानें त्याच्या अंकांत शस्त्र खुपसलें. ज्याचें पदाहरण केलेंस तो मीं असें म्हणून रड्डुनें त्याची मान कापली. यापूर्वी त्याच्यावर एक निद्रोह कायस्थ पडला. दुसरा राजपक्षीय श्वानाप्रमाणें मुच्छोपन्न सुरी लपवून पळाला. भोगसेन वचत राहिला. द्रोह! द्रोह! असें मोठ्यानें ओरडून वीरवृत्तीनें व्यड्डुचें विदारण करून, रड्डुला क्षत करून लौ. ४१८७ पौष शुद्ध सप्तमीला सर्वंच एका मृत्यु पथानें जात असतां मी मारला, हा मेला, भेदाचा ग्रह मित काला पूरताच असतो, राजद्रोह्यांना मारण्याचें काम लोहरचा डामर गर्गचंन्द्र या वीरानें केलें.

## २ रड्डु

स्मशानांतील शिळेवर जसा वेताळ, तसा उच्चलाच्या सिंहासनावर, हा रुधिरमंडित रड्डु बसला. पौरांनीं अवस्कर प्रणालींत (शौचकूपाच्या मोरींत) दगडानें रड्डुचें डोकें ठेवलें. इतर द्रोह्यांना बांधून त्यांची थूत्कार पूजा केली.

* जयमतीवरून राजाचें मन उडालें होतें कारण कोणी म्हणतात तिनें भिक्षाचरांच रक्षण केलें.

उच्चलाच्या दोन सात्रम यापैकीं सल्हणाला गर्गाने राजा केलें. रात्रीं उच्चलाचीं, सकाळीं रड्डाची ऊर्फ शंख राजाची व दुपारीं सल्हणाची अशी त्रयी दृश्य झाली.

## ३ राजा सल्हण

लोहर कोटांत असलेल्या सुस्सलाला उच्चलाच्या मरणाचें वृत्त कळतांच तो सैन्यानिशीं काश्मीराकडे वळला. वाटेंत गर्गाचा दूत भेटला. तो म्हणाला "आता जाऊन उपयोग काय? सल्हण नृप झाला." सुस्सलानें उत्तर दिलें, "माझा वडीलभाऊ व मी मिळून जें हें राज्य मिळवलें तें आम्हाला कोणी द्यावयाला नव्हता. ज्या क्रमानें (उपायानें) आम्हीं तें मिळवलें. तो कोठें गेला नाहीं असें म्हणून तो योग्य प्रसंगांची वाट बघत बसला. सल्हण राजाचा राज्यकाल अल्पच होता. पण तो दीर्घरात्रीं पडलेल्या स्वप्नाप्रमाणें दुःसह होता.

टीप: —अल्प राज्याला दीर्घ रात्री पडलेल्या स्वप्नाची उपमा उत्कृष्ट आहे.

राजा व्यवहारांत प्रमाद करी. तापसाशीं गोष्टी करण्याला उचित अशा आपल्या भावाच्या लोठणाच्या श्वशूराला (उज-सिंहाला) ज्या जागेवर निष्ठुर विक्रम करावा लागतो. त्या द्वारपालाच्या जागेवर राजानें नेमलें. कारण तो म्हणे कीं सुस्सल आला, म्हणजे मी आपल्या मंत्राचा लक्ष जप करून पळवून लावीन, राजामध्यें मंत्र नव्हता, पराक्रम नव्हता, व कौटिल्य नव्हतें.

हा योग्य काळ ओळखून सुस्सल काश्मीराकडे वळला. वाटेंत गर्गाची एक मुलगी स्त्री करून घेतली, व दुसरी पुत्राला (जयसिंहाला) करून घेतली, व गर्गाशीं संधि केला. सुस्सलानें आपल्या सैन्यानिशी राजवाड्याला वेढा दिला. तमोरींचा (खिडक्यांचा) च्छेद करून अंगणांतील लोकांशीं पातगी वृत्तीनें लढूं लागला. आंतील बाहेरील लोकांचें निर्विभाग युद्ध सुरू झालें. सुस्सल सिंहासनावर बसला नसतांच सुस्सलो अयवि असा ध्वनि निघाला. सुस्सलानें सल्हण व लोठण यांस तुम्ही अद्यापि लहान बालकें आहांत असें म्हणून त्यांच्याकडून शस्त्रन्यास करविला. अशी शोचनीय स्थिति करून त्यांस लौ. ४१८८ इ. स. ११११२ या वर्षी बंधनांत टाकलें. सल्हणानें तीन दिवस कमी चार महिने राज्य केलें.

## (४) राजा सुस्सल

### (ऊच्चल व सुस्सल या भावांच्या स्वभावाचें वर्णन)

सुस्सल आर्द्रहृदय होता. पण शत्रूचें उच्चाटन करण्याला त्यानें भितीतील सर्पाप्रमाणें अवास्तव भीमत्व अंगिकारलें होतें. सुस्सलासारखा, कालवित्, इंगितज्ञ व दूरदृष्टि दुसरा नव्हता. वडीलभावाशीं (उच्चलाशीं) याचें स्वभावैक्य होतें. तथापि दोष अथवा गुण यासंबंधीं म्हणाल तर ते कांहीं अधिक होते, कांहीं न्यून होते व कांहीं समान होते. सुस्सलाचा राग गांवींल माशीच्या दंशासारखा होता. उच्चलाचा पिसाळलेल्या कुत्र्याच्या विषासारखा दुःसह होता. वडील भावापेक्षां सुस्सल गुणांनीं अधिक होता असें म्हणणें तर त्यांतून फक्त अर्थनैस्पृह्य व सेवकांस दुर्लभ दर्शित्व हे गुण वगळसे म्हणजे झाले. हा द्रव्यलोभी संपदेचा संचय करी पण वेळीं धनाचा वर्षाव करी. पुष्कळ रेशमी वस्त्रें देणाऱ्या या राजाचा इंद्र द्वादशीचा उत्सव शोभायमान होत असे.

टीप :—अशी धर्तीं जानसननें कवि चरित्रांत उपयोगांत आणलेली आहे. (पहा विशेषतः डायडन व पोप यांच्या गुणांची तुलना.)

## राजा कोश वृद्धि करतो

लोहरचा डामर गर्ग, शमालांचा डामर पृथ्वीहर, कंपनाधिपति तिलक, सहेल, इत्यादि महत्तमांना दूर करून, राजानें गौराभिध कायस्थाला सर्वाधिकारी नेमलें. त्यानें राजोपजीवींच्या वृत्या बंद करून, कोशांत भर घातली. व सर्व द्रव्य लोहर कोटाला पाठवून दिलें. राजा अप्रिय झाला.

कनक नांवाच्या कायस्थानें आपल्या द्रव्यानें अविच्छिन्न अन्नछत्रें घालून नाना दिगन्तरांतून आलेल्या दुष्काळ पीडितांची पीडा शान्त केली.

## राजा पुन्हां डामरांकडे वळतो व एकामागून एक अशा सर्वांचा नाश करतो

राजानें गर्गाचा पुरा निःपात करण्याचें मनांत आणलें. मल्लकोष्ठ म्हणून एक गर्गाचा शत्रू होता. त्याला गर्गानें बंधनांत टाकलें होतें. त्याला राजानें बंधमुक्त केलें. दुसऱ्या डामराशीं त्याचें यौनसंबंधानें त्याचें नातें जुळवून त्याचें बल वाढविलें. नीचांना राजानें समशीर्षकानें वागविलें म्हणून गर्ग शंकित झाला. गर्गाशीं युद्ध करून त्याला कम्पनेश तिलकानें त्रस्त केलें. संधि करण्याकरितां गर्गाने आपली पत्नी व पुत्र राजाकडे पाठविलीं. राग मनांत ठेऊन राजानें संधि केला. व त्याच्याकडून शस्त्रन्यास करविला. व एक दिवस दरदांचा राजा मणिधर, राजाच्या भेटीला आला असतां, त्याच्याकडून गर्गाचा त्याच्या तीन मुलांसह खून करविला.

पृथ्वीहर व त्याचा भाऊ क्षीर शमालाचे अमर यांनीं शमाला प्रान्तांत डामरांचा संघ केला. कल्पनाधिपतीला प्रवेश दिला नाहीं. त्याचा अपमान झाला. माणसें जसे सर्पाकीर्ण घर सोडून जातात त्याप्रमाणें तो प्रभूला सोडून गेला.

राजानें कार्याचें अनुसंधान सोडलें म्हणून अटरा डामरांनीं धान्याची कोठारें लुटलीं. तुरग आणि उंट्र रोगांनीं मरण पावलीं. मण्डळावर महाभय प्राप्त होणार असें सूचित झालें. पृथ्वीहरानें श्रीनगराजवळचा नागमट जाळला.

राजा क्रूर पद्धतीनें वागला. राजाजवळ पृथ्वीहराबद्दल जो एक नीवि (ओलीस) होता. त्याला मारून त्याच्यावर बिसतन्तू टेऊन (मासाबरोबर बिसतन्तू खाण्याची काश्मीरांत चाल आहे.) तें समोज्य वस्तूची भेट म्हणून पृथ्वीहराकडे राजानें दिलें अशी नातेवाईकांची प्रेतें राजानें अनेक डामराकडे लवून दिलीं.

भिक्षाचराचा सेनापति बली विजय विषमटाच्या मार्गानें देवसरात प्रवेश करूं पहात होता. त्याला कम्पनाधिपतीनें, तिलकानें पळविलें. पळतांना विजय एका श्वभ्रावरून,(कड्यावरून) पडून मेला. त्याचें शिर कम्पनाधिपतिनें विजश्रीचें फळ म्हणून राजाकडे पाठविलें. कृतघ्नतावरून राजानें कम्पनाधिपतीचा सत्कार केला नाहीं. उलट त्याला निरोप पाठविला कीं विजयाला एका श्वभ्र नांवाच्या कम्पनाधिपतीनें मारलें. तेथें तुझ्या उत्सेकाचें काय? कम्पनाधिपति तिलकाच्या मनांत अप्रीति उत्पन्न झाली. सर्व प्रकारें राजा कृतघ्न आहे. असें तिलक समजला.

> पटं वन्हिस्पर्शज्वलितमहिदष्टात्वचमरेः।
> श्रुतिं यातं मंत्रं, पतननिरतां जीर्णवसतिम्॥
> असेवाज्ञं भूपं व्यसनविमुखं स्निग्धमजहन्।
> न धीरोऽप्युत्थानोपहतमहिमा शर्म लभते ॥६९२॥

(अर्थ) वन्हिस्पर्शानें पेटलेले वस्त्र, अहिदष्टत्वचा, शत्रूच्या कानीं पडलेला मंत्र, पडावयाला झालेलें जीर्ण घर, सेवा न स्मरणारा भूप, संकटसमयीं विमुख झालेला स्नेही यांचा त्याग न केला तर धीराला सुद्धां त्याचा उदय पावणारा महिमा उपहत होऊन त्याला कल्याण प्राप्त होत नाहीं.

मल्लकोष्ठानें भिक्षाचरास आणावयास पाठविलें.

## राज्यावर संकट आलें असतां पसरणाऱ्या वार्ता व त्यावर भरंवसा ठेवणारी भोळसट मण्डळी

ठिकठिकाणीं कर्णाकर्णिका पसरल्या. कीं सत्कृत नाहीं तें भिक्षाचर करीत नाहीं. तो एका बाणानें दहा शिला फोडतो. शत योजनें जातो येतो, दमत नाहीं. याप्रमाणें पलितशीर्ष व लम्बकूर्च म्हाताऱ्यांनीं भिक्षूच्या महात्म्याची स्तुती करून त्याविषयीं कौतुक उत्पन्न केलें. जणुं काय आपण, साम्राज्याच्या अर्धभागाचे भोगी होणार म्हणून जो तो राज्यव्यवहारात नसलेभिक्षु विषयी वार्ता बोलूं लागला व पुसूं लागला. नदीकाठीं स्नान करण्याला बसलेले वृद्ध वृद्ध क्षीण नियोगी, (काम जाऊन घरीं बसलेले सरकारी नोकर) राजगृहांत न गणले जाणारे नृपात्मज, घोड्यावर बसूं इच्छिणारे कांहीं स्वभाव दुर्जन योद्धे, शिष्याकडून नखांनीं शिक्षण करवून घेणार (पाठ खाजवून घेणारे) उपाध्याय, देवालयांतील वृद्ध नर्तकया व पालक, टेवी दाबणारे व पुस्तक (पुराण) श्रवण करण्याला बसणारे सावकार, प्रायोपवेशन करण्यात कुशल असे ब्राह्मण परिषदेतील ब्राह्मण. नगरोपान्तांत राहणारे शस्त्रधारी, पण कार्षिकाप्रमाणें (नागव्याप्रमाणें) असणारे डामर व स्वतांना आणि दुसऱ्यांना खळबळ उत्पन्न करणाऱ्या गोष्टींनीं सुखवणारे असे जे जन असतात त्यांना प्रायः या देशांत राजाच्या विरुद्ध विप्लव प्राप्त झाला असतांच तो प्रिय वाटतोच.

टीप :—प्रत्यक्ष वस्तुस्थि पाहून हें वार्ताप्रिय लोकांचे चित्र कवीनें काढलें आहे यांतील विनोद काश्मीरी आहे; पण वार्ताप्रियता सर्व देशांत आहे.

## सुस्सलाची युद्धाची तयारी व भिक्षूशीं त्याची पहिली लढाई

पिपीलिकाकुळाचें अंडींअन्नेनें, गाईच्या उड्या मारण्यानें, सर्पाच्या वृक्षमूर्धाधिरोहणानें, पर्जन्य जवळ आला असें समजतें, राजाला दुर्निमित्तानें उपद्रव जवळ आला असें समजलें. सुस्सलानें कुटुंबांची माणसें लोहरला लावून दिलीं. वसूचा वर्षाव करून तो पायदळाचा संग्रह करूं लागला. त्यानें शकट हांकणारे व शिलपीजन यांकडून शस्त्रग्रहण करवलें. अश्वांना चिलखतें घालून प्रत्येक मार्गांत, सेनापती त्यांच्याकडून समरोन्मुख व्यायाम करवूं लागले.

डामरांनीं येऊन राजधानीला वेढा दिला, व कित्येक ठिकाणीं आगी लावल्या. युद्धाला आरंभ झाला. तूर्य वाजवीत सैनिक बाहेर पडूं लागले. व शस्त्रक्षत परत येऊं लागले. व्रणाला पट्या बांधणें, शल्याचा उद्धार करणें, पथ्य पाण्याकरतां धन देणें इ. व्यवस्था करतांना राजा सतत आढळे. प्रवास वेतन व प्रीति दाय देण्यांत राजा निःसंख्य व्यय करूं लागला. कल्पनाधीश तिलक शिबिरात साक्षीभूत राहिला.

डामरांनीं उभें पीक जाळल्यास आमचें काय होईल. या भीतीनें विप्रांनीं प्रायोपवेशन सुरू केलें. तटस्थ मंत्र्यांकडून जामीन घेण्यास त्यांनीं राजाला चिथावलें. पारिषद्य विप्रांची ही सेना जणुं काय वैऱ्यांची दुसरीच सेना राजाजवळ वृद्धि पावली. लवन्यांनीं बंड केलें त्यपेक्षां हें ब्राह्मणांनीं केलेले बंड राजाला अधिक त्रासदायक झालें. गल रोग पादरोगापक्षां अधिक व्यथा उत्पन्न करतो. राजाची आस्थान सभा ज्या

शठांनी पाहिली नव्हती, ते अव्यवहारिक लोक राजाला अप्रिय बोलूं लागले. यांतील अधिक चाक्रिक होते त्यांना राजानें कांचनमय उत्कोच ( लांच ) देऊन प्रायोपवेशन थांबविलें.

पृथ्वीहरानें मोठ्या सैन्यानिशीं नगरांत प्रवेश केला. नेद मस्तीत्यचिंतयत् ( हें कांहीं नाहीं, आतां घडगत नाहीं ) असें राजाला वाटूं लागलें. जे भृत्य दिवसा पार्थिवाजवळ ते उघडपणें रात्रीं भिक्षाचराला जाऊन मिळत. सुस्सल गेला तर भिक्षु, या महीला सुवर्णपूरीत करील असें लोकास वाटलें. त्यांनीं भिक्षूचें औदार्य कोठें पाहिलें होतें ? जनलोक गतानुगतिक असतात.

संदृश्यते परिवृता चिरमम्बरेण ।
रेखा स्वयंन खलु या शशिनोनवस्य ॥
तस्याजनः प्रकुरुते नतिमम्बरार्थी ।
धिग्लुब्धतामपसरद्सदसद्विचारान् ॥ ७९८ ॥

( अर्थ ) नव्या शशीची रेषा स्वतः अम्बरानें ( आकाशानें ) परिवृत असणारी दिसतांच अम्बरार्थी ( वस्त्रार्थी ) जन तिला नमस्कार करितात. सदसत् विचार यांना मार्गे टाकळणाऱ्या लुब्धतेला नमस्कार असो.

बेळ पाहून लौ. ४०९६ इ. स. ११८६ या वर्षी राजानें पळ काढिला कांहीं अनुगांसह हलोहाद्री चढून गेला.

## ( ५ ) राजा भिक्षु

दुसरे दिवशीं पदोपदीं घोडा थांबवून सामंतांची पूजा स्वीकारीत भिक्षूनें नगरांत प्रवेश केला. भिक्षाचर राजा होणें असंभाव्य होतें म्हणून आतां तो राजा झाल्यावर तो अवतार आहे अशी दुसरीच प्रथा डामरांनीं पाडली. जनकसिंहानें याला पुतणी व कंपनाधिपतीनें कन्या दिली. कंपनाधिपतीचा सावत्र भाऊ बिंब सर्वाधिकारी झाला. मल्लकोष्ठ उपदेशक झाला.

दुसऱ्यानें केलेलें राज्य भिक्षाचरानें पाहिलेलें नव्हतें. म्हणून तो पदोपदीं चुके, दुसऱ्यानें केलेली वैद्यकी न पाहिलेला वैद्य चुकतो. भिक्षाचर सुखाभिलाषी झाला. सभेंत बसविलें असतां त्याला निद्रा घ्याविशी वाटे. त्याचें स्थैर्य पाण्यावर काढलेल्या रेषेप्रमाणें अस्थिर असे. त्याचे सचिव जे कांहीं बोलत त्याचा तो नुसता पुनरुच्चार करी. त्याचें स्वतःचें असें तोंडातून कांहीं निघत नव्हतें.

पृथ्वीहराच्या घराण्यांतील मुलीशीं राजानें लग्न लावलें, म्हणून मत्सरानें मल्लकोष्ठ कुपित होऊन निघून गेला. राज्यव्यवहार विसूत्रित झाले. या मण्डळांत अराजक झालें; अथवा बहुराजक झालें असें म्हणा. सुवर्ण पद्धति त्रुटित झाली. पुरातन दिनार निष्प्रचार झाले. जुनें शंभर देऊन ऐंशी घ्यावे लागत.

भिक्षूनें सैन्य देऊन, सुस्सलाला त्रस्त करण्यास बिम्बाला पाठविलें. विरमय ( इस्माएल ) तुरुष्क सैन्य घेऊन, बरोबर होता. एक अश्वारोह पाश दाखवून म्हणे मी यानें सुस्सलाला बांधून आणीन.

बिम्ब गेल्यावर त्याची पृथु नितंबिनी पत्नी आमंत्रण देऊन राजाला घरीं आणी. तिच्याकडे अश्वागारामार्गें खाग, कुम्भ व कास्यपात्रानें वादन करीत, असें प्राकृतिकेशीं तसें तिच्याशीं वागण्यास राजाला कांहीं लाज वाटल नाहीं.

सुस्सल लोभी व क्रूर म्हणून निंद्य होता. तो आतां वंद्य वाटू लागला. पृथक् जन हे पशुप्राय आहेत. क्षणांत सन्मुख क्षणांत विन्मुख होतात. मल्लकोष्ठादिकांनीं दूत पाठवून राज्य प्रसंन्न करतां सुस्सलाला उद्योग करावयास लाविलें.

### पुरोहित प्रायोपवेशन

तिक्काच्या ( तिलकाच्या ) लोकांनीं अक्षोभुवाग्रहार लुटला. पुरोहित पारिषद्यांनीं प्रायोपवेशन सुरू केलें. पारिषद्य समाज अदृष्टपूर्व होता. पालखींत ठेवलेल्या देवाच्या प्रतिमांनीं अंगण आच्छादित होतें. पदरी छत्रें व चामरे यांनी त्याला चांगली शोभा आली होती. काहल कास्य वाद्यांनीं दिग्मुखें शोभित झाली होती. ब्राह्मण म्हणाले आम्हांला सुस्सलाशिवाय सद्गति नाहीं.

भिक्षाचरानें नगरांत (विरक्त) भेदिल झालेल्या लोकांची सभा भरविली. शठबुद्धीच्या लोकांनीं त्याला उत्कोंत अडथळा केला विप्रवानें संस्पृष्ट झालेल्यांना औषध नाहीं.

### सुस्सलाचें भिक्षूशीं दुसरें युद्ध

पर्णोत्सवांत सुस्सलानें भिक्षूला हरवलें. भिक्षूच्या तुरुष्क सैन्याचा सुस्सलानें कवल केल. ज्येष्ठ वद्य तृतीयेला; लौ. ४१९७ इ. स. ११२१ या वर्षी सुस्सलानें श्रीनगरांत प्रवेश केला. भिक्षू पृथ्वीहरासह राजपुरीच्या सोमपालाकडे आश्रयास गेला.

### सुस्सल व भिक्षु यांचें तिसरें युद्ध

मडव राज्यातील मंखश्यादी डामर मिळवून विजयेश्वरी सुस्सलाच्या सैन्याला भिक्षूनें पळविलें. भीतीनें जागजागचे लोक व राजाचे स्वार चक्रधराच्या देवळात शिरले. देवळांत धन धान्य पशू होते. भिक्षूच्या सैन्यानें त्यांस लुटण्यास देवळाला वेढा दिला. हट्टद्वारानें व वप्रानें रक्षित अशा या देवळाला एका डामरानें आग लावली.

### चक्रधराच्या देवळाला लावलेली आग

आंतील अश्व उधळले. त्यांच्या टापांखाली लोक मेले. मोठाल्या लांकडांच्या गांठीं फुटून चटचटां शब्द निघू लागला. घरट्यावाटोळे फिरणाऱ्या पक्षांच्या आक्रन्दनानें, नभ भरलें. दह्यमान मनुष्यांच्या ओरडण्यानें भूमि मुखरित झाली. अग्नीनें दग्ध झाले त्याहून धामाधूम होऊन अधिक मेले. मग सर्व

निःशब्द झालें. वन्हीचा कटकटा शब्द पुष्कळ दृश्य झाला. तेव्हां शिजणाऱ्या शवौघाचा सिमसिमा ध्वनि ऐकूं येऊं लागला. वसा व मेद याचा दुर्गंधि कांहीं योजनें पसरला. एक मस्ताकय डामर शवें शोभित होता. त्याला कापालिकाप्रमाणें संतोष झाला. या कुकर्मानें भिक्षूचा त्याग लक्ष्मीनें केला. भिक्षु विजयेश्वराकडे वळला.

## सुस्सल व भिक्षु यांचें चवथें युद्ध

कनराज्यांत आनंद द्वाराधिप होता. त्यानें पृथ्वीहराशीं (भिक्षूच्या सहायानीं) युद्ध केलें. या काश्मीर मण्डळांत भाद्रपद महिन्यांत एक दिवस आहे. तेव्हां मृताच्या अस्थी तीर्थाला नेत असतात. त्याप्रसंगीं अबलांच्या आक्रन्दनानें दिग्वय आक्रान्त होतो. तो प्रकार या लढाईंत सर्व दिवस चालू होता.

सुस्सलशीं चालविलेल्या या बहुवार्षिक युद्धांत पृथ्वीहर व भिक्षु या दोघांच्या अनुक्रमें कादंबरी व पताका, पीत व पाण्डुर अशा घोड्या होत्या. अनेक तुरंगांचा क्षय झाला पण यांच्या पैकीं एकहि मृत झाली नाहीं. पृथ्वीहरापेक्षां अधिक उत्थानशील व भिक्षूपेक्षा अधिक क्लेशसह वीर झाला नाहीं. डामरांनीं भिक्षूचा उत्कर्ष पाहून त्याच्या दायादाचा सुस्सलाचा उच्छेद केला नाहीं. युद्ध चालू ठेवण्यांत आपलें हित आहे असें त्यांना वाटलें. दस्यूंचें (डामरांचें) हें मत आपल्या हितानें आहे असें सुस्सलाला वाटलें. त्यानें कौटिल्य व पराक्रम यांत अंतर न ठेवतां दोहोंचें अवलंबन केलें. युद्धांत सुस्सलानें शत्रूला पळवलें. भिक्षु व पृथ्वीहर पुष्प-नाडाला परतले. सुस्सलाला शीतळता मिळाली. त्यानें मल्ल-कोष्ठाला राज्याबाहेर घालविलें. सिंवाला बंधनांत टाकलें. वकाला कम्पनाधीश केलें. एका सिंधुदेशीय राजबीजीला (प्रजीला) मल्ल-कोष्ठाचे अधिकार दिले. याच्या आश्रयाला स्वदेशीय असा शतैकीय (शतांत एक असा) होता. स्वदेशीय शंकित होऊन शत्रूला मिळाले.

एकाक्षेपे परेऽपिस्युः यत्र भृत्या विशंकिताः।
तत्रापराधे प्राज्ञस्य राज्ञेऽपेक्षा प्रशस्यते ॥१०२०॥

(अर्थ) एकाला आक्षेप घेतला म्हणजे दुसरे भृत्य विशंकित होतात. म्हणून अपराध झाल्यानें प्राज्ञ राजानें तिकडे दुर्लक्ष्यच केलें तर त्याची प्रशंसा होते.

## सुस्सलाचें भिक्षूशीं पांचवें युद्ध

लौ. ४१९७ च्या माघ महिन्यांत, मल्लकोष्ठनें आमंत्रण दिल्यावर भिक्षु व पृथ्वीहर मडव राज्यांतील डामर घेऊन आले. पृथ्वीहराचा भाऊ मनुजेश्वर व काकवंशीय रत्नादी भिक्षुरक्षीं स्फुरण पावले. उन्मेश पावणाऱ्या यांच्या बलांतील वाद्यमाण्डांची गणना केली. तेव्हां तूर्यादीवाद्य सोडून, श्वपाकानीं वाजवलेली दुंदुभि वाद्यें मारायें भरली.

सुस्सलाच्या पक्षात वीस-तीस नृपात्मज, धन्य, व उदय गर्गाचा पुत्र चंद्र हे व यांना कुंकुम आणि छत्रचामर दी अर्पण करून, राजानें मंण्डलेश्वर केलेला यशोराज, असे सज्ज होते. सुज्जी व प्रज्जी बंधू मोठे रणकर्मठ होते. ते राजाचे हात होते, व राजा त्यांचे चिलखत होत. राजानें सुतनिर्विशेष वागविलेला रिल्हण, रणाग्रीं असे. यांसह राजा रणांत हिंडे. गृहमेधी जसा यज्ञमण्डपांत. १४९८ च्या चैत्रांत इ. स. ११२१–२२ या वर्षी उभय सैन्याचें हस्तमेळक झालें. आलेलें संकट जसें आरंभींच राजाला त्रासदायक होईल तवढेंच. मागाहून संकट वृद्धि पावलें तरी तें राजाला धैर्य-दायीच होई. आरंभीं भय जेवढें क्लैब्यकारक असतें तेवढें तें त्याच्या भर मध्यावर नसतें. करावर टाकलेलें सराचें पाणी जेवढें शीत असतें तेवढें तें सरांत बुडी मारल्यावर नसतें.

हा संग्राम बहुकाल शौर्य व धैर्य यांचा कसोटी होता. तसा दुसरा झाला नाहीं. राजानें भिक्षूची व भिक्षूनें राजाची अशी परस्परांनीं परस्परांची शक्ति जोखली. लढतां लढतां राजाला जयापजय प्राप्त झाले पण अन्तीं प्रभुत्व प्राप्त झालें.

## सुस्सलाचें भिक्षूशीं सहावें युद्ध

भिक्षु व पृथ्वीहर यांनीं पुन्हां श्रीनगरांत प्रवेश करून, बऱ्याच आगी लावल्या. धुराचे लोट उठले. हुडुकेच्या मुखा-वरील चामड्याप्रमाणें रवि दृश्य व अदृश्य होऊं लागला. धूमान्धरानें सच्छिन्न झालेली घरें शेवटलें दर्शन देण्याकरतां अग्निज्वालांच्या प्रकाशांत एकाएकदां आविष्कृत झालीं. धूमानें श्याम झालेली बुद्धाची मूर्ति, उंचावर दग्ध झालेल्या द्रुमाप्रमाणें दिसूं लागली. पेटलेल्या घरांचें संरक्षण करण्यास राजाचें बरेच सैनिक गुंतले तरी दिवसाचे अन्तीं शत्रूचें कंदन करून सुस्सल राजा परत आला.

## सुस्सलाच्या राणीचें मरण

मत्यावर येणाऱ्या संकटानीं क्षीण होऊन महादेवी राणी मंजरी कादम्बरीस यावयास निघाली व वाटेंत मरण पावली. तिच्या आगमनोत्सवाची आकांक्षा तपःफलाप्रमाणें राजा बाळगून होता. तिचें वचन त्याला गौरवानें प्रिय वाटे; ती याची अपत्याप्रमाणें कोपासना करणारी प्रिय गृहिणी त्याला उपक-रणीभूत विभूतीच वाटत होती. आतां त्याला लोकयात्रा विनोदशून्य वाटूं लागली. त्याला जगण्यांत अथवा राज्य कर-ण्यांत कांहीं कर्तव्य दिसेना.

टीप :—रघुवंशांतील अजविलाप याच शब्दांत कालि-दासानें लिहिला आहे. तो असा :—गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ। करुणा विमुखेन मृत्युना। हरता वदकिं-नमे हुतम् ॥ तिच्या बरोबरीच्या, श्रेष्ठ स्त्रियांनीं प्राण दिले. एका सुदानें राणीच्या

चितेजवळील दगडावर डोके फोडून नदींत प्रवेश करून तो भृत्यांत वंद्य ठरला.

राजानें वयांत आलेल्या पुत्राला, जयसिंहाला आगवडे पण त्याला राज्याभिषेक केला पण अधिकार दिले नाहींत. हा द्रोही आहे असें पिशुनांनीं सांगितलें. पुत्र, स्त्री, मित्र व भृत्य हीं ज्या नृपतीचे शंकास्थान असतात त्यांची विश्वासभूं कोठली !

## सुस्सलाचा वध

उत्पल म्हणून प्रथम पशुपाल, मग, देवसर येथील टिक्क नांवाच्या प्रबल अशा डामराचा सेवक हळू हळू शस्त्रधारण करूं लागला. हा दूताचें काम करून राजाचा आप्त झाला होता. वैऱ्यांत भेद करण्याकरतां उत्पलाला सुस्सलानें सांगितलें तो म्हणाला तूं प्रथम भिक्षूला मार व मग टिक्काला मार. सुस्सलानें त्याला गंजपति केलें. लोभाचा मोह व प्रभूचा द्रोह, यांच्यामध्यें उत्पलाची बुद्धि हेलकावे खाऊं लागली.

उत्पलाची स्त्री पुत्र प्रसवली. राजानें तिला प्रसवोचित वस्तू पाठविल्या. उपचाराच्या अति प्रमाणानें तिचें मन शंकित झालें. तिनें पतीला कांहीं प्रश्न विचारले. तिच्या आग्रहावरून त्यानें तिला सर्व सांगितलें. तिनें उपदेश केला स्वामिद्रोह करूं नकोस. केलास तर द्रोही आहेस असें मानून सुस्सल मागून तुझाच नाश करील. विश्वास संपन्न करून तूं सुस्सलाच मार. आपला पहिला स्वामी आपणास विभूति भाक् करील.

उत्पलानें हें वृत्त टिक्काला कळवलें. तो उत्पलाला म्हणाला, तूं सुज्जीला किंवा सुस्सलाला मार. हा द्रोही पुरुष राजाकडे गतागत करूं लागला. विश्वास वैरिसंश्रित झाला. त्यानें व्याघ्र व प्रशस्तराज असें दोन तीक्ष्ण पुरुष ( मारेकरी ) आणविले.

याच सुमारास राजाचा प्रीतिकार्यकृत् असा मंदुग चक्रवर्ति ( अश्व शाळेतील अश्वांना सम्राट ) नांवाचा घोडा अस्वस्थ झाला. त्याला उपचार करण्याकरता या तुरगव्यसनी राजानें प्रतीहार लक्ष्मक व दुसरे जन बाहेर पाठविले. जवळ अनुग मोजके राहिले.

लक्ष्मकाचा पुत्र शृंगार यानें त्याला उत्पलाचें कृत्य कोठून तरी कळल्यावर तें राजाच्या कानावर घातलें. कसाई खान्यातील पशु त्याच्या हिंसेची तयारी चालली असतां शत्रूला मित्र समजतो. त्याप्रमाणें हें मिथ्या असा अधिक्षेप घेऊन शृंगारादींकडे बोट दाखवून, राजा तेथें हजर असलेल्या उत्पलादींना म्हणाला, तुमच्या राजभक्तीनें मला स्वस्थ यावें अशी यांची इच्छा नाहीं. हे उत्पल ! तूं दुष्ट आहेस असें हा म्हणतो. भयानें विकृत झालेलें तोंड धष्टपणानें हसरें करून उत्पल म्हणाला, " जें आम्हीं बोलावें तेंच देव बोलले " काळाची कवलग्रहण करण्याची शक्ति हीन आहे कीं जन्तु जाणून बुजून मूढ होतो.

उत्पलानें डोळे असतांस दवडून केंस तरी दोन दिवस घालविले. एकदां एकान्त पाहून, तो व्याघ्र व प्रशस्तराज यांसह राजाजवळ गेला. राजा शीतनिवारणार्थ वस्त्र पांघरून, आसनावर बसून होता. उत्पल पायांना विनंति करण्याच्या कपटानें, पुढें झाला. तोंच मारेकऱ्यांनीं राजाच्या सव्यबाजूवर, व मस्तकावर वार केले. त्याचा प्राण जावयास दोन तीन नलिका (घटका) लागल्या, मारेकरी ग्रामान्तराकडे तोंड करून पळाले. त्यांवर कोणी शस्त्री धावले नाहींत. ते रागानें अथवा भयानें चित्रार्पित असे दिसले. राजाच्या प्रीतीला पात्र झालेल्या, पयानें, स्थूलकाय झालेले. राजवंशीय लोक कीर्तिकालुष्याला पात्र होऊन, जनविवर्जित अशा अंगणांत जमले. व तेथपर्यंत आलो हेंच पौरुष मानूं लागले.

हर्षदेवाच्या काळापासून आम्हीं असल्या कुत्सित पुरुषांची आठवण टेऊन त्यांच्या दुष्कृतींचें वर्णन, हवें तेवढें केलें असल्यामुळें खेद पावून आतां त्यांच्या दुष्कृतींचें नामग्रहण पूर्वक, वर्णन करूं इच्छित नाहीं.

मी कसा फंसवला गेलों असें चिंतन राजा करीत आहे, असें त्याच्या निष्पन्द दृष्टीवरून दिसत होतें. टिक्कादी डामरांनीं लुटालूट केली. राजवंशीय लोकांनीं राजाचा अग्निसात् केलें नाहीं तर नाहींच तर नुसता भडाग्नि सुद्धां दिला नाहीं. उत्पलादिकांनीं राजाचें शिर तोडून देवसरास नेलें. छिन्न शरीर राजा गांवढळ जनांस, एक प्रेक्षणीय वस्तु झाला. राजा लौ० ४२०३ इ. स. ११२८ या वर्षी फाल्गुनांत अमावास्येला मारला गेला. श्रीनगरांत एका स्वामिनिष्ठानें घडाला आग दिला दिवींची रूपलेखावधि असलेली राणी देवलेखा व तीन रांण्डा यांनीं अग्निप्रवेश केला.

## सिंहदेवाची प्रतिज्ञा

सिंहदेवाला ही दुर्वार्ता कळतांच त्या त्या दुःखकारक प्रसंगाला आठवून त्यानें स्पष्ट अस्पष्ट असा विलाप केला. तो सुस्सलाला उद्देशून म्हणाला कृप, द्रोण, जामदग्नि, यांच्या अपमानाचा सूड त्यांच्या कुळांतील पुरुषानीं घेतला म्हणून कांहीं काल त्यांचा हेवा करूं नका; कारण तुमच्या अवमानाचा सूड घ्यावयास कांहीं काळ लागेल. सर्वत्र वैऱ्याशीं ठरवें लागलें तरी लढेन "

गांवांत इकडून इकडून तिकडे फिरणाऱ्या, एकमेकांस आख्या सांगणाऱ्या लोकांनीं उत्प्लुत स्वर काढून, सारें नगर मुखर करून सोडलें. सर्वांना अकुशल करणारी ती रात्र भयावह गेली. मग शक्य ती त्वरा करून जयसिंह राजनगरांत ससैन्य आला.

## सार्वत्रिक क्षमेची घोषणा

जयसिंहानें पटहध्वनीनें अशी आज्ञा पुरोंत घोषित केली

कीं जें कोणी अपहार करून नेलें असेल त्याचा मी परित्याग केला आहे. ज्यांनीं अरीचा आश्रय घेतला त्यांना अभय दिलें जाईल. ही वृत्ति पूर्वींच्या आचारा विरुद्ध खरी. पण तिनें राजा आतां अनुरक्तजनांनीं वेढला गेला.

सुस्सल मारला गेला ही स्थिति सहन न होऊन सुज्जि नागाप्रमाणें निघाला व जयसिंह राजाला भेटला. राजानें नेत्रांतून अश्रू व भीति मनांतून गाळली.

## जयसिंह ऊर्फ हिमराज

हिमवृष्टि चालू असतां राज्य भिक्षूला न मिळतां जयसिंहाला मिळालें; म्हणून नव्या राजाला डामर हिमराज म्हणूं लागले.

भिक्षूपुढें सुस्सलाचें मुण्डकें ठेवण्यांत आलें. त्यानें त्याकडे कोधानें प्रदीप्त अशा दृक्पातानें पाहिलें. व कुत्सितपणानें उच्चलाचा जांवई जो सोमपाल त्याकडे राजपुरीला पाठविलें. त्यानें त्या मुंडक्याला कालागुरु व चंदन यांनीं रचलेल्या चितेवर गोपाळपुरांत अग्नि दिला. म्हणजे गात्रें एका मंडळांत व शिर दुसऱ्या मंडळांत असा अद्भुत अग्निसंस्कार कोणाच्या वांट्यास न आलेला दृष्टीस पडला. अशी वार्ता आहे कीं, देवाधिष्ठित असलेल्या एका दैशिकानें सुस्सलाचे वधाविषयीं एक वाक्य लिहून ठेवलें तें खरें झालें. त्याच्या अन्वयेंच सुस्सलाचें शिर ज्यानें तोडलें व जागजागीं फिरवलें तो पुरुष मेलेला निजलेला आढळला.

राजा जयसिंहानें आपलें महत्व झांकून ठेवलें. सुज्जीला संमत नाहीं असा आहार सुद्धां हा धूर्त राजा घेत नसे. नगरांत पाय पसरून पुढें आढीला घातलेल्या नीतिरूप फळाच्या पक्व दशेची वाट पहात बसला.

भिक्षु राजवाच्या आशेनें टिक्काला भेटला. त्याला टिक्कानें प्रणति केली. व त्याला भिक्षूनें श्वेतपत्रादी भावानें दिलीं.

भिक्षूनें अदृष्टपूर्व संघटण पाहून, भिक्षूला भिऊन, उच्चलाचा जामाता, जो राजपुरीचा सोमपाल, त्याला राज्य देऊं केलें. जो दास्य भावाला उचित तो राजा व्हावा ही त्रपा जरी बाजूला ठेवली तरी तो या देशाचें रक्षण करण्यास कसा समर्थ होईल? पलाल पुरुष, (पेंढ्याचें केलेले पक्ष्यांचें बुजगावणें) माजलेल्या मडक्याच्या तोंडानें चिमण्यांना भिववून जो साळीच्या पिकाचे रक्षण करतो त्याला जर काननतरूंचें रक्षण करावयास ठेवलें, तर तो पायांखालीं तुडवून तरूंना मोडणाऱ्या गजापासून त्या तरूंचें रक्षण कसें करणार?

टीप: —असमर्थ राजांना दिलेला बुजगावण्याचा दृष्टान्त चांगला समर्पक आहे.

भिक्षु गंभीरा तीरावर सज्ज होता. त्यावर अभियोग करण्याकरतां सुज्जि निघाला. सुज्जीनें नौकांचा पूल बांधून आपलें सैन्य तिकडे नेलें व भिक्षूच्या सैन्याचा नाश केला. डामर भराभर राजाकडे येऊं लागले. मीं आधीं मी आधीं अशी अहंपूर्विका कोष्ठेश्वर व मनुजेश्वर यांमध्यें लागली. कोष्ठेश्वर हा शीलबहिष्कृत होता. अतिरूप अशा भिक्षूंच्या स्त्रियांवर त्याची स्पृहा होती. पण सिंहाची आयाळ, नागाचें फणारत्न, अग्नीची ज्वाला, व भिक्षूच्या राण्या यांना जीवंत असतां कोण धरूं शकेल!

टीप:—हा कल्हणाच्या आवडत्या अशा दीपकालंकाराचे उदाहरण आहे. मूळ श्लोकांत सिंहाची आयाळ नागाचें फणारत्न, अग्नीची ज्वाला कुल बालिकेचे स्तन एवढ्या वस्तू आहेत त्यांतील शेवटल्या वस्तूबद्दल भिक्षूच्या स्त्रिया ही वस्तु घालून हा अलंकार कवीनें साधला आहे.

भिक्षूला थारा उरला नाहीं तो शेवटीं राजपुरीच्या सीमाप्रान्तीं सुन्दरी नांवाच्या गांवीं गेला.

## प्रान्ताप्रान्तांतील लोकांचे स्वभाव

त्रिगर्तामध्यें दया, चम्पामध्यें शील, भद्रमंडळांत त्याग व दार्वाभिसरांत मैत्री असे असलेले गुण अमर्त्यधर्मी देवांतही आढळत नाहींत.

असो.पित्याच्या मरणापासून चार महिन्याच्या आंतच जयसिंहानें आपलें राज्य अनन्यशासन केलें.

## जयसिंहाच्या राज्याच्या आरंभींची स्थिति

निवास नगरांत पौर सामर्थ्यहीन झाले होते. पार्थिवोपथ डामरांनीं सर्व राष्ट्र आकीर्ण झालें होतें. सर्व भार सहन करण्यास समर्थ असा भिक्षु दूर नव्हता. आंतले व बाहेरचे सामन्त व मंत्री यांनीं वैऱ्याचा संश्रय घेतला होता. उपदेश वृद्ध अशा एकाची पण नृपाजवळ सत्ता नव्हती. सर्व नृत्य अधर्मबहुल व द्रौहिक बुद्धि झाले होते.

## जयसिंह राजाच्या गुणांचें वर्णन

प्रसंग प्राप्त म्हणून या जयसिंह राजाच्या गुणांचें प्रदर्शन बहुशःलेशावरून करण्यांत येत आहे. या राजाच्या ठिकाणीं गुण व दोष या गुणांची अद्भुत निष्ठा होती. हा राजा चांगला अथवा वाईट म्हणता येईल. याच्या वचाला तुलना म्हणजे एकच धार असलेल्या तलवारीची होय. याचा प्रसाद स्थिर होता. या राजाच्या प्रखर तेजापुढें पूर्वींच्या राजाचें तेज फिकें पडे. जो जो त्याच्याकडे पाही त्याला असें वाटे कीं जशी शंकराची सरळ घडवलेली मूर्ति, पहाणाऱ्याकडे बघत असते तसा हा माझ्याकडे पहात आहे.

या राजाच्या प्रकृष्टप्रतीहारी लक्ष्मकाला. अन्य मंत्र्यांची उद्गति (राजाजवळ जाणें) सहन होत नसे. एषा नांवाचा वृक्ष आपल्याशेजारीं अन्य वनस्पतीची उद्गति स्तंभित करतो. लक्ष्मकानें सर्व मंत्र्यांना अवहेलनेनें उखडून टाकलें.

कांहीं दिसांनीं राजाला अंगावर स्फोट, सूज, अतिसार, अग्निमांद्य इत्यादी विकार जडले. राजपक्षीय विचार करूं लागले. हितकृत्य कोठलें. राजा जयसिंह व राणी गुणलेखा यांचा पंचवर्षदेशीय पुत्र परमाडी यास राजा करावा असें सुज्जीनें राजपुत्राचा मातुल जो गार्गी (गर्गाचा पुत्र पंचचंद्र) त्याच्याशी मंत्र चालवला. ही संधि साधून लक्ष्मकानें चिथवलेले धन्य व उदय, राजाला भेटले व म्हणाले " हा द्रोही सुज्जि, व त्याचे पुत्र यांनीं पंचचन्द्राशीं अहर्निश, मंत्र चालविला आहे. राजाला खरें वाटलें. राजेलोक दुसऱ्याच्या बुद्धीनें हरवले जातात.

## विटपराक्रम वर्णन

शौचस्थानीं स्त्रीव्यवयालयांत, वसति करणारे असे कुशल गर्भचेट, ज्या राजाला गांठून ज्याच्या मनांत प्रवेश करून भूतांनीं संचार केलेल्या माणसाप्रमाणें ज्याला विवश करतात त्या राजापासून कल्याण कसें होणार ! हा विट निर्हेतुक राजाजवळ हसत हसत प्रविष्ट होतो. राजा प्रीतीनें नयन उत्फुल्ल करून "कां ? कसें काय" ? असें त्या अस्वच्छ मनाच्या माणसाला विचारतो. मग मित्रांना, किंबहुना मान, प्राण व गूण-या सर्वांना पीळ देत बोचक बोलतो. व सर्वांवर पाणी सोडतो. तो मोठ्या संभ्रमानें गतागत करीत, कांहींतरी बोलत प्रभूची दृष्टि, आपल्याकडे वळली असें पहातांच, जगाकडे अवज्ञेनें पहातो. प्रणयताडणानें झालेली आपली मुखाची विक्रिया अनुग्रह असें मानतो. असा नृपतिवल्लभ दुःसह होतो. हातांतील केवळ यंत्रपुत्रक बनलेला असून जो राजा निःसंक्षोभवृत्ति राहून, लबाड जन जसा नाचविल तसा न नाचणारा असा कसा आढळेल !

आस्थान द्विजाचा पुत्र चित्ररथ नांवाचा एक सुज्जीचा आश्रित होता, तो राजाच्या विरुद्ध मंत्र करीत असे. प्रभूचें आरोग्य कसें आहे याची नित्या प्रमाणें चौकशी करण्यास सुज्जि गेला असतां पहातो तों तेथें पहारेकरी ठेवलेले होते. असा अविश्वास झालेला पाहून सुज्जीला खेद झाला. दाक्षिण्य वाम झालें. उलटें फिरलें. तें आरशांतल्या प्रमाणें राजाच्या आशयांत उलटें प्रतिबिंबित झालें. असें पाहून तो पराङ्मुख झाला.

टीपः—दाक्षिण्य वाम झालें. या वस्तुपुढें तें राजाच्या आशयरूपी आरशांत उलटें प्रतिबिंबित झालें अशी प्रतिवस्तु ठेवून येथें प्रतिवस्तूपमा हा अलंकार किती उत्कृष्ट साधला आहे बरें !

राजा बरा झाला. त्यानें सुज्जीचे अधिकार काढून घेतले. राजस्थानाची जागा धन्याला दिली. व त्याच्या वडील भावाला उदयाला कम्पनाधीश केलें. सुज्जीचा पुत्र भागिक, हा लोहर पर्वतावर होता. त्याला काढून राजाचा सावत्र भाऊ प्रेम याला कोष्टधिकार दिले. खेरी येथील अधिकार रिल्हणाला दिले. अमात्यांचा संघ चेंडूप्रमाणें पाडण्यांत व उठवण्यांत लक्ष्मक समर्थ होता. त्याची प्रथा चांगली बसली. सुज्जीचा प्रतिमल्ल असा एक कुष्यमाण (हस्तक) राजमंगल नांवाचा होता. त्याची स्थापना लक्ष्मकानें द्वाराधिकारावर केली. पण अयोग्य अशा माणसांस योग्य माणसाचें काम करण्यांत कोणालाहि नेमतां येईल; पण योग्य माणसाचे जे गुण आहेत त्यांशीं त्या अयोग्य माणसांचा संयोग पंचमहाभूतांनासुद्धां करतां येणार नाहीं. शंकराच्या शरीरावर श्रीखण्डाच्या (चन्दनाच्या) बद्दल अनुचित असें चिताभस्म घाइघाईनें प्रक्षिप्त करतां येईल. पण जो शंकर जगत्रयाचा नाश अथवा उदय आपल्या स्वेच्छेनें घडवून आणतो. त्याला सुद्धां त्या चन्दनाचा गंध त्या भस्मांत उतरवतां येत नाहीं.

टीपः—अयोग्य माणसास योग्य माणासाचें काम करण्यास कोणाला नेमतां येईल पण योग्य माणसाचे गूण त्या अयोग्य माणसांत उतरवतां येणार नाहींत या सिद्धांताला दिलेला शंकरविषयक दाखला फारच सुंदर आहे.

सुज्जि अपमान झाला म्हणून सुस्सलाच्या अस्थी गंगेंत टाकण्याचें निमित्त करून जान्हवीकडे निघून गेला. प्रतिज्ञा करून त्यानें राजपुरीच्या सोमपालाला राज्य देऊं केलें.

लक्ष्मकानें सोमपालाला गाठलें, जयसिंहाची मुलगी त्याला दिली. व त्याची भाची राजाला करून घेतली. दोन्हीं राज्यें सन्धिबद्ध झालीं.

देंगपालाकडे बसलेल्या भिक्षूला आणण्यास सुज्जि निघाला पित्याचा (सुस्सलाचा) वध करवल्यामुळें जयसिंहाचा शत्रू झालेल्या टिक्कानें भिक्षूस आमंत्रण दिलें. तो बाणशाला नांवाच्या, टिक्काच्या जांवयाच्या (भागिकाच्या) खशांच्या राजांच्या, किल्ल्यांत येऊन सुज्जीची वाट बघत बसला.

राजाच्या सांगण्यावरून सोमपालानें सुज्जीला पुन्हां अधिकार देण्याचें व्याज केलें. व सुज्जीला फितवलें. सुज्जीनें राजाकडे तोंड फिरवलें. कम्पनाधीश उदयानें बाणशालेला वेढा दिला. उल्हारयंत्र व धनु, यांवरून दगड व शर इ. विविध आयुधांची वृष्टि नृपचमू खालून किल्ल्यांतून लोकांवर व वरून दुर्गस्थ लोक नृपचमूवर, दगड व भिक्षूचें नामलक्षित शर, यांची वृष्टि करीत होती. नृपचमूनें दुर्गाचें मूळ (पाया) फोडून, सर्वच धान्याचें व पाण्याचे सांठे ताब्यांत घेतले. राजकार्य व भानु लंबायमान होत असतां लक्ष्मकानें टिक्काला धन देऊन फितवलें. आपली अंगुली कापून टिक्क दूर जाऊन बसला. एकादी (कुम्भदासी) कुम्भानें पाणी भरणारी दासी दुसऱ्यानें मनांत आणलेलें फुकट दवडूं शकते.

भिक्षूला बाहेरून मदत येईल म्हणून किल्लेदाराला आनंदाला राजानें मथवून ठेवलें होतें. भिक्षु लढाईला उत्सुक होता. तो आपल्या अन्ताचें भय सोंगट्या खेळून घालवीत होता. तो शस्त्रधारी लोक किल्ल्यांत शिरले. येवढा उरलेला डाव सोडून जसा कोणी कामी कान्तेसह खेळत असतां सुहृत् आला म्हणून त्याला प्रत्युत्तर देण्याकरतां क्षुब्ध झ त्याशिवाय उठतो, तसा भिक्षु उठला. असिधेनु घेऊन बाहेर पडला. त्याच्या मुखवर अहंक्रियेचें हास्य होतें. त्याची दृष्टि, हात, पाय व मन ही एकाच प्रकारें चाल (प्रचार) करीत होती. त्याची चर्या औचित्याला उचितता आणीत होती. अहंकृतीचा अलंकार होती. अभिमानी विभूतीचा उत्सेक होती त्याच्या तोंडावर मृत्यु जवळ आल्याचे दिसत नव्हतें. तो एकदम क्षिप्रपातानें शत्रूच्या जवळ आला. त्यानें युद्ध सुरू केलें. शस्त्रप्रहार होऊं लागले. कुमारीय रक्तिक व मागिक हे वीर जवळ होते. घोर युद्ध झालें. अन्तीं भिक्षु यकृत्पिंडावर बाण लागून तीन पावलें मागें सरून भूवर मागें पडला. याप्रमाणें हर्षनृपतीच्या राजचक्रामध्यें भिक्षूनें मानाचें—अवमानाचें नव्हे—असें स्थान मिळविलें. शत्रूचे सैनिक अहो पुरुषिका (अहो आमचें पौरुष) या अभिमानें त्याला वेढा देऊन राहिले. भिक्षाचर तीस वर्षें नऊ मास वयाचे भोगून, लौ. ४२०६ इ. स. ११३० च्या ज्येष्ठ वद्य दशमीला मृत झाला. त्याचा एक तेजोमय देह अप्सरांच्या संगार्थ अंगात प्रविष्ट झाला. व दुसरा जड पार्थिव देह भूमीवर अग्नींत प्रविष्ट झाला. शत्रूचा अन्त्य संस्कार योग्य रीतीनें करावा अशी आज्ञा राजानें सौजन्यानें दिली.

## सुस्सलाचा (जयसिंहाच्या पित्याचा) सावत्रभाऊ लोठण लोहरचा राजा होतो

वीर पुरुष कृत्ये करून विश्रांतिकरितां जरा मन शिथिल करणार, तों विधि अन्य दीर्घ कार्याच्या भारांचें समर्पण त्यास करतो. घोडयाच्या रिकबींतून दीर्घ दमन करून श्रान्त झालेली बोटें, पहिला स्वार काढून घेतो व घोडयाला वाटतें भागवतारानें सुख होईल तोंच असह्य झालेली त्याची पृष्ठ भू दुसऱ्या स्वारानें अधिष्ठित होते. याप्रमाणें एक रात्रभर राज्य निःशत्रु असतां एक लेख हारक नृपाच्या पुढें शोकमूक होत्साता प्रविष्ट झाला व तो विचारहृदयावरून म्हणाला "ज्या दिवशीं भिक्षु शांत झाला त्या दिवशीं सुस्सलानें आपले सावत्र भाऊ मल्हण व लोठण, हे जे लोहर कोटांत कोंडून ठेवले होते; त्यांतील ज्येष्ठ मल्हण अगोदर मृत झाल्यामुळें उरलेला कनिष्ठ जो लोठण, त्याला कोट्टभृत्यांनीं जबरीनें अभिषेक केला आहे. लोठण त्याचा सुत दिल्ह व पुतण्ये तीन असे पांच बंधनांतून मुक्त झाले आहेत. सर्व कोश त्यांच्या स्वाधीन आहे. आकार, आचार व चेष्टा यांनीं आपली प्रागवस्था नृपानें टाकली नाहीं.

हें वृत्त ऐकून राजानें लोहर येथील एक मंत्री लुल्ल द्वारपति (आनंदवर्धनाचा पुत्र) व रिल्हण यांना किल्ला घेण्यास पाठविलें. बरोबर प्रतीहार लक्ष्मक राजपुत्र अमात्य व हयारोह डामर यांचें संमिश्र व दीर्घ सैन्य दिलें.

भिक्षाचर गेला, आतां सुज्जीचें काम काय, असें समजून राजानें त्याची उघडपणें अवहेलना केली. त्यानें लोठणाचें साचिव्य पतकरलें. हें खरें पण हिमशर्करेप्रमाणें शुक्ल अशा जलपानानें ज्या काश्मीरात अन्न चांगलें पचतें, त्या मृदु स्निग्ध काश्मीराला तो मुकूं शकत नव्हता. शुष्क सतुष सत्वादी बाहेरील अन्नाचा भोग त्याला पार पडत नव्हता. म्हणून ते ते उपाय करून तो पुन्हां काश्मीरांत शिरावयाची इच्छा करूं लागला.

राजाचें सैन्य व सुज्जीचें खश व सैंधव लोकांचें सैन्य भिडलें. राजाचें सैन्य पळालें. सुज्जीच्या सैन्यानें राजाच्या मंत्र्यांचीं वस्त्रें त्याना लुटून हरण केलीं. लालरंगाच्या अधर वस्त्रांनीं वेष्टित असे ते लोक उड्या मारीत अद्रीचें लंघन लंघन करीत असतां लाल तुंगणांच्या मर्कटांच्या गतीचें पाटव मिळविते झाले.

टीपः— या वर्णनांत काश्मीरी विनोद आहे. मूढ प्रतीहारिला (लक्ष्मकाला) पकडून सुज्जी पुढें उभे करण्यांत आलें. तो नुकत्याच पकडलेल्या सरिकेप्रमाणें, घाबरला होता. त्याने आपल्या अश्रूंनीं आपले तोंड झाकलें. "एषनो आर्चितो बृहद्राजः (हा आमचा पूज्य महाराजा) असें म्हणून त्यानें त्याला वस्त्रें दिलीं. व सोमपालाला तो अर्पण करण्यांत आला. सोमपाल हा सुस्सलाचा जामात होता. व द्रव्यलोभानें तो लोठणाचा पक्षपाती झाला होता.

लक्ष्मकाला सोडवून आणण्याकरतां लोठणानें छत्तीसलक्ष दिनार दिले. व सुज्जि द्रव्यलोभानें लोठणाचें साचिव्य पतकरता झाला. भागिकाच्या कन्येशीं लोठणाचा विवाह केला. त्याची विधुरावस्था दूर केली. विश्वास दृढ झाला.

## जयहिन्द लोहर येथें सुस्सलच्या एका पुत्राला (मल्लार्जुनाला राजा करतो)

लोहर येथील भागिक, वृंदारक व दुसरे चाक्रिक लोक, यांनी राजाला कळविलें कीं, सुस्सलाला त्याच्या सहज.ख्य राणीच्या पोटीं जो पुत्र मल्लार्जुन म्हणून झाला आहे त्याला राज्य देऊं पण तुम्ही लोठणाला बंधनांत टाका.

सुज्जीनें पद्मरथ राजाची मुलगी लोठणाला देण्याकरतां आणवली. लोठण तिला दर्पितपुराला सामोरा गेला. ही संधि पाहून चाक्रिकांनीं मल्लार्जुनाला कोट्ट राज्यावर अभिषेक केला.

हा फार खर्चिक होता. यानें एकदां सुपारीबद्दल मोत्यें भरून विडे वांटले. जनतेला उपद्रव देऊन मिळवलेलें द्रव्य शत्रुसात् किंवा अग्निसात् व्हावयाचें. चोर, चाक्रिक, वेश्या, विटादींनीं याच्या खजिन्याची पुष्टलूट चालविली.

जयसिंहानें चित्ररथाला द्वाराधिपाचे व पादाग्राचे अधिकार देऊन मल्लार्जुनावर पाठविलें. मल्लार्जुनानें आपली विधवा माता, चित्ररथाकडे संधि करावयास पाठविली. तिनें वैधव्याला उक्त पण ऐश्वर्याला उचित असा वेश करून आपल्या चक्षूरागानें चपल चित्त अशा चित्ररथादींना सोत्कण्ठ केलें. तिनें खण्डणी देऊन संधि केला.

मल्लार्जुनाला कांहीं काळ पादप्रसादिका ( पाय पसरण्याला वेळ ) मिळाली. मल्लार्जुन अहर्निश मूढ होता. निष्परिपाक प्रज्ञ होता. वाक्प्रौढीमुळें त्याला बालिश लोक, कुशलाशय समजत. अभद्र हेतु धूमकेतुप्रमाणें त्याच्या प्रदीप्त वदनाशिवाय अन्यत्र कांहीं सौष्ठव नव्हतें.

नंतर जयसिंहानें उग्र विक्रमाच्या सुज्जीशीं संधान बांधलें न जाणो उग्रश्री सुज्जीला, मल्लार्जुन आपलासा करील. म्हणून राजस्थानाच्या (न्यायाधीशाच्या) पदाशिवाय, कम्पनाधीशाचें पद त्याला घरीं आणवून सोमपाल बरोबर असतांना दिलें. सुज्जीला संतोष वाटला नाहीं. म्हणून डाव्या हातानें जटाजूटांतील माळ जोरानें काढून अर्पण केली. सुज्जि संतुष्ट झाला. त्याच्या सांगण्यावरून, उदय व धन्य, यांना राज्यांतून घालविलें मनातून नव्हे.

इतक्यांत प्रतिहारी लक्ष्मक मृत्यु पावला. अशा संधीला लोहर घेण्याकरतां राजानें सुज्जीला पाठवलें. मल्लार्जुन कोश घेऊन पळाला. लौ. ४२०८ इ. स. ११३२ वैशाख कृष्ण द्वितीयेच्या दिवशीं वयाच्या १८ व्या वर्षी राज्यभ्रष्ट झाला.

सुज्जि आपल्याबरोबर हर्षट नांवाच्या एका मनुष्याला मण्डळेश्वराच्या जागीं नेमण्यास घेऊन गेला होता. व मण्डळाला स्वास्थ्य येण्याकरतां तेथें राहिला. तेव्हां त्याच्याविषयीं पिशुनांनीं राजाचें मन कलुषित केलें. आश्रित जोंपर्यंत राजाचें समूर आहेत तोंपर्यंत, त्याला खल लोक जाळूं शकत नाहींत. जसें सूर्यकांत मण्याच्या पुढें ठेवलेलें इंधन रवीचे कर जाळूं शकत नाहींत; पण तेंच मागें ठेवलें म्हणजे रविकरांना प्रसार पावण्याला अवकाश मिळून, ते त्या इंधनाला भस्मसात् करून टाकतात.

सुज्जि परत आला. मडव राज्यांत असतां सुज्जीच्या अनुगांनीं एका ब्राह्मणाला लुटलें. तो ब्राह्मण सुज्जीविषयीं कांहीं कठोर बोलला. त्या ब्राह्मणाची रागानें कोल्ह्याप्रमाणें शिकार केली. आम्हांला सुज्जी कम्पनाधीशनको म्हणून मडव राज्यांतील ब्राह्मणांनीं प्रायोपवेशन केलें. राजाला वाटलें आपल्याला दुःस्थितीला औषध सुज्जीच्या मरणाशिवाय नाहीं.

राजानें या कामावर महौजस अशा सज्जपालाची व्यवस्था केली. कपटानें प्रहार करण्याला तो वीर तयार नव्हता. त्यानें कोशपानपूर्वक शपथ घेतली व सुज्जीची मैत्री संपादन केली. सुज्जीनें त्याच्या मार्फत राजाला कळविलें कीं तूं जर आम्हांवर विश्वास टाकून स्वस्थ बसणार नाहींस, तर आम्हीं दुसरा दायद आणून राज्यावर बसवूं. राजा म्हणाला अल्पसत्त्व लोकांपुढें मंत्र केला. राजांना मूर्खपणाचें फळ भोगावें लागतें. खल हे कुत्रीं आहेत. ते जिव्हा लौल्यानें शोभतात. व परपिण्डाचें अपहरण करतात. राजा सुज्जीच्या वधाला सिद्ध झाला.

## सुज्जीचा वध

कुलराज म्हणून व्यायामविद्याख्यात असा राजाचा एक सेनापति होता. त्यानें या सुज्जीच्या वधाच्या साहसाचा अंगीकार केला. कुलराजचें धैर्य अव्याज होतें. त्याचा चेहरा नेहमीं अविकृत दिसे. हा तांबूलवाह म्हणून याच्या हातांत राजानें सुज्जीला देण्याकरतां एक तांबूल दिला. सगण असो अगण असो मी सुज्जीला मारला असें समज असें म्हणून तो बरोबर दोन शस्त्री घेऊन गेला.

वर्दी पोंचवून त्याला द्वारपालानें सुज्जीजवळ नेलें. सुज्जीनें राजाकडील तांबूल वंदन करून घेतला. कुलराज म्हणाला "कुणी एकशस्त्रभृत् कैवर्त माझा आश्रित आहे. त्याला द्वारप्रवेश होण्याची आज्ञा व्हावी. व त्याच्या तोंडून विनंति ऐकावी." परंतु "आज जा! सकाळीं आम्हांला काय करावयाचें तें करूं" असें म्हणून पाठ फिरवून सुज्जि विश्वासानें पलंगावर वपु टाकून राहिला. तेव्हां कांहींसें मागें परतून जवानें क्षुरी काढून कुलराजानें सुज्जीच्या डाव्या कुशींत ती खुपसली. नोकरांशीं झालेल्या झटापटींत, कुलराज सुज्जीचें डोकें कापून पळाला. हा विप्लव लौ. ४२१९ इ. स. ११३२ च्या आषाढ शुद्ध पंचमीला घडून आला.

कुलराजाची संभावना त्याला नगराधिप करून राजानें केली. चित्ररथाला राजानें द्वारेश पदावर स्थिर केलें.

कोष्ठेश्वरानें सैन्य उभारलें. त्याचा पराभव द्वारेशानें (चित्ररथानें) केला. हा कोष्ठेश्वराच्या पुढील अनेक पराजयांचा मंगलोंकारच झाला व वेळींच तयारी ठेवणें. रात्रीं जागरण करणें, सैन्याशीं साम करणें, नाना युक्त्या करून वेळ येईल तशा त्या योजून अथवा सोडून मिळालेल्या भूमीचा त्याग न करणें इ० विजुगीषू द्वारेशाच्या गुणांनीं कोष्ठेश्वराला राज्यांत कोठें थारा मिळाला नाहीं. तो

संचारशून्य झाला. छिन्नच्छद झाला, पाय ठेवावयाला जागा उरली नाहीं.

कोष्ठेश्वर मग गंगा नदीवर स्नानाला गेला. त्यावेळेस मल्लार्जुन सूर्यग्रहणानिमित्त कुरुक्षेत्राला गेला. दोघांची भेट झाली. कार्यपरत्वें दोघे एक झाले त्यांच्या मागें राजानें ठक्कूर लावून ठेवला.

हें सूर्यग्रहण कुरुक्षेत्रांत ठाणेश्वरांत इ. स. ११३४ मध्यें दिसलें असें लेले म्हणतात.

## चित्ररथावर ांतिक हल्ला

चित्ररथ कर वाढवण्याचा आग्रह धरी. ब्राह्मणांनीं प्रायोपवेशन केलें. चित्ररथाच्या आश्रितांनीं धर्मधेनूचीं रानें जप्त केली. कारुण्यप्रवण एका गोपानें प्राणत्याग केला. भट्टउद्भट वंशांत विजयराज म्हणून एक तरुण पृथ्वीराजाचा पुत्र होता. तो ही विषमदशा पाहून आपल्या भावाला म्हणाला, "या दण्ड्याला दंड केला पाहिजे, कधीं लोह अश्माला पाडील तर कधी अश्म लोहाला पाडील. वधा शिवाय या चित्ररथाल दुसरा उपाय नाहीं. सर्वांवर उपकार करण्याकरतां एका क्षुद्राचा नाश करणें हा धर्म आहे. सर्व जन्तूंचा अन्तक अशा अजगराला जनानें मारलें. त्याप्रमाणें अशा दुर्वृत्ताचें जर आम्हीं दमन केलें; तर जनांतून दुसरा कोणी तेजस्वी पुरुष पुढें येऊन मारील या भीतीनें पुन्हां कोणताही अधिकारी पुरुष प्रजेचें पीडण करणार नाहीं. या कार्यानें जर अनेक जीव सुखी होतील तर हे बन्धो ही वणिज्या मोठी नव्हे काय? भावानें होय म्हणून त्याला तीर्थजलाच्या शपथा व्हावयास लावलें.

संधि साधण्यास विजय राजाला जागरणें पडलीं. जनसंबंधात चित्ररथ एकवेळ दृश्य होई, एकवेळ अदृश्य होई, विजय राजाचें नैष्ठुर्य अचल होतें. एकदां राजवाड्याच्या पायऱ्या चढून जात असतां चित्ररथाच्या मागोमाग जाऊन विजय राजाने त्याच्या डोक्यावर प्रहार केला. मेला असें समजून त्याच्यावर दुसरा प्रहार केला नाहीं. त्याचा भाऊ लोटराज धांवत जाऊन एका नर्तकीचें थान तोंडांत धरून तिला शरण गेला. तुझा आहे. असें समजून मला राख असें म्हणाला.

टीपः—एकाद्या मनुष्यावर दुसऱ्याच्या स्त्रीशीं गमन केलें असतां तो अपराधी तें नाकारून शपथा वाहूं लागतो. तेव्हां अन्य पुराव्याच्या अभावी त्या अपराध्याला त्या स्त्रीचें थान चोख असें लोक म्हणतात. आरोपी कचरला, म्हणजे त्याचा अपराध सिद्ध धरतात. कारण तो तिला आई म्हणावयाला कबूल नसतो.

द्वारेशाला कोणी मारलें अशी अन्वेषणा राजानें चालविली असतां, तो मी असें विजय राजानें दाखवून दिलें. विजयराज मारला गेला तेव्हां "परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृतां। धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे," हा श्लोक वर लिहिलेली. व आपल्या कृत्याचें कारण दाखविणारी पत्रिका त्याच्या करांत मिळाली. व त्या श्लोकामुळें त्याची पावनी प्रशंसा झाली. बरेच दिवस शयनतलावर पडल्यावर चित्ररथाचें क्षत बरें झालें.

## मल्लार्जुन राजाला शरण जातो

सावर्णिक गांवांत मल्लार्जुनाला ठक्कुरानें पकडलें. उदय सेनापति त्याला आणावयास गेला. मल्लार्जुन उदयाची स्तुति करीत त्याला म्हणाला. "आपल्यासारखा रक्षामणि मला मिळाला नाहीं म्हणून माझी अशी हानि झाली. कोणी प्रौढ कवि पद व अर्थ याची प्राप्ति होऊन पद पुरें करण्याच्या प्रसंगीं मूढ होतो तसा मी थोर पद (पदवी) व अर्थ (द्रव्य) उपभोगानें त्याची पूर्ति होण्याच्या वेळीं मूढ झालों. आपण आतां सत्यंकार व्हा, व जिचा अन्त चांगला होतो अशी स्थिति मला एक वर देऊन आणून दाखवा." असें म्हणून त्यानें द्वारपतीच्या पुढें एक स्फटिकाचें लिंग स्पर्श करण्याकरतां आणून ठेवल. याला लढावयाचें आहे असें समजून उदयानें त्याला लिंगाला स्पर्श केला. मल्लार्जुन म्हणाला, जीव घेतल्याशिवाय राजाजवळ मी तुला नेईन अशा वर मी तुझ्याजवळ मागतों. "हें कार्पण्योपहत वच ऐकून सर्व लोक त्रपाजड झाले. त्यांचें हृदय आर्द्र झालें. राजाच्या पाठच्या भावाला (मल्लार्जुनाला) नैर्घृण्य दाखविणें इष्ट नाहीं असें त्यांस वाटलें. पांचालीच्या केश कर्षणादी गोष्टी ऐकून, श्रोत्यांना पाण्डवापेक्षां धृतराष्ट्राचा राग अधिक येतो, पण त्याच श्रोत्यांना दुःशासनाच्या रुधिराचें केलेलें पान आणि ऊरुभग्न झालेल्या दुर्योधनाच्या मूर्ध्यावर, भीमानें केलेलें ताडन ऐकून पांडवांचा द्वेष वाटूं लागतो. तटस्थ राहून तमाशा पाहणाऱ्यांचा अनुभव बदलत असतो. राजानें अभय देऊन मल्लार्जुनाला लौ. ४२११ इ. स. ११३५ आषाढ शुद्ध पौर्णिमेला एका मठांत कैदेंत ठेवलें.

टीप:—आरंभीचा कविविषयक व शेवटचा धृतराष्ट्र विषयक असे दाखले फार समर्पक आहेत.

मल्लार्जुन राजाला म्हणाला, "चित्ररथ व कोष्ठक हे दोघेजण द्रोही आहेत, त्यांना ठार मारलें पाहिजे. या उद्यमाला राजानें स्वतां स्पर्श केला. कोष्ठकाच्या लोकांची व राजाच्या लोकांची झटापट झाली. त्यांत कोष्ठकाला मानेवर क्षत झालें. त्याला बन्धनांत ठेवण्यांत आलें. नंतर अशी एक गोष्ट घडली तशी आम्हीं पाहिली नाहीं किंवा ऐकिली नाहीं. तुझा पति भेटेल अशी आपल्या बन्धूची उक्ति न जुमानून तिनें अग्नि प्रवेश केला. मग कोष्ठकाचा व्रण कृमिसात् होऊन त्याला मृत्यु आला. तेव्हां अभिमानानें त्याचें शिर वर केलेलें होतें. कारण डामरांच्या वधूना वैधव्य प्राप्त झालें असतां द्रव्याकरतां साध्या ग्रामाधिकाऱ्यांना नितंब

भोगभोगी करीत. नंतर चित्ररथाचें नानाभूयिष्ठ द्रव्य राजानें लुटलें. चित्ररथ मरण्याच्या इच्छेनें सुरेश्वरीला गेला. तेथें तो मर्मव्यथेनें कथाशेष झाला. चित्ररथ एकभार्य होता.

टीप :—पुरुष एकभार्य असल्याची ही नोंद सर्व ग्रंथांत एकच दिसते.

## जयसिंह व त्याचे सेवक यांची धर्मकृत्यें

द्राक्षांना माधुर्य जुनेंपणानें येतें. तसें राजांना मनोज्ञत्व जुनेंपणानेंच येतें. पुरवासी जनाकडील पुत्रोत्सव, विवाहादि प्रसंगीं तो उपयोगी वस्तूंचें दान करी. जे लाकडाचे कर राजांची धनवृद्धि करतात. ते लोकांच्या स्वाधीन करून त्यानें सर्व पूर नवीन करून घेतले. कोश रत्नादिकांवर प्रजेचा हक्क आहे असें राजानें ठरविलें म्हणून पौर तेते उत्सव करीत. याचा रिल्हणमंत्री, कृष्णाजिनें, सवत्सगोदानें, धर्मकन्या विवाह इ. धर्मकृत्यें करी. यानें एक यज्ञ केला. त्यांत याच्या चौसष्ट जातींस, भव्य भोग भोगण्याला मिळाले. हा राजाचा पूर्वपथिक ( मार्गदर्शक ) झाला.

## स्वामिभक्त मार्जारी

जयसिंहाची प्रिय कान्ता सुस्सला हिची एक मार्जारी होती तिचें तिर्यक् जातीला उचित असें प्रेम सुस्सलेवर होतें. सुस्सलेचें पतीशीं जरा कालुष्य उत्पन्न झालें, तर ही क्रीड मार्जारी तिच्याजवळ पुढें मागें माणसाप्रमाणें सारखी राही. सुस्सलेला यक्ष्मा नांवाचा रोग जडला. तीर्थांत देह ठेवण्याला ती गेल्यापासून ही मार्जारीसारखी ओरडत राहिली. पुढें आणलेल्या भोज्याचा त्याग करून जीविताचा तिनें त्याग केला. सुस्सलेच्या नांवानें बांधलेला विहार ती मृत झाल्यावर या मार्जारीच्या नांवानें ख्याति पावला.

## कांहीं धर्म भोळेपणा

या राजाच्या राज्यांत रात्रीं राक्षसांची भूतवेतांळांची भाषा ऐकूं येई. धूमकेतु इत्यादि उत्पात झालेले दिसत. पण प्रजेला त्रास होत नसे.

## लोठणावर ( काकाची ) जयसिंहाची स्वारी

लोठण आपली उत्थानेच्छा अखण्डित ठेवून, सबान्धव कृषिकर्म व वाणिज्य करून होता. त्याचा पार्श्वलिप्सु (पाठ राखणारा ) अतिक्षुद्र असा जनकभद्र नांवाचा एक मित्र होता. यांच्याकडे दुर्लक्ष झालें. यानीं उत्पिंज (बंड ) आरंभिलें त्यांच्या बरोबर डामर, अलंकारचक्र, सुस्सलाचा पुत्र विग्रहराज व सल्हणाचा पुत्र भोज हे होते. बंड मोडण्यास उदय व धन्य या द्वारधिपतींस, राजानें पाठविलें. उदयानें बहु दिवसांनीं उल्लंघ्य असा मार्ग एक दिवसांत उलंघिला म्हणून अलंकार चक्राच्या अमूल्य कन्या ( अ.पा ) असिद्ध झाल्या. लोठणानें मधुमती व सिंधु यांच्या मधील शिर:शिला या नावाच्या किल्ल्यांत आश्रय घेतला.

## शिर:शिला किल्ल्याचा वेढा

उदयानें दुर्गस्थ ( द्वाराशीं ) राहून मागील मार्ग रोखण्याची पुच्छपद्धति स्वीकारली. हटानें हल्ला करणें व रणांत झटापटी करणें, हीं वर्ज केलीं व शत्रूला शोषण्याचें चालू ठेवलें. मधुमती तीरावरचा द्रुमसंबाध नाहींसा केला. नगरस्पर्धिनी झोंपड्या बांधल्या व कटक प्रबल केलें. संभार प्रेषणाचें कार्य अखंडित चालू ठेवलें. किल्ल्यांतील लोकांची जीवधासार ( रसद ) तोडणें वगैरे दैव्यदायी उपायांनीं किल्ल्यांतील लोकांचें कांहीं वाकडें झालें नाहीं. कृषीवल शेती सोडून व द्विज वेद सोडून, हातांत शस्त्र घेऊन होते. सर्वत्र हिमाची म्हणजे काळरूप कापसाची गोधडीच पसरली होती. तिच्या भीतीनें जन व राजसेना सारखीच कांपत होती. दगडांचा वर्षाव करून व पाणवठ्याचें रक्षण लोठण करीत होता. किल्ल्यांतील लोकांनीं श्लिष्ट दरवाजे लावले. तो किल्ला मीलिताक्ष ( डोळे मिटून बसल्याप्रमाणें ) दिसूं लागला.

टीप:—राजा जॉन या नाटकांत शेक्सपियरनें घाईघाईनें लावलेले किल्ल्याचे दरवाज्याना किलकिले केलेल्या नेत्रांचीं उपमा दिली आहे.

निद्राच्छेद करण्याकरतां रात्रौ एकमेकांना ओरडून हांका मारतांना किल्ल्यांतील लोकांना झोंप आली नाहीं. भोज रात्रीं निसटून जाण्याच्या विचारानें पहातो तो खाली शिबिरांत सैनिक शेकोट्या पेटवून जागत आहेत असें त्यास आढळलें. लक्षांत आल्याशिवाय पीपिलिकेलासुद्धां मुख्य मार्गानें जाणें शक्य नव्हतें.

रात्र गेल्यावर एका डामरासह कमरेला दोरी बांधून एका कड्यावरून पुढें आलेल्या प्रतर्दिकेवर एका डामरासह भोज उतरला. आसनापुरती दोघांना जागा होती. पडण्याच्या भीतीनें पांच रात्रीं त्यांनीं निर्निद्र घालविल्या. सक्तुपिंडावर प्राणयात्रा करून तेथूनच ते घरट्यांतील पक्ष्यांप्रमाणें विष्ठा विसर्जन करीत. सहाव्या दिवशीं घनांनीं तुषारवृष्टि चालवली. तेव्हां त्यांनीं दंतवीणा वाजविण्याचा उपक्रम चालविला. अरिकटकाच्या जाळयांत पक्षांप्रमाणें पडूं असें त्यांना वाटलें. कंपुत्कुर्वः ( कोणाला हाक मारूं ) असें ते म्हणाले. मग त्यांना डामरांनीं वर ओढून एका रिकाम्या घरांत नेऊन ठेवलें. लोठण व विग्रहराज याची स्थिति अधिक वाईट होती. ते अपूप खाऊन होते. अन्नसामग्री क्षीण झाली होती व यशस्कर या नांवाच्या सेवकांना अन्नदानानें वश करून धन्यानें भृत्य भेदनीतीनें आपलेंसें केलें. त्यांनीं लोठण व विग्रह यांना शत्रूला विकण्याचें ठरविलें. एकाद्या कथाशरीराचा

(कथानकाचा) शेवट नीट करणारा अप्राप्य असतो तसा भानगडीच्या कार्याचा शेवट करणारा मंत्रीहि अप्राप्य असतो.

लोठण व विग्रह राज यांना तेजानें सोडलें. तें त्यांस पुन्हां प्राप्त झालें नाहीं. निर्वीर्य वानरेंधन अग्नीसंगानेंहि जळत नाहीं. निद्राभग झालेल्या अर्भकाप्रमाणें उद्वेगामुळें बाहेर ओंठ काढून रडावयाची इच्छा लोठण करूं लागला. लोठणाला डामरानें अलंकारचक्रानें राजाच्या मंत्र्यांच्या स्वाधीन केलें. त्यांना दया आली. ते म्हणाले महाराज सौजन्यसुधेचे सिंधुच आहेत. अपकार करणारे असे विपद्ग्रस्त परके लोक आपल्या क्षमेची परीक्षा करण्यास कारण होतात, म्हणून ते त्यांस उपकारीच समजतात.

लोठण जीर्ण कम्बल पांघरून, गोठ्यांतून जसा बलिवर्द तसा राजाकडे निघाला. लोकांना तो गुहेंतून घालविलेला घुबड वाटला. लोठण राजाला शीतार्त गाईप्रमाणें दिसला. लोठणाला पृथ्वी भ्रान्त झाल्यासारखी दिसली. व पर्वत पर्यस्त होऊन पडत असल्यासारखे वाटलें. राजापुढें कसा उभा राहूं याचा विचार करून तो क्षितीवर जानू टेंकून राजाच्या पदकमलावर मूर्धा ठेवून राहिला. राजानें हस्तस्पर्श करून त्याचें शिर वर उचललें. भिऊ नको असे म्हणणें दर्पोक्ति होईल, पुन्हां सुखाची प्राप्ति होईल या म्हणण्यात गांभीर्य नाहीं. माझा राग गेला असें म्हटलें तर पूर्वीच्या सर्व वैराचें विस्मरण झालें असें होईल. तूं आमचा बान्धव आहेस या वाक्यानें थट्टा केली असें होईल. तुम्हीं दुःखानें कष्टी अहांत अशा सांगण्यानें स्वतांचा प्रभाव दाखविणें होईल. असा विचार करून राजा कांहींच बोलला नाहीं.

टीप :—वरील राजाच्या स्वभाववर्णनांत त्याचा धीरोदात्त पणा व्यक्त होत आहे. पुढें विग्रह राजाचाहि राजाशीं असाच भेटीअन्तीं सन्धि झाला.

## भोजाशीं जयसिंहाचें युद्ध

लोठण व विग्रहराज यांच्या ओष्टद्वयांतून मंत्रवित् जयसिंह राजानें गारुड्यांप्रमाणें राष्ट्र ओढून काढलें. तरी त्याला दंश करणाऱ्या भोजाच्या दातांची चिंता होती.

डामरानीं वितर्दिकेवरून वर ओढून काढल्यावर भोज किल्ल्यांतच एका शून्यगृहांत वसति करून होता. आपला लोठणाप्रमाणेंच विक्रय होईल, या भीतीनें तो तेथून एका रात्रीं निसटला. वाट चालत असतां त्याला दुर्गावरोह प्रसृत असतां अप्रसृत वाटे. ऊर्ध्वावरोह असतां वारंवार अधोगति आहे असें वाटे. तो दुर्गम वाट किल्ल्याशीं मधुमतीच्या तीरानें आला. अभिर्तानें त्याला सामुग्री पुरविली दरदांच्या राजानें विद्धसिंहानें छत्रचामरादि प्रक्रिया पुरवली. स्वकोशाचें स्वामित्व दिलें. हिमालयाच्या खोऱ्यांतले म्लेंच्छ आणून दिले. रजाद्वयांत राहून भोज राज्याभिमान झाला. राजासारखा वागूं लागला.

## रिल्हणाचा पराक्रम

राजाशीं वेतनांत झलेला कलहराचा ओजस्वी मुलगा राजवदन भोजाला मिळाला. जनाची उत्क्षेपेच्छा सतशाखी झाली. त्रिलक डामरानें बंड केलें. मंत्री अलंकार, दस्यूशीं समेट करतो. म्हणून राजानें त्यास दूर केलें. पृथ्वीहराचा पुत्रचतुष्क व कोष्ठकाचा धाकटा भाऊ हे राजाच्या कारागृहांतून पळाले व त्रिल्लकाला जाऊन मिळाले. गर्गाचे पुत्र श्रीचन्द्र व जयचंद्र यांचे वेतन राजानें बुडविलें म्हणून ते बंडांत सामील झाले. भोजाला वाटलें मही हस्तगत झाली.

याच्या विरुद्ध लढण्यास, राजानें कम्पनेश, उदय, रिल्हण व गर्गपुत्र षष्ठचंद्र यांना पाठविलें. काळ येताच साळू जशी पिसांचे बाण सर्व दिशांनीं सोडते तसे कर्म रिल्हणानें आरंभिलें. तों पर्जन्य वृष्टीनें जलस्थलें सारखीं झालीं. वर मेघांनीं भरलेलें अम्बर व खालीं दूरवर जलानें पूर्ण भरलेलें भूतल, यांच्यामध्यें विजली स्फूर्त होत होती. शिवण घालीत होती. राजपक्षीय रिल्हण याचें सैन्य त्याला सोडून पळालें; तरी तो एकटाच शत्रुसैन्यांत घुसला. तृणमणि (अम्बर) घांसला म्हणजे त्यावर तृणें येऊन चिकटतात. त्याप्रमाणें त्याच्या खड्गावर शत्रूचा खड्ग घांसला म्हणजे त्याच्या खड्गावर शत्रु शिरें चिकटत. तो मृत्यूच्या मुखांत संप्रविष्ट झाला. आणि कोठल्या तरी मार्गानें बाहेर पडला. जसें तिमि माशाच्या श्रोत्ररंध्रांतून पाणी बाहेर पडतें तसा. रिल्हणावर चतुष्कानें मागाहून येऊन हल्ला केला. रिल्हणानें दोहोंकडून मारा करणारें अरिसैन्य पाहिलें तरी दुतोंड्या साप पाहून मोर जसा संभ्रमपावत नाहीं व उलट नाचावयासच लागतो. तसा हा आनंदानें नाचावयास लागला. व शत्रूच्या दोन्ही सैन्यांना पर्यायानें मुख व पृष्ठ दाखवूं लागला. घोड्यावर स्वार होऊन तो साळ्याच्या घोड्याप्रमाणें इकडून तिकडे फिरत होता. शेवटीं त्यानें रन मार्गानें अरीला पळविलें.

टीपः—सर्वत्र बाण मारणाऱ्या रिल्हणला दिलेली साळूची उपमा; वर आकाश व खालीं भूतल यांना वीज जणूं शिवण घालीत होती ही उत्प्रेक्षा; शत्रु शिरें डकवून घेणाऱ्या रिल्हणाच्या खडगाला अंगावर तृण डकवून घेणाऱ्या, तृणमणीची उपमा; शत्रुमुखांत शिरून कोठल्या तरी मार्गानें बाहेर पडणाऱ्या रिल्हणाला, तिमिमत्स्याच्या श्रोत्र रंध्रांतून बाहेर पडणाऱ्या पाण्याची उपमा; दोहोंकडून झालेल्या अरीच्या माऱ्याला न भिणाऱ्या रिल्हणाला दुतोंड्या सापाला पाहून न भीतां उलट नाचणाऱ्या मोराची उपमा; इकडून तिकडे अरीच्या सैन्यांत स्वार होऊन फिरणाऱ्या

त्याच रिल्हणाला दिलेली चोंट्याची उपमा असं उत्कृष्ट अलंकार एका वर एक रचून कवीनें आपली असामान्य निरीक्षण शक्ति दाखविली आहे. तिचें केवढें हि केलेलें कौतुक अपुरेंच ठरेल. रिल्हणाचें शौर्यहि असामान्य खरेंच !

नाग हा समृद्ध डामर होता. त्याची भिक्षूच्या युद्धांत उपेक्षा झाली होती. म्हणून आपण करावयाचें बंड दुसऱ्यानें केलेलें पाहून त्याला शोक झाला, जसा आपला अर्थ दुसऱ्यानें आणलेला पाहून कवीला होतो तसा.

राजाचा शत्रु जो भोज, त्याला आपल्या पक्षाला आणण्या करतां, नाग त्याला म्हणाला " राजवदनाला सोडून तूं माझ्या पक्षाला ये. कामधेनूला सोडून शेळीच्या गळ्यांत मिठी कोण मारील ? "

राजवदनाची प्रतिष्ठा कमी करण्या करतां, राजाच्या पक्षाला नाग मिळाला. लोक प्रिय किंवा अप्रिय, मित्र किंवा शत्रु होतात, ते सर्व स्वकीय तात्पर्यामुळें होतात. त्यांना स्नेह किंवा वैर यांतलें कांहीं ठाऊक नसतें. मधुदान देऊन जें कमळ भ्रमराचें पोषण करतें त्याचा नाश हत्ती करतो. म्हणून हत्तीचा द्वेष भ्रमर करीत नाहीं कारण हत्तीच्या मद–दानाचा आस्वाद भ्रमराला घ्यावयाला मिळतो.

टीप :—कवीची प्रतिभा येथें सारखी तापत गेलेली दिसते. आपलें बंड दुसऱ्यानें केलें म्हणून नागाला झालेल्या शोकाला, आपला अर्थ दुसऱ्यानें आणला म्हणून कवीला झालेल्या शोकाची उपमा; राजवदन हा शेळी व नाग हा कामधेनु या शब्दांनीं ध्वनित केलेला दृष्टान्त; व स्वार्थाकरितां लोक स्नेह किंवा वैर करतात याला भ्रमर व हत्ती यांचे दिलेले दृष्टांत फारच आल्हाददायक आहेत.

भोजाचे अनुयायी भोजाला घेऊन डोंगरांत पळाले. राजवदनाला दोरी तुटून विहिरींत पडल्यासारखें झालं. भोजानें पळतां पळतां युद्ध चालू ठेवलें ही त्याच्या धैर्याची मोजणी झाली.

भोज व अलंकारचक्र यांना धरूं जाणारं राजाचें सैन्य यांचा न्याय चिखलांतून पळून जाणारा ककच पक्षी व त्याच्या मागें लागलेला व्याध यांच्या न्यायासारखा झाला.

भोज क्षीणार्थ झाला. ज्यानें वृत्ति मिळेल तें करण्याचें त्याचें मनांत आलें. राजकारण रहाटाच्या दोरीप्रमाणें फिरत होतें. राजा जणुं बुद्धिबळांचा डाव खेळत होता. लोठण व विग्रहराज हे दोन मोठे मोहरे घेऊन राहिलेला मोहरा जो भोज तो घेण्याकडे तो लक्ष देत होता. त्याकरतां वाजी व प्यादीं ( घोडदळ व पायदळ ) हीं बळि देण्यास तो सज्ज होता. म्हणून भोजाचे लोक जें जें मागत तें तें देऊन भोजाशीं संधान बांधण्याचें तो पहात होता.

नाग या डामराचें राजवदनाला भय वाटत होतें. राजाचा डाव लक्षांत घेऊन, राजवदनानें द्वारपति धन्याला कळविलें कीं तुम्ही राजवदनाला माझ्या स्वाधीन करा. म्हणजे मी भोजाला तुमच्या स्वाधीन करीन. त्याप्रमाणें भोजाचा निष्क्रय करून विक्रय नागाला धरून आणण्यांत आलं. त्याला जयचंद्रानें वैर साधून कपटानें मारलें.

भोजाचें मन राजवदनाविषयीं शंकित झालें. संघ्र घरट्याच्या वाटोळें बांधलेल्या जाळ्यांत, कोटल्याहि रंध्रानें बाहेर पडलें तरी; पतन हें आहेच. हें कळून आलेल्या पक्षाप्रमाणें राजसैन्यानें सर्व बाजूंनीं वेढा गेल्यामुळें भोज तडफडूं लागला.

भोजाला या समयीं एक समरांत क्षत झालेला ब्राह्मण भेटला. भोज ह्याचें समरांत रक्षण करूं शकला नाहीं म्हणून त्यानें भोजाची निंदा केली. स्वतःच्या दुःखानें आर्त झालेला भोज, त्याच्या दुःखानें व्यथित झाला. आधींच उग्र असलेल्या एकाच्या दुःखाचें, दुसऱ्याचें दुःख अनुषंगिक होतें. कमलाच्या कोषांत बद्ध झालेल्या मधुपाला चक्रवाकाच्या विरहार्त स्वरानें अधिकच दैन्य प्राप्त होतें. भोज म्हणाला, " हे ब्रह्मन् मी निंद्य नाहीं. उलट माझी तुला दया आली पाहिजे. इतक्या विषम स्थितींत मी सांपडलों आहे. " ब्राह्मण म्हणाला, " हे राजपुत्रा ! आपलें प्राण संकटांत टाकून, प्रजेला नाना प्रकारची पीडा देऊन आपले कोणतें कार्य साधणार आहेस तें सांग ! जो तुला जेतव्य वाटतो तो अग्निशौच सारंगाप्रमाणें, शत्रूच्या शौर्यरूप अग्नींत उडया मारून, स्वतःची शुद्धि करून घेतो. ज्याच्या पुढें पृथ्वीहर व अवतारी भिक्षाचर हे जित झाले. त्याच्याशीं युद्ध करणार कोण बरें क्षुद्रप्राय वाटणार नाहींत ? द्वैराज्य जीवींच्या ( राज्यांत भेद पाडून पोट भरणाऱ्यांच्या ) कृती तूं जाणतोस. पृथ्वीचा भार वाहणाऱ्या नागाच्या कुलांत जन्मलेल्या, पकडलें जाऊन पटींत कोंडलेल्या, व तोंड वासून आंत पडेल ते गिळून असलेल्या सर्पांना गारुडी पेट्यांतून बाहेर काढतात, तें लोकांना भिवविण्याकरतां असते. स्वतःचें पोट भरण्याकरतां असतें, सर्पांना खावयाला घालण्याकरतां अथवा त्यांचे यश वाढविण्याकरतां नसतें. "

राजाचें प्रसाधन करण्याचा मार्ग भोज शोधूं लागला. तेव्हां भोजाला केव्हांतरी भेटलेला असा एक जयसिंहाच्या पक्षाचा चारण भोजाजवळ येऊन जयसिंहाची स्तुति करूं लागला. भोजाचें मन द्रवलें. दोघांच्या भाषणांतील दैर्घ्य संक्षिप्त करावयाचें म्हणजे एवढेंच सांगणें कीं एक आप्त संधीचें बोलणें करावयास जयसिंहाकडे पाठविणें इष्ट आहे असें ठरलें. भोज पोरका असतां त्याचें मातृकृत्य ज्या धात्रीनें केलें त्या स्त्रीत्वामुळें अप्रतिम दिसत असलेल्या नोना नावाच्या धात्रीला भोजानें

राजाकडे पाठविलें. भोजाची इच्छा मान्य करून राजानें आपल्या निर्मत्सर पट्टराणीला कल्हणिकेला तारमूलक येथें अमात्यांसह पाठविण्याचें ठरविलें.

राजधर्म पाळतांना कांहीं क्रूर कर्मे करावी लागतात, म्हणून प्रस्थानसमयीं ती म्हणाली. "शत्रूवर विश्वास ठेवण्यापूर्वी विचार करावा. अमानुषांच्याच ठिकाणीं उन्मेष पावणारी जी शेमुषी बुद्धि ( दुसऱ्याच्या मनांतील खोल विचार जाणण्याची शक्ति ) तींत विग्रहन करण्याचें तूं बघतोस, तें शक्य झालें तर मनुष्यांचें मर्त्यधर्मत्व कोठें राहिलें ! भोजानें हिमालयांत हिम विक्रय चालविला आहे. हल्लीं प्राकृत जनांत मदादोष वाढला आहे. ते क्षमाचें ग्रहण करीत नाहींत आपण व दुसरा यांतील अंतर जाणीत नाहींत. राणीच्या शंका शांत केल्याशिवाय राजाने तिची रवानगी केली कांहीं डामरांस राजवंदन निमित्त काढून संधि न होऊं देण्याच्या तयारींत होता. त्याचें निवारण भोज करीत होता. राजाचें रंजन करणारे विट आतां संकटाचे काळीं वैकल्य पावून पळाले.

## राजाच्या विटांस कवीचा शेवटचा रामराम

ज्याच्या ज्याच्या राष्ट्रांत दुंदुभिरवानें घोष केला जातो, तें तें हे रंजक राजाच्या कानांत गुप्त म्हणून सांगतात. मर्माचें कर्तन करणाऱ्या ज्या गोष्टींचा उच्चार अरि सुद्धां करणार नाहीं, त्या गोष्टी हे श्लाघापूर्वक सांगतात. शाठ्य व मौर्ख्य यांचे कोठे निधी असतील, तर ते हे राजाचे रंजक जन होत. भाण्ड ( विदूषक ) तांडवनृत्य मंडपांत, कन्याकवि ( गोंधळ्या कवि ) कटुकथा विणण्याच्या कार्यांत; खटाकू नांवाचा प्राणी पर्वताच्या भूगर्भांत; व विट पिण्डीशूरतेनें ( परपुष्टतेनें ) राज मंदिरांत पटुत्व दाखवितात; पण अन्य ठिकाणीं दृश्य झाले म्हणजे ऱ्हादाच्या पाण्यातून बाहेर पडलेल्या कांसवाची तुलना पावतात हें विचित्र आहे.

## युद्ध कार्याचा गोड शेवट

इकडे नदीच्या एका तीरावरील झाडींत भोज श्रान्त होऊन ठाण देऊन बसला. दिवसहि पर्वताच्या शिखरावर विसावा घेत बसला. दिवस व रात्र यांच्यामध्यें मध्यस्थपणा संध्येनें पतकरला. व हात जोडलेल्या सर्वजनांस वंद्य झाली त्या प्रमाणें कल्हणिका राणीनें भोज व राजा या मध्यें संधि-करण्याचा मध्यस्थपणा पतकरला व हात जोडलेल्या सर्वजनांस ती वंद्य झाली. तिकडे पैल तीरावर धन्यादी राजभृत्य, कार्याच्या शेवटाची वाट बघत बसले.

टीपः— एकीकडे मानव सृष्टींत चाललेल्या दोन युद्धमान राजांचा संधिकरण... काल व दुसरीकडे निसर्गाच्या सृष्टींत दिवस व रात्र ... तील संधिकाल व राणीचें संध्येप्रमाणें मध्यस्त होणें व ... होणें हे देखावे फार रम्य आहेत.

रात्र सरतांच तरूषण्डातून मितपदातियुक्त, असा एक वीर पालखींत बसून बाहेर आला. सर्व बाजुनी येऊन त्याला अडविणाऱ्या डामरांचे ओघ तो आपल्या दृष्टिक्षेपानें प्रतिहत करीत होता. धन्यादी त्याच्या वाटोळे जमले. मंत्र्यांनीं भोजाला राणीकडे नेलें. काककुलांतून पिकाला दुसरे पिक काढून नेत असतां काक जसे आक्रोश करतात, तसा आक्रोश कांहीं लव न्यांनीं केला. राणीकडे गेल्यावर तिला भोजानें वंदन केलें. प्रिय पुत्राप्रमाणें तिला अभिवंदन केलें. तिच्या अव्याज्य माधुर्यादी अकृत्रिम गुणांनीं राजाचें शीलहि विशद आहे असें भोजाला वाटलें.

मुखरागो मनोवृत्ते र्द्वारोज्वल्यं गृहश्रियः

भर्तुःस्वभावस्याचारो योषितामनुमापकः ॥

अर्थः— मुखरागावरून ( चर्येवरून ) मनोवृत्तीचें, दारांच्या औज्ज्वल्या वरून गृहलक्ष्मीचें व स्त्रीच्या आचारावरून भर्त्याच्या स्वभावाचें बरोबर अनुमान करतां येतें.

टीपः या सिद्धांतांत केवढें मार्मिक व भव्य सत्य आहे ! पतीनो ! या पासून योग्य तो धडा घ्या !

नंतर तो राजाला भेटावयाला राजसभेंत गेला. भोजाच्या पायांना स्पर्शकरून भोजानें आपली तरवार त्याला अर्पण केली. राजा म्हणाला, "तू समरांत जित केलेला नाहींस. तुझं शस्त्र आम्हीं घेणार नाहीं."

भोज म्हणाला, "महाराजांचें दाक्षिण्य उत्पन्न करण्याकरतां किंवा उपचार म्हणून मी बोलत नाहीं. कवीची प्रतिभा जितका भास्वर प्रताप निर्माण करूं शकते तितका भास्वर महाराजांचा प्रताप मी पाहिला. संधि घडावा अशी इच्छा धरून मी होतों. जें जें पापमूलक केलें तें तें माझे अंगीं जीव स्फुरत आहे हें दाखविण्याकरतां केलें. विग्रह करण्याच्या इच्छेनें नव्हे. पुढें जें करावयाचें त्याला महाराज प्रमाण आहेत."

भोजाचें शस्त्र भोजाच्या मांडीवर ठेवून राजा म्हणाला "हें शस्त्र मी तुला देतों. तें धारण करण्यास विमुख होऊं नकोस इतकीच माझी आज्ञा पाळावी." कल्हणिका राणीनें या कामांत सर्व भाग घेतला होता. तिचा मान करण्याकरतां हा सौजन्यनिधि राजा, तिच्या महालांत भोजासह गेला. ती निपुण राणी सस्मित म्हणाली, "तूं आताच नृपाचा आप्त झाला आहेस. तिनें स्वागतार्थ केलेली उक्ति पतीनें प्रणतीनें मान्य केली. तेव्हां राणीनें लाजून मुख खालीं केलें.

टीपः—हा राजाचा, भोजासह राणीच्या महालांतील इवलासा प्रवेश फार बहारीचा आहे, राजाचें सौजन्य, राणीवरचें त्याचें अव्याज प्रेम, राजाविषयींची, राणीच्या मनांतील पूज्य बुद्धि व तिचा विनय या गुणांच्या

आविष्करणानें या प्रवेशाला अत्यन्त शोभा आली आहे. ती पाहून मनाला फार आनंद होतो.

नंतर सर्व उपकरणानीं पूर्ण अशी एक जागा राजानें भोजाला दिली. आप्तपणाचा गौरव दाखवण्याकरितां, राजा त्याला जेवते वेळेस उजव्याबाजूस बसवी.

## संधिनंतर भोजाचें राजाशीं वर्तन

जसे क्षुद्रकवी महाकवीच्या काव्यांत दोष काढण्याकडे लक्ष देतो; तसें लक्ष भोज राजाचें कार्य करतांना, प्रमादानें कांहीं चुकलें; कांहीं हीन राहिलें; कांहीं अधिक झालें, तर त्यांत दोष काढण्याकडे लक्ष देत नसे. आपण प्रभु जयसिंहासारखे आहांत; असा कोणी विचारकानें (खुषमस्कऱ्यानें) चाटुवाद केला. तर धीर व धृष्ट दृष्टिपातानें भोज त्याला धमकावून, अपुनर्भाषी (पुन्हा कधचें बोलतो असें) करी. राजानें त्याची नजर कैद कांहीं काळानें शिथिल केली तरी तो शिकवलेला अश्व जसा पळत नाहीं तसा हा पळाला नाहीं. तो सदैव राजाच्या पुढें असे. पण राजा जर अवरोधगृहांत अथवा मंत्रागारांत शिरला, तर तो निषेध केल्याशिवाय रुद्ध पद होई. स्वप्नांतसुद्धां राजाला न सांगण्यासारखें भोजाला वाटलें नाहीं. मंत्र्यांनीं केलेली परस्परांची निंदा तो स्वप्नवत् विसरून जाई.

टीप:—वरील भोजाचें कवीनें काढलेलें चित्र सुंदर आहे. या वर्णनांत भोजाचें सत्शील दिसून येते. क्षुद्रकवीचा समाचार कवीनें थोडक्यांत जातां जातां घेतला आहे. तें टीकाकारांनीं ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

आतां राजा त्रिल्लकाकडे वळला. सज्जपालानें त्रिल्लकावर हल्ला केला. त्रिल्लकाचा पुत्र जयपाल लढत असतां त्याचे तीन घोडे हत झाले तरी चातुर्यानें तो पदाति असा दिसला नाहीं. त्याच्या अनुजाला शिशुपणांत लढाई प्रायम्यानेंच उपलब्ध होती तरी त्यानें जुन्या योद्ध्यास चकित केलें.

कोठून कांहीं लाभ नाहीं असें पाहून त्रिल्लकानें आपुली अंगुली कापून राजाच्या स्वाधीन केली व आपलें शीर्षफल मागून घेतलें जसें माकडाच्या हातचें फळ त्याला कांहीं देऊन घेतात तसें. लोठक पकडला गेला व मारला गेला. राजवदन एका लढाईंत कपटानें मारला गेला. त्यानें शेवटपर्यंत संधि केला नाहीं.

रड्डाराणीच्या ज्येष्ठ मुलाला लोहर कोट्टाच्या राज्यावर बसविलें.

## जयसिंहाचे प्रिय मंत्री कुलराज

यानें कांहीं चिर प्ररूढ व्यवस्था निर्माण केल्या. विवाहित अंगनेचें शीलभ्रष्ट झाल्यास तिच्या पतीला दंड करण्याकडे प्रवृत्ति होती. तिचें यानें विचार करून, निवारण केलें. पण पुढें राजानें याला नगराधिपति केल्यावर परिणित गृहस्थाशीं बद्ध झालेल्या नर्तकीशीं सप्रयुक्त झालेल्या लोकांना तो दंड करूं लागला. पण असल्या क्लेशाच्या दोषगुणाचें चिंतन कशाला पाहिजे? याच्यासारखा अद्रोही व निर्लोभी कोणी झाला नाहीं. हा मृत झाल्यावर याच्या संस्काराला पुरेल इतकें द्रव्य याजवळ नव्हतें.

## जयसिंहाच्या अमात्यांचा दानधर्म

कंपनाधिपति जो उदय त्याच्या चिताख्य पत्नीनें विहार बांधला, त्यांतील प्रासादप्रचक्र हा धर्मानें उभारलेला. हा उंच पांच बोटांचाच पंजा होय. पंचादी मंत्र्यांनीं गवादिकांना जाण्यास वितस्तेवर पूल बांधला व संसारोत्तरण पुण्य कर्म केलें. रड्डा देवीनें मंत्र्यासह यात्रा केल्या.

## ग्रंथसमाप्ति

जयसिंह व रड्डा राणी, ही सुंदर पांच पुत्र व चार कन्या अशा अपत्यांनीं सुशोभित आहेत एक सोमपालाला व एक त्याच्या मुलाला दिलेल्या आहेत.

हल्लीं हा अतिक्षमाशील राजा, मेदिनीला आनंदित करीत असतो. जशी गोदावरी नदी उत्तुमुक्त अशा सात मुखांनीं सागराला मिळते तशी ही राजतरंगिणी (सात) आठ तरंगांनीं मधुरालाप करणाऱ्या लाटांनीं श्रीकांत राजाच्या विपुल अभिजात वंशाला सागरांत विश्रांति देण्याला मिळते.

॥ शुभंभवतु ॥

## राजतरंगिणीचें पहिलें वृत्त

या ग्रन्थाकडे परकीयांचें लक्ष जहानगीर बादशहाचे काळांत प्रथम गेलें. बादशहानें या ग्रन्थाचें संक्षिप्त भाषांतर पर्शियन भाषेंत प्रथम करविलें. त्यानंतर पॅरिस येथील रॉयल एशियॅटिक सोसायटीनें फ्रेंच भाषेंत तसेंच करविलें. पुढें डाक्तर स्टोन यानें इ. स. १९०० सालीं इंग्रजींत समग्र भाषांतर छापून प्रसिद्ध केलें. डाक्तर स्टीन यांच्या कार्यनिष्ठेस व परिश्रमांस तोड नाहीं.

या काव्याची मूळप्रत शारदा लिपींत आहे. तिची नक्कल देवनागरींत उतरून घेतांना लेखकानें कांहीं शब्द गाळले व कांहीं जावई शोध केले. मूळ प्रतीचें गोषांतल्या स्त्री प्रमाणें आपल्याला क्षणदर्शन झालें असें डाक्तर स्टीन यांस सांगितलें. त्यावरून डाक्तर स्टीननें त्या प्रतीचा शोध चालविला. त्यास असें आढळलें कीं त्या प्रतीचा स्वामी दिवंगत असून त्याच्या वारसांनी तिचें वांटप करून घेतलें होतें. वांटणी पत्रवार नसून तरंगवार होती. यावरून ते वारस सुबुद्ध होते म्हणावयाचे!

या मूळ प्रतीचीं अष्टपत्री संचयाची (सांच्याची) असून तींत विविध पाठ आहेत. थोडी खोडाखोड आहे. एखादी अवान्तर टीप आहे; पण अर्थबोधिनी टिका नाहीं.

डाक्तर स्टीननें या ग्रन्थात निर्दिष्ट केलेलीं ठिकाणें आयवा त्यांचे अवशेष हीं बागयावर जाऊन पाहिलीं. व त्यांवर आपल्या ग्रन्थात भरपूर टिपा दिल्या आहेत. इतिहासाचें संशोधन करणारा असा ग्रंथ विरळा.

यानंतर इच्छाराम सूरराम यांनें गुजराथी भाषांतर श्रीमंत सयाजीराव गायकवाड ग्रथामालेंत छापून निघालें. कै. मा. व्यं. लेले यांचे मराठी भाषांतर त्यांनीं पुणे येथील चित्रशाळेच्या मालकांनीं प्रसिद्ध केलें.

यानंतर माझ्या हातांत एक राजतरंगिणीची संस्कृतांत छापलेली प्रत पडली.

तिचें भाषांतर करण्याचा मोह मला झाला. मीहि माझें स्वतांचे असें मराठींत भाषांतर केलें. तें संस्कृत भाषेची गोडी घेत घेत केलें. पोपनें होमरच्या इलियडचें भाषांतर इंग्रजींत केल्यावर ड्रायडननें नाहीं का केलें !

हें भाषांतर केल्यावर माझे हातीं अलाहाबादेच बॅरिष्टर पंडित यांनीं आपले इंग्रजींत भाषांतर छापून प्रसिद्ध केलें. त्यांत नवीन माहिती पुष्कळ घातली. उत्तम कागदावर उत्तम छपाई व उत्तम सोनेरी बांधणी यांचें अलंकृत असें अंतर्बाह्य सुंदर पुस्तक मुंबई रॉयलएशियॅटिक सोसायटीच्या ग्रन्थालयांत पाहून मला फार आनंद झाला. जसा हिऱ्याच्या आंगठीला सोन्याचें कोंदण पाहून होतो तसा !

असो, माझ्या भाषांतरित ग्रन्थाचें सार काढून छापलें त्याचें कारण ह्या ग्रंथाच्या पहिल्या पृष्ठावर पहा.

## हल्लींच्या सुधारलेल्या राष्ट्राला शोभणाऱ्या कांहीं गोष्टी.

पहा तरंग ३ पृष्ठ १२. ललूखण राजानें लिखित दैस्ते वज नीट रहाण्यास जागा बांधल्या. कवीनें राजांचें मुख्यत्वें वर्णन केलें आहे तरी सामान्य जनांच्या व्यथेचेहि वर्णन लक्ष लावून केलें आहे. ( पहा तरंग ५ पृष्ठ २२ )

गोपाळ वर्म्याचा पित्याला शंकर वर्म्याला उपदेश. त्यांत त्यानें वेठबिगारीचा निषेध केला आहे. चंद्रापीड रणादित्य राजानें एका चर्मकाराची कुटि मोबदला देऊन सार्वजनिक कार्याकरतां विकत घेतली. ( पहा तरंग ४ पृष्ठ १४ )

अशी, गोष्ट हल्लीं लॅंड ऍक्वि झिशन कायद्या खालीं करण्यांत येते. स्थापत्य शास्त्री सूय्य हा दगडांनीं मार्ग बुझालेल्या वितस्ता नदीचा मार्ग ते दगड काढून मोकळा करतो व कालवे खणून तिचें पाणी सर्वत्र खेळवतो. ( पहा तरंग ५ पृष्ठ २१ )

पहा तरंग ५ पृष्ठ २१ साक्षरता प्रसार यशस्कर राजा करतो. — एकांगांना (एका लढाऊ जातीच्या राजाला युद्धांत उपयोगी पडणाऱ्या शिपायांना वेतन घेण्यास अक्षपटलांत ( हिशेब नवीसच्या ) हल्लींच्या अकाउन्टन्ट जनरलच्या – कचेरींत ) जावें लागे. व तें नामग्रहं पूर्वक मिळे. ते त्यांचे श्रम वांचविण्यास अनंत राजाने त्यांस नक्त नेमणुका करून दिल्या. तरंग ७ पहा पादाग्र नांवाचें एक कर्मस्थान होतें. तेथें सोन्याचा वर्ण (कस) व मूल्य ठरावयाचा व मुद्रित करावयाचा राजाचा हक्क होता. तेणें जनांजवळ वित्तसंचय किती आहे तें कळून येत असे. तो राजाचा क्षेम नांवाचा एक उग्रधी अधिकारी होता. त्या ज्ञानी मनुष्यानें हें कर्मस्थान बंद केलें. कारण त्यापासून राजे वित्तसंचय करणाऱ्या प्रजेला त्रास देतील. हल्लींच्या भाषेत म्हणावयाचें म्हणजे त्यानें सोन्यावरचें नियंत्रण ( कंट्रोल ) उठविलें. सार्वत्रिक माफीची घोषणा हर्षानें एका युद्धप्रसंगीं केली. ही हल्लींची जनरल ॲनेस्टी होय. पहा तरंग ७ एका बौद्धधर्मानुयायी राजानें खाटकांचा धंदा बंद केला तेव्हां त्यांस उपजीविकेचें अन्य साधन करून दिलें. पहा तरंग ३ मेघवाहन हें दारूबंदी केल्यावर माड वाहणाऱ्यांना दुसरा धंदा देण्यासारखा आहे. आगींत पेटलेल्या घरांचे रक्षणाचे कामांत सैन्याचा उपयोग राजानें केला. दाद लाऊन घेण्याकरतां व्यक्तिशः किंवा सामुदायिक उपोषण हल्लीप्रमाणें करीत. ही उपोषणाची पद्धत जुनीच होती म्हणावयाची. प्रजापीडक कायस्थांस ( कारकुनांस ) शासन करणें. पहा उच्चलाची कारकीर्द. जयसिंह राजा पुरवासी जनांकडील पुत्रोत्सव विवाहादी प्रसंगीं औपयोगिक वस्तूचें दान करी. राजाच्या करांची वृद्धि करणारे जे लांकडावरचे कर ते प्रजेच्या स्वाधीन करून नगर नवीन वसवून राजानें घेतलें. पहा तरंग ८ उच्चल राजा. उपोषण करून कुणी मरण कवटाळतें तर धर्माध्यक्षाकडून त्याची नीट प्रत्यवेक्षा करी. तेणें जनता प्रबल झाली व अधिकारी निर्बंध झाले. तस्कराला तो कोशाध्यक्ष करी व चौर्याचरणापासून निवृत्त करी. दंडास योग्य पुरुषाला हा दंड करी व त्याचीच शुद्धि होण्यास त्याच पुरुषांकडून धर्म करावी. यानें उदारपणें दिलेल्या दानांत दूतांचा अर्धा वांटा नसे. हा वृत्तिहीनांस वतन देई. अन एम्प्लाय मेंट बरोचें कामकरी ! आपलें संचित अन्न अल्पमूल्यानें विकून दुर्भिक्ष नाहीसें करी. हीं हल्लींची स्वस्त धान्याची दुकानें होत. पहा तरंग ८ उच्चलाच्या कारकीर्दीचा आरंभ.

अन्नानें भरलेलीं पात्रें ललितादित्य राजा सरकांनीं वाटी पहा तरंग ४ पृष्ठ १६

शेवटल्या राजानें सर्व राज्यें एकसूत्री केलें. हें हल्लीं लहान राज्यें मोठ्या राज्यांत विलीन करण्याचा जो मार्ग तो देशसुधारणेचा मार्ग अवलंबिला जात आहे.

## काश्मीरची संस्कृति व राजतरंगिणीचें ऐतिहासिक महत्त्व

काश्मीर हा देश हिमालयाच्या एका उंच भागांत आहे. सर्व दिशांनीं वाटोळच्या अधिक उंच रांगांनीं तो वेष्ठित आहे. इतर देशांपासून त्याच्या पृथक्पणामुळें त्याचा इतर देशांशीं फारसा संबंध नसे. त्यामुळें त्याची संस्कृति हजारों वर्षें जशीच्या तशी टिकून असे. मध्यंतरच्या मुसलमानी अमलानें ती बदलली नाहीं. अजूनहि पुढील हजारो वर्षांत ती साफ पुसून जाणें शक्य नाहीं. ही गोष्ट पुढें दिलेल्या राजकीय, सामाजिक, व आर्थिक अशा स्थितीकडे लक्ष दिलें म्हणजे कळून येईल.

### काश्मीरची राजकीय स्थिति

राज्यप्राप्ति बरा परांपरागत असे. निर्वंश झाल्यास मंत्री अथवा पौरजन राजाची निवड करीत. पहिला राजा मेघवाहन याला गांधार देशांतुन आणविलें होतें.

पहा तरंग पृष्ठ ९. काश्मीरचा राजा हिरण्य निःसततिपणांत मृत्यु पावला. त्याचा वारस पुतण्या तोरमाण, यात्रेला गेला होता. म्हणून रिकामें असलेल्यां काश्मीरच्या राज्यावर बसण्या प्रजेनें उज्जयनीचा चक्रवर्ती राजा जो विक्रमादित्य त्याजवळ राजा पाठविण्यास विनंति केली. त्यानें मातृगुप्ताला पाठवून दिला पहा ३ तरंग पृष्ठ १ . ब्राह्मण परिषदेनें एकदां यशस्कर राजाला निवडलें. स्त्रीलाहि राज्यप्राप्ति होत असे. श्रीमान दामोदर राजा त्याचा मित्र जरासंध व कृष्णाचा बन्धु बलराम, यांच्या युद्धांत श्रीकृष्णाचे चक्रानें मारला. त्याची स्त्री यशोमति गरोदर होती. मंत्री विरुद्ध असतां श्रीकृष्णानें नीलमल पुराणाच्या आधारानें तिला राज्यावर बसविलें. व ती प्रजेस मान्य झाली. पहा तरंग १ पृष्ठ ४.

याच्यापुढें मात्र तरंग ५ मध्यें टीप दिल्याप्रमाणें हें राज्यपदप्राप्तीचें तंत्र पुढें टिकलें नाहीं. वारसा प्रकरणांत मत्सरीराण्या सत्ताभिलाषी मंत्री, प्रबल डामर व शस्त्रधारी तंत्री वगैरे लुडबुड करूं लागले. युद्धें परस्परांत सुरू झालीं तीं तरंग ६ च्या शेवट पासून तों आठव्या तरंगांत जयसिंहानें सर्व भांडखोर लोकांचा मोड करीतों टिकलीं. तेथें ग्रंथ समाप्ति झाली.

साधारणता म्हणावयाचें झालें म्हणजे राज्य प्रांतीच्या आड येणाऱ्या शत्रूचा कांटा उपटून टाकण्याकरितां, मारेकरी घालणें ज दूटोणा करणें इ. प्रकार राजरोज चालत. विजय मल्लानें (एका खाजगी व्यक्तीनें) जयसिंहाच्या एका कर वाढवणाऱ्या जुलमी अधिकाऱ्यावर चित्ररथावर प्राणान्तिक हल्ला केला. हेतु असाकीं अशा दुर्वृत्तांचें जर आम्हीं दमन केलें तर त्याला दहशत पडून तो पुन्हां जुलूम करावयाला प्रवृत्त होणार नाहीं. पहा तरंग ८ उच्चलाच्या कारकीर्दीचा आरंभ

चित्ररथाचें क्षत बरें झालें. धूर्त राजे सामदाम दण्डाचा उपयोग करीत.

### राज्यकारभार

राजसत्ता अनियंत्रित असे. निरनिराळीं कर्मस्थानें स्थापलेलीं असत. त्यावर तितकेच मंत्री नेमलेले असत. निरनिराळया करांच्या रूपानें द्रव्य वसूल केलें जाई त्यांतून राज्य व्यवस्थेला लागणारा खर्च चालविला जाई.

आयात व निर्यात मालावर कर बसविला जाई हें हल्लींचें कष्टम खातें होय. एका राजानें पुरीषावर (मैलावर) कर बसवून हसें करून घेतलें.

दिवाणीं कामें न्यायाधिकारी करीत. त्याच्या विरुद्ध राजाकडे अपील चाले. दाद मागण्यांत येई. पहा तरंग ६ यशस्कर राजा.

### दण्डनीति ( मालमत्तेस व शरीरास इजा केल्यास करणाऱ्यांस शासन ).

साधी शिक्षा म्हणजे दण्डाची, बंधनांत टाकण्याची, कडक म्हणजे मुंडके कापून नदींत फेकून माशांना खाद्य देण्याची; अर्धामूर्धा मारून खटाऱ्याला बांधण्याची.

ब्राह्मणास देहान्ताची शिक्षा सोडून शिक्षा देण्यांत येई एका ब्राह्मणाला अत्याचाराबद्दल कपाळावर डाग देण्यांत आला.

आरोपीला मारहाण केली जाई; चोराला पोलिसची समजूत देत असतां तो मेला. अधिकाऱ्यानें काशीस जाऊन प्रायश्चित्त घेतलें. असें एक उदाहरण आहे.

व्यभिचाराबद्दल एका स्त्रीचें नाक कापण्यांत आलें. स्त्रीवध निंद्य मानला आहे.

### देशाचें रक्षण

देशाचें संरक्षण सैन्य करी. सैन्यांत लढाऊजातीचे लोक असत. कधीं कधीं ब्राह्मण वेद सोडून सैन्यांत काम करीत. सैन्यांत घोडदळ व पायदळ असे. शस्त्रास्त्रें साधीं असत. बाण, खड्ग, भाले, परशु इ. दगडांचा मारा गोफणींनें (उल्हाट यंत्रानें) केला जाई. हिमवृष्टिहि प्रबळ शत्रूंच्या सैन्यास शत्रूप्रमाणें दगडांसारखा मारा करून युद्ध बंद करी. कधीं कधीं आधुनिक तंत्रें योजलीं जात. सैन्याकडून व्यायाम ( कवाईत ) करून घेत. युद्ध चालू असतां शल्योत्पारण करून क्षतावर मलमपट्टया बांधीत. डोळया सैन्याबरोबर असत.

### सामाजिक स्थिति

राजानें राण्या किती कराव्या त्याला निर्बंध नसे. शिवाय अवरोध गृहांत (जनानखान्यांत) अनेक स्त्रिया असत.

देवदासीं देवळांत अर्पण केल्या जात. पहा तरंग ४ पृष्ठ १३. पट्टराणीला मान अधिक असे. कधीं कधीं राजकारण म्हणून लग्नें जुळविण्यांत येत. दोघां युद्धयमान पक्षांत संधि करण्यांत स्त्रिया मध्यस्थाचें काम करीत. पहा तरंग ८. एक पत्नी मताचें मंत्र्याचें एकच उदाहरण आहे. सासुरवासाचा मामला एकच आहे स्त्रियांना पडदा नसे.

राज्यांत स्त्रियांची वेशभूषा सुधारलेली असे.

सती जाण्याची चाल धूमधडाक्यानें चाले. सती जात असतां राणीला वरवाहन मंत्र्यानें परत फिरविलें. असें एकच उदाहरण आहे.

राजांच्या व राण्यांच्या मरणानंतर दास, दासी व भृत्य जाळून अथवा डोकें फोडून प्राणहत्या करीत. ही जपानी हराकीरी होय.

वर्णव्यवस्था मुद्राबद्ध नव्हती. नागाशीं संबंध असलेल्या संततीला राज्य प्राप्ति झाली आहे. पहा कर्कोटक वंश तरंग ४ पृष्ठ १३ कल्यपालाच्या कलालाच्या मुलीशीं लग्न झाले-ल्याच्या संततीला राज्य प्राप्ति झाली आहे. पहा उत्पलक वंश

## धार्मिकस्थिति

अस्पृश्यता अस्तित्वांत होती. चाण्डाळांना पहारेकऱ्यांचें काम असे कलशाचें रात्रीचें धाडस तरंग ७ पहा

काश्मीरी लोक बहुधा शैवपंथी. शिव विश्वात्मा असून त्यांत विलीन होण्याची त्यांची इच्छा असे पार्वती ही विश्व निर्माण करणारी शिवाची शक्ति आहे. जन्म व मरण यांच्या मधली-स्थिती शिव आपल्या तांण्डव नृत्यानें चालू ठेवतो. अर्धनारी नटेश्वर हें या तत्त्वाचें कलात्मक रूप आहे-गणपति, विष्णु वगैरे सर्वत्र देवांची देवळें बांधलीं जात. असा एक राजा नाहीं, राणी नाहीं. मंत्री नाहीं किंवा भृत्य नाहीं कीं ज्यानें किंवा जिनें देवळें बांधिलीं नाहींत, किंवा मठ स्थापिला नाहीं. व त्यांस आपलें किंवा आपल्या प्रियमाणसाचें नांव दिलें नाहीं.

देवास अग्रहार देण्यांत येत. वरील धर्मकृत्यें पापाचें निरसन करण्यास क्वचित् पुण्यार्जन करण्यास केलीं जात. देवास नृत्यांगना अर्पण करीत. पुवर्जन्म अथवा सदेहस्वर्गास जाणे यावर भरंवसा असे. कोशपान पूर्वक शपथा घेतलेल्या नीट पाळल्या जात. ज्योतिष, शकुन, स्वप्नें दृष्टांत, जादू, मंत्र, तंत्र जपजाप्य, इंद्रजाल वशीकरण इत्यादींवर लोक भरंवसा ठेवीत. बुवाबाजीहि बोकाळली होती. मृत्यु समयीं गंगोदक प्रीत. प्रेताचे दहन झाल्यावर अस्थी गंगेत टाकीत. मृत्युसमयीं गीता हातांत धरीत.

अन्यायाची दाद लावून घेण्यास प्राणान्तिक उपोषण करीत. ही उपोषणाची पद्धति जुनीच आहे. असें उपोषण कुणी केलें तर त्याची दाद लावून देण्यास स्वतंत्र अधिकारी असत पहा

## आर्थिकस्थिति

राजांजवळ संपत्ति विपुल असे. ललिता दित्य प्रतिकुबेर होता. मुक्ताकेशवाची मूर्ति बनविण्यास चौऱ्यायशीं हजार तोळे याने लावलें.

लोक संपन्न असत. तांब्या रुप्याचीं व सोन्याचीं नाणीं (दिनार) पाडलेलीं असत. दरिद्री कवड्या नवृत्या. महमंदाच्या राज्यांतील चामड्याचीं नाणीं नवृतीं.

## उत्पलक वंश ( तरंग ५ वा )

राजा ललितादित्य याची राणी जी जयादेवी कल्यपालाची ( कल्लालाची कन्या ) तिचा भाऊ

उत्पलक

|

सुखवर्मा

|

१ अवन्तिवर्मा राज्यारोहण लौकिक ३९३१ इ. स. ८५६–६ मृत्यु. लौ ३९५९ इ. स. ८८३

सापत्न शूरवर्मा ( यास युवराजपद अवन्तीनें स्थापिलें )

२ शंकरवर्मा ( राज्यारोहण इ. स. ८८३ लौकिक ३९५९ मृत्यु. लौ. ३९७७ इ. स. ९०२ )

सापत्न सुखवर्मा युवराजपद शंकर वर्म्यानें दिलें )

३ गोपाळवर्मा ( माता सुगंधा ) राज्यारोहण लौ. ३९७७ इ. स. ९०२ मृत्यु लौ. ३९७९ इ. स. ९०४

४ संकटवर्मा ( पालक सुगंधा माता ) राज्यप्राप्ति लौ. ३९७९ इ. स. ९०४ मृत्यु दहा दिसानीं लौ. ३९७९ इ. स ९०४

५ राजमाता सुगंधा

निर्जितवर्मा ऊर्फ पंगु

निर्जितवर्मा ऊर्फ पंगु

(५) पार्थ ( पालक निर्जितवर्मा ) राज्यारोहण ३९७७ इ. स. ९०४ उच्चाटण ( तंत्र्यांनीं केलें )—

(६) निर्जितवर्मा बाप राज्यारोहण लौ. ३९९७ इ. स. ९२१ मृत्यु लौ. ३९९९ इ. स. ९२३.

लौ. ३९९७ इ. स. ९२३

निर्जितवर्मा राणी बप्पट देवी

(७) चक्रवर्मा राज्यारोहण. लौ. ३९९९ इ. स. ९२३

तंत्रीकृत उच्चाटण लौ. ४००९ इ. स. ९३३–४ ( तंत्र्यांस पार्थापेक्षां अधिक द्रव्य दिल्यानें पुनः स्थापना इ. स. ४९११ इ. स. ९३५ ( तंत्र्याच्या हुंड्या न देतां आल्यामुळें लवकरच त्यानें पलायन केलें. )

निर्जितवर्मा राणी मृगावती

शूरवर्मा राज्यारोहण तंत्रीसंमत लौ. ४००९ इ. स. ९३३–४ उच्चाटण तंत्र्यांचें देणें न दिल्यानें लौ. ४०१० इ. स. ९३४–५ चक्रवर्म्यानें मंत्री शुभवर्धन याला तंत्र्याकडे दूत म्हणून पाठविलें त्यानें तंत्र्यांना अधिलांच देण्याचें कबूल करून आपल्याला राजा करून घे लौ. ४०११ इ. स. ९३५

पण पद्मपुराजवळ संग्राम करून शंभुवर्धनाला मारून चक्रवर्मा सिंहासनस्थ राजा झाला. तो लौ. ४०१३ इ. स. ९३७ या वर्षी दुष्कर्मानें मारला गेला.

तरंग ६ वा

वीरदेव

कामदेव

प्रभाकरदेव ( हा सुगंधादेवीचा कामुक होता. )

यशस्करदेव. हा तरंग सहामधील १ ला राजा. याला विप्रपरिषदेनें राजा केला.

## लोहर वंश

तरंग ७ व ८

नर ( दारवाभिसारच्या देशांत भारद्व ज कुलांतील पुरुष राजा झाला )

नरवाहन

फुल्ल

सातवाहन शालवाहन

चन्द्र

चंद्रुराज

सिंहराज गोपाळ

उदयराज संग्रामराज कान्तिराज

विग्रहराज

क्षितिराज

भुवनराज

हरिराज अनंत उदयनवत्स लोठिक कल्हण

कलश नाग

हर्ष उत्कर्ष विजयमल्ल जयराज भोज

(माता पद्मश्री विजयमल्ल हा हर्षाचा सावत्र भाऊ )

जयमल्ल

भोज (पुत्र) सल्ह

भिक्षाचर

जसराज


तन्‍ंग गुजू

+ मल्लार्जुन

थक्कन बम्मट अज्जक

रल्हण सल्हण

तुल्ल विजयराज बल्ल गुल्ल




## कल्हणाची कालगणना

ही कालगणना काश्मीरांत चालू असलेल्या लौकिक शकाप्रमाणें आहे. याच शकाला सप्तर्षि शक म्हणतात पहिल्या तरंगांतील पहिला राजा जो पहिला गोनंद तो कौरव पाण्डवांचा समकालीन होता. धर्मराजाला अभिषेक झाला तेव्हांच या गोनंदाला झाला. भारतीय युद्ध द्वापारयुगाच्या शेवटीं झालें हें मत कल्हणाला मान्य नाहीं. त्याच्या मतें कलियुगाचीं सहाशें त्रेपन्न वर्षें झालीं तेव्हांच भारती युद्ध थांबलें व तेव्हांच गोनंदाला राज्याभिषेक झाला.

| | |
|---|---|
| पहिल्या गोनंदापर्यंत कलियुगाचीं | ६५१ वर्षें. |
| पहिल्या गोनंदापासून युधिष्ठिर राजाच्या अन्तापर्यंत पहिल्या तरंगांत येतात. | २२६८ |
| यांत नष्ट नाम झालेल्या राजाचीं वर्षें येतात. | |
| तरंग २ ते ८ यांतील वर्षें जयसिंह राजाच्या कारकीर्दीला आरंभ होण्यापर्यंतचीं | १३२८ |
| | ४२४९ |

जयसिंह राजाच्या कारकीर्दीला आरंभ लौकिकवर्ष ४२२४ या वर्षी झाला. वर दाखविलेल्या बेरजेंत फक्त २५ वर्षांचा फरक आहे. तो तीन चार हजार वर्षांत भारी नाहीं. कांहींनीं या गणनेला हरकत घेतली आहे. तिचा विचार या लघुग्रन्थांत घेणें अवश्य नाहीं. तरी येथें एवढें म्हणणें भाग आहे कीं तिसऱ्या तरंगांतील रणादित्य राजाच्या वांटणीस तीनशें वर्षांचा राज्यकाळ कवीनें जुळवा जुळव करण्याला घातला असावा.

# शब्दकोश

### अ

अंकित अभिधा–यष्टीत दिलेलें नांव

अगस्त्योदय–अगस्ति या ताऱ्याचा उदय भाद्रपद मासीं होतो. नंतर पावसाळ्यांत गढूळ झालेले पाणी निवळतें.

अग्निशौच मृग हे मृग अग्नींतून उडया मारीत जातात व आपलें ऊर्णामय अंग स्वच्छ व शुद्ध करतात. अशी कविकल्पना आहे.

अग्रहार–एकाद्या देवालयाला, विप्राला, विप्रसंघाला अथवा धार्मिक संस्थेला जहागीर ( इनाम ) करून दिलेला गांव किंवा जमीन. हें दान आचंद्रार्क असे.

अंगुलि कापून बसणें–शत्रूला शरण जाणें. ही शरणागति सक्रिय असते. उष्णीष ( डोक्याचें वस्त्र ) गळ्यांत बांधणें किंवा जोडा डोक्यावर ठेवणें, हे दुसरे शरणागतीचे प्रकार असत.

अट्टसूद–खाणावळींतला आचारी.

अतितात्पर्यतः–घ ईघ ईनें.

अर्थक–ऋणको.

अधिकरण लेखक – एक सरकारी अधिकारी. जमिनीची विक्री ठरल्यावर तिचें मोजमाप करणारा लेख लिहिण्याचें काम याचकडे असे.

अधोरिक–अर्धोबंडी

अन्नपति–उत्तम पीक उत्पन्न करून देणारा देव.

अम्बराधिकारी–सैन्याला कपडे पुरवणारा कापडणवीस.

अम्बुतरण–पोहण्याची कला; पोंवणी.

अभिचार–जादू.

अयःशंकु–खिळे.

अवरुद्धा–धर्मशास्त्राप्रमाणें जिच्याशीं विवाह करतां येत नाहीं अशी स्त्री आवडली म्हणून अवरोध गृहांत ( जनानखान्यांत ) ठेवलेली.

अवस्करप्रणाली–शौचकूपांतील मोरी.

अवस्कर मंदिर–शौचकूप.

अश्रेयस्–जमेकडील रकमेला नाहींशी करणारी खर्चाची रक्कम

अश्वघांस–घोड्यांना घांस पुरवणारा अधिकारी; घांसवाला.

अक्षपटल–मुख्य हिशोबनीसाची कचेरी.

अक्षपाताळ–कागदपत्र. ठेवण्याची जागा.

### आ

आतंपु–नाकेपट्टी.

आमलक–रायआंवळ्याच्या आकाराचा सोन्याचा दागिना. देवालयाच्या घुमटावर बसवतात तो.

आम्नाय–ऐतिह्य लेख.

आरामिक–सोनखताचा उपयोग करण्याच्या कामीं योजलेला अधिकारी.

आस्थान मण्डप–राजसभागृह.

आहो पुरुषिका–अहो ! आमचे केवढें हें पौरुष तें पहा ! अशी बढाई.

### इ

इतिहासिनी ( नीति )–इतिहासावरून अनुमित ( नीति )

### उ

उत्कोच–लांच.

उत्थान शील, उत्थास्नु – उठून पुन्हा साहस करण्यालायक, चपळ.

उपजाप–चहाडी.

उपपति–जार.

उपस्थायिका–रोग्याची शुश्रूषा करणारी स्त्री.

उत्पन्नध्वंसी–उत्पन्न झाल्याबरोबर नाश पावणारीं संकटें.

उत्पात पीटिका–काळपुळी.

उद्भिज–बंड

उभयमुखी धेनु–सवत्स गाय.

### ऊ

ऊष्मवारिणी–छत्री.

### ए

एकांग–शस्त्रधारी राजाचे संरक्षक, तंत्र्यांचे प्रतिस्पर्धी.

### औ

औमयिक–आपत्त्याच्या वेळीं उपयोगी पडावें म्हणून राखून ठेवलेलें धन

### क

कर्णीरथ–डोल्या. माणसांनीं वाहून नेण्याचीं वाहनें

कर्मकृत्–कामकरी; मजूर.

कर्मस्थान–सरकारी खात्याची कचेरी.

कन्था–गोधडी प्रमाणें जुळवलेले लांब रुंद व खोल पद

कर्ष–पहा पळ-

कल्यपाल–कलाल.

कल्याण प्रकृति–प्रकृतीनेंच (स्वभावानेंच) कल्याण करणारा-

क्रमराज्य–पहा मत्स्य राज्य,

काक–काकडंडा

कांदिशिक–कोणत्या दिशेला जाऊं अथवा न जाऊं अशा स्थितींत सांपडलेला

कापालिक–स्मशान भूमीचा रक्षक. प्रेत जाळण्यापूर्वी त्यावरील वस्त्र काढून नेणारा.

काम्बोज–अफगाणिस्थानाच्या पूर्वेचा प्रदेश.

कायस्थ–कारकूनी करणारा, कायस्थ जातीचा नव्हे.

कार्य निवारण–कामावरून दूर करण्याची क्रिया.

कासण्डिका–गण्डिका

कुटुम्बी–राजवंशीय. भायाद.

कुम्भदात–पाणक्या.

कुम्भदासी–कुम्भानें पाणी भरणारी दासी.

कोटिवेधिनी शिला–हलक्या धातूस स्पर्श करून कोट्यावधि सोनें उत्पन्न करणारा. परीस.

कोशपान–कांहीं पेय पिऊन शपथ घेणें व पुढील काळीं परस्पर विश्वास संपादन करणें. हें एक संधि करण्याचें साधन होतें. केलेला कट गुप्त ठेवण्याचा संकल्प यांत केला जाई. हा स्मृति कथित दिव्याचा प्रकार आहे. असें कोशपान कधीं रक्तानें सिंचलेल्या मृग चर्मावर उभें राहून केला जाई.

कौसीद–रिकामपणाची विश्रान्ति अथवा विश्रान्ति करतां रिकामपणा. उसन्त.

क्लेशपंच–अविद्या, अस्मिता, राग, द्वेष व अभिनिवेश

ख

खश–वितस्तेच्या आसपास डोंगरी मुलखांत राहणारी जात व ही वर राजपुरीचे राजे अम्मल करीत लोहरे येथील राजे खश होते.

खारी–१९२० पळें ४ तोळें–पळ. १२ पळें–प्रस्थ ६० प्रस्थ खारि म्हणजे एका खराचें ( गाढवाचें ) ओझें.

खार्खोदविद्या–जादू.

ग

गजनीमीलिका–डोळे झांक.

गणना पत्रिका–हिशोबाची वही अथवा खरडा.

गार्हस्थ्य भिक्षू–जे भिक्षू गृहस्थांप्रमाणें, स्त्री गृह व पशुपाळगतात. ते गर्व झालेले भिक्षू.

गंज–निधि खजिना.

गंजपति<br>गंजवर<br>गंजाध्यक्ष<br>गंजाधिकारी } खजिनदार

गूढलेस–खोटेलेख.

गेहगणनाधिपति–घरचा हिशोब ठेवणारा.

गौड–बंगालप्रान्त.

गृहपति–गृहस्थ

च

चर्चाकथा–विस्तृतपणें कथन केलेलें वृत्त

चाक्रिक–द्रोहाची चक्रें फिरवून खलबतें करणारा.

चंद्राचार्य–एक प्रसिद्ध वैय्याकरणी.

चैत्य–उंचीचा प्रश्न मनांत न बाळगून बांधलेलीं देवळें.

ज

जन्मवसुधा–जन्मभूमि.

जय ! जीव !–संगीताच्या दलश्याच्या वेळी संतुष्ट होऊन रसिक श्रोत्यांनीं तोंडांतून काढलेले वावा ! जिते रहो ! सुभानअल्ला इत्यादि उद्गार.

जयस्वामी–विष्णु.

ट

टंक–नाणी पाडण्याचा राजाचा अधिकार.

ठ

ठक्कुर–दक्षिण काश्मीरांतील डोंगरांत राहणाऱ्या रजपूत लोकांना दिलेली ठाकूर ही पदवी.

ड

डामर–दस्यु अथवा लवन्य. हे जमीनदार होते. यांच्याजवळ द्रव्य जमलें म्हणजे हे शस्त्रें, सैनिक व घोडे बाळगून प्रबळ बनत. यांतील एकाची ओळख पहिल्यानें पांचव्या तरंगांत अवन्तिवर्म्याच्या राज्यांत होते. शेवटीं कल्हणाच्या काळांत यांच्या दुर्दम्य राजकीय चळवळीचें स्वरूप दिसून येतें. राजांना यांचा मोड करावा लागे. नाहींतर यांना वश करून घ्यावें लागे. यांचीं वसतिस्थानें म्हणजे किल्ले असत. दोन तीन खेड्यांइतक्या भूभागावर यांची सत्ता चाले. मूळ जमिनी यांच्या ताब्यांत कशा आल्या त्याचा व मालकी हक्क कोणत्या अटीवर यांस प्राप्त झाला त्याचा पत्ता लागत नाहीं. पण पुष्कळ द्रव्य व्यापारांत मिळवून सशस्त्र लोक ठेऊन डामर झाल्याचें एका कुटुम्बी माणसाचें ( जय्याचें ) उदाहरण आठव्या तरंगांत आहे. यांचा अवमान राजानें केल्यास ते शत्रु पक्षाला मिळत यांचा मोड कावेबाजपणानें उच्चलानें केला संग्राम राजापासून व त्याच्यापुढें हे अर्धवट स्वतंत्रच झाले. राजाची वेळीं उपयोगी पडण्याच्या शर्तीवर यांस जमिनी मिळालेल्या होत्या. केव्हां तें कळत नाहीं.

ढक्क–पहारा करण्याची जागा.

ढक्का–नगारा. ( डंगा ? )

त

तमोरि–तमचा शत्रु. खिडकी

ताम्र स्वामी–रवि.

तंत्री–एक लढाऊ संघटित जाति हींत पदाति असत; घोडेस्वार नसत.

तीक्ष्ण पुरुष–मारेकरी

तुलापुरुषदान तुळा.

द

दण्डनायक–मुख्य पुर संरक्षक कोतवाल.

दरद–काश्मीरच्या उत्तरेस उत्तर व उत्तर दक्षिण दिशेस (ऐशानी दिशेस ] असलेल्या डोंगराळ मुलखांत चित्रल व गिलगित या प्रांतांत राहिलेले लोक, यांच्याकडून होणाऱ्या पीडेचें निवारण करण्या करतां त्यांवर राजांना स्वारी करावी लागे.

दस्यु–डामर शद्ब पहा.

दुर्नामकव्याधि–मूळव्याध

दिद्दा–वडील बहिणीला हांक मारण्याचें नांव. वडील भावाला आपण दादा म्हणतोंच.

दूत–वकील

दिष्टवृद्धि–अभिनंदन.

देवादि खातें–पंचमजमाखर्चाचें खातें. यांत चार खात्यांतील शिल्लक असलेल्या रकमा जमा करण्यांत येत.

देशिक–परकी. काश्मीरच्या बाहेरचा. सपाट मुलखांतून आलेला

द्रंग–सीमेवरील डोंगरांत असलेलीं रक्षा स्थानें. पहाऱ्याचीं ठिकाणें

द्रंग बाहेरून येण्याऱ्या मालावर जकात घेण्याचीं ठिकाणें.

द्रंगेश } द्रंगाच्या ठिकाणी पहारा ठेवणारा, मार्गेश.

द्वाराधिप, द्वारपति, द्वारनायक, द्वाराधिपति, द्वारेश, द्वारेश्वर { डोंगरी सीमाप्रांतांतून काश्मीरांत प्रवेश करूं देणारीं जीं द्वारें आहेत. त्यावरचे मुख्य रक्षक.

द्वैराज्य- राजाचे दोन विभाग करणारें युद्ध अथवा कलह.

ध

धर्माध्यक्ष–न्यायाधीश.

न

नविका–घटका.

नाग–जलाधिष्ठित देवता; त्या भूमीवर नागाचें ( सर्पाचें रूप घेतात; व मेघाचें रूप घेऊन आकाश व्यापून टाकतात हिमवृष्टि करतात,

व भूवर उतरतात. कधीं मनुष्याचेंहि रूप घेतात. नाग पिकांचा नाश करून पोट भरीत. (पहा सुश्रवस नागाची गोष्ट.) शंख व पद्म या नांवाचे नाग काश्मीर मण्डळांत होते. यांतील पद्मनाभ नांवाच्या नागानें कोल्ह्याचें रूप घेतलेलें आहे. कर्कोटक, वासुकी व नील या नागाचें नीलमत पुराणांत उल्लेख आहे. कर्कोटक वंशाला राज्यप्राप्ति झाली होती. तो वंश गोनंद वंशापेक्षां शुचि असें कल्हण म्हणतो.

नागार्जुन–बोधिसत्व.

नियोगी–मोठा अधिकारी

नीवि–ओलीस.

नीलमत पुराण–काश्मीरांतील धार्मिक आचारांचा ग्रन्थ. काश्मीरांतील तीर्थांचा इतिहास. हे पुराण नीलमुनीनें लिहिलें

प

पट्टोपाध्याय–सरकारी कागद पत्रांचा संरक्षण करणारा.

परित्राण दीक्षित–आपन्नांचें रक्षण करण्याचें व्रत घेतलेला.

पादप्रसारिका–पाय ताणून विश्रांति घ्यावयाची सन्धि

परिषद्–तीर्थस्थ अथवा देवालयांतील पुरोहितांची सभा.

पल– चार तोळे. वीस पल–शेर. (पहा खारि)

पातगी वृत्ति–पतंगाप्रमाणें शत्रूदीपावर झेंप घालण्याची मनीषा.

पादाग्र–कर वसूल करणाऱ्या मण्डळेश्वराच्या वरची जागा.

पायुक्षालनवेश्म–शौचकूप.

पाल–शाहीराजांच्या नांवाचीं अन्त्याक्षरें.

पंचमहाशब्द–पहिलीं पंचकर्मस्थानें १ महाभाण्डागार; २ महासंधिविग्रह, ३ महाश्वशाला, ४ महाभाण्डागार ५ महासाधनभाग मागून हीं स्थानें आठ झालीं होतीं. १) धर्माध्यक्ष, २) धनाध्यक्ष (महसूलावरचा अधिकारी.) ३) कोशाध्यक्ष, (खजिनदार,) ४) सेनाध्यक्ष, ५) दूत (वकील) ६) पुरोहित, ७) दैवज्ञ व ८) न्यायाधीश.

पारिषद्य–मागें निर्दिष्ट केलेल्या परिषदेचे सभासद. यांचें राजकारणांत महत्व असे. ते उपासाचा संप करून आपलें म्हणणें राजास ऐकवण्यास लावीत. उपोषणाची ही प्रथा जुनीच आहे.

पीतकोश–कोशपान करून घेतलेला मनुष्य.

पुरोधा–पुरोहित.

पूर्वपथिक–पुढें जाऊन मार्ग साफ करून ठेवणारा.

पृष्ठपाती–एकमेकांस मागें टाकणारा.

पौंड्र–चंदनाचे टिळे.

प्रकृति–राजाचा प्रधान.

प्रकृतिनामनी–पत्ता व नांव.

प्रतिकर–नगदी नेमणूक.

प्रतिकार–सार्वजनिक कामाकरतां घेतलेल्या जागेचा दिलेला मोबदला.

प्रतिक्रिया–प्रत्युपकार.

प्रतिभू–जामीन.

प्रतिभान–प्रसंगावधान.

प्रतिहार–कंचुकी.

प्रत्यभियोग–उलट हल्ला.

शंकित
शंकास्थान } आरोपी.

शाहीराजे–गझन सुलतानच्या पूर्वींचे काबूलच्या खोऱ्यांत (गान्धार प्रदेशांत) नवव्या. शतकापर्यंत असणारे हिंदु राजे हे मूळचे तुर्क होते.

शिक्षा–हिताच्या गोष्टी.

शिक्षाध्यायी–मतप्रचारक. म्होरका.

शिक्षिताक्षर–अक्षर ओळख असलेला. लिहितां वाचतां येणारा

शीलबहिष्कृत–शीलानें (सद्वर्तनानें) ज्याला बहिष्कार घातलेला आहे असा.

शीर्षक–मथळा.

शीर्षिका–लहान मथळा.

शुभोदर्क–ज्याचा शेवट चांगला आहे असा.

श्रमण–बौद्धसन्यासी.

श्रेयस्–जमा.

श्वपाक–हीनजातीचा. मूळार्थाप्रमाणें श्वानाचें मांस खाणारा.

## स

समकार्य–दोघांचें कार्य एकच समजून केलेलें सह कार्य

संकट–डोंगरांतील घांटी.

संभृति–कोठार (धान्य भरून ठेवण्याचें)

सर्वाधिकारी–मुख्यप्रधान.

सादीमण्डळ–घोडेस्वाराची तुकडी.

स्थावर विलम्बि–कायम नेमणूक.

स्थूलोत्पत्ति–स्थावर उत्पन्न.

सिंधु–वितस्ता नदीचा सर्वांत मोठा फांटा.

सुखासिका–सुखी आहेस का असा प्रश्न.

स्वभावमहिमा–सृष्टिसौंदर्य.

स्थेय–न्यायाधीश.

स्पर्शसंचारी–केवळ स्पर्श झाल्यानें संचार पावणारा रोग.

स्तीचास्तन तोंडांत धरणें–मी तुझा मुलगा आहे असें, शरण जाणें.

स्थिरकरणें–अधिकाराच्या जागेवर नोकरास कायम करणें

## ह

हस्तमेलक–उभय सैन्याची समोरासमोर युद्ध जुंपणें.

हिमालयांत हिमविक्रय करणें–अगदीं फायदेशीर न होणारा असा व्यापार करणें. ही म्हण व Carrying gold to Lanka ही म्हण अशा समानार्थ आहेत.

हुडुका–वर वारा तोंडानें एकीकडे वारा भरण्यास नळी लावलेली चामड्याची पिशवी. वरच्या नळीनें तोंडांतील वारा आंत भरत असतां खाकेंत ती पिशवी धरून दाबली असतां दुसरीकडील नळीच्या रंध्रांतून वारा जात असतां त्या रंध्रावर बोटें ठेऊन वाजवणारा सूर काढीत असतो.

हुण्डिका–पैशांची हुंडी.

हेडादिखातें–मुख्य चार खात्यांतील शिल्लक ज्या पांचव्या खात्यांत जमा करतात तें खातें.

## क्ष

क्षत्ता–द्वारपाळ.

क्षांतिचरु–प्रायश्चित्त.

क्षेत्रपाल–क्षेत्राचें पालन करणारी देवता.

क्षेपणीय–दगडाचें क्षेपण करणारें यंत्र, गोफण.

क्षेमेंद्र–कंकालि नांवाच्या धंदेवाईक स्त्रीचें चरित्र वर्णन करणाऱ्या समयमातृका नांवाच्या ग्रंथाचा कर्ता.

## ज्ञ

ज्ञंमन्य–आपणाला शहाणा समजणारा.

मुद्रक—न. मो. जोशी, हिंद मुद्रणालय, आंग्रेवाडी, गिरगांव, मुंबई नं. ४.

स्थिति—अनाक्रमण.
स्थति—परत फिरणें.
प्रशस्तिपत्रें—प्रशस्तींपर कोरीवलेल देवळांत किंवा अन्यत्र ठेवलेलें.
प्रवासवेतन—प्रवासांत दिलेला सरकारी नोकरांचा भत्ता
प्रवेशभागिका—देशांत येणाऱ्या मालावर कर घेणाऱ्याचें काम.
प्राग्ज्योतिष—असामची ( कामरूपाची ) राजधानी.
प्रायोपवेश / प्रायोपवेशन } व्यक्तिशः अथवा सामुदायिक प्रकारें उपवास करणें. दाद लावून घेण्याचा हा एक मार्ग होता अशा घटनेची चौकशी करण्याकरतां राजाहि एक धर्माधिकारी नमी ह्याच्या नंतर राजा दाद लावी.

ब

बालभंजक—न्हावी
बाह्याली—राजसभेची पडवी.
बीजाश्व—वळू घोडा.
बोधिसत्व—अपराध्यावर न रागावणारे, उलट त्यांवर उपकार करणारे गतक्लेश असे जन.

भ

भक्तशाला—शिजवलेला भात वाटणारी अन्नछत्रें जिथें शिजवलेलें आयतें अन्न वाटण्यांत येतें
भाटक—भाडें
भाण्ड—विदूषक.
भाण्डपति—वणिज.
भीमस्वामी—विनायक देव.
भूतभारती—आगाशवाणी

म

मडवराज्य—श्रीनगरच्या वरच्या परगण्यास मडवराज्य म्हणतात. खालच्याला क्रमराज्य म्हणतत.
मण्डळ—इलाखा.
मण्डळेश्वर—इलख्याचा ( मण्डळाचा ) अधिकारी
मणिदीप—रत्नांच्या वातीचे दिवे.
मंगलोंकार—मंगळ असा ओनामा
मंख—लोकप्रकाशाचा कर्ता
मातृका—जन्म, मरण, सौंदर्य, इ. दींच्या अधिष्ठित देवता.
मातृचक्र—गूढ आकृति (दगडावर कोरलेली) उदाहरण देवीचक्र. श्रीचक्र इ.

मार्तंड—आदित्य.
...शाला
...—सर्व अश्वशाळेतील अश्वांचा सम्राट.

मुष्टिंपच—चिकट.
म्लेंछा—महंमदी धर्म स्वीकारलेले दरद लोक.

य

यष्टिधर / याष्टिक } यष्टि ( काठी ) धारण करणारा दण्डुक्यामारेकरी.
युग्य—शिबिका. मेणा.
यौनसंबंध—लग्न संबंध

र

रक्षामणि—दृष्टमणि. दृष्टीपासून रक्षण करणारा मणि.
राजगृह्य—राजगृहांतील ( राजवाड्यांतील ) सेवक.
राजबीजी—राजवंशीय लोक.
राजस्थान—मुख्य न्यायाधिशाची जागा.
राजानक—जवळ जवळ राजाचे सर्व अधिकार असलेला अधिकारी. हल्लीचा रिजन्ट
रूढ भारोढी—बेठ बिगार. रूढ असलेली भार वाहण्याची सक्तीची पद्धति.

ल

लवट—मालिक लवट नांवाचा खजिनदार.
लवन्य—पहा डामर
लौकिक अथवा सप्तर्षिशक—हा शक काश्मीरांत व त्याच्या आसपासच्या मुलखांत चालू आहे.
लेखहार—जासूद.
लोहर—काश्मीरच्या दक्षिण व पश्चिम भागांतील डोंगरी प्रान्त तेथील राजा जयसिंह हा भारद्वाज गोत्रांतला होता. त्याच्या वंशाला सार्थवाह अथवा शातवाहन म्हणतात

व

वक्त्रपट—तोंडावरील पदर.
वानरेंधन—जी लांकडे जाळल्याशिवाय पुढें ठेऊन नुसतें जवळ बसून वानर हिवाळ्यांत थंडीचें निवारण करूं शकतात अशीं लांकडें.
वारिक—पहारेकरी.
वितस्ता—झेलम नदी.
विचार वंध्या—चांगले विचार न प्रसवणारी.
विस्रंभ भवन—एकांतांत बसून विचार करण्याची जागा.
विहार—मठ
वृथा वृद्ध-वृद्धावस्थेपर्यंतहि सर्व आयुष्य व्यर्थ घालविलेला पुरुष
वेळावित्त—प्रसादवित्त मर्जीसंपादित करून वित्त मिळवलेला पुरुष.
वैयात्त—दंगा.
व्याज मूर्ख—आपण मूर्ख आहोंत अशी बतावणी करणारा

श

शतैकीय—शतांत एक.

शंकित } आरोपी.
शंकास्थान }

शाहीराजे–गझन सुलतानच्या पूर्वीचे काबूलच्या खोऱ्यांत (गान्धार प्रदेशांत) नवव्या. शतकापर्यंत असणारे हिंदु राजे हे मूळचे तुर्क होते.

शिक्षा–हिताच्या गोष्टी.

शिक्षाध्यायी–मतप्रचारक, म्होरका.

शिक्षिताक्षर–अक्षर ओळख असलेला. लिहितां वाचतां येणारा

शीलबहिष्कृत–शीलानें (सद्वर्तनानें) ज्याला बहिष्कार घातलेला आहे असा.

शीर्षक–मथळा.

शीर्षिका–लहान मथळा.

शुभोदर्क–ज्याचा शेवट चांगला आहे असा.

श्रमण–बौद्धसन्यासी.

श्रेयस्–जमा.

श्वपाक–हीनजातीचा. मूळार्थाप्रमाणें श्वानाचें मांस खाणारा.

स

समकार्य–दोघांचें कार्य एकच समजून केलेलें सह कार्य

संकट–डोंगरांतील घांटी.

संभृति–कोठार (धान्य भरून ठेवण्याचें)

सर्वाधिकारी–मुख्यप्रधान.

सादीमण्डळ–घोडेस्वाराची तुकडी.

स्थावर विलम्बि–कायम नेमणूक.

स्थूलोत्पत्ति–स्थावर उत्पन्न.

सिंधु–वितस्ता नदीचा सर्वांत मोठा फांटा.

सुखासिका–सुखी आहेस का असा प्रश्न.

स्वभावमहिमा–सृष्टिसौंदर्य.

स्थेय–न्यायाधीश.

स्पर्शसंचारी–केवळ स्पर्श झाल्यानें संचार पावणारा रोग.

स्त्रीचास्तन तोंडांत धरणें–मी तुझा मुलगा आहे असें शरण जाणें.

स्थिरकरणें–अधिकाराच्या जागेवर नोकरास कायम करणें

ह

हस्तमेलक–उभय सैन्याची समोरासमोर युद्ध जुंपणें.

हिमालयांत हिमविक्रय करणें–अगदीं फायदेशीर न होणारा असा व्यापार करणें. ही म्हण व Carrying gold to Lanka ही म्हण अशा समानार्थ आहेत.

हुडुका–वर वारा तोंडानें एकीकडे वारा भरण्यास नळी लावलेली चामड्याची पिशवी. वरच्या नळीनें तोंडांतील वारा आंत भरत असतां खाकेंत ती पिशवी धरून दाबली असतां दुसरीकडील नळीच्या रंध्रांतून वारा जात असतां त्या रंध्रावर बोटें ठेऊन वाजवणारा सूर काढीत असतो.

हुण्डिका–पैशांची हुंडी.

हेडादिखातें–मुख्य चार खात्यांतील शिल्लक ज्या पांचव्या खात्यांत जमा करतात तें खातें.

क्ष

क्षत्ता–द्वारपाळ.

क्षांतिचरु–प्रायश्चित्त.

क्षेत्रपाळ–क्षेत्राचें पालन करणारी देवता.

क्षेपणीय–दगडाचें क्षेपण करणारें यंत्र, गोफण.

क्षेमेंद्र–कंकालि नांवाच्या धंदेवाईक स्त्रीचें चरित्र वर्णन करणाऱ्या समयमातृका नांवाच्या ग्रंथाचा कर्ता.

ज्ञ

ज्ञंमन्य–आपणाला शहाणा समजणारा.

८५०९

मुद्रक—न. मो. जोशी, हिंद मुद्रणालय, आंग्रेवाडी, गिरगांव, मुंबई नं. ४.